# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—३/२/२०११

दि. ३/२/२०११ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

(१०)

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा गुरुवार दिनांक ३/२/२०११ रोजी सांयकाळी ४.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | सदस्यांची नावे | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर | सभापती |
| २ | श्री. जीवन (राजु) चंद्रभान इदनानी | सदस्य |
| ३ | श्री. रमेश महादेव चव्हाण | सदस्य |
| ४ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | सदस्य |
| ५ | श्री. धनंजय बाबुराव बोडारे | सदस्य |
| ६ | श्रीमती मिनाताई दिपक सोनेजी | सदस्या |
| ७ | श्रीमती पंचशिला नाना पवार | सदस्या |
| ८ | श्री अंकुश निवृत्ती म्हस्के | सदस्य |
| ९ | श्री. दिलीपकुमार देविदास जग्यासी | सदस्य |
| १० | श्री. सुंदर (बाबु) आसनदास मंगतानी | सदस्य |
| ११ | श्री. दत्तात्रय नारायण पवार | सदस्य |
| १२ | श्रीमती संगिता राजेश कंडारे | सदस्या |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्रीमती जया प्रकाश माखिजा, २. डॉ. निना प्रकाश नाथानी, ३. श्री. रविंद्र दशरथ बागुल, ४. श्रीमती सरोजीनी मुरलीधर टेकचंदानी

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्री. अशोक रणखांब, आयुक्त
२. श्री. विजयकुमार मसाळ, उप–आयुक्त
३. श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
४. श्रीमती संगिता धायगुडे, उप–आयुक्त, आरोग्य
५. श्री. प्रविणकुमार जैन, मुख्य लेखा अधिकारी
६. श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखा परिक्षक
७. श्री.जी.टी.जिंदे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी
८. श्री. एम.जी. गिरगांवकर, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
९. श्री. अली, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
१०. श्रीमती विजया कंठे, कर निर्धारक व संकलक
११. श्री. हरेश इदनानी, उप मुख्य लेखा अधिकारी
१२. डॉ. राजा रिझवानी, वैद्यकीय अधिकारी
१३. श्री. दिपक चिमनकारे, वाहन विभाग प्रमुख
१४. श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
१५. श्री. भास्कर मिरपगार, प्र.अग्निशमन अधिकारी
१६. श्री. संतोष लोणे, कनिष्ठ अभियंता, नासुके

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.

१. श्री. तानाजी पतंगराव
२. श्रीमती अमिता संखे
३. श्रीमती नर्गीस खान

सायंकाळी ४.३० वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. १** :– करांचे दर प्रस्तावित करणे व सन २०११–१२ साठी अर्थसंकल्पीय अंदाज तयार करणे.

---

सन २०१०–११ चे सुधारीत अर्थसंकल्पाचे अंदाज व सन २०११–१२ चे उत्पन्न व खर्चाचे आयुक्तांच्या अंदाजाची पुस्तिका आयुक्तांनी मा. सभापती स्थायी समिती यांना सादर केली. व आपले निवेदन वाचुन दाखविले.

<u>आयुक्त (श्री. अशोककुमार रणखांब):–</u> मी अशोककुमार रणखांब, आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका वित्तीय वर्ष २०११–१२ च्या अर्थसंकल्पासाठी मा. स्थायी समिती सभापती, सर्व सन्माननिय सदस्य यांचे स्वागत करतो. उल्हासनगर महानगरपालिकेत आयुक्त म्हणुन माझी शासनाने दिनांक १७/८/२०१० रोजी नेमुणक केली असून महानगरपालिकेचा १५ वा व माझ्या कारकिर्दीतील पहिला अर्थसंकल्प सादर करण्याचे सौभाग्य लाभले आहे.

उल्हासनगर शहराच्या अनेक जटील समस्या डोळयासमोर ठेवून उत्पन्न व खर्चाचा ताळमेळ साधण्याचा प्रयत्न करून वित्तीय वर्ष २०११–१२ चा अर्थसंकल्प तयार करणेसाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ मधील तरतुदीनुसार उत्पन्न व खर्चाचे अंदाज, कराधानासंबंधीचे प्रस्ताव, प्राथमिक शिक्षण निधीत महानगरपालिकेने घ्यावयाच्या अनुदानाची रक्कम तसेच महाराष्ट्र शासन व केंद्र सरकार यांचेकडुन वेळोवेळी देण्यात आलेल्या विकास कार्यासंबंधीच्या सुचना इत्यादीबाबींचा विचार करून सखोल अभ्यासाअंती वास्तववादी तपशिल आपणासमोर सादर करीत आहे.

महानगरपालिकेचा अर्थसंकल्प हा महानगरपालिकेने एका विशिष्ट अवधीत पार पाडावयाच्या उद्दिष्टांचा आराखडा असतो. त्यात नियोजन, नियंत्रण, प्रयोजन इत्यादी निरनिराळया प्रक्रियांचा समावेश आहे. अंदाजपत्रक हे महानगरपालिकेची अग्रता प्रतिबिंबीत करणारा व आवश्यक नियोजन दर्शविणारा महत्वाचा दस्तावेज असल्याने तो वास्तववादी व वस्तुस्थितीवर आधारीत आसावा याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

आयुक्त पदाची सुत्रे हाती घेतल्यावर प्रथम सर्व बाबींचा आढावा घेवून उत्पन्न वाढीबाबत लक्ष केंद्रीत केले आहे. महानगरपालिका उत्पन्नाचे मुख्य स्त्रोत जकात व मालमत्ता कर आहे. जकात वसुलीसाठी अभिकर्ताची नेमणुक करण्यात आल्यामुळे जकातीपासुन निश्चित उत्पन्न प्राप्त होत आहे. महानगरपालिकेच्या उत्पन्नाचा दुसरा मुख्य स्त्रोत मालमत्ता कर व पाणीपट्टी असल्याने त्याची जास्तीत जास्त वसुलीवर भर देण्यात आला आहे. मागील संपुर्ण वित्तीय वर्षात ३३ कोटीचे उत्पन्न मिळाले होते. चालु वर्षात मालमत्ता करापोटी आतापर्यंत ४० कोटी पेक्षा जास्त वसुली झाली आहे. आर्थिक वर्षाअखेर एक अभिमानास्पद वसुलीचा आकडा सांगण्याची संधी मला प्राप्त होणार आहे. वसुल करण्यात आलेल्या करातून हाती घेण्यात आलेल्या कामांना गती देण्यात आली असुन बहुतांश कामे पुर्णही झालेली आहेत.

## उद्यान विकास

सर्वप्रथम गौरवाची गोष्ट म्हणजे नुकतेच विर जिजामाता उद्यानाचे उद्घाटन करून त्याचा लोकार्पन सोहळा नुकताच पार पाडण्यात आला असुन नागरिकांना एक उच्च दर्जाचे उद्यान उपलब्ध करून देण्यात आले आहे.

## जेएनएनयुआरएम पाणी पुरवठा योजना

शहरात सुरू असलेल्या जेएनएनयुआरएम पाणी पुरवठा योजनेवर आतापर्यंत ३४ कोटी रक्कम खर्च झालेली आहे. याकामी शासनाकडुन आतापर्यंत १६ कोटी अनुदानाची रक्कम प्राप्त झाली असुन महानगरपालिकेने आपला अधिकतम हिस्सा १८ कोटी खर्च केला आहे. यामुळे एम.एम.आर.डी.ए मार्फत लवकरात लवकर निधी उपलब्ध होणार असल्याने सदर योजना विहीत कालावधीत कार्यान्वीत करण्यात येईल. त्यामुळे शहर पाणी टंचाई मुक्त होणार आहे.

## रस्ते विकास

उपलब्ध निधीतुन ज्या रस्त्यांच्या सिमेंट कॉक्रीटीकरणाच्या कामांना गती देण्यात आली आहे त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

१. ए ब्लॉक चौक ते शांतीनगर नाका. डॉल्फिन क्लबमार्गे, उल्हासनगर—३

२. पेट्रोल पंप ते ओ. टी सेक्शन उल्हासनगर—४

३. निरंकारी हॉल ते भारत चौक उल्हासनगर—१

४. बॅरेक नं. २०५८ ते टॅकर पॉईंट गायकवाड पाडा उल्हासनगर—५

५. व्हिनस सिनेमा ते नेताजी हायस्कुल उल्हासनगर— ४

तसेच पुढील रस्त्यांचे कामांची निविदा प्रक्रिया पुर्ण करण्यात आली असुन लवकरात लवकर काम सुरू करण्याचा मानस आहे.

१. सी ब्लॉक चौक गुरूद्वारा ते मधुबन हॉटेल पर्यंत उल्हासनगर—३

२. सेक्शन ३९ मार्गे दुधनाका ते गणेशनगर उल्हासनगर—५

३. राधास्वामी सतसंग हॉल ते साईबाबा मंदीर ऑडनन्स पहिले गेट पर्यंत उल्हासनगर—३

४. नेनुमल सोसायटी ते गुरूद्वारा आयोध्यानगर पर्यंत उल्हासनगर—३

५. स्वामी लीला शहा नारी शाळा मार्गे नागेश्वर मंदीर ते ओ. टी उल्हासनगर—४

६. बॅरेक नं. ए ४७७ ते ट्रान्सफॉर्मर मेथॉडी चर्च मार्गे वार्ड क्र. ५६

७. अण्णाभाऊ साठे चौक ते राजाई अपार्टमेंट संतोष नगर उल्हासनगर—३

८. कालीमाता मंदीरमार्गे गणेशनगर ते दुनिचंद कालानी स्कुल उल्हासनगर—५

## ऊर्जा, शोध व विकास केंद्र स्थापना

विद्युत विभागासाठी महानगरपालिका मुख्य इमारतीमध्ये दुसऱ्या मजल्यावर ऊर्जा, शोध व विकास केंद्राची निर्मिती करण्यात येत आहे. सदर केंद्र या आर्थिक वर्षात पुर्ण करून ते कार्यान्वीत करण्यात येईल. विद्युत विभागामार्फत करण्यात आलेली कामे उल्लेखनिय असुन याची सर्वांना जाणीव आहे. ऊर्जा, शोध व विकास केंद्र स्थापनेमुळे त्यांचे कार्यात भर पडेल.

## शहर सुशोभिकरण

शहराचे सुशोभिकरणाअंतर्गत १७ सेक्शन जवळ मेनका सोसायटीच्या बाजुला कारंजे सुरू करण्यात आले असुन त्यामुळे शहराच्या सौंदर्यात अधिकाधिक वाढ होत आहे. तसेच (१) कालीमाता मंदीर समोर (२) कैलास कॉलनी प्रवेशद्वारासमोर या दोन ठिकाणी कारंजे उभारण्याचे काम पुर्ण होत आहे. व ते लवकरात लवकर सुरू करण्यात येतील.

## दिशादर्शक फलक

उल्हासनगर शहराची ''औद्योगिक शहर'' म्हणुन गणना केली जात असल्याने शहरातील रस्त्यांची व ठिकाणांची माहिती प्राप्त होणेसाठी शहरात विविध ठिकाणी दिशादर्शक फलक लावण्यासाठी कार्यादेश निर्गमित केले आहेत. पुढील दोन महिन्यात मुंबई, ठाणे या महानगरपालिकांसारखे चित्र उल्हासनगर शहरात दिसुन येईल.

## प्रवेशद्वार

साईबाबा मंदीर जवळ, कल्याण अंबरनाथ रोड तसेच कैलास कॉलनी उल्हासनगर—५ येथील प्रवेशद्वारांची कामे वेगात सुरू असुन ती लवकरात लवकर पुर्ण करण्यात येईल यामुळे शांतीनगर प्रवेशाद्वाराप्रमाणे शहराच्या सौदर्यात भर पडेल.

## कर्मचारी प्रोत्साहन

महानगरपालिकेची कार्य व कर्तव्य पार पाडण्यासाठी सर्व कर्मचाऱ्यांचा मोठा सहभाग आहे. महानगरपालिकेच्या सर्व कर्मचा—यांना ६ वा वेतन आयोग लागु करण्यात आला आहे. त्याअनुषंगाने नियमित कर्मचारी व सेवा निवृत्त कर्मचारी यांना थकबाकीचे हप्तेही प्रतिमहा अदा करण्यात येत आहेत. महानगरपालिका आस्थापनेवर कार्यरत वर्ग ४ मधील बहुतांश कर्मचाऱ्यांना वर्ग ३ मध्ये विविध पदावर पदोन्नती देण्यात आलेली आहे. मालमत्ता कर व पाणीपट्टी व्यवस्थापन व वसुलीत उल्लेखनीय काम केलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन मा. महापौर यांचे हस्ते करण्यात आले आहे.

## इतर कार्य व कर्तव्य

एम.आय.डी.सी, शिक्षण मंडळ, पुरवठादार, कचरा वाहतुक ठेकेदार या सर्वांना नियमित रक्कम अदा करून महानगरपालिकेची कार्य व कर्तव्य व्यवस्थितरित्या पार पाडण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

त्याअनुषंगाने वर्ष २०१०—११ चे सुधारीत अंदाज रू. ३२१.९६ कोटी पर्यंत सिमित करण्यात आले आहेत.

## वित्तीय वर्ष २०११—१२ उत्पन्न बाजू

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६३ व ६६ अन्वये पार पाडावी लागणारी कार्य व कर्तव्ये, उत्पन्नाचे स्त्रोत, मागील वर्षाचे उत्पन्न, जेएनएनयुआरएम योजना या सर्व बाबींची शहानिशा करून वर्ष २०११—२०१२ करिता पुढीलप्रमाणे उत्पन्न अंदाजित करण्यात आले आहेत.

| लेखाशिर्ष | उत्पन्न | टक्केवारी |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| जकात | १२६.०८ कोटी | ५२ टक्के |
| मालमत्ता कर | ५२.३० कोटी | २२ टक्के |
| पाणीपट्टी | १९.५० कोटी | ८ टक्के |
| एम.आर.टी.पी अंतर्गत वसुली | १४.२७ कोटी | ६ टक्के |
| अनधिकृत बांधकाम नियमाधिन करणे | ०.५० कोटी | — |
| परवाने व इतर शुल्क इत्यादी | २.०८ कोटी | १ टक्के |
| अनुदाने | १२.१२ कोटी | ५ टक्के |
| इतर | १३.८७ कोटी | ६ टक्के |
| एकुण | २४०.७२ कोटी | १०० टक्के |
| जेएनएनयुआरएम | ९१.१० कोटी | |
| जेएनएनयुआरएम सह एकुण | ३३१.६२ कोटी | |

वित्तीय वर्ष २०११—१२ खर्च बाजू

| लेखाशिर्ष | उत्पन्न |
|---|---|
| पगार, भत्ते व इतर प्रशासकीय खर्च | ७६.२० कोटी |
| म.औ.वि.महामंडळ | ३३.४० कोटी |
| कर्ज परतफेड | ३५.९६ कोटी |
| दिवाबत्ती खाते | ६.०३ कोटी |
| सार्वजनिक आरोग्य | ८.९९ कोटी |
| शिक्षण मंडळ | १२.३५ कोटी |
| उदयाने | १.९५ कोटी |
| विपरीत परिस्थितीत व्यवस्थापन व अग्निशमन | ३.०३ कोटी |
| डिस्पेन्सरी व आरोग्य विषयक कार्यक्रम | १.६४ कोटी |
| पाणी पुरवठा | ६.८४ कोटी |
| भुयारी गटार | २.६६ कोटी |
| ड्रेनेज विभाग (जल नि:सारण) | ३.४५ कोटी |
| बांधकाम | २२.१३ कोटी |
| प्रभाग समिती | २.२८ कोटी |
| परिवहन सेवा | ००.१६ कोटी |
| शासकीय व इतर देणी | १९.१६ कोटी |
| इतर | १६.२० कोटी |
| एकुण | २५२.४३ कोटी |
| जेएनएनयुआरएम | १४०.६० कोटी |
| जेएनएनयुआरएम सह एकुण | ३९३.०३ कोटी |

एकुण अंदाजित उत्पन्न रू. ३३१.८२ कोटी
एकुण अंदाजित खर्च रू. ३९३.०३ कोटी
———————————
तूट रू. ६१.२१ कोटी

महानगरपालिकेच्या उत्पन्नाचे प्रमुख स्त्रोत जकात, मालमत्ता कर व पाणीपट्टी आहे. त्यातून प्राप्त होणारे उत्पन्न हे मर्यादीत आहे. महानगरपालिकेस जेएनएनयुआरएम योजनेत येत्या दोन ते तीन वर्षात रू. १०० कोटी गुंतवणूक करावयाची आहे. यापैकी रू. ६३ कोटी कर्ज उभारणी केली असल्याने त्याची व्याजासह कर्ज परतफेड करावयाची आहे. याशिवाय ई गर्व्हनस व बी.एस.यु.पी योजनेतही महानगरपालिकेचा हिस्सा गुंतवणूक करावयाचा आहे. उपरोक्त बाबी व महानगरपालिकेची इतर कार्य व कर्तव्य पार पाडणे ही बाब लक्षात घेता पुढीलप्रमाणे कर व दरवाढ प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

| अ क्र | कराचे नाव | सद्याचे प्रचलित दर (%) | प्रस्तावित वाढीव दर (%) | अंदाजित उत्पन्न |
|---|---|---|---|---|

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | मालमत्ता कर | | | १५.१६ कोटी |
| | अ) सामान्य कर | २६ | ३७ | |
| | ब) मलप्रवाह सुविधा लाभकर | २ | ४ | |
| | क) पाणी पुरवठा लाभकर | ४ | ६ | |
| | ड) मलप्रवाह कर | ६ | ८ | |
| | उ) पथकर | ७ | १० | |
| | इ) पाणीपट्टी कर | — | १० | |
| | फ) अग्निशमन कर | — | २ | |
| २ | पाणी पुरवठा दर | | | |
| | अ) आरसीसी व टियर गरडर बांधकाम | रू. १५० प्रतिमाह | रू. ५०० प्रतिमाह | ३७.९५ कोटी |
| | ब) पन्याचे छत व विट बांधकाम | रू. ७५ प्रतिमाह | रू. ३०० प्रतिमाह | |
| | क) लफाटा किंवा पन्याचे किंवा मातीचे बांधकाम | रू. ६० प्रतिमाह | रू. २०० प्रतिमाह | |
| | मिटरप्रमाणे पाण्याचे दर | | | |
| | अ) निवासी वापर | रू. १२ प्रति हजार लि. | रू. १६ प्रति हजार लि. | १.०० कोटी |
| | ब) वाणिज्य वापर | रू. २६ प्रति हजार लि. | रू. ३९ प्रति हजार लि. | |
| | क) औद्योगिक वापर | रू. २६ प्रति हजार लि. | रू. ३९ प्रति हजार लि. | |
| | ड) सार्वजनिक/धर्मदाय वापरासाठी | रू. १५ प्रति हजार लि. | रू. २७ प्रति हजार लि. | |
| ३ | टॅंकर भाडे | | | |
| | | — | रू. ३२० (७००० हजार लिटर क्षमता टॅंकर) | १.५० कोटी |
| | | | रू. ४५० (१०००० हजार लिटर क्षमता टॅंकर) | |
| ४ | जकात दर | प्रस्तावात नमुद | प्रस्तावात नमुद | ५.५५ कोटी |
| ५ | विविध सेवा शुल्क प्रस्ताव | प्रस्तावात नमुद | प्रस्तावात नमुद | ०.०५ कोटी |
| ६ | अग्निशमन विभागामार्फत देण्यात येणाऱ्या सेवा | प्रस्तावात नमुद | प्रस्तावात नमुद | ०.२५ कोटी |
| | **एकुण** | | | **६१.४६ कोटी** |

## शहरी गरीबांसाठी 'पी' अंदाजपत्रक

शहरातील गरीबांना रस्ते, पाणी पुरवठा, विद्युत, साफसफाई, सार्वजनिक आरोग्य स्वच्छता इत्यादी मुलभूत सुविधा व कल्याणकारी योजना राबविण्यासाठी स्वतंत्र अंदाज तयार करून त्यात रक्कम रूपये १७.७० कोटी तरतुद करण्यात आलेली आहे. या व्यतिरिक्त दलित वस्ती अनुदान, बी.एस.यु.पी योजना, निर्मल एम.एम.आर व सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना याद्वारेही शहरी गरिबांसाठी सोईसुविधा पुरविण्याची तरतुद अंदाजपत्रकात करण्यात आली आहे.

## महिला व बालकांसाठी कल्याणकारी योजना

महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार शहरातील महिला व बालकांच्या कल्याणासाठीयोजना राबविण्यासाठी रू. १.३० कोटी तरतूद करण्यात आली असुन मुख्य योजनांचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

१) महिलां व मुलींसाठी व्यावसायिक प्रशिक्षण योजना
२) बालवाडी, महिला लोकप्रतिनिधीसाठी काम व योजना प्रशिक्षण सहल आयोजन
३) दारिद्रय रेषेखालील मुलींचे शाळा गळतीचे प्रमाण थांबविणेसाठी प्रोत्साहन अनुदान
४) माध्यमिक (१०वी) व उच्च माध्यमिक (१२वी) परिक्षेत जास्त गुण प्राप्त झालेल्या विद्यार्थ्याचा गौरव
५) अंगणवाडी व बालवाडीसाठी विविध उपयोगी वस्तू पुरविणे
६) महिलांना स्वंय रोजगारासाठी साहित्य खरेदी
७) मुलींच्या शाळेत विविध क्रिडा सुविधा निर्माण करणे
८) उत्कृष्ट कामाबद्दल महिलांचा गौरव करणे
९) महिलांना कायदे व विधी विषयक सल्ला देणे
१०) सार्वजनिक ठिकाणी महिलासांठी प्रसाधनगृह बांधणे
११) दुर्बल घटकातील महिला व १० वर्षाच्या आतील मुलांना दृष्टीदोष उपचार मदत देणे
१२) महिला व मुलांसाठी विविध स्पर्धा आयोजन व प्रोत्साहन
१३) बागेतील मुलांसाठी खेळणी खरेदी

## राष्ट्रीय कार्यक्रम

राष्ट्रीय कार्यक्रम राबविण्यासाठी खालीलप्रमाणे तरतूद करण्यात आलेली आहे.

| | |
|---|---|
| १) अपंग व्यक्तींसाठी कल्याणकारी योजना | १५ लाख |
| २) डेंग्यू व हिवताप प्रतिबंधक उपाय | ५० लाख |
| ३) श्वान दंशावरील उपचार | १० लाख |
| ४) एड्स, टी.बी प्रतिबंधात्मक उपाय | १० लाख |
| ५) वेडे व कृष्ठरोगी कल्याण कार्यक्रम | १० लाख |
| ६) नसबंदी व लसीकरण मोहीम | १० लाख |

## अग्निशमन व आणीबाणी सेवा

महानगरपालिका क्षेत्रातील वाढती लोकसंख्या व उंच इमारती यांचा विचार करून आपतकालीन परिस्थितीत नागरिकांना तत्पर सेवा उपलब्ध होण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ, यंत्रसामुग्री व वाहनांची व्यवस्था करण्यात आली आहे. अग्निशमन विभागातील अधिकारी व कर्मचारी यांना आधुनिक स्वरूपाचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. अग्निशमन वाहने व साधन सामुग्रीची खरेदीसाठी रू. ४० लक्ष व देखभाल दुरूस्तीसाठी १८ लक्ष तरतुद करण्यात आली आहे. नवीन अग्निशमन केंद्राची उभारणीसाठी रू. १.२५ कोटी तसेच अग्निशमन वाहने खरेदीसाठी रू. १.२० कोटी अर्थसंकल्पात तरतुद करण्यात आली आहे.

## राजीव आवास योजना

केंद्र शासनाने बी.एस.यु.पीच्या धर्तीवर राजीव गांधी आवास योजनेअंतर्गत झोपडपट्टी मुक्त भारत बनविण्यासाठी झोपडपट्टयाचे पुर्नवसन करून त्याजागी पक्की घरे बांधण्यासाठीची योजना जाहीर केलेली आहे. त्याअनुशंगाने मागील महिन्यात हैदराबाद येथे आयोजित कार्यशाळेत भाग घेण्यात आला होता. यामध्ये उल्हासनगर महानगरपालिकेसही आपला प्रस्ताव सादर करणेस परवानगी प्राप्त झाली आहे. त्याअनुशंगाने आराखडा तयार करणेसाठी महानगरपालिकेने अर्थसंकल्पात रू. ३ कोटीची तरतूद केली आहे.

## भांडवली मुल्य यावर आधारीत मालमत्ता कर आकारणी

सद्यस्थितीत शहरात अस्तित्वात असलेल्या इमारतीचे किंवा जमिनीचे क्षेत्रफळ, बांधकाम प्रकार, मिळकतीचा वापर व परिसरातील उपलब्ध मुलभूत सोयीसुविधा यावर आधारीत करयोग्य मुल्यावर मालमत्ता कराची आकारणी करण्यात येत आहे. सदर कर प्रणालीनुसार कोणत्याही इमारती व जमिनीचे निश्चित करण्यात आलेले करयोग्य मुल्य जोपर्यंत इमारती व जमिनीचे उक्त करपात्र बाबींत बदल होत नाही तोपर्यंत कायम राहते.

यामुळे एकाच परिसरात असलेल्या दोन सारख्या मिळकतींचे कर आकारणीत असमानता निर्माण होते.

ही असमानता दुर करणे व कर व्यवस्थापनाचे सुलभीकरण यासाठी करयोग्य मूल्य ऐवजी भांडवली मूल्यावर आधारीत मालमत्ता कर आकारणी करणेसाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये सुधारणा करून मुभा देण्यात आली आहे. त्याअनुशंगाने उल्हासनगर क्षेत्रात करयोग्य मूल्य ऐवजी भांडवली मूल्यावर आधारीत मालमत्ता कर आकारणी करणेसाठी प्रारूप विनियम व करांचे मंजुरीकरीता सादर करण्यात आले आहेत.

## परिवहन सेवा

उल्हासनगर महानगरपालिकेने खाजगी अभिकर्तामार्फत दिनांक २७ जानेवारी २०१० रोजी परिवहन सेवेचा शुभारंभ केला आहे. सुरूवातील २ बस सुरू करण्यात आल्या होत्या. परिवहन सेवेच्या ताफयात आणखी १३ बसेसची भर घालून एकुण १५ बस उल्हासनगर, बदलापूर, अंबरनाथ व कल्याण इत्यादी शहरांसाठी उल्हासनगर महानगरपालिकेची परिवहन सेवा सुरू करण्यात आली आहे. परिवहन सेवेमध्ये आणखी १५ नवीन बस मार्च २०११ अगोदर सामील होणार आहेत. त्यामुळे नागरिकांना सवलतीच्या दरात परिवहन सेवा उपलब्ध झाली आहे. तसेच शहराच्या वाहतुक व पर्यावरण समस्येंवर अनुकूल परिणाम होईल.

## इतर बाबी

शहरात पुरविण्यात येणाऱ्या सर्व सेवा सुविधांसाठी उदा. साफसफाई, विद्युत रोशनाई, जलमल नि:सारण, पाणीपुरवठा, अग्निशमन सेवा, कर्ज परतफेड, कर्मचारी पगार व भत्ते तसेच इतर प्रशासकीय बाबींसाठी योग्य ती तरतूद अंदाजपत्रकात करण्यात आलेली आहे. शहराच्या विकासासाठी नागरिकांचे सहकार्य तसेच आपल्या सर्वांचा सहभाग महत्वाचा असल्याने सुधारीत व मुळ अर्थसंकल्पीय अंदाज व करवाढ प्रस्तावित केल्याप्रमाणे स्विकारण्यात यावी अशी मी मा. स्थायी समितीस आग्रहाची विनंती करीत आहे.

धन्यवाद!!

यावेळी सदस्य श्री. दत्तात्रय पवार यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>काही सदस्य :</u>—यावर सविस्तर अभ्यास करण्यासाठी सभा स्थगित करावी लागेल.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे:</u>—सभा स्थगित तर करावीच लागेल. सर्व पक्षांच्या गटनेत्यांची बैठक घेवुन संमती तयार करावी लागेल.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:</u>—करांचे दर निश्चित करायचे आहेत.

यावेळी सदस्य श्री. रमेश चव्हाण हे सभागृहातुन बाहेर गेले.

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी:</u>—ही सभा स्थगित करुन दिनांक १०/२/२०१० रोजी ठेवली जावी.

<u>सदस्य श्री. अंकुश म्हस्के:</u>—आपण येथे मोठया अभिमानाने सांगतो की, शांतीनगर येथे आम्ही छत्रपती शिवाजी महाराज यांचे नावे एक प्रशस्त प्रवेशद्वार बांधले आहे. परंतु त्या प्रवेशद्वारावर अश्लील पोस्टर लावले जातात. त्यामुळे शहराचे नाव खराब होत आहे.

**सदस्य श्री. जीवन इदनानी :–**शहरात विना परवानगी लावण्यात येणारे बॅनर्स, पोस्टर्स, कटआउट्स हटविण्याकामी सहा. आयुक्त, उप–आयुक्त यांना कोणतेही अधिकार नाहीत असे माझ्या ऐकिवात आले आहे. मी स्वतः सहा. आयुक्तांना चार वेळा सांगितले होते की, महापालिका मुख्यालयाच्या प्रवेशद्वारासमोरील स्वामी विवेकानंद यांच्या पुतळयाच्या बाजुस चार,पाच मोठ मोठे पोस्टर्स कटआउट्स लावले आहेत त्यामुळे या परिसराचे विद्रुपीकरण झाले असून ते पोस्टर्स त्वरीत हटविले जावे. त्याबाबतीत त्यांचे म्हणणे आहे की, ते पोस्टर याचे आहे, त्याचे आहे, अशा प्रकारे ते पोलिटीकल व्हीव सांगत आहेत.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–**शहरामध्ये विविध राजकिय पक्षांच्या जे काही बॅनर्स पोस्टर्स लागलेले आहेत ते काढण्यासाठी एक ठराव तयार करु या.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे:–**विना परवानगी लावण्यात आलेले बॅनर्स, पोस्टर्स हटविणे हे प्रशासनाचे काम आहे त्यामध्ये कुणी आड येत असेल तर त्यास सरळ करा. ते पोस्टर्स हटविण्यासाठी ठरावाची आवश्यकता नाही. ठरावाची आवश्यकता कधी लागली असती जेव्हा ठराव करुन परवानगी घेवुन पोस्टर्स किंवा बॅनर्स लावण्यात आले असते. हे जे पोस्टर्स लावण्यात आलेले आहेत ते परवानगी न घेता बेकायदेशीरपणे लावण्यात आले असल्याने ते त्वरीत काढुन टाकण्यात यावेत. त्यासाठी ठरावाची आवश्यकता नाही.

सांयकाळी ५.०० वाजंता सभेचे कामकाज स्थगित केल्याचे सभापती श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

.

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—१०/२/२०११

दि. १०/२/२०११ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

१०—अ

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा गुरुवार दिनांक ३/२/२०११ रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित केलेली सभा स्थगित केल्याने सदरची सभा गुरुवार दिनांक १०/२/२०११ रोजी सांयकाळी ४.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | सदस्यांची नावे | पदनाम |
|---|---|---|
| १ | **श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर** | **सभापती** |
| २ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | सदस्या |
| ३ | श्री. जीवन (राजु) चंद्रभान इदनानी | सदस्य |
| ४ | श्री. रमेश महादेव चव्हाण | सदस्य |
| ५ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | सदस्य |
| ६ | श्री. धनंजय बाबुराव बोडारे | सदस्य |
| ७ | श्रीमती मिनाताई दिपक सोनेजी | सदस्या |
| ८ | श्रीमती पंचशिला नाना पवार | सदस्या |
| ९ | डॉ. निना प्रकाश नाथानी | सदस्या |
| १० | श्री अंकुश निवृत्ती म्हस्के | सदस्य |
| ११ | श्री. रविंद्र दशरथ बागुल | सदस्य |
| १२ | श्री. दिलीपकुमार देविदास जग्यासी | सदस्य |
| १३ | श्री. सुंदर (बाबु) आसनदास मंगतानी | सदस्य |
| १४ | श्री. दत्तात्रय नारायण पवार | सदस्य |
| १५ | श्रीमती सरोजीनी मुरलीधर टेकचंदानी | सदस्या |

| | | |
|---|---|---|
| १६ | श्रीमती संगिता राजेश कंडारे | सदस्या |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

खालील अधिकारी सभेस हजर होते.
१७. श्री. अशोक रणखांब, आयुक्त
१८. श्री. विजयकुमार मसाळ, उप–आयुक्त
१९. श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
२०. श्रीमती संगिता धायगुडे, उप–आयुक्त, आरोग्य
२१. श्री. प्रविणकुमार जैन, मुख्य लेखा अधिकारी
२२. श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखा परिक्षक
२३. श्री.जी.टी.जिंदे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी
२४. श्री. एम.जी. गिरगांवकर, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
२५. श्री. अली, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
२६. श्रीमती विजया कंठे, कर निर्धारक व संकलक
२७. श्री. हरेश इदनानी, उप मुख्य लेखा अधिकारी
२८. डॉ. राजा रिझवानी, वैद्यकीय अधिकारी
२९. श्री. दिपक चिमनकारे, वाहन विभाग प्रमुख
३०. श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
३१. श्री. भास्कर मिरपगार, प्र.अग्निशमन अधिकारी
३२. श्री. संतोष लोणे, कनिष्ठ अभियंता, नासुके

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.
१. श्री. तानाजी पतंगराव
२. श्रीमती अमिता संखे
३. श्रीमती नर्गीस खान

सांयकाळी ४.३० वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.**काही सदस्य:–**पास,पास.......

**सभापती, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:–**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

सांयकाळी वाजंता सभेचे कामकाज संपल्याचे सभापती श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः– २१/२/२०११

दि. २१/२/२०११ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

११

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा सोमवार दिनांक २१/२/२०११ रोजी सांयकाळी ४.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | सदस्यांची नावे | पदनाम |
|---|---|---|
| १ | **श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर** | **सभापती** |
| २ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | सदस्या |
| ३ | श्री. जीवन (राजु) चंद्रभान इदनानी | सदस्य |
| ४ | श्री. रमेश महादेव चव्हाण | सदस्य |
| ५ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | सदस्य |
| ६ | श्री. धनंजय बाबुराव बोडारे | सदस्य |
| ७ | श्रीमती मिनाताई दिपक सोनेजी | सदस्या |
| ८ | श्रीमती पंचशिला नाना पवार | सदस्या |
| ९ | डॉ. निना प्रकाश नाथानी | सदस्या |
| १० | श्री. रविंद्र दशरथ बागुल | सदस्य |
| ११ | श्री. सुंदर (बाबु) आसनदास मंगतानी | सदस्य |
| १२ | श्री. दत्तात्रय नारायण पवार | सदस्य |
| १३ | श्रीमती सरोजीनी मुरलीधर टेकचंदानी | सदस्या |
| १४ | श्रीमती संगिता राजेश कंडारे | सदस्या |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्री अंकुश निवृत्ती म्हस्के, २. श्री. दिलीपकुमार देविदास जग्यासी

श्री. विजयकुमार म्हसाळ उप–आयुक्त, मुख्यालय हे आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ होते.

खालील अधिकारी सभेस हजर होते.

३३.श्री. विजयकुमार म्हसाळ, उप–आयुक्त
३४.श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
३५.श्री. संतोष देहेरकर, उप–आयुक्त
३६.श्रीमती संगिता धायगुडे, उप–आयुक्त
३७.श्री. प्रविणकुमार जैन, मुख्य लेखा अधिकारी
३८.श्री. जी.टी. जिंदे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी
३९.श्रीमती विजया कंठे, कर निर्धारक व संकलक
४०.श्री. एम.जी. गिरगावकर, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
४१.श्री. ह.न. जमादार, उप मुख्य लेखा परिक्षक
४२.श्री. आर.बी.शिर्के, कार्यकारी अभियंता, स्थापत्य
४३.डॉ. राजा रिझवानी, वैद्यकीय अधिकारी
४४.श्री. दिपक चिमनकारे, वाहन विभाग प्रमुख
४५.श्री. बबीश गंगारामानी, उप अभियंता
४६.श्री. भास्कर मिरपगारे, प्र. अग्निशमन अधिकारी
४७.श्री. जी.जी. हिबारे, प्र. सहा– आरोग्य अधिकारी
४८.श्री. नंदु समतानी, मुख्य लिपिक
४९.श्री. राजेश घनघाव, लिपिक, मालमत्ता

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.

१. श्री. तानाजी पतंगराव
२. श्रीमती अमिता संखे
३. श्रीमती नर्गीस खान

सायंकाळी ४.२० वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ **<u>विषय क्र. १ </u>**:– मागील सभेचे दिनांक १४/१२/२०१० व दिनांक ३/२/२०११ (त्यात दिनांक १०/२/२०११) रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>सभापती, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:–</u>मागील सभेचे दिनांक १४/१२/२०१० व दिनांक ३/२/२०११ (त्यात दिनांक १०/२/२०११) रोजीचे इतिवृत जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. १** :– मागील सभेचे दिनांक १४/१२/२०१० व दिनांक ३/२/०११(त्यात १०/२/२०११) रोजीचे इतिवृत्त कायम करणे

सूचकाचे नांव : श्रीमती निना नाथानी

अनुमोदकाचे नांव : श्रीमती संगिता कंडारे

स्थायी समिती ठराव क्र. :–१०८ अ                                        दिनांक : – २१/२/२०११

ही स्थायी समिती महापालिका सचिवांनी प्रस्तृत केलेले दिनांक १४/१२/२०१० रोजीचे पृष्ठ क्र. १ ते ६ पर्यंतचे व दिनांक ३/२/११ (त्यात १०/२/२०११) रोजीचे पृष्ठ क्र. १ ते ७९ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. २ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. २ :–** भांडार विभागास सन २०१०–११ करीता लागणारी वार्षिक स्टेशनरी साहित्य पुरविणेकामी बाबनिहाय लघुत्तम दराच्या निविदाकाराशी केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

---

सदस्य श्री. धनंजय बोडारेः–भांडार विभागाची आताची परिस्थिती काय आहे? दिनांक ९/६/२०१० रोजी तुम्ही निविदा मागविली होती, भांडार विभागाचे कुणी संबंधीत अधिकारी येथे उपस्थित आहे का? खर्च केलेला आहे का?

महापालिका सचिव :–होय. निविदाकाराशी केलेल्या संविदेची माहिती नोंद करायची आहे.

काही सदस्यः–पास,पास.......

सभापती, श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः–सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. २ :–** भांडार विभागास सन २०१०–११ करीता लागणारी वार्षिक स्टेशनरी साहित्य पुरविणेकामी बाबनिहाय लघुत्तम दराच्या निविदाकाराशी केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

प्रस्तावना

महापालिकेच्या भांडार विभागास सन २००१०–११ करीता लागणारी वार्षीक स्टेशनरी साहित्य पुरवठा करणे बाबतच्या प्राप्त प्रस्तावास व भांडार विभागाव्दारे सादर केलेल्या टिपणीस लेखा शाखा व मा आयुक्त सो. यांचे दिनांक २४/०५/१० च्या मान्यतेनुसार जाहिर निविदा सुचना ही दिनांक ०२/०६/२०१० रोजीच्या दै. फ्री प्रेस जर्नल, दै. नगरन्युज, दै. आपला महानगर हया वृत्त पत्रामध्ये प्रसारीत करण्यात आली होती.त्या अनुषंगाने दिनांक ०२/०६/१० ते ०९/०६/१० या कालावधी मध्ये खालील प्रमाणे पुरवठादारांनी/निविदाकारांनी निविदा फार्मस विकात घेतले होते.

| अनु. क्र | पुरवठादारांचे नाव | पावती क्र | दिनांक |
|---|---|---|---|
| १ | मे माउंट मेरी एंटरप्रायजेस, उल्हासनगर–३ | ३५४५ | ०९/०६/१० |
| २ | मे मोहित एंटरप्रायजेस, उल्हासनगर–३ | ३५४७ | ०९/०६/१० |
| ३ | मे श्रुति प्रिंटर्स, उल्हासनगर–३ | ३५४९ | ०९/०६/१० |
| ४ | मे. अमरज्योत एंटरप्रायजेस, उल्हासनगर–३ | ३५५१ | ०९/०६/१० |

उपरोक्त ०१ ते ०४ पुरवठादारांनी आपल्या सिलबंद निविदा आवश्यक त्या दस्त ऐवजासह दिनांक १०/०६/१० रोजी दुपारी ३.०० वाजे पर्यत भांडार विभागात सादर केल्या होत्या. प्राप्त पुरवठादारांच्या सिलबंद निविदा हया आज दिनांक १८/०६/१० रोजी २.३० वाजता उप–आयुक्त(मु) यांच्या दालनामध्ये उपस्थित निविदाकार, मुख्य लेखा अधिकारी, मुख्य लेखा परिक्षक यांच्या उपस्थितीमध्ये उघडण्यात आल्या होत्या.

अनु क्र ०१ ते ०४ यांचे पाकीट क्र १ प्रथम उघडण्यात येऊन निविदेच्या अटी व शर्ती नुसार पाकीट क्र १ मध्ये आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता केलेली असल्याने अनु क्र ०१ ते ०४ यांचे पाकीट क्र २ उघडण्यात आले निविदाकारांनी सादर केलेल्या दरामध्ये वाटाघाटी करण्यात येऊन वाटाघाटीअंती पुरवठादारांनी सादर केलेल्या दराचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला तो सोबत जोडला आहे. तुलनात्मक तक्त्यांची पहाणी केली असता.

१) मे. मोहित एंटरप्रायजेस, उल्हासनगर–३ यांनी निविदेत सादर केलेले अनु. क्र ३०,६९,७०,८३,८४,८५ स्टेशनरी साहित्याचे दर न्युनतम असुन वाजवी आहेत. सदर न्यनतम दराने स्टेशनरी साहित्य खरेदीसाठी रुपये २,३७,८७५/– येवढा खर्च येणार आहे.

२) मे. श्रुति प्रिटर्स, उल्हासनगर–३ यांनी अनु.क्र ५० व ८१ स्टेशनरी साहिंत्याच्या वाटाघाटी अंती निविदेत सादर केलेले अनु. क्र १४,१५,२०,२१,२२,३१,३३,४२,४३,४९,५०,५७,८०,८१, ८२,८६,८७,८८,९२ स्टेशनरी साहित्याचे दर न्युनतम असुन वाजवी आहेत. सदर न्यनतम दराने स्टेशनरी साहित्य खरेदीसाठी रुपये २,७१,४२५/– येवढा खर्च येणार आहे.

३) मे. अमरज्योत एंटरप्रायजेस, उल्हासनगर–३ यांनी अनु. क्र ४ स्टेशनरी साहिंत्याच्या वाटाघाटी अंती निविदेत सादरकेलेले अनु. क्र २,४,१०,११,१२,१३,४४,४५,४६,४७,४८,६६,६७ ,७१,८२,८६,८७,८८,९२ स्टेशनरी साहित्याचे दर न्युनतम असुन वाजवी आहेत. सदर न्यनतम दराने स्टेशनरी साहित्य खरेदीसाठी रुपये २,२६,५००/– येवढा खर्च येणार आहे. .

३) मे. माउंटमेरी एंटरप्रायजेस, उल्हासनगर–३ यांनी अनु. क्र २६,३७,५६,६१,६३ व ९१ स्टेशनरी साहिंत्याच्या वाटाघाटी अंती निविदेत सादरकेलेले अनु.क्र १,३,५,६,७,८,९,१६,१७, १८,१९,२३,२४,२५,२६,२७,२८,२९,३२,३४,३५,३६,३७,३८,३९,४०,४१,५१,५२,५३,५४,५५,५६,५८,५९,६०,६१,६२,६३,६४,६५,६८,७२,७३,७४,७५,७६,७७,७८,७९,८९,९०,९१ स्टेशनरी साहित्याचे दर न्युनतम असुन वाजवी आहेत. सदर न्यनतम दराने स्टेशनरी साहित्य खरेदीसाठी रुपये २,३५,२६५/– येवढा खर्च येणार आहे. .

उपरोक्त अनु. क्र ०१ ते ९१ स्टेशनरी साहित्याचे पुरवठादारांनी सादर केलेले दर वाजवी आहेत. सदर वाजवी दराने स्टेशनरी साहित्य खरेदी करण्याकरीता एकुण रुपये ९,७१,०६५/– (नऊ लाख एक्काहत्तर हजार पासंष्ठ मात्र) खर्च होणार आहे.

सबब उपरोक्त पुरवठादारांनी सादर केलेले दर स्विकृत करण्यात येउन सदरचे स्टेशनरी साहित्य खरेदीसाठी लागणारी रक्कम रुपये ९,७१,०६५/– हे वित्तीय वर्ष २०१०–११ अंदाजपत्रकामधील स्टेशनरी साहिंत्य खरेदी लेखा शिर्ष AB A-3 (1) मध्ये १६,००,०००/– तरतुद करण्यात आली असुन पुरेशी तरतुद शिल्लक असल्यामुळे सदरचा खर्च भांगविता येईल.

तरी सदरचा प्रस्ताव मंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ७३(ड) अन्वये मा. स्थायी समितीसमोर माहितीसाठी सविनय सादर.

स्थायी समिती ठराव क्र. १०९ — दिनांक:– २१/२/२०११

सुचकाचे नाव :– श्रीमती निना नाथानी

अनुमोदकाचे नाव :– श्रीमती संगिता कंडारे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार भांडार विभागास सन २०१०–११ करीता लागणारी वार्षिक स्टेशनरी साहित्य पुरविणेकामी प्रशासनाने बाबनिहाय लघुत्तम दराच्या निविदाकाराशी केलेल्या संविदेची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

महापालिका सचिव :– विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ३ :–** विद्युत विभागा अंतर्गतच्या चार विविध कामांच्या सविंदेची माहिती नोंद करणे.

---

काही सदस्य :–पास–पास……

सभापती, श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः–सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

**विषय क्र. ३ :–** विद्युत विभागा अंतर्गतच्या चार विविध कामांच्या सविंदेची माहिती नोंद करणे.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिका विद्युत विभागाचे कामास दिलेल्या मंजुरीची माहीती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ ( ड ) नुसार पुढील प्रमाणे देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | मंजुर निवीदा रक्कम | कराराचा दिनांक | एजंन्सीचे नांव |
|---|---|---|---|---|
| १ | उल्हासनगर उल्हासनगर महानगरपालिकाच्या क्षेत्रातील उल्हासनगर ४ मघिल सतोष नगर येथिल समाज मंदिराच्या विद्युत व्यवस्थे साठी. | १,५०,०००/– | २०/०८/२०१० | में.साई लम्क्षी मजूर कामगार सहकारी संस्था मर्या.ता. अंबरनाथ जि.ठाणे. |
| २ | वित्तीय वर्ष २०१० – २०११ करिता मार्ग प्रकाशा साठी उभारलेल्या सोडीयम दिवाबत्तीची देखभाल व दुरुस्ती साठी लागणारे साहीत्य खरेदी. | ९,९९,८००/– | १८/०९/२०१० | में.मेहता ट्रेडर्स |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | वित्तीय वर्ष २०१० – २०११ करिता स्वयंचलीत स्विचींग पॉईट निगा व दुरुस्ती साठी लागणारे साहीत्य खरेदी | २,४९,४५०/– | २०/०९/२०१० | मे.मेहता ट्रेडर्स |
| | | २,४९,४५०/– | २०/०९/२०१० | मे.बी.के.इलेट्रीकल |
| | | ४,९९,१००/– | २८/०९/२०१० | मे.हटर्स ट्रॅनझीस्को |
| ४ | वित्तीय वर्ष २०१० – २०११ करिता मार्ग प्रकाशा साठी उभारलेल्या दिवाबत्तीची देखभाल व दुरुस्ती साठी लागणारे साहीत्य खरेदी. | ३,८७,०७०/– | २८/१२/२०१० | मे.मेहता ट्रेडर्स |
| | | ३४,८२५/– | २८/१२/२०१० | मे.शारदा इंउट्रीट |
| | | ६४,९००/– | २८/१२/२०१० | मे. मोहित इन्ट्रप्राईज |
| | | १,२८,०००/ | २८/१२/२०१० | मे.दशमेश केबलस |
| | | ८४,२५०/ | २८/१२/२०१० | मे.साईदिप इन्ट्रप्राईज |

तरी सदरची माहीती स्थायी समिती अवलोकनार्थ प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ११० — दिनांकः– २१/२/२०११

सुचकाचे नाव :– श्रीमती पंचशिला पवार

अनुमोदकाचे नाव :– श्री. रमेश चव्हाण

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार विद्युत विभागा अंतर्गतच्या चार विविध कामांच्या प्रशासनाने उल्लेखलेल्या ठेकेदाराशी केलेल्या सविंदेची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्रमांक. ४ वाचून दाखवितात.

---

**विषय क्र. ४ :—** मोकाट डुकरे पकडणे व त्यांना शहराबाहेरील निर्जन्य ठिकाणी सोडण्याकामी मेहतर समाज बेरोजगार उत्थान सेवा संस्था, उल्हासनगर यांच्याशी केलेल्या सविंदेची माहिती नोंद करणे.

---

काही सदस्य :—पास—पास......

सभापती, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ४ :—** मोकाट डुकरे पकडणे व त्यांना शहराबाहेरील निर्जन्य ठिकाणी सोडण्याकामी मेहतर समाज बेरोजगार उत्थान सेवा संस्था, उल्हासनगर यांच्याशी केलेल्या सविंदेची माहिती नोंद करणे.

प्रस्तावना

आरोग्य विभागाकडुन मागविण्यात आलेल्या मोकाट डुक्करे पकडणे व त्यांना शहरातबाहेर निर्जन्य ठिकाणी सोडणेबाबतची निविदा सुचना दि. १४/९/२०१० रोजी दै. वार्ताहर व दै. दोपहर का सामना या वर्तमानत्रात प्रसिध्द करण्यात आली होती. विहीत मुदतीत एकूण ३ निविदाकारांनी निविदा मुल्य अदा करुन निविदा खरेदी केल्या होत्या तसेच विहित मुदतीत निविदाकारांनी निविदा या कार्यालयास सादर केल्या होत्या. प्राप्त ३ निविदा दि. २७/९/२०१० रोजी दुपारी ४.०० वाजता उप — आयुक्त (आरोग्य) यांचे दालनात मुख्य लेखा अधिकारी, मुख्य लेखा परिक्षक यांचे उपस्थितीत तसेच निविदाकारांचे उपस्थितीत उघडण्यात आल्या.

तरी पात्र निविदाधारकांमधील प्राप्त झालेल्या न्युनतम निविदाकाराशी दरांबाबत लगेचच वाटाघाटी करण्यात आल्या. वाटाघाटी अंती प्राप्त झालेल्या दराचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | कामाचा तपशील | परीमाण | निविदाधारकाचे नाव व त्यांचे प्राप्त दर | | | वाटाघाटी अंती प्राप्त दर प्रति नग रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | चंदा मजूर का.स.संस्था | कपिलेश्वर मजूर का.स. संस्था | मेहतर समाज बेरोजगार उत्थान सेवा संस्था | |
| १ | शहरातील मोकाट डुकरे पकडणे व त्यांना शहराबाहेरील निर्जन्य ठिकाणी सोडणे. | २०१६ | २७५/— | ३००/— | २१०/— | १९०/— |

तरी उक्त नमुद कामाच्या तपशीलानुसार दर्शविलेल्या परीमाणानुसार डुक्करे पकडून निर्जन्य स्थळी सोडण्यासाठी रुपये ३,८३,०४०/— (तिन लाख त्र्याऐंशी हजार चाळीस मात्र.) खर्च अपेक्षित आहे. (डुक्करांची संख्या कमी अथवा जास्त होवू शकते.) तरी न्युनतम दर सादर करणारे मेहतर समाज बेराजगार उत्थान सेवा संस्था, उल्हासनगर यांच्याशी संविदा करुन कार्यादेश देण्यात आले आहे. तद्नंतर सदरचा प्रस्ताव मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये मा. स्थायी समितीसमोर माहितीकरिता सविनय सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १११ दिनांकः— २१/२/२०११

सुचकाचे नाव :— श्रीमती पंचशिला पवार

अनुमोदकाचे नाव :— श्री. रमेश चव्हाण

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार मोकाट डुकरे पकडणे व त्यांना शहराबाहेरील निर्जन्य ठिकाणी सोडण्याकामी मेहतर समाज बेरोजगार उत्थान सेवा संस्था, उल्हासनगर यांच्याशी केलेल्या सविंदेची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ५ :—** विद्युत विभागा अंतर्गतच्या चार विविध कामांच्या सविंदेची माहिती नोंद करणे.

---

काही सदस्य :—पास—पास......

सभापती, श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ५ :—** विद्युत विभागा अंतर्गतच्या चार विविध कामांच्या सविंदेची माहिती नोंद करणे.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिका विद्युत विभागाचे कामास दिलेल्या मंजुरीची माहीती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ ( ड ) नुसार पुढील प्रमाणे देण्यात येत आहे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्र क्रमांक २ मधील,गजानन मार्केट मधिल खराब झालेले दिवे बदलि करणे. | ६०,०००/— | ०१/०१/२०११ | में.लक्ष्मीकृपा मजूर कामगार सहकारी संस्था मर्या.ता. उल्हासनगर जि.ठाणे. |
| २ | उल्हासनगर महानगरपालिका उल्हासनगर — ३ येथील मुख्यालयातील टेलिफोन व विदयुत वायरींग करण्या करीता | ७,९५,०००/— . | ०१/०१/२०११ | में.आशा मजूर कामगार सहकारी संस्था मर्या.ता. उल्हासनगर जि.ठाणे. |
| ३ | उल्हासनगर म.न.पा.च्या क्षेत्रातील उल्हासनगर ५ येथील येथील वॉड कमिटी ऑफीसची —४, ची जुनी वायरींग व जुने विद्युत साहीत्य बदली करणे . | १,१०,०००/— | ०१/०१/२०११ | में.महालक्ष्मी मजूर कामगार सहकारी संस्था मर्या.ता. उल्हासनगर जि.ठाणे. |
| ४ | उ.म.पा.क्षेत्रातील उल्हासनगर — ४ व ५ मध्ये बसविलेल्या दिव्यांची पावसाळया पूर्वी देखभाल व दुरुस्ती करण्या साठी तसेच खराब झालेले दिवे बदलि करणे | ७,९०,०००/— . | ०१/११/२०१० | में.भिमरत्न मजूर कामगार सहकारी संस्था मर्या.ता. अंबरनाथ जि.ठाणे. |

तरी सदरची माहीती स्थायी समिती अवलोकनार्थ प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ११२ दिनांक:— २१/२/२०११

सुचकाचे नाव :— श्रीमती निना नाथानी

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती संगिता कंडारे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार विद्युत विभागा अंतर्गतच्या चार विविध कामांच्या प्रशासनाने उल्लेखलेल्या ठेकेदाराशी केलेल्या सविंदेची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र. ६ :— प्रभाग क्र. ६७, आशियाना महल अपार्टमेंट मागे, उल्हासनगर—५ येथिल जुन्या व वापरात नसलेल्या शौचालयांचे विनियोगास मान्यता देणे.

---

सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी :—दोन वर्षापुर्वी निष्कासनास मान्यता दिलेल्या सार्वजनिक शौचालयांचे आजपर्यंत निष्कासन झालेले नाही. त्याबाबतीत अडचण काय आहे?

श्री. विजयकुमार म्हसाळ, उप—आयुक्त मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी:— सार्वजनिक शौचालय निष्कासित करण्याबाबतीत आपण ठराव केला आहे. सार्व— शौचालय तोडल्या नंतर तेथे मोकळया झालेल्या जमिनिवर अतिक्रमण होवु नये म्हणुन सी.सी. पॅसेज करायचा आहे.

सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी :—ही सार्वजनिक शौचालये तोडण्यासाठी तुमच्याकडे माणसे नाहीत त्यामुळे शौचालय तोडण्यासाठी आम्ही माणसे लावायची काय? तसेच या कामासाठी अर्थसंकल्पामध्ये तुम्ही निधीची तरतुद केलेली नाही.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—सार्वजनिक शौचालय तोडण्यासाठी जेवढया काही नगरसेवकांनी पत्र दिलेली असतील त्यानुसार शौचालये तोडल्यानंतर त्याठिकाणी मोकळया झालेल्या जागेवर अतिक्रमण होवू नये म्हणुन तेथे सीसी पॅसेज किंवा समाजमंदिर बांधण्यासाठी आपला नगरसेवक निधी उपलब्ध करुन दयावा.

सदस्य श्री. रविंद्र बागुल :—आजपर्यंत किती सार्वजनिक शौचालये तोडण्यास परवानगी दिलेली आहे? त्याची माहितीच्या अधिकाराखाली मी यादी मागितली होती. ती यादी मला मिळालेली आहे. यादीत उल्लेख केलेल्या ठिकाणी आम्ही काही नगरसेवक जावुन पाहणी करुन आलो आहोत. मात्र संबंधित कुठल्याही अधिका—याने त्याठिकाणी प्रत्यक्ष जावुन पाहणी केलेली नाही.

सदस्य श्री. रमेश चव्हाण :—शौचालय निष्कासनास परवानगी दिल्यानंतर ती तोडण्याची जबाबदारी महापालिकेची आहे ना? तुमची जबाबदारी नाही काय? मागील काही दिवसापुर्वी जी सार्वजनिक शौचालये तोडण्यात आली त्याठिकाणी अतिक्रमणे झालेली आहेत.

सदस्या श्रीम.मिनाताई सोनेजी:— सार्वजनिक शौचालये तोडण्यासाठी कुठल्याही प्रकारची तरतुद केलेली नाही

सदस्य श्री. रविंद्र बागुल :—सार्वजनिक शौचालयें तोडण्यासाठी ज्या नगरसेवकांनी पत्रे दिलेली आहेत त्यानुसार त्या ठिकाणची शौचालये तोडल्यानंतर त्याठिकाणी मोकळया होणा—या जागेवर अतिक्रमण होवु नये म्हणून त्याठिकाणी सीसी पॅसेज किंवा समाजमंदिर बांधण्यासाठी संबंधित नगरसेवकाने आपल्या नगरसेवक निधीतुन निधी उपलब्ध करुन दिला पाहिजे.

यावेळी सदस्या श्रीमती जया माखिजा यांनी सभागृहात प्रवेश केला.

सदस्य श्री. सुंदर मंगतानी :— परंतु असे कधी झालेले नाही.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—त्याठिकाणी सीसी पॅसेज किंवा समाजमंदिर बांधण्यासाठी नगरसेवकाने आपला निधी उपलब्ध करुन दिला पाहिजे किंवा महापालिकेने सर्वसाधारण निधी उपलब्ध करुन दिला पाहिजे.

सदस्य श्री. जीवन इदनानी:—सार्वजनिक शौचालये तोडल्यानंतर महापालिकेने सर्वसाधारण निधीतुन त्याठिकाणी सीसी पॅसेज तयार केला पाहिजे.

श्री. आर.बी. शिर्के, कार्यकारी अभियंता, स्थापत्य:—तोडलेल्या सार्व— शौचालयाचे ठिकाणी समाजमंदिर बांधण्यासाठी अर्थसंकल्पात निधी उपलब्ध असला पाहिजे.

सदस्य श्री. जीवन इदनानी :—यासाठी निधी कोठुन येतो आणि कोठे जातो ते आम्हांला सांगावयास लावु नका.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—हा प्रस्ताव पारीत केला जावा परंतु त्याठिकाणी सीसी पॅसेज किंवा समाजमंदिर बांधण्यासाठी जेव्हा निधी उपलब्ध होईल तेव्हाच ते शौचालय तोडले जावे.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**मार्च २०१० पासुन आतापर्यंत तोडण्यात आलेल्या सार्वजनिक शौचालयाची स्थिती काय आहे त्याचा अहवाल सभेपुढे आला पाहिजे.

**महापालिका सचिव:—**सार्वजनिक शौचालय निष्कासनास परवानगी दिल्यानंतर जागेवरील परिस्थिती पाहता प्रशासनास ईष्ट वाटेल त्याप्रयोजनासाठी सदर जागेचा उपयोग/विनियोग करणेस मान्यता व सदरचे शौचालय तोपर्यंत निष्कासित करु नये जोपर्यंत त्याठिकाणी विकास काम सुरु होत नाही. या सर्व अटी आम्ही ठरावामध्ये यापुर्वीच अंतर्भुत केलेल्या आहेत..

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ६ :—** प्रभाग क्र. ६७, आशियाना महल अपार्टमेंट मागे, उल्हासनगर—५ येथिल जुन्या व वापरात नसलेल्या शौचालयांचे विनियोगास मान्यता देणे.

**प्रस्तावना**

प्रभाग क्र. ६७, अशियाना महल अपार्ट. मागे, उल्हासयनगर—५ येथील ६ सिट्चे जुने शौचालय नागरीकांच्या मागणीनुसार निष्कासित करणेबाबत मा. नगरसेवक श्री. भारत रा. राजवानी प्रभाग क्र. ६७ उल्हासनगर महानगरपालिका यांनी विनंती केलेली आहे.

प्रभाग क्र. ६७, अशियाना महल अपार्ट. मागे, उल्हासयनगर—५ येथील ६ सिट्चे जुने शौचालय मोडकळीस आलेले आहे, असा संबंधीत आरोग्य निरीक्षक उल्हासनगर महानगरपालिका यांनी प्रत्यक्ष पाहणी करून पंचनामा सादर केलेला आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ अन्वये महापालिकेच्या मालमत्तेचा अन्य प्रकारे विनियोग करावयाचा झाल्यास मा. स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक आहे.

उक्त बाबी विचारात घेता, सी.सी पॅसेज बांधणेसाठी निधी उपलब्ध होताच प्रस्तावित शौचालय निष्कासित करून सदर मालमत्तेचा महानगरपालिकेच्या आवश्यकतेनुसार अन्य प्रकारे विनियोग करणेकरीता सदर मालमत्ता निष्कासित करणेसाठी व अन्य प्रकारे विनियोग करून त्या ठिकाणी सी. सी. पॅसेज बांधणेसाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ अन्वये मान्यता मिळणेसाठी प्रस्तावित आहे.

**स्थायी समिती ठराव क्र. ११३** दिनांक:— २१/२/२०११

सुचकाचे नाव :— श्रीमती निना नाथानी

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती संगिता कंडारे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार प्रभाग क्र. ६७, आशियाना महल अपार्टमेंट मागे, उल्हासनगर—५ येथिल जुन्या व वापरात नसलेल्या शौचालयांचे निष्कासनास व जागेवरील परिस्थिती पाहता प्रशासनास इष्ट वाटेल त्या प्रयोजनासाठी सदर जागेचा उपयोग/विनियोग करणेस मान्यता देत आहे.

**परंतु**

सदरचे शौचालय तोपर्यंत निष्कासित करु नये जो पर्यंत त्याठिकाणी विकास काम सुरु होत नाही.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ७ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र.** ७ :— प्रभाग क्र. ३५, किंग्ज प्लाझा अपार्टमेंट, बॅरेक नं. ६७३ जवळ, उल्हासनगर—२ येथिल जुन्या व वापरात नसलेल्या शौचालयांचे विनियोगास मान्यता देणे.

---

काही सदस्य :—पास—पास......

सभापती, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र.** ७ :— प्रभाग क्र. ३५, किंग्ज प्लाझा अपार्टमेंट, बॅरेक नं. ६७३ जवळ, उल्हासनगर—२ येथिल जुन्या व वापरात नसलेल्या शौचालयांचे विनियोगास मान्यता देणे.

प्रस्तावना

प्रभाग क्र. ३५, किंग्ज प्लाझा अपार्ट. बॅ. नं. ६७३ जवळ, उल्हासयनगर—२ येथील १० सिट्चे जुने शौचालय नागरीकांच्या मागणीनुसार निष्कासित करणेबाबत मा. नगरसेवक श्री. महेश पी. सुखरामानी प्रभाग क्र. ४८ उल्हासनगर महानगरपालिका यांनी विनंती केलेली आहे.

प्रभाग क्र. ३५, किंग्ज प्लाझा अपार्ट. बॅ. नं. ६७३ जवळ, उल्हासयनगर— २ येथील १० सिट्चे जुने शौचालय मोडकळीस आलेले आहे, असा संबंधीत आरोग्य निरीक्षक उल्हासनगर महानगरपालिका यांनी प्रत्यक्ष पाहणी करून पंचनामा सादर केलेला आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ अन्वये महापालिकेच्या मालमत्तेचा अन्य प्रकारे विनियोग करावयाचा झाल्यास मा. स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक आहे.

उक्त बाबी विचारात घेता, सी. सी. पॅसेच बांधणे करिता निधी उपलब्ध होताच, प्रस्तावित शौचालय निष्कासित करून सदर मालमत्तेचा महानगरपालिकेच्या आवश्यकतेनुसार अन्य प्रकारे विनियोग करणेकरीता सदर मालमत्ता निष्कासित करणेसाठी व अन्य प्रकारे विनियोग करून त्या ठिकाणी सी. सी. पॅसेज बांधणेसाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ अन्वये मान्यता मिळणेसाठी प्रस्तावित आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ११४ दिनांक:— २१/२/२०११

सुचकाचे नाव :—श्रीमती निना नाथानी

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती सरोजिनी टेकचंदानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार प्रभाग क्र. ३५, किंग्ज प्लाझा अपार्टमेंट, बॅरेक नं. ६७३ जवळ, उल्हासनगर—२ येथिल जुन्या व वापरात नसलेल्या शौचालयांचे निष्कासनास व जागेवरील परिस्थिती पाहता प्रशासनास इष्ट वाटेल त्या प्रयोजनासाठी सदर जागेचा उपयोग/विनियोग करणेस मान्यता देत आहे.

परंतु

सदरचे शौचालय तोपर्यंत निष्कासित करु नये जो पर्यंत त्याठिकाणी विकास काम सुरु होत नाही.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ८ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ८ :—** उल्हासनगर —४ येथील प्रभाग क्र. ५०, मधील बॅरेक क्र. १५०३ जवळील जुन्या व वापरात नसलेल्या शौचालयांचे विनियोगास मान्यता देणे

---

सभापती, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—त्याठिकाणी समाजमंदिर बांधण्यात यावे

काही सदस्य :—पास—पास...... विषय क्र. ८ ते १२ पर्यंत पास...

सभापती, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ८ :—** उल्हासनगर —४ येथील प्रभाग क्र. ५०, मधील बॅरेक क्र. १५०३ जवळील जुन्या व वापरात नसलेल्या शौचालयांचे विनियोगास मान्यता देणे

प्रस्तावना

उपरोक्त विषयान्वये कुमारी शकंतला. जी. जग्यासी नगरसेवक, उमपा, उमपा, यांनी दि. १०/४/२०१० च्या पत्रान्वये प्रभाग क्र.५० मधील, बॅरेक न.१५०३ जवळ उल्हासनगर ४ येथील ०६ सीटस बैठकीचे विनावापराचे सार्वजनिक शौचालय तुटलेले असल्यामुळे सदरील शौचालय निष्कासीत करणे बाबत विनंती केली आहे.

आरोग्य विभागाकडून सदर शौचालय बाबत संबंधीत आरोग्य निरिक्षक श्री. आर. डी.थिटे यांनी सादर केलेला अहवाल, पंचनामा मालमत्ता विभागास प्राप्त झालेला आहे. सदर अहवालात नमुद केलेप्रमाणे प्रभाग क्र.५० मधील बॅरेक नं.१५०३ उल्हासनगर ४ जवळ सार्वजनिक शौचालय मोडकळीस आले असुन वापरात नसून तेथील नगरींकानी सदरचे शौचालय निष्कासन करुण येथे उद्यानसाठी मैदान बनविण्याची मागणी केली असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

मुबंई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ अन्वये महापालिकेच्या मालमत्तेचा अन्य प्रकारे विनियोग करावयाचा झाल्यास मा. स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक आहे.

उक्त बाबी विचारात घेता, प्रभाग क्र. ५०, बॅरेक नं.१५०३ जवळ, उल्हासनग ४, ०६ साटसचे विनावापराचे सार्वजनिक शौचालय निष्कासित करुन सदर मालमत्तेचा महानगरपालिकेच्या आवश्यकतेनुसार अन्य प्रकारे विनियोग करणेकरीता सदर मालमत्ता निष्कासित करणेसाठी व अन्य प्रकारे विनियोग करुन त्या ठिकाणी उदयानासाठी मैदान बनविणे व सदर जागेवर अतिक्रमण होवु नये या करीता संबंधीत सहाय्यक आयुक्त व

उप अभियंता सा.बा.वि. यांना योग्य ते आदेश होणे करीता मा. स्थायी समिती पटलावर प्रस्ताव प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र. ११५ दिनांकः— २१/२/२०११

सुचकाचे नाव :— श्री. रविंद्र बागुल

अनुमोदकाचे नाव :— श्री. सुंदर मंगतानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर —४ येथील प्रभाग क्र. ५०, मधील बॅरेक क्र. १५०३ जवळील जुन्या व वापरात नसलेल्या शौचालयांचे निष्कासनास व सदरच्या जागेवर समाज मंदिर बाधंणेस मान्यता देत आहे.

परंतु

सदरचे शौचालय तोपर्यंत निष्कासित करु नये जो पर्यंत त्याठिकाणी विकास काम सुरु होत नाही.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ९ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ९** :— उल्हासनगर —२ येथील प्रभाग क्र. ३५ मधील, बॅरेक क्र. ६६४ जवळ, वाशुमल तबेलाचे मागे, आर.एस.एस. बुक डेपो, झुलेलाल स्कुल, येथिल जुन्या व वापरात नसलेल्या शौचालयांचे विनियोगास मान्यता देणे

---

काही सदस्य :—पास—पास......

सभापती, श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ९** :— उल्हासनगर —२ येथील प्रभाग क्र. ३५ मधील, बॅरेक क्र. ६६४ जवळ, वाशुमल तबेलाचे मागे, आर.एस.एस. बुक डेपो, झुलेलाल स्कुल, येथिल जुन्या व वापरात नसलेल्या शौचालयांचे विनियोगास मान्यता देणे

प्रस्तावना

प्रभाग क्र. ३५, बॅ.नं ६६४ जवळ, वाशुमल तबेलाचे मागे आर.एस.एस.बुक डेपो, झुलेलाल स्कुल उल्हासनगर २ येथील १५ सिट्चे जुने शौचालय नागरींकाच्या मागणीनसार निष्कासित करणेबाबत मा. नगरसेवक श्री. महेश पी. सुखरामानी प्रभाग क्र.३५ उल्हासनगर महानगरपालिका यांनी विनंती केलेली आहे.

प्रभाग क्र. ३५, बॅ.नं. ६६४, वाशुमल तबेलाचे मागे आर.एस.एस.बुक डेपो, झुलेलाल स्कुल उल्हासनगर २ येथील १५ सिट्चे ९ सिट्चे पुरुषाचे आणि ६ महिलाचे जुने शौचालय मोडकळीस आलेले आहे, असा संबंधीत आरोग्य निरीक्षक उल्हासनगर महानगरपालिका यांनी प्रत्यक्ष पाहणी करुन पंचनामा सादर केलेला आहे.

मुबंई प्रातिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ अन्वये महापालिकेच्या मालमत्तेचा अन्य प्रकारे विनियोग करावयाचा झाल्यास मा. स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक आहे.

उक्त बाबी विचारात घेता, सी.सी.पॅसेज बांधणे करिता निधी उपलब्ध होताच, प्रस्तावित शौचालय निष्कासित करुन सदर मालमत्तेचा महानगरपालिकेच्या आवश्यकतेनुसार अन्य प्रकारे विनियोग करणेकरीता सदर मालमत्ता निष्कासित करणेसाठी व अन्य प्रकारे विनियोग करुन त्या ठिकाणी सी.सी.पॅसेज बांधणेसाठी मुंबई प्रातिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ अन्वये मान्यता मिळणेसाठी प्रस्तावित आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ११६ दिनांकः— २१/२/२०११

सुचकाचे नाव :— श्रीमती निना नाथानी

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती सरोजिनी टेकचंदानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर —२ येथील प्रभाग क्र. ३५ मधील, बॅरेक क्र. ६६४ जवळ, वाशुमल तबेलाचे मागे, आर.एस.एस. बुक डेपो, झुलेलाल स्कुल, येथिल जुन्या व वापरात नसलेल्या शौचालयांचे निष्कासनास व जागेवरील परिस्थिती पाहता प्रशासनास इष्ट वाटेल त्या प्रयोजनासाठी सदर जागेचा उपयोग/विनियोग करणेस मान्यता देत आहे.

परंतु

सदरचे शौचालय तोपर्यंत निष्कासित करु नये जो पर्यंत त्याठिकाणी विकास काम सुरु होत नाही.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. १० वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. १०** :— उल्हासनगर —३ येथील प्रभाग क्र. ३२ मधील, अमृतलाल तबेला, सुभाष नगर येथिल येथिल जुन्या व वापरात नसलेल्या शौचालयांचे विनियोगास मान्यता देणे

---

काही सदस्य :—पास—पास......

सभापती, श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. १०** :— उल्हासनगर —३ येथील प्रभाग क्र. ३२ मधील, अमृतलाल तबेला, सुभाष नगर येथिल येथिल जुन्या व वापरात नसलेल्या शौचालयांचे विनियोगास मान्यता देणे

प्रस्तावना

प्रभाग क्र. ३२, अमृतलाल तबेला, सुभाश नगर, उल्हासनगर—३. येथील १० सिट्चे जुने षौचालय नागरीकांच्या मागणीनुसार निश्कासित करणेबाबत मा. नगरसेवक श्री. प्रभुनाथ दुखंती गुप्ता, उल्हासनगर महानगरपालिका यांनी विनंती केलेली आहे.

प्रभाग क्र. ३२, अमृतलाल तबेला, सुभाश नगर, उल्हासनगर—३. .येथील १० सिट्चे ५ सिट्चे पुरशचे आणि ५ महिलाचे जुने षौचालय मोडकळीस आलेले आहे, असा संबंधीत आरोग्य निरीक्षक उल्हासनगर महानगरपालिका यांनी प्रत्यक्ष पाहणी करून पंचनामा सादर केलेला आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ अन्वये महापालिकेच्या मालमत्तेचा अन्य प्रकारे विनियोग करावयाचा झाल्यास मा. स्थायी समितीची मंजुरी घेणे आवष्यक आहे.

उक्त बाबी विचारात घेता, प्रभाग क्र ३२ , अमृतलाल तबेला, सुभाश नगर, उहासनगर—३ येथे असलेले १० सिट्चे सार्वजनिक षौचालय प्रस्तावित काम करणेसाठी निधी उपलब्ध झाल्यास सदर मालमत्ता निश्कास्ति करणेसाठी व त्या ठिकाणी सफाई कामगार कार्यालय बांधणे बाबतचे निर्णयास्तव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ अन्वये सादर.

स्थायी समिती ठराव क्र. ११७ दिनांकः— २१/२/२०११

सुचकाचे नाव :— श्रीमती निना नाथानी

अनुमोदकाचे नाव :—श्रीमती सरोजिनी टेकचंदानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर —३ येथील प्रभाग क्र. ३२ मधील, अमृतलाल तबेला, सुभाष नगर येथिल येथिल जुन्या व वापरात नसलेल्या शौचालयांचे निष्कासनास व जागेवरील परिस्थिती पाहता प्रशासनास इष्ट वाटेल त्या प्रयोजनासाठी सदर जागेचा उपयोग/विनियोग करणेस मान्यता देत आहे.

परंतु

सदरचे शौचालय तोपर्यंत निष्कासित करु नये जो पर्यंत त्याठिकाणी विकास काम सुरु होत नाही.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ११ वाचुन दाखवितात

---

६. निविदाधारकांनी पोलिस खात्याकडून मालक/सर्व भागीदार/सर्व संचालक यांचे ***वैंतंबजमत ब्मतजपपिबंजम*** सादर करणे आवश्यक राहील.

७. निविदाधारक कोणत्याही संस्थेमार्फत ***ठसंबा स्पेजमक*** करणेत आला नसावा.

जे.एन.एन.यु.आर.एम. योजनेअंतर्गत सुरु असलेल्या पाणी पुरवठा योजनेस पुर्ण होण्याकरीता अद्याप दिड—दोन वर्षाची कालावधी लागणार आहे. सबब, निविदाची कालावधी कमीत कमी दोन वर्ष किंवा पाणी पुरवठा सुरळीत होईपर्यंत या दोन्ही पैकी जे उशिराने होईल त्या कालावधीपर्यंत निविदा अस्तित्वात राहिल.

सुचकाची सही/—
अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. २५ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. २५** :— बी.एस.यु.पी. लेखा शिर्षात रु.१.०० कोटी तरतुद समायोजनेस अधिन राहुन जे.एन. एन.यु.आर.एम. योजनेअंतर्गत बी.एस.यु.पी. चा प्रकल्प राहुलनगर व वाल्मीकी वसाहत येथे उभारणेसाठी बांधकामावर देखरेख करणेकामी प्रकल्प व्यवस्थापकाचे नेमणूकीसाठी निविदा मागविणे.

---

सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी :— जे.एन.एन.यु.आर.एम. योजनेअंतर्गत बीसयुपीचा प्रकल्प राहुल नगर व वाल्मीकी वसाहत येथे उभारण्यासाठी बाधंकामावर देखरेख करणेकामी प्रकल्प व्यवस्थापक नेमायचा आहे तर मग आपल्या महानगरपालिकेचे अभिंयते काय करणार?

<u>श्री.आर.बी.शिर्के, कार्यकारी अभियंता, स्थापत्य :–</u> प्रत्येक बांधकामावर देखरेख करण्यासाठी अभियंत्याची आवश्यकता असते. आपणाकडे कनिष्ठ अभियंत्याची संख्या कमी असल्यामुळे प्रकल्प व्यवस्थापकाच्या नेमणुकीची आवश्यकता आहे.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u> जे.एन.एन.यु.आर.एम. योजनेअंतर्गच्या सिमेंट कॉक्रिट रस्त्यांच्या कामांवर देखरेखीसाठी तुम्ही सल्लागार नेमला होता त्याचा काय उपयोग झाला.

<u>श्री.आर.बी.शिर्के, कार्यकारी अभियंता, स्थापत्य :–</u> आपणांकडे कनिष्ठ अभिंयत्याची संख्या कमी आहे त्यामुळे बाधंकामावर लक्ष ठेवण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापकांची आवश्यकता आहे.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u> तुम्ही त्याच्याकडुन कामे करुन घेता काय?

<u>श्री.आर.बी.शिर्के, कार्यकारी अभियंता, स्थापत्य :–</u> आपण स्थापत्य सल्लागार नेमल्या नंतर ते लोक बांधकामावर देखरेख करण्यासाठी कनिष्ठ अभियत्याची नियुक्ती करतात व बांधकामावर देखरेख करुन घेतात.

<u>सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी:–</u> ते लोक बरोबर काम करत नाहीत. निविदा दिल्यांनतर कोणत्या रस्त्यांवर रोड कटींग किती आहे त्याच्या मार्कींगसाठी सुध्दा त्यांना वेळ मिळत नाही. आणि नगररचनाकार तर आता नाहीच आहेत ना?

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u> राहुलनगर व वाल्मिकी वसाहत येथे उभारण्यात येणाऱ्या बाधांकामावर देखरेखी साठी प्रकल्प व्यवस्थापकाचे नेमणुकीसाठी निविदा काढायला हरकत नाही परंतु त्यांच्याकडुन काम करवुन घेंण्याची जबाबदारी तुमची असेल .तुम्ही काय करणार

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u> या कामासाठी निविदा न मागविता मेसर्स प्रतिष्ठान यांच्याशी प्रचलित दरानुसार संविदा करुन कामघेतले जावे. या सल्लागाराची नेमणूक करा.

**यावेळी श्री. भगवान कुमावत, प्रभाग अधिकारी, प्रभाग क्षेत्र क्र.३ यांनी सभागृहात प्रवेश केला.**

<u>सदस्य श्री. सुंदर मंगतानी :–</u>त्यांना नेमणूक करा.

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण:–</u> श्री. शिर्के साहेब जबाबदारी तुमची राहील, तुम्ही हे काम करुन घ्या.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u> होय, जबाबदारी श्री. शिर्के यांची राहील त्यानी काम करुन घ्यावे.

<u>सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी :–</u> आम्ही ठेकेदारांच्या कामाने समाधानी नाहीत.

<u>काही सदस्य :–</u>पास–पास……

<u>सभापती, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:–</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. २५ :–** बी.एस.यु.पी. लेखा शिर्षात रु.१.०० कोटी तरतुद समायोजनेस अधिन राहुन जे.एन. एन.यु.आर.एम. योजनेअंतर्गत बी.एस.यु.पी. चा प्रकल्प राहुलनगर व वाल्मीकी वसाहत येथे उभारणेसाठी बांधकामावर देखरेख करणेकामी प्रकल्प व्यवस्थापकाचे नेमणूकीसाठी निविदा मागविणे.

<u>प्रस्तावना</u>

जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी नुतनीकरण योजनेअंतर्गत बी.एस.यु.पी. प्रकल्प शहरातील राहुलनगर व वाल्मिकी वसाहत येथे राबविण्यात येत आहे. यामध्ये राहुलनगर येथे ५ व वाल्मिकी वसाहत येथे ३ इमारती बांधण्यात येणार आहेत. या रु.३५.३२

कोटीच्या प्रकल्पास केंद्र शासनाची मंजुरी प्राप्त आहे. दोन्ही कामांचे कार्यारंभ आदेश दि.२५/०९/२००९ रोजी देण्यात आले आहेत.

या इमारतींच्या बांधकामावर देखरेख करणेसाठी आवश्यक तांत्रिक अधिकारी व कर्मचारी उपलब्ध नाहीत. सद्यस्थितीत उल्हासनगर महानगरपालिकेचे शासनाच्या योजनेवर आधारित विविध प्रकल्प तयार करण्याचे प्रस्तावित आहेत. त्याकरिता आवश्यक तांत्रिक कर्मचारी वर्ग अत्यंत अपुरा आहे. सदर शासकिय योजनांवर देखरेक करणे तसेच शासनाने निर्गमित केलेले विविध माहितीपत्रके वेळेवर सादर करणे यासाठी अनुभवी कर्मचारी वर्ग महानगरपालिकेकडे उपलब्ध नाही. करिता प्रकल्प व्यवस्थापकाची नेमणूक करणे अत्यंत आवश्यक आहे.

सदर प्रकल्प व्यवस्थापकाची नेमणूक करणेसाठी जाहिर निविदा मागविणे व त्याकामी अर्थसंकल्पात बी.एस.यु.पी.लेखाशिर्षकात रक्कम रु.१.०० कोटीची तरतुद करणेसाठी मा. स्थायी समितीपुढे मान्यतेसाठी प्रस्तावित

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> १३२ <u>दिनांक:— २१/२/२०११</u>

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. सुंदर मंगतानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे प्रकरण ५ चे कलम २(२) मधील तरतुदीनुसार जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी नुतनीकरण योजनेअंतर्गत बी. एस.यु.पी. मधील सर्व कामे तसेच सफाई कामगार निवास स्थान, राहुल येथे शाळेची इमारत व श्रमसाफल्य अंतर्गत बांधावयाच्या इमारतीसाठी, निविदा न मागविता मे. स्पर्श प्रतिष्ठान यांच्याशी प्रचलीत दराने सल्लागार म्हणुन नेमणुक करणेसाइी थेट करार करण्यास आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे. व येणाऱ्या खर्चास वित्तीय व प्रशासकीय मान्यता देत आहे.

सुचकाची <u>सही/—</u>

अनुमोदकाची <u>सही/—</u>

<u>सर्वानुमते</u>

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. २६ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. २६ :—** भारत गॅस यांचेकडून रस्ते खोदाई भरपाई पोटी वसुल केलेली रक्कम रु. १,०७,१०,१००/— अंदाजपत्रकाचे भाग—१ क—५ ''रस्ते दुरुस्ती'' या लेखाशिर्षात समायोजनेस अधिन राहून रस्त्यावरील खडडे भरणेकामी प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणे.

---

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u> पाईप लाईन टाकण्यासाठी उल्हासनगर ५ येथील कैलास कॉलनी पासुन श्रीराम सिनेमा चौकापर्यंत नेताजी चौक मार्गे मानेरा जक्शन व व्ही.टी.सी ग्राऊड याठिकाणी रस्ते खोदले असल्याने लोकांना या रस्त्यावरुन ये—जा करणे खुपच त्रासाचे होत आहे यासाठी तात्काळ दुरुस्तीसाठी महापालिका अधिनियमाचे प्रकरण क्र ५ चे कलम २ (२) मधील तरतुदी अनुसार निविदा न मागविता हे काम करुन घेण्यासाठी आयुक्तांना प्राधिकृत केले जावे.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u> या निधीतुन रस्त्यांवरील खडड्े भरण्याचे काम न करता एखादा लहान मोठया रस्त्याचे सिमेट कॉक्रिटीकरण करण्यात यावे.

**<u>सदस्य श्री. रविंद्र बागुलः—</u>** परंतु यानंतर भुमिगत मलवाहिनी टाकण्याचे काम हाती घ्यावे लागणार आहे. त्यासाठी पुन्हा रस्ता खोदावा लागणार आहे त्याचे काय?

**<u>सभापती, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>** या निधीतुन एखादया लहान मोठया रस्त्यांचे सिमेंट कॉंक्रिटीकरण करण्याचे काम हाती घेण्यात यावे. श्री. बोडारे साहेब, कोणता रस्ता घेण्यात यावा ते आपण सुचवा.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>** रस्त्याच्या कामाचे प्राकलन किती रक्कमेचे होईल व रस्त्यावरील खडडे् भरण्याच्या कामाचे प्राकलन किती रक्कमेचे होईल?

**<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल :—</u>** संपुर्ण शहरातील रस्ते खोदुन ठेवले आहेत आता जो निधी आलेला आहे त्या निधीतुन शहाड फाटक रस्त्याचे काम हाती घेण्यात यावे.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>** मानेरा जक्शन, व्ही.टी.सी. ग्राऊंड या भागातील रस्ते खोदलेले आहेत.या विभागातीलच एखादया रस्त्याचे काम हाती घेतले पाहीजे

**<u>सभापती, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>** आपल्याकडील रस्ते खोदलेले आहेत त्यातील कोणत्या रस्त्याचे काम हाती घ्यावे ते स्थळ आपण निश्चित करा.

**<u>सदस्य श्री.सुदंर मगंतानी:—</u>** माझ्या प्रभागातील सर्व रस्ते खोदुन ठेवले आहेत.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>** कैलास कॉलनी ते श्रीराम सिनेमा चौक, मानेरा जक्शन, व्ही.टी.सी. ग्राऊड या विभागातील हे जे रस्ते खोदलेले आहेत ते गॅस पाईप लाईन टाकण्यासाठी खोदलेले आहेत यासाठी रस्ते दुरुस्ती करण्यासाठी निधी आलेला आहे. त्या निधीतुन न्यु सिंध विव्हीग ते आशा सिलिकेट पर्यंतच्या रस्त्याचे काम हाती घेण्यात यावे. या साठी जो ठराव तयार करावयाचा आहे त्याचा मसुदा मी आपणास वाचुन दाखवितो .

उल्हासनगर शहरातील खोदण्यात आलेले रस्ते तात्काळ दुरुस्ती करण्याकरीता मुंबई प्रातिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ चे कलम २(२) मधील तरतुदीनुसार निविदा न मागविता मेसर्स जयभारत कन्ट्रशन यांच्याशी प्रचलित डि.एस.आर. दराने न्यु सिंध विव्हींग ते आशा सिलिकेट पर्यंतचा रस्ता बाधंणे व इतर कामी संविदा करण्यास व प्राकलनीय रक्कम रु १,००,६१,२००/— प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

**<u>काही सदस्य :—</u>**पास—पास......

**<u>सभापती, श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः—</u>**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. २६ :—** भारत गॅस यांचेकडून रस्ते खोदाई भरपाई पोटी वसुल केलेली रक्कम रु. १,०७,१०,१००/— अंदाजपत्रकाचे भाग—१ क—५ ''रस्ते दुरुस्ती'' या लेखाशिर्षात वाढवून सदर रक्कमेतून रस्त्यावरील खडडे भरणेकामी प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने महानगर गॅस लिमिटेड यांनी पाईप लाईन टाकण्यासाठी उल्हासनगर—५ येथील कैलास कॉलनी ते श्रीराम सिनेमा चौकापर्यंत मार्गे नेताजी चौक, मानेरा जंक्शंन व व्हि.टी.सी. ग्राउंड येथे रस्ता खोदून पाईप लाईन टाकलेली आहे.

उल्हासनगर शहरातील भारत गॅसतर्फे खोदण्यात आलेले रस्ते दुरुस्ती करण्याकरिता रु.१,०७,१०,१००/— सदर कंपनीने महानगरपालिकेत जमा केलेले आहे. रस्त्यामध्ये पडलेले खड्डे बंद करण्याकरिता रु.१,००,६१,२००/— इतक्या रकमेचे प्राकलन तयार करण्यात आलेले आहे. सदर रक्कम महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकामध्ये भाग–१ क–५ रस्ते दुरुस्तीमध्ये वाढवुन देय व सदर प्राकलनास व वित्तीय मान्यतेसह निविदा कार्यवाही करणेसाठी स्थायी समितीपुढे प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र. १३३ दिनांकः— २१/२/२०११

सुचकाचे नाव :— श्री. धनंजय बोडारे

अनुमोदकाचे नाव :— श्री. सुंदर मंगतानी

ही स्थायी समिती शहरातील खोदाई करण्यात आलेल्या रस्त्यांबाबत नागरीकांच्या तक्रारी प्राप्त होत असल्याने त्या रस्त्यांची दुरुस्ती करणे आवश्यक आहे त्यामुळे ही स्थायी समिती वर नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर शहरातील खोदण्यात आलेले रस्ते तात्काळ दुरुस्ती करण्याकरिता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे प्रकरण ५ चे कलम २(२) मधील तरतुदीनुसार निविदा न मागविता मे. जयभारत कंन्ट्रक्शन यांच्याशी प्रचलीत डी.एस.आर. दराने न्य. सिंध वीव्हींग ते आशा सिलिकेट पर्यंतचा रस्ता बाधंणे व इतर रस्त्यांची दुरुस्ती कामी थेट सविंदा करण्यास आयुक्तास प्राधिकृत करीत आहे व प्राकलनीय रक्कम १,००,६१,२००/— यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. २७ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. २७** :— निरंकारी हॉल ते भारत चौक रस्त्यावर सिमेंट कॉंक्रिटीकरण करणे कामी सुधारीत प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणे.

---

काही सदस्य :—पास—पास……

सभापती, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. २७** :— निरंकारी हॉल ते भारत चौक रस्त्यावर सिमेंट कॉंक्रिटीकरण करणे कामी सुधारीत प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणे.

प्रस्तावना

उपरोक्त विषयानुसार निरंकारी हॉल ते भारत चौकापर्यंत रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण सुरु आहे. सदर काम कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी करीत आहे. सदर कामाचे प्राकलन ४० फुट रुंदीनुसार रु.२,१६,१२,११२/—

बनविण्यात आलेले आहे. तसेच नगररचना विभागाने दिलेल्या मार्किंग नुसार व अतिक्रमण विभागाने रोडच्या रुंदीमध्ये बाधित असलेली दुकाने तोडल्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाने जागेवर मिळालेल्या रुंदीनुसार रोडचे काम सुरु केलेले आहे.

सदर रस्त्याचा काही भाग नॉन डि.पी. असल्यामुळे व जागेवर अस्तित्वात रोडचे लगत आरसीसी इमारत आहे त्यानुसार सरदचा रस्ता ३० फुट रुंदीपर्यंत करणे शक्य आहे

मा. आमदार यांनी त्यांचे पत्र दिनांक २६/०५/२०१० मध्ये या रस्त्यालगत जे भाजी मार्केटकडे रस्त्यालगत जातो त्यांचे रुंदीकरण करण्यास सुचविले आहे. तसेच मा. महापौर व नगरसेविका वॉर्ड क्र.२३ यांनी पण रस्त्याच्या लगत नाली बनविण्यास सुचविले आहे. बॅ.नं.३१ ते ६३ पर्यंतचे पाणी उतार असल्यामुळे वॉर्ड क्र.२३ मध्ये पसरते त्याकरिता बॅ.नं.६३ समोर जे हेमराज डेअरी पर्यंत व सुनिता अपार्टमेंट समोर कुमार अपार्टमेंट येथे नाला बांधणे जरुरीचे आहे. कारण लासी हॉलसमोर सांडपाणी जमा होतो व सदर रस्त्यामध्ये साकाव बांधणे आवश्यक आहे. जेणेकरुन पाणी सुरळीत चालु होईल व आरोग्य विभागास स्वच्छता करणे सोईस्कर होईल व रस्त्यालगत लिंक रोडवर पेव्हर ब्लॉक बसविण्यास सुचविले आहे.

त्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे सदर रस्त्याचे लांबी व रुंदीनुसार सुधारित प्राकलन तयार करण्यात आलेले आहे व किंमत रु.२,१६,१२,०९५/— व या रस्त्यालगत मा. आमदार यांनी मागणी केल्यानुसार मच्छीमार्केट लगतच्या डी.पी. रस्त्याचे २० फुट रुंदीकरण करण्यात येत आहे याकरिता मान्यता असल्यास तयार करण्यात आलेल्या सुधारित प्राकलनाप्रमाणे येणारा खर्च रु.२,१६,१२,०२५/— इतका असून सदर खर्च मूळ मंजूर प्राकलनाच्या मर्यादित आहे. तरी सुधारित प्राकलनास मा. स्थायी समितीपुढे मान्यतेसाठी प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र. १३४ दिनांकः— २१/२/२०११

सुचकाचे नाव :— श्री. रविंद्र बागुल

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती निना नाथानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार निरंकारी हॉल ते भारत चौक रस्त्यावर सिमेंट कॉक्रिटीकरण करणे कामी सुधारीत प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. २८ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. २८ :— उल्हासनगर महानगरपालिकेकरीता एक मिनी बस शासकिय दराने खरेदी करणेकामी मे. टाटा मोटर्स यांच्याशी निविदा शिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे.**

---

सदस्य श्री. रविंद्र बागुल :— ही मिनी बस कश्यासाठी मागवित आहात?

श्री. दिपक चिमनकारे, वाहन विभाग प्रमुखः— आपल्या अतिक्रमण विभागामार्फत निष्कासनाची जी कारवाई केली जाते या कारवाईवर जाण्यासाठी पोलिस बंदोबस्त बरोबर घेवुन जावा लागतो. पोलिसांना घेवुन जाण्यासाठी या बसची आवश्यकता आहे. आपणाकडील जुनी बस वारंवार ना दुरुस्त होत असल्याने नविन बस घेणे आवश्यक आहे.

काही सदस्य :—पास—पास......

**सभापती, श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. २८ :—** उल्हासनगर महानगरपालिकेकरीता एक मिनी बस शासकिय दराने खरेदी करणेकामी मे. टाटा मोटर्स यांच्याशी निविदा शिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिकेतील वाहन विभागातील मिनी बस १९९८ साली खरेदी केलेली असून ती वारंवार नादुरूस्त होत असते.तसेच सदर वाहन अतिक्रमण विभागात पोलीसांना ने आण करण्याकरीता व तसेच इतर कार्यालयीन कामकाजासाठी वापरण्यात येते.

सदर बस वारंवार नादुरूस्त होत असल्यामुळे व जुनी झाल्यामुळे नविन Mini Bus शासकीय दराने खरेदी करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

सदर बाबत TATA Motors Limited या कंपनी नीची Tata star bus 32+15 LP 712/42 BSlll चे शासकिय दर मागविण्यात आले.सदर शासकिय दरानुसार Mini Bus वाहनांची Vat धरून किमंत रू.१०,९७,४१७/— एवढी आहे.सोबत दरपत्रक सादर.

तरी सदर TATA Motors Limited कंपनीकडून शासकिय दराने रू.१०,९७,४१७/— एवढया किंमतीची मिनी बस निविदेशिवाय थेट घेण्यास मंजुरी मिळावी.सदर प्रस्ताव मंजुर झाल्यास सदर बाबत TATA Motors Limited कंपनीला रू.१०,९७,४१७/— एवढे Advance Payment Demand Draft व्दारे अदा करावे लागेल व सदर खर्च लेखाशिर्ष AA -2 Part – II वाहन खरेदीमधून करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

तरी सदर वाहन निविदा शिवाय थेट M/s Tata Motors या कंपनीकडून खरेदी करण्यास प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १३५ दिनांकः— २१/२/२०११

सुचकाचे नाव :— श्री. रविंद्र बागुल

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती निना नाथानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिकेकरीता एक मिनी बस शासकिय दराने खरेदी करणेकामी मे. टाटा मोटर्स यांच्याशी निविदा शिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. २९ वाचुन दाखवितात

————————————————————————————————————

⇨ **विषय क्र. २९ :—** जप्ती करण्यात आलेल्या स्थावर मालमत्तेचे आधारभुत किंमत रुपयें १/—नाममात्र बोली लावणेकामी आयुक्तास प्राधिकृत करणे.

————————————————————————————————————

**सभापती, श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः—**जे लोक मालमत्ता कर भरत नाहीत अशा लोकांच्या जप्त केलेल्या मिळकतीवर आधारभुत किंमत म्हणुन १ रुपया नाममात्र बोली लावण्याविषयीचा प्रस्ताव आहे.

**श्रीमती विजया कंठे, कर निर्धारक व संकलक:—**मिळकत कर भरला नाही तर वारन्ट काढला जातो. वारन्ट काढुनही मिळकत कर भरला नाही तर मिळकत जप्त केली जाते. अशा जप्त केलेल्या मिळकतीवर नाममात्र एक रुपया बोली लावण्याचा प्रस्ताव आहे.

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑

**विषय क्र. २९ :—** जप्ती करण्यात आलेल्या स्थावर मालमत्तेचे आधारभुत किंमत रुपयें १/—नाममात्र बोली लावणेकामी आयुक्तास प्राधिकृत करणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात अस्तित्वात असलेल्या मिळकतींवर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १२७ व १२९ मधील तरतुदीनुसार मालमत्ता कर आकारणी करण्यात येते.

कराची रक्कम कर भरण्यास पात्र असलेल्या व्यक्तीने अधिनियमातील तरतुदीनुसार आवश्यक असल्याप्रमाणे कराची रक्कम भरली नाही तर, अशी अदत्त कराची रक्कम किंवा त्या रकमेचा भाग यांव्यतिरिक्त, त्याने ज्या दिनांकापर्यत असा कर भरावयाचा होता, त्या शेवटच्या दिनांकानंतर प्रत्येक महिन्यासाठी किंवा त्याच्या भागासाठी अशा कराच्या दोन टक्के इतकी रक्कम, शास्ती म्हणून आकारण्यात येते.

अधिनियमाच्या तरतुदींन्वये आवश्यक असल्याप्रमाणे २ टक्के प्रतिमाह शास्ती किंवा व्याज अथवा दोन्ही यांसह कर भरला नसेल तर नियम ४२ अन्वये स्थावर मालमत्ता जप्ती/अटकावणी करणेची तरतुद आहे. तद्नंतर जप्ती/ अटकावणी करण्यात आलेली स्थावर मालमत्ता लिलावाद्वारे विक्री करून रक्कम वसुल करता येईल.

अशा परिस्थितीत जप्ती/अटकावणी केलेल्या स्थावर मालमत्तांची लिलावाद्वारे विक्री करणेसाठी मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ अंतर्गत नोंदणीकामी प्रतिवर्ष निश्चित करण्यात येत असलेल्या बाजार भावानुसार ''आधारभुत किंमत'' ***;न्चेमज च्तपबमद्ध*** निश्चित करणे प्रस्तावित आहे.

तसेच जप्ती/अटकावणी करण्यात आलेल्या काही स्थावर मालमत्तांच्या विक्रीसंदर्भात प्रतिसाद प्राप्त न होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

अटकावणी किंवा जप्ती करण्यात आलेल्या कोणत्याही स्थावर मालमत्तेच्या बाबतीत महानगरपालिकेच्या वतीने स्थायी समितीची पुर्व मान्यता घेवुन आयुक्त नाममात्र बोली बोलु शकतात.

सबब, अशा मिळकतींसाठी महानगरपालिकेच्या वतीने आयुक्त यांनी रक्कम रू. १/— (अक्षरी एक रूपया) नाममात्र बोली लावणेकामी मंजुरीकरीता मा. स्थायी समिती पटलावर प्रस्तावित करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र.** १३६ **दिनांक:— २१/२/२०११**

सुचकाचे नाव :— श्री. रविंद्र बागुल

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती निना नाथानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केलेप्रमाणे जप्ती/अटकावणी केलेल्या स्थावर मालमत्तांची लिलावाद्वारे विक्रि करणेसाठी मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ अंतर्गत नोंदणीकामी प्रतिवर्ष निश्चित करण्यात येत असलेल्या बाजार भावानुसार ''आधारभुत किंमत'' ***;न्चेमज च्तपबमद्ध*** निश्चित करुन जप्ती करण्यात आलेल्या स्थावर मालमत्तांच्या विक्रिसंदर्भात प्रतिसाद प्राप्त न झालेल्या मिळकतींसाठी रक्कम रु. १/— (अक्षरी एक रुपया) नाममात्र बोली लावणेकामी आयुक्तांस प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ३० वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ३० :—** उल्हासनगर महानगरपालिकेस मोबाईल कॉम्प्युटरद्वारे वसुली करणेस व मोबाईल प्रिंटरद्वारे पोच पावती देणे प्रयोजनार्थ लागणारे मोबाईल कॉम्प्युटर बॅटरी चार्जर , क्रेडील चार्जर व सेवा पुरविणे कामी आयुक्तांस योग्य ठेकेदाराशी निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे.

---

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ३० :—** उल्हासनगर महानगरपालिकेस मोबाईल कॉम्प्युटरद्वारे वसुली करणेस व मोबाईल प्रिंटरद्वारे पोच पावती देणे प्रयोजनार्थ लागणारे मोबाईल कॉम्प्युटर बॅटरी चार्जर , क्रेडील चार्जर व सेवा पुरविणे कामी आयुक्तांस योग्य ठेकेदाराशी निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे.

**प्रस्तावना**

महानगरपालिकेने कर वसुली व्यवस्थापनातर्गंत उल्हासनगर शहराचे संपूर्ण क्षेत्राचे विभाजन 58 प्रभागात केलेले असून त्यासाठी कर वसुली लिपिकांची नियुक्ती केलेली आहे . सध्या ते घरोघरी जावून मालमत्ता कराची वसुली करतात व हाताने ;डंदनंसद्ध तयार केलेली पावती मालमत्ताधारकास देतात . त्यानंतर सदर पावतीच्या अनुषंगाने मिळकतधारकाच्या खात्यात भरणा केलेल्या रक्कमेची नोंद करण्यात येते व सदर रक्कम महापालिका कोषागारात जमा होते . अशी प्रथा पुर्वीपासून चालू होती .

उल्हासनगर महानगरपालिकेने जेएनएनयुआरएम योजनेत भाग घेतला असून सदर योजनेत केंद्र व राज्य शासनाकडून अनुदान प्राप्त करुन घेणेसाठी महानगरपालिकतर्फे पुरविण्यात येणा—या सर्व सेवांचे संगणकीकरण करण्याची हमी दिलेली आहे . त्यानुषंगाने कर विभागात जनतेच्या सोयींसाठी विविध सोयी व सुविधा . उदा. मोबाईल एसएमएस व्दारे देयकांची माहिती , मोबाईलव्दारे देयकांचा भरणा, केडीट व डेबीट कार्ड व्दारे देयकांचा भरणा , तसेच इंटरनेटव्दारे देयकांची माहिती इत्यादी सोयी उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत .

सध्या अनेक प्रकारच्या रक्कमेचा भरणा मोबाईल व्दारे करण्याची संगणकीय प्रणाली विकसीत करण्यात आली असून त्यासाठी मोबाईल कॉम्प्युटर्स व प्रिन्टर्स खरेदीसाठी दरपत्रक मागविण्यात आलेले असून त्याचा तपशिल पुढील प्रमाणे आहे .

ekckbZy dkWEI;qVj o fiUVj %

मालमत्ता कर वसुलीसाठी मोबाईल कॉम्प्युटरचा आढावा घेतल्यास , त्यात मोटोरोला कंपनीचे मोबाईल कॉम्प्युटरमध्ये इतर कॉम्प्युटरपेक्षा अनेक प्रकारच्या आधुनिक सेवांचा अंतर्भाव असून मोटोरोला ही जगात एकमेव कंपनी आहे , शिवाय आणीबाणीच्या परिस्थितीत इंटरनेटव्दारे तात्काळ सेवा देण्याचेही कार्य करते . मोटोरोला कंपनीचे व्यवसायीक भागीदार मेसर्स स्कॅन इन्फोटेक प्रा. लि. यांचेकडून मोबाईल कॉम्प्युटर , बॅटरी चार्जर , केडील चार्जर व सेवा इत्यादी साठी प्राप्त दरांचा तपशिल पुढील प्रमाणे आहे .

| Sr.No | Item | Description | Qty | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Motorola | Motorola FR68 EDA,GPS, WLAN 802.11 b/g, GSM/Edge/EGPRS,1D,Generic GSM Carrier Support, Color QVGA Display,3.2MP | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | FR68 | Camera,128MB SDRAM/256MB Flash Memory, QWERTY Keypad,WM6.1 Professional,Bluetooth,1900mAh Battery, RoHs. | 20 | 57360 | 1147200 |
| 2 | SSB-FR68XX-30 | 3 Year Service from the Start Service Center Bronze. Includes Comprehensive Coverage. Does not include coverage for cradles. Available in APAC Only. | 20 | 11280 | 225600 |
| 3 | SAC7X00 | 4-Slot Battery Charger "Toaster" for FR68 | 5 | 11880 | 59400 |
| 4 | CRD7X00 | MC70/MC75 Single Slot USB/Serial cradle kit, Includes: Single Slot Serial/USB Charge Cradle (w/spare battery charging) and Power Supply . Must purchase 3 Wire AC line cord separately. For USB communication to a host computer purchase USB active sync cable | 1 | 8520 | 8520 |

मोबाईलव्दारे घरोघरी जावनू वसुली करणेसाठी मोबाईल कॉम्प्युटर सोबत आधुनिक सेवांचा अंतर्भाव असलेले मोबाईल प्रिन्टर ही आवश्यक आहे . मोटोरोला कंपनीचे प्रिन्टर पार्टनर झेब्रा टेक्नॉलॉजीस एशिया पॅसिफिक प्रा. लिमिटेड , सिंगापुर हे आहेत . सदर कंपनीचे व्यवसायिक भागीदार मेसर्स स्कॅन इन्फोटेक प्रा. लि. यांच्याशी संपर्क साधून मोबाईल प्रिन्टर साठी दरपत्रक मागविण्यात आलेले असून प्राप्त दरांचा तपशिल पुढील प्रमाणे आहे .

| Sr. No. | Item | Description | Qty | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Zebra EM220 | EM220 Mobile printer, BLUETOOTH<br>Print method: Direct thermal<br>2 MB Flash, 8 MB RAM<br>Standard Serial and USB interfaces<br>Magnetic card reader<br>Bluetooth® v.2.0<br>Windows® compatibility<br>Different-color LEDs indicate on/off, error, connectivity status and battery life<br>Single push-button media access for simple reloading<br>Translucent media cover for media-low/-out anticipation<br>Sensors: Door ajar, out of paper, pre-printed media alignment<br>Designed with rubber overmolding to resist damage from daily wear and tear and repeated drops up to 4 feet<br>Print width - 2.28" / 58.0 mm<br>Print length – Continuous<br>Print speed - 3" (76 mm)/sec<br>Media sensors – Reflective<br>**BAR CODES/SYMBOLOGIES**<br>**Linear**<br>Codabar / UPC-A / UPC-E / Code 39 / Code 93 / Code 128 / EAN-8 / EAN-13 / EAN-18<br>**2-dimensional**<br>PDF417 / MaxiCode / QR Code / Data Matrix<br>**Fonts and Graphics**<br>Supports international character sets<br>Supports vertical or horizontal printing | 20 | 20200 | 404000 |

उल्हासनगर महानगरपालिकेव्दारा मोबाईल कॉम्प्युटर्स व्दारे वसुली करुन मोबाईल प्रिन्टर व्दारे पोच पावती देण्याचीही संगणक कार्यप्रणाली ही स्थानिक स्वराज्य संस्था स्तरावर महाराष्ट् राज्यात प्रथम असावी . मोबाईल व्दारे वसुल करण्यात आलेली रक्कम मिळकतधारकाच्या खात्यात परस्पर जमा होवून ती ज्या व्यक्तीने वसुल केलेली आहे त्याच्या नावाची व रक्कमेची नोंद महापालिका मुख्यालयात होईल व महापालिका रक्कमेची अफरातफर टाळता येईल. अशा आधुनिक संगणक प्रणालीव्दारे रक्कम वसुल केल्यास मिळकतधारकाचा विश्वास संपादन केल्यासारखे होवून मिळकतधारक मालमत्ता कराचा भरणा करणेसाठी पुढे येतील शिवाय लेखा परिक्षणातर्गंत आक्षेपांचे काम देखील कमी होईल . संगणक प्रणाली राबविणे , सदर संगणक प्रणालीशी सुसंगत मोबाईल कॉम्प्युटर्स व प्रिन्टर्स हे सर्व विशेष स्वरुपाचे कार्य असून मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 5 चे कलम 2 (2) मधील तरतूदीनुसार वरील पुरवठादारांकडून निविदा न मागविता थेट कराराने खरेदी करणेसाठी मा. आयुक्तास प्राधिकृत करणे व येणा–या खर्चास मंजुरी मिळणेसाठी मा. स्थायी समिती पटलावर प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १३७ दिनांकः– २१/२/२०११

सुचकाचे नाव :– श्री. रविंद्र बागुल

अनुमोदकाचे नाव :– श्रीमती निना नाथानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिकेस मोबाईल कॉम्प्युटरद्वारे वसुली करणेस व मोबाईल प्रिंटरद्वारे पोच पावती देणे प्रयोजनार्थ लागणारे मोबाईल कॉम्प्युटर बॅटरी चार्जर , क्रेडील चार्जर व सेवा पुरविणे कामी आयुक्तांस योग्य ठेकेदाराशी निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ३१ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ३१** :— महापालिका अधिका—यांना कार्यालयीन कामकाजासाठी वाहनचालकासह भाडे तत्वावर वाहने पुरविणेकामी लघुत्तमदराचे निविदाकार मे.अनमोल ट्रान्सपोर्ट कंपनी,डोंबिवली यांच्याशी संविदेस मान्यता देणे.

---

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—आपल्या महापालिकेचे काही अधिकारी ठाणे, मुंबई येथुन येतात. त्यांना त्यांना घरून महापालिकेत येण्यासाठी व परत घरी जाण्यासाठी त्रासाचे होते यासाठी त्यांना महापालिकेच्यावतीने भाडे तत्वावरील वाहन पुरविण्यांत आलेले आहे घर ते महापालिका व परत घर हा त्यांचा प्रति दिवसाचा प्रवास ४० किलोमिटरपेक्षा जास्त होत आहे.. .

सभापती, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—त्या अधिका—याचे कमालमर्यादा १२५० कि.मी. पेक्षा जास्त वापर होत आहे.

महापालिका सचिव :—रोज किती किलोमिटर प्रवास होतो हे पाहणे हे लेखा परिक्षकांचे काम आहे. व त्यासाठी यापूर्वीच महासभाने ठराव केलेला आहे त्यात बदल करावा लागेल.

सदस्य श्री. धनंजय बोडारे :—हा प्रस्ताव प्रशासनाने आणलेला आहे. तो सर्व बाबींचा विचार करुनच आणलेला असेल त्याबाबतीत आपण का विचार करायचा?

श्री. विजयकुमार म्हसाळ,उप—आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :—उल्हासनगर महापालिकेच्या अधिका—यांना कार्यालयीन कामाजासाठी भाडे तत्वावर वाहन देण्यात आलेले आहे. सदर भाडेतत्वावरील वाहन पुरविण्याबाबत २००३ मध्ये निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यावेळेस एक ठराव पारीत करण्यात आलेला आहे. २००३ मध्ये निविदेचा कालावधी एक वर्षाचा असल्यामुळे जुन २००४ मध्ये तो संपृष्टात आला होता. तद्नंतर निविदा कामात काही कालावधी लागणार असल्यामुळे निविदेस दोन महिन्याची मुदतवाढ देण्यात आली होती. त्यानंतर २००५, २००८ व २०१० मध्ये निविदा मागविण्यात आल्या होत्या. परंतु काही कारणास्तव त्या अंतिम झाल्या नाहीत.

सदस्य श्री. धनंजय बोडारे :—त्या पुर्वीच्या ठरावात बदल करण्याचा तुम्ही प्रस्ताव आणावयास पाहीजे होता ना?

सभापती, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—महासभेपुढे ठराव आणणे आवश्यक होते.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—मुळ निविदेतील अटी, शर्तीस अधिन राहुन भाडे तत्वावर वाहने पुरविणे आवश्यक असून या कामी जो ठराव केला आहे तो मी आपणांस वाचुन दाखवितो.

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रशासकीय कामकाजासाठी व मे. अनमोल ट्रान्सपोर्ट यांच्या पत्रान्वये व विनंतीनुसार मूळ निविदेतील अटी व शर्तीस अधिन राहून सलग ५ वर्षासाठी वरील तक्त्यातील नमूद केलेल्या दरानुसार कार, व्हॅन, सुमो व इतर वाहने वाहनचालकासह भाडेतत्वावर पुरविण्याकामी प्रशासनास संविदा करणेस मान्यता देत आहे.

काही सदस्य :—ठिक आहे, पास—पास......

सभापती, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ३१ :— महापालिका अधिका—यांना कार्यालयीन कामकाजासाठी वाहनचालकासह भाडे तत्वावर वाहने पुरविणेकामी लघुत्तमदराचे निविदाकार मे.अनमोल ट्रान्सपोर्ट कंपनी, डोंबिवली यांच्याशी संविदेस मान्यता देणे.**

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिकेच्या अधिका—यांना कार्यालयीन कामकाजासाठी भाडेतत्वावरील वाहन देण्यात आलेले आहेत. सदर भाडेतत्वावरील वाहन पुरविण्याबाबतच्या निविदा सन २००३ साली मागविण्यात आल्या होत्या व सदर निविदेचा कालावधी १ वर्षाचा असल्यामुळे जुन २००४ मध्ये संपुष्टात आला होता.तद्नंतर निविदा कामास काही कालावधी लागणार असल्यामुळे प्रशासनातर्फे जुन्या निविदेस दोन महिने मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव मा. स्थायी समितीपुढे मंजुरीस्तव सादर केला व मा. स्थायी समितीने पुढील निविदा अंतिम होऊन नविन ठेकेदार निश्चित होई पर्यत जुन्या निविदेस मंजुरी दिलेली होती.

तद्नंतर सदर निविदा सन जानेवारी २००५, फेंब्रुवारी २००८, ऑगस्ट २००८ व माहे एप्रिल २०१० रोजी मागविण्यात आल्या होत्या व त्या काही कारणास्तव अंतिम झाल्या नाहीत.

आता सदर निविदा दिनांक १७/६/२०१० च्या दै.सामना, दै.फ्रि प्रेस जनरल, दै.प्रात:काल, दै. नगर न्युज या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आल्या व जाहीर सुचनेनुसार खालील निविदाकारांनी कोरे निविदा संच विकत घेऊन विहित वेळेत सिलबंद निविदा सादर केल्या.

१) में.केस्ट्रल इंन्फ्रस्ट्रक्चर प्रा.लि, उल्हासनगर
२) में.अनमोल ट्रान्सपोर्ट कंपनी, डोंबिवली
३) में.मोहिनी राज टूर्स आणि ट्रॅव्हल्स, डोंबिवली
४) में.राज टुरिस्ट, उल्हासनगर

सदर सिलबंद निविदा (लिफाफा क्र.१) हा दिनांक २८/०६/१० रोजी मा.उप आयुक्त (वाहन) यांच्या दालनात मा.मुख्यलेखा अधिकारी,मा.मुख्यलेखा परिक्षक, वाहन विभागप्रमुख व निविदाकारांच्या प्रतिनिधी समक्ष उघडण्यात आल्या. वरिल सर्व निविदाकार लिफाफा क्र.१ मध्ये पात्र झाल्याने त्याच दिवशी लिफाफा क्र.२ वरिल उपस्थिता समक्ष उघडण्यात आला व वरिल निविदांकारापैकी में.अनमोल ट्रान्सपोर्ट कंपनी, डोंबिवली यांचे दर सर्व वाहनांसाठी न्युनतम आहे. सदर में.अनमोल ट्रान्सपोर्ट कंपनी, डोंबिवली यांना वाहन विभागाने पत्र क्र.६९ दिनांक २८/६/२०१० अन्वये दिनांक २९/६/२०१० रोजी वाटाघाटीसाठी मा.उप आयुक्त (वाहन) यांच्या दालनात बोलविण्यात आले व वाटाघाटी केल्यानंतरचे दर खालीलप्रमाणे आहेत.

| वाहनाचा तपशील | वाहनाचा दर | | जादा कि.मी चा दर | | जादा तासाचा दर |
|---|---|---|---|---|---|
| | प्रति दिवस ४० कि.मी (१२५० कि.मी प्रति महिना) | प्रति दिवस ४० किमी (२५०० कि.मी प्रति महिना) | १२५० कि.मी. नंतरचा प्रति कि.मी.दर | २५०० कि.मी. नंतरचा प्रति कि.मी.दर | १२ नंतरचा प्रति तास दर |
| १. मारूती इस्टीम (ए.सी.) | रू.१३०० | रू.१५०० | रू.७.०० | रू.७.०० | रू.३५.०० |
| २. टाटा इंडिगो (ए.सी.) | रू.१३०० | रू.१५०० | रू ७.०० | रू.७.०० | रू.३५.०० |
| ३. टाटा इंडिका (ए.सी.) | रू.९५० | रू.१०५० | रू ७.०० | रू.७.०० | रू.३५.०० |
| ४. टाटा इंडिका (नॉन ए.सी.) | रू.९०० | रू.१०५० | रू ७.०० | रू.७.०० | रू.३५.०० |
| ५. टाटा सुमो/जिप (ए.सी.) | रू.१२२५ | रू.१३७५ | रू ७.०० | रू.७.०० | रू.३५.०० |
| ६. टाटा सुमो/जिप(नॉनए.सी.) | रू.११७५ | रू.१२७५ | रू ७.०० | रू.७.०० | रू.३५.०० |
| ७. क्वालिस/टवेरा (ए.सी.) | रू.१८०० | रू.२००० | रू ७.०० | रू.७.०० | रू.३५.०० |
| ८. मारूती व्हॅन (नॉन ए.सी.) | रू.९५० | रू.१०५० | रू ७.०० | रू.७.०० | रू.३५.०० |

| वाहनाचा तपशील | वाहनाचा दर | जादा कि.मी चा दर | जादा तासाचा दर |
|---|---|---|---|
| निवडणूक आपातकालीन परिस्थिती, ,खासदार दौरा, अतिमहत्वाच्या व्यक्तीसाठी आवश्यकतेनुसार | | | |

| | प्रति दिवस (२५० कि.मी.पर्यत) | २५० कि.मी. नंतरचा प्रति कि.मी. दर | १२ तासा नंतरचा प्रति तास दर |
|---|---|---|---|
| ९. टाटा इंडिगो (ए.सी.) | रू.२००० | रू.८.०० | रू.३५.०० |
| १० क्वालिस (ए.सी.) | रू.२२०० | रू.८.०० | रू.३५.०० |
| ११. टवेरा (ए.सी.) | रू.२२०० | रू.८.०० | रू.३५.०० |
| १२.स्कॉरपिओ (ए.सी.) | रू.२२०० | रू.८.०० | रू.३५.०० |
| १३.टाटा सुमो (ए.सी.) | रू.२२०० | रू.८.०० | रू.३५.०० |
| १४. JCB 4DN Type Driver cum Operator | | ८ तासासाठी प्रती दिवस दर | ८ तासा नंतरचा प्रती तास दर |
| | | रू.५०० | रू.७० |

वरिल दराबाबत सादर करण्यात येते की, सदरचे दर हे सध्या २००३ च्या निविदा दरापेक्षा जास्त आहेत. तथापी सन २००३ व सन २०१० चे दरात, दरम्यानच्या कालावधीत झालेली भाववाढ पाहता, तफावत असणे अपेक्षित आहे. सन २००८—२००९ साली विषयांकीत कामाच्या निविदा मागविण्यात आल्या होत्या व त्यावेळेस प्राप्त झालेले दरास उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी त्यांचे पत्र क्र.९५४५ दिनांक ३/११/२००८ अन्वये त्यावेळेस प्राप्त झालेल्या निविदेचे दर योग्य व आजच्या बाजार भावाप्रमाणे वाजवी असल्याबाबत नमुद केले आहे. सदर सन २००८—२००९ मधील प्राप्त झालेल्या दराच्या तुलनेत आता में.अनमोल ट्रान्सपोर्ट कंपनी, डोंबिवली यांनी वाटाघाटी नंतर दिलेले वरिल दर कमी आहेत.

सदर निविदेचा गोषवारा मा.स्थायी समिती पुढे मंजुरीस्तव सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १३८ — दिनांक:— २१/२/२०११

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. सुंदर मंगतानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रशासकीय कामकाजासाठी व मे. अनमोल ट्रान्सपोर्ट यांच्या पत्रान्वये व विनंतीनुसार मूळ निविदेतील अटी व शर्तीस अधिन राहून सलग ५ वर्षासाठी वरील तक्त्यातील नमूद केलेल्या दरानुसार कार, व्हॅन, सुमो व इतर वाहने वाहनचालकासह भाडेतत्वावर पुरविण्याकामी प्रशासनास संविदा करणेस मान्यता देत आहे .

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ३२ वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र. ३२ :— उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात निर्बीजीकरण कार्यक्रमांतर्गत भटक्या कुत्र्यांवर शस्त्रक्रिया करणे व रेबिज लस देणेकामी लघुत्तम दराचे निविदाकार मे.ॲनिमल वेल्फेअर सोसायटी, मुंबई यांचेशी संविदेस मान्यता देणे.

---

सदस्य श्री. रमेश चव्हाण :—याबाबत स्पष्टीकरण कोण करेल? रेबीजच्या इंजेक्शनचा काही फायदा होत नाही हे आम्ही कित्येकवेळा पाहिले आहे.

श्री.जी.टी. जिंदे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी:— . रत्नागिरी, ठाणे, उल्हासनगर या तीन, चार ठिकाणी शासकिय मध्यवर्ती रुग्णालये आहेत उल्हासनगरमधील शासकिय रुग्णालयात अण्टी रेबीजचे इंजेक्शन

घेण्यासाठी मुंबई, कर्जत, कसा–या पासुनचे लोक येतात. अण्टी रेबीज इन्जेक्शनचा लाभ घेणा–यामध्ये पंधरा टक्के सुध्दा उल्हासनगरचे रहिवासी नसतात.

<u>सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी</u> :–रेबीज लसची किती इंन्जेक्शने खरेदी केली त्यातील किती इंन्जेक्शने वापरात आली त्याची सविस्तर माहिती आम्हांला दया.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे</u> :–आज २१ फेब्रुवारी आहे, ८ दिवसानंतर हा महिना संपणार आहे. ३१ मार्चच्या आत हा निधी संपवायचा आहे की पुढच्या वर्षी सुध्दा हा निधी उपयोगात आणता येणार आहे.?

<u>श्री.जी.टी. जिंदे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी</u>:– श्वान निर्बीजीकरणाच्या दैनंदिन कामाचा आम्ही अहवाल तयार केला आहे त्यामध्ये कुत्रे पकडुन नेण्याची तारीख, कुत्रे ज्या ठिकाणाहुन पकडली त्याचा सविस्तर पत्ता व प्रभाग क्र,. निबीर्जीकरणास पाठविलेल्या कुत्रें यांची संख्या, पकडलेली कुत्री निर्बीजीकरणास पाठवितांनाचे दोन प्रतिष्ठित स्थानिक साक्षीदारांची नावे, पत्ते, आणि त्यांच्या सहया घेतल्या जातात. तसेच स्वच्छता निरिक्षकाची सही घेतली जाते., निर्बीजीकरण केलेली कुत्री परत त्याच भागात आणुन सोडली जातात अशी कुत्री सोडल्याची तारीख, कुत्रे यांची संख्या आणि ज्यांच्या समक्ष कुत्री आणुन सोडली त्या दोन प्रतिष्ठित स्थानिक साक्षीदारांची नावे, पत्ते आणि सही घेतली जाते. त्याचबरोबर स्वच्छता निरिक्षकाची तारखेनिशी सही घेतली जाते आणि ठेकेदाराची सही अशा प्रकारचा अहवाल तयार केला जात आहे.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे</u>:–३१ मार्चपर्यंत निधी संपवायचा आहे ना?

<u>काही सदस्य</u> :–पास–पास......

<u>सभापती, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर</u>:–सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ३२** :– उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात निर्बीजीकरण कार्यक्रमांतर्गत भटक्या कुत्र्यांवर शस्त्रक्रिया करणे व रेबिज लस देणेकामी लघुत्तम दराचे निविदाकार मे.ॲनिमल वेल्फेअर सोसायटी, मुंबई यांचेशी संविदेस मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील भटक्या कुत्र्यांवर शस्त्रक्रिया करुन त्यांना रेबिज लस देण्याची जाहिर निविदा सुचना मा. आयुक्त यांचे मान्यतेनुसार दि. २१/१०/२०१० रोजी दै. पुण्यनगरी व दै. मुंबई लक्षव्दिप या वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानुसार विहित कालावधीत तीन निविदाकारांनी निविदा मुल्य अदा करुन निविदा खरेदी केल्या होत्या. त्यानुसार विहित कालावधीत म्हणजे दि. २७/१०/२०१० रोजी पूर्वी तीन निविदा या कार्यालयास सादर झाल्या होत्या. सदर प्राप्त निविदा दि. १/१२/२०१० रोजी दुपारी ४.०० वाजता मा. उप – आयुक्त (आरोग्य) यांचे दालनात मा. उप – आयुक्त (आरोग्य), वैद्यकीय आरोग्य अधिकारी, मुख्य लेखा परिक्षक व मुख्य लेखा अधिकारी यांचे उपस्थितीत निविदाकारांचे प्रतिनिधींचे उपस्थितीत उघडण्यात आल्या प्राप्त तीनही निविदाकारांनी निविदेतील नमुद अटी व शर्तीची पूर्तता केल्यामुळे तीनही निविदाकारांचे वित्तीय लिफाफे उघडण्यात आले आहेत. सदर निविदांमध्ये खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| अ. क्र | कामाचे स्वरुप | निविदाकाराचे नाव | | |
|---|---|---|---|---|
| | | *<u>मे. ॲनिमल वेल्फेअर सोसायटी, मुंबई</u>* | मे. ॲनिमल वेल्फेअर सोसायटी, ठाणे | मे. रॉयल वॅटरनरीस सोसायटी ऑफ इंडीया, नागपुर |
| १ | मोकाट कुत्रे पकडणे | *<u>रु ११९२/– प्रति श्वान</u>* | रु १२१०/– प्रति श्वान | रु १२१२/– प्रति श्वान |
| २ | पकडून सदरचे कुत्रे शस्त्रक्रिया ठिकाणी नेणे | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | प्रजनन शस्त्रक्रिया करणे व श्वानदंश लस देणे | | | |
| ४ | शस्त्रक्रिया केलेल्या या कुत्र्यांवर बरे होईपर्यंत औषधोपचार व खानपान व्यवस्था करणे. | | | |
| ५ | टेटॉईंग / कानावर व्ही मार्क (शस्त्रक्रिया केल्याचे ओळखचिन्ह) करणे. | | | |
| ६ | प्रजनन शस्त्रक्रिया झाल्यावर ज्या जागेवरुन पकडली तेथे नेऊन सोडणे | | | |

उक्त प्राप्त निविदांपैकी मे. ॲनिमल वेल्फेअर सोसायटी, मुंबई यांचा दर हा न्युनतम असून उपरोक्त दर हा अपेक्षित खर्च रु १२२०/— प्रति श्वान पेक्षा रु २८/— ने कमी आहे. तरी उपरोक्त न्युनतम दराची निविदा स्विकारण्यास हरकत नसावी. सन २०१० — ११ या वर्षात १५०० कुत्र्यांचे निर्बिजीकरण करण्याचे प्रस्तावित करण्यात येते. त्याकरिता सी — २ (पग) श्वान निर्बिजीकरण कार्यक्रम या लेखाशिर्षाखाली १८,००,००० रु तरतुद उपलब्ध आहे. तरी प्रति श्वान रु ११९२/— याप्रमाणे एकुण होणा—या १७,८८,०००/— रु खर्चास मान्यता मिळून वरील नमुद लघुत्तम निविदाकार मे. ॲनिमल वेल्फेअर सोसायटी, मुंबई यांचेशी संविदा करण्याकरिता मा. स्थायी समितीची वित्तीय व प्रशासकीय मान्यता आवश्यक असल्याने सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीसमोर मान्यतेकरिता सादर.

स्थायी समिती ठराव क्र. १३९          दिनांकः— २१/२/२०११

सुचकाचे नाव :— श्री. दत्तात्रय पवार

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती संगिता कंडारे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात निर्बीजीकरण कार्यक्रमांतर्गत भटक्या कुत्र्यांवर शस्त्रक्रिया करणे व रेबिज लस देणेकामी प्रशासनास लघुत्तम दराचे निविदाकार मे.ॲनिमल वेल्फेअर सोसायटी, मुंबई यांचेशी संविदेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ३३ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ३३** :– महापालिका मुख्यालयाचे इमारतीत लिफ्ट बसविणेसाठी आवश्यक साधनसामुग्रीसह लिफट संच पुरविणे,बसविणे,चाचणी घेणे व कमिशनिंग करणेकामी लघुत्तम दराचे निविदाकार मे.सचिंदलर इंडिया प्रा.लि. यांच्याशी संविदेस मान्यता देणे.

---

काही सदस्य :–पास–पास......

सभापती, श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः–सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ३३** :– महापालिका मुख्यालयाचे इमारतीत लिफ्ट बसविणेसाठी आवश्यक साधनसामुग्रीसह लिफट संच पुरविणे,बसविणे,चाचणी घेणे व कमिशनिंग करणेकामी लघुत्तम दराचे निविदाकार मे.सचिंदलर इंडिया प्रा.लि. यांच्याशी संविदेस मान्यता देणे.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिका मुख्यालय, उल्हासनगर–३ येथे लिफ्ट संच आवश्यक साधन सामुग्रीसहीत पुरविणे, बसविणे, चाचणी व कमिशनिंग करणे यासाठी प्रथम जाहिरातीनुसार फक्त एकच मक्तेदार M/s. Schindler India Pvt. Ltd. यांनी निविदा खरेदी केली सदर निविदा दाखल करण्याचा अखेरचा दिनांक २३/८/१० रोजी दुपारी ३–०० वाजेपर्यत होता परंतु एकही निविदा दाखल झाली नाही. तसेच दुस–या जाहिरातीनुसार निविदा कोणीही मक्तेदारांनी खरेदी केली नाही आणि तिस–यांदा सिलबंद निविदा जनसंपर्क कार्यालयामार्फत जाहिरात देवुन मागविण्यात आल्या होत्या. सदर निविदा खरेदी करण्याचा दिनांक ०५/१०/२०१० ते १३/१०/२०१० पर्यत होता. सदर निविदा दाखल करण्याचा अखेरचा दिनांक १४/१०/२०१० रोजी दुपारी ३–०० वाजेपर्यत होता. सदर कालावधीमध्ये फक्त एकाच मक्तेदाराने M/s. Schindler India Pvt. Ltd. यांनी निविदा फॉर्म खरेदी केला आणि विहीत मुदतीत सिलबंद निविदा दाखल केली आहे.

महापालिका मुख्यालयात लिफ्ट बसविणेसाठी तीनवेळा जाहिरात देवुन इच्छुक निविदाकारांकडुन निविदा मागविण्यात आल्या असता तिस–या जाहिरातीनुसार M/s. Schindler India Pvt. Ltd. यांचेकडुन निविदा प्राप्त झाली आहे. वरील निविदाकाराकडुन तिस–यांदा जाहिरातीनुसार प्राप्त झालेली सिलबंद निविदा दिनांक ०१/११/२०१० रोजी दु. १२–००वा. उघडण्यात आली. सदर निविदेमध्ये M/s. Schindler India Pvt. Ltd. यांनी लिफ्ट संच आवश्यक साधन सामुग्रीसहीत पुरविणे, बसविणे, चाचणी व कमिशनिंग करणे यासाठी लागणारा खर्च रक्कम रू.१३,७९,३१३/–पेक्षा ९.४% इतका कमी म्हणजे रू. १२,४९,६५७=५७/– म्हणजेच रू.१२,४९,६५८/–इतका दर सादर केलेला आहे.

महापालिका मुख्यालयात लिफ्ट बसविणेचे काम आवश्यक असुन वरील सर्व बाबींचा विचार करता M/s. Schindler India Pvt. Ltd. यांचेकडुन प्राप्त झालेला दर अंदाजपत्रकीय रक्कम रू.१३,७९,३१३/– पेक्षा ९.४% कमी व वाजवी असुन त्यांच्या दराला मंजुरी देवुन लागणा–या खर्चास म्हणजे रू.१२,४९,६५८/– इतक्या रक्कमेस मान्यता देवुन स्थायी समितीपुढे करार करण्याच्या प्रस्तावास मा. स्थायी समितीपुढे मंजुरीसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १४० दिनांकः– २१/२/२०११

सुचकाचे नाव :– श्री. दत्तात्रय पवार

अनुमोदकाचे नाव :– श्रीमती संगिता कंडारे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार महापालिका मुख्यालयाचे इमारतीत लिफ्ट बसविणेसाठी आवश्यक साधनसामुग्रीसह लिफ्ट संच पुरविणे,बसविणे,चाचणी घेणे व कमिशनिंग करणेकामी प्रशासनास लघुत्तम दराचे निविदाकार मे.सचिंदलर इंडिया प्रा.लि. यांच्याशी संविदेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ३४ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ३४ :—** वाहन क्रमांक एम.एच. ०५ पी ९०९० (होंडा सिटी) या वाहनाचे डेंटिंग व पेंटिंग, बम्पर्स रिप्लेसमेंट इत्यादी काम कंपनीचे अधिकृत सर्विस सेंटर मे. हॉलमार्क ऑटोमोटिव प्रायव्हेट लिमिटेड, नवि मुंबई यांचेकडुन करण्यासाठी परवानगी मिळविणे कामी आयुक्तांस या ठेकेदाराशी निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे.

---

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—वाहन क्रमांक एम.एच.०५ पी ९०९० (होंडा सिटी) हे जे वाहन आहे ते कधीचे आहे?

श्री. दिपक चिमनकारे, वाहन विभाग प्रमुख:— वाहन क्रमांक एम.एच.०५ पी ९०९० (होंडा सिटी) हे वाहन २००६ चे आहे.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—हे वाहन विकायला गेले तर ३ लाख रुपये सुध्दा मिळणार नाहीत. आणि दुरुस्ती करायला गेले तर २ ते ३ लाख खर्च करुन सुध्दा ते व्यवस्थित होणार नाही. यासाठी या वाहनावर जास्त खर्च न करता एक नविन वाहन खरेदी केले जावे.

सदस्य श्री. दिपक चिमनकारे, वाहन विभाग प्रमुख:—होंडा सिटीचे अधिकृत शोरुम / सर्व्हिसींग सेंटर मेसर्स हॉलमार्क ऑटोमोटिव्है सेन्टर यांच्याकडे सदरचे वाहन दाखविण्यात आले व दरपत्रके मागविण्यात आली होती त्यानुसार सदर वाहनाचे डेटिंग, पेन्टींग, बम्पर्स रिप्लेसमेंट इत्यादीचा प्रस्ताव तयार करुन आपणापुढे आणला आहे.

काही सदस्य :—पास—पास......

सभापती, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ३४ :—** वाहन क्रमांक एम.एच. ०५ पी ९०९० (होंडा सिटी) या वाहनाचे डेंटिंग व पेंटिंग, बम्पर्स रिप्लेसमेंट इत्यादी काम कंपनीचे अधिकृत सर्विस सेंटर मे. हॉलमार्क ऑटोमोटिव प्रायव्हेट लिमिटेड, नवि मुंबई यांचेकडुन करण्यासाठी परवानगी मिळविणे कामी आयुक्तांस या ठेकेदाराशी निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिकेचे मा.आयुक्त सो. यांना कार्यालयीन कामकाजासाठी वाहन क्रमांक एम.एच.०५ पी ९०९० (होंडा सिटी) देण्यात आलेले आहे.

सदर वाहनाचा रंग उडालेला व काही भाग गंजलेला असल्यामुळे सदर वाहनाचे Denting व Painting चे काम करणे गरजेचे आहे.या अनुषंगाने सदर वाहन होंडा सिटीचे अधिकृत शोरूम/सर्विसिंग सेंटर मे.हॉलमार्क ऑटोमोटीव प्रायव्हेट लिमिटेड यांच्याकडे दाखविण्यात आले व सदर कामाचे दरपत्रक मागविण्यात आले.सदर दरपत्रकानुसार सदर वाहनाचे Body paint, Tin work, Bumpers इत्यादी कामाकरीता अंदाजित खर्च रू.९१,७९४/— एवढा येईल असे कळविले.

सदर बाबत असे सादर करण्यात येते की,सदर वाहनाचे कोणतेही किरकोळ व मोठी कामे ही कंपनीच्या अधिकृत सर्विस स्टेशन मे.हॉलमार्क ऑटोमोटीव लिमिटेड यांचे मार्फत करण्यात येते व त्यामुळे वाहन सुस्थितीत आहे.

यास्तव वरिल वाहनाचे Denting व Painting, Bumpers replacement इत्यादी कामे देखील होंडासिटीचे अधिकृत सर्विस सेंटर मार्फत करण्यासाठी सादर करण्यात येत आहे.सदर कामासाठी एकूण रू. ९१,७९४/— एवढा खर्च येणार आहे व सदर रक्कम मे.हॉलमार्क ऑटोमोटीव प्रायव्हेट लिमिटेड यांना अग्रीम स्वरूपात धनादेशाव्दारे अदा करावे लागेल.तसेच सदर खर्च लेखाशिर्ष AA-3 (14) वाहन दुरूस्तीमधुन करण्यात येईल.सदर लेखाशिर्षात रू.१४,८१,३६४/— एवढी शिल्लक आहे.

तरी सदर वाहनाचे काम निविदेशिवाय थेट होंडासिटीचे अधिकृत सर्विस सेंटर मे.हॉलमार्क ऑटोमोटीव प्रायव्हेट लिमिटेड यांच्याकडून करण्यास मा.आयुक्ताच्या अधिकारात मुंबई महानगरपालिका अधिनियम १९४९ अंतर्गत ५(२)(२) अंतर्गत करून घ्यावयाचे आहे,करीता प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र.** १४१ **दिनांकः—** २१/२/२०११

सुचकाचे नाव :— श्री. दत्तात्रय पवार

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती संगिता कंडारे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार वाहन क्रमांक एम.एच. ०५ पी ९०९० (होंडा सिटी) या वाहनाचे डेंटिंग व पेंटिंग, बम्पर्स रिप्लेसमेंट इत्यादी काम कंपनीचे अधिकृत सर्विस सेंटर मे. हॉलमार्क ऑटोमोटिव प्रायव्हेट लिमिटेड, नवि मुंबई यांचेकडुन करवून घेणेकामी आयुक्तांस निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ३५ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ३५ :—** वाल्मीकीनगर, उल्हासनगर—५ येथिल सफाई कामगार निवासस्थानासाठी इमारत क्र. ४ बांधणेकामी दिनांक २५/८/२००९ रोजी देण्यांत आलेली निविदा व कार्यादेश रद्द करुन जवाहरलाल नेहरु नागरी पूर्नउत्थान योजने अंतर्गत शहरी गरीबांना मुलभूत सेवा पुरविणे प्रकल्पाअंतर्गत ७२ सदनिकांच्या तीन इमारतींसह आणखी ७२ सदनिकांची एक इमारत बांधणे प्रयोजनार्थ सध्या कार्यरत असलेला ठेकेदार मे. कोनार्क इन्फ्रास्ट्रक्चर यांच्याशी पूर्वीच्या निविदेतील अटी शर्ती व दरावर निविदा शिवाय थेट संविदेस आयुक्तांना प्राधिकृत करणे.

---

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**या कामासाठी किती खर्च येणार आहे? व हा खर्च महापालिकेचा आहे की कुणाचा?

**श्री. आर.बी. शिर्के, कार्यकारी अभियंता, स्थापत्यः—** वाल्मीकीनगर येथे शहरी गरीबांकरीता मुलभुत सुविधा पुरविणे प्रकल्पाच्या कार्यक्रमा अंतर्गत स्थायी समितीच्या दिनांक २४/८/२००९ च्या ठराव क्र. ७४ नुसार रुपये

१३४८२ प्रति चौरस मिटर दराने सदनिका बांधण्याच्या कामास मंजुरी प्राप्त झाली आहे. त्या दरानुसार सफाई कामगाराच्या निवासस्थानासाठी /इमारतीच्या बांधकामासाठी रु. ३,७५,६१,६६१/— एवढा खर्च अपेक्षित आहे.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>जुन्या इमारतींची सद्यस्थिती काय आहे?

<u>श्री. आर.बी. शिर्के, कार्यकारी अभियंता, स्थापत्य:—</u> जुनी इमारत तोडुन ठेवली आहे.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>या कामासाठी निधीची तरतुद आहे काय?

<u>श्री. आर.बी. शिर्के, कार्यकारी अभियंता, स्थापत्य:—</u>सफाई कामगारांसाठी निवासस्थाने बांधण्याकामी रुपये ३,८८,७९,२५३/— रक्कमेची तरतुद महापालिकेच्या मागील अर्थसंकल्पात करण्यात आली होती.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>त्यातील काहीही निधी वापरलेला नाही?

<u>श्री. आर.बी. शिर्के, कार्यकारी अभियंता, स्थापत्य:—</u>स्थायी समितीच्या दिनांक २५/१०/२०१० च्या ठरावानुसार सफाई कामगारांच्या निवासस्थानाच्या कामास मंजुरी प्राप्त झाल्यानंतर दिनांक १०/१२/२०१० रोजीच्या वृत्तपत्रात प्रसिध्दी देवुन निविदा मागविण्यात आल्या आहेत. सदर निविदेतील अटीनुसार चौथ्या इमारतीचे काम मेसर्स कोनार्क इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड यांची मागणीनुसार यांच्याकडुन करुन घेतल्यास या कामाची निविदा प्रक्रिया रद्द करावी लागेल. शहरी गरीबांकरीता मुलभुत सुविधा पुरविणे प्रकल्पाच्या मंजुर निविदा दराने काम केल्यास निविदा रक्कमेपेक्षा रुपये १३,१७,५९२/— कमी खर्च येणार आहे. तसेच या कामाच्या निविदा मागविल्यास सध्याची बाजारभावाची वाढ महानगरपालिकेत प्राप्त होणा—या निविदामधील दर लक्षात घेता निविदा जास्त दराने प्राप्त होण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणुन कोनार्क इन्फ्रास्ट्रक्चर यांच्याकडुन शहरी गरीबांकरीता मुलभुत सुविधा पुरविणे प्रकल्पाच्या मंजुर दराने काम करुन घेणे महानगरपालिकेच्या हिताचे आहे.

<u>सदस्या श्रीमती पंचशिला पवार :—</u>प्रशासनाने दिलेला प्रस्ताव मंजुर करा.

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>सभापती, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ३५** :— वाल्मीकीनगर, उल्हासनगर—५ येथिल सफाई कामगार निवासस्थानासाठी इमारत क्र. ४ बांधणेकामी दिनांक २५/८/२००९ रोजी देण्यांत आलेली निविदा व कार्यादेश रद्द करुन जवाहरलाल नेहरु नागरी पूर्नउत्थान योजने अंतर्गत शहरी गरीबांना मुलभूत सेवा पुरविणे प्रकल्पाअंतर्गत ७२ सदनिकांच्या तीन इमारतींसह आणखी ७२ सदनिकांची एक इमारत बांधणे प्रयोजनार्थ सध्या कार्यरत असलेला ठेकेदार मे. कोनार्क इन्फ्रास्ट्रक्चर यांच्याशी पूर्वीच्या निविदेतील अटी शर्ती व दरावर निविदा शिवाय थेट संविदेस आयुक्तांना प्राधिकृत करणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील कार्यरत असलेल्या चतुर्थ क्षेणी सफाई कामगारांसाठी सेवा निवास्थाने बाधण्याच्या रु. ३,८८,७९,२५३/— रकमेस मा. स्थायी समितीचा ठराव क्र. ७७ दिनांक २५/१२/२०१० नुसार प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्राप्त झाली असुन, मा. स्थायी समितीने या कामाची निविदा प्रक्रीया करण्यास मान्यता दिलेली आहे.

उल्हासनगर ५ येथील वाल्मिकी वसाहत येथे जवाहरलाल नेहरू नागरी पुर्नरोत्थान योजने अंतर्गत शहरी गरीबांन करीता मुलभुत सुविधा पुरविणे प्रकल्पा अंतर्गत ७२ सदनिकांच्या ३ इमारती (इमारत क्रंमाक १,२ व ३) प्रस्तावित आहेत व त्याच बरोबर ७२ सदनिकांची १ इमारत (इमारत क्रंमाक ४) महानगरपालिकेच्या निधीतून संफाई कामगाराच्या सेवा निवास स्थाना करीता प्रस्तावित असून याच्या आराखडयास महानगरपालिकेच्या नगर रचना विभागा कडून मान्यता देण्यात आली आहे.शहरी गरीबांकरीता मुलभुत सुविधा पुरविणे प्रकल्पा अंतर्गत वाल्मिकीनगर येथील ३ इमारती बांधण्याच्या कामाच्या निविदा दिनांक १२/०६/२००९ रोजी

मागविण्यात आल्या होत्या. व निविदा प्रक्रीया पूर्ण करून या कामाचे कार्यादेश दिनांक २५/०८/२००९ रोजी देण्यात आले आहे.

या निविदेतील तरतुदीनुसार निविदा धारकांनी शहरी गरीबांकरीता मुलभुत सुविधा पुरविणे प्रकल्पा अंतर्गत इमारत क्र. १,२, व ३ चे काम पूर्ण करावयाचे असुन, इमारत क्र. ४ ही महानगरपालिकेच्या निधीतुन बांधावयाची असल्याने महानगरपालिकेने ठरविल्यास महानगरपालिकेच्या निधीतुन इमारत क्र. ४ ची निविदा धारकाने त्याच्या वरील निविदेच्या मंजुर दराने करावयाचे आहे. या कामी निविदा धारकांची देयके महानगरपालिकेच्या निधीतुन स्वतंत्रपणे देण्यात येतील असे नमुद आहे.

सदर निविदेतील अटी नुसार दिनांक २१/०७/२००९ रोजी या कामाची निविदापूर्व बैठक घेण्यात आली. निविदापूर्व बैठकीतील मुद्दा क्र. १२ अन्वये निविदा धारकामार्फत चौथ्या इमारतीसाठी वाढीव दराची मागणी केली होती. परंतु निविदेतील पृष्ठ क्र. १२ च्या अटीनुसार निविदा धारकाने चौथ्या इमारतीचे कार्यादेश शहरी गरीबांकरीता मुलभुत सुविधा पुरविणे प्रकल्पाच्या कामाच्या कार्यादेशा नंतर ६ महिन्याच्या आतील कालावधी दिल्यास चौथ्या इमारतीचे काम मंजुर निविदा दराने करावे लागेल असे नमुद आहे. किंवा या कामाच्या स्वतंत्रपणे निविदा मागविण्यात येतील असेही नमुद आहे. म्हणजेच निविदा धारकाने मंजुर दराने चौथ्या इमारतीचे काम करण्याची तयारी दर्शविल्यास निविदा धारकास मंजुर निविदा दराने काम देता येणे शक्य आहे.

मे. कोणार्क इंफ्रास्ट्रक्चर ली. यांचे पत्र दि. २९/१२/२०१० नुसार त्यांनी सदरचे चौथ्या इमारतीचे काम शहरी गरीबांन करीता मुलभुत सुविधा पुरविणे प्रकल्पाच्या मंजुर दराने करावयाची तयार दर्शविली आहे. व निविदेतील पृष्ठ क्र. १२ अन्वये अट क्र. ४ नुसार व निविदापुर्व बैठकीतील स्पष्टीकरणानुसार निविदा मंजुरी दराने निविदा धारक काम करण्यास तयार असल्याने चौथ्या इमारतीचे काम निविदा धारकाकडून करुन घेण्याचे ठरल्यास या कामाच्या निविदा मागविण्याची आवश्यकता नाही.

निविदापूर्व बैठकीतील मुद्दा क्र. १२ च्या स्पष्टीकरणानुसार शहरी गरीबांकरीता मुलभुत सुविधा पुरविणे प्रकल्पाच्या कामाच्या कार्यादेशा नंतर ६ महिन्याच्या आतील कालावधी दिल्यास चौथ्या इमारतीचे काम मंजुर निविदा दराने देणे शक्य होते. परंतु वरील कामाचे कार्यादेश दि. २५/०८/२००९ रोजी देण्यात आले असुन, त्यानंतरचा ६ महिन्याचा कालावधी संपुष्ठात आला असल्याने चौथ्या इमारतीच्या कामाच्या निविदा काढण्याचे स्वतंत्रपणे प्रस्ताव तायार करण्यात आला. व त्यास मा. स्थायी समितीच्या दि. २५/१०/१० च्या ठराव क्र. नुसार सफाई कामगारांच्या सेवा निवास्थानाच्या रु. ३,८८,७९,६५३/– रकमेच्या कामास मंजुरी प्राप्त झाल्यावर या कामाच्या दि. १०/१२/२०१० रोजीच्या वृत्तपत्रात प्रसिध्दी देवून निविदा मागविण्यात आल्या आहेत. सदर निविदेतील अटी नुसार चौथ्या इमारतीचे काम मे. कोणार्क इंफ्रास्ट्रक्चर ली. यांचे मागणी नुसार त्यांचेकडून करुन घेतल्यास या कामाची निविदा प्रक्रीया रद्द करावी लागेल. आता पर्यंत को–या निविदांचे एकुण आठ फॉर्म ठेकेदारास विक्री करण्यात आलेले आहेत.

वाल्मीकी नगर येथे शहरी गरीबांना करीता मुलभुत सुविधा पुरविणे प्रकल्पाच्या कार्यक्रमांतर्गत मा. स्थायी समितीच्या दि. २४/०८/२००९ चा ठराव क्र. ७४ नुसार रूपये १३,४८२/–प्रति चौ.मिटर दराने सदनिका बांधण्याच्या कामास मंजुरी प्राप्त झाली आहे. त्या दरानुसार सफाई कामगाराच्या निवासस्थांनासाठीच्या इमारतीच्या कामास रूपये ३,७५,६१,६६१/–एवढा खर्च आपेक्षित आहे.म्हणजेच शहरी गरीबांकरीता मुलभुत सुविधा पुरविणे प्रकल्पाच्या मंजुर निविदा दराने काम केल्यास निविदा रक्कमे पेक्षा रूपये १३,१७,५९२/– रक्कमेने कमी खर्च येणार आहे. तसेच या कामाच्या निविदां मागविल्यास सद्याची बाजार भावाची वाढ महानगर पालिकेस प्राप्त होणा–या निविदा मधील दर लक्षात घेता निविदा जादा दराने प्राप्त होण्याची शक्यता नाकरता येत नाही म्हणून में. कोणार्क इन्फारस्क्रर्चर यांच्या कडून त्यांचे दिनांक २९/१२/२०१० रोजीच्या विनंती अर्जानुसार शहरी गरीबांकरीता मुलभुत सुविधा पुरविणे प्रकल्पाच्या मंजुर दराने काम करून घेणे महानगरपालिकेच्या हिताचे आहे.

वाल्मिकीनगर येथे चतूर्थ श्रेणी कामगाराच्या चौथ्या सेवा इमारतीच्या कामाच्या निविदा रदद करण्यास व तशा प्रकारे निविदा सुचनेस दुरूस्ती करून प्रसिध्दी करण्यास व वरील चौथ्या सफाई कामगाराच्या इमारतीचे काम में.कोणार्क इन्फास्टक्र्चर यांच्या कडून शहरी गरीबांना करीता मुलभुत सुविधा पुरविणे प्रकल्पाच्या मंजुर दराने म्हणजेच रूपये १३,४८२/– प्रति चौरस मिटर दराने करून घेण्यात मंजुरी मिळावी हि विनंती.

या सर्व गोष्टीचा सर्वकश विचार करता चौथ्या सफाई कामगाराच्या इमारतीचे कामाच्या निविदा रदद करण्यासाठी व काम में.कोणार्क इन्फास्टक्र्चर यांच्या कडून शहरी गरीबांना करीता मुलभुत सुविधा पुरविणे प्रकल्पाच्या मंजुर दराने म्हणजेच रूपये १३,४८२/— प्रति चौरस मिटर दराने करून घेण्यास मा. स्थायी समितीची मंजुरी घेण्यासाठी सादर.

स्थायी समिती ठराव क्र. १४२ | दिनांक:— २१/२/२०११

सुचकाचे नाव :— श्रीमती पंचशिला पवार

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती सरोजिनी टेकचंदानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार वाल्मीकीनगर, उल्हासनगर—५ येथिल सफाई कामगार निवासस्थानासाठी इमारत क्र. ४ बांधणेकामी दिनांक २५/८/२००९ रोजी देण्यांत आलेली निविदा व कार्यादेश रद्द करुन जवाहरलाल नेहरु नागरी पूर्नउत्थान योजने अंतर्गत शहरी गरीबांना मुलभूत सेवा पुरविणे प्रकल्पाअंतर्गत ७२ सदनिकांच्या तीन इमारतींसह आणखी ७२ सदनिकांची एक इमारत बांधणे प्रयोजनार्थ सध्या कार्यरत असलेला ठेकेदार मे. कोनार्क इन्फ्रास्ट्रक्चर यांच्याशी पूर्वीच्या निविदेतील अटी शर्ती व दरावर निविदा शिवाय थेट संविदेस आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ३६ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ३६ :—** उल्हासनगर —४ येथिल, पेट्रोल पंप ते ओटी सेक्शन ४ पर्यंतच्या रस्त्यांचे उर्वरीत कामासाठी सुधारीत प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणे व ठेकेदार मे. कोनार्क इन्र्फास्ट्रक्चर यांच्याशी पूर्वीच्या निविदेतील अटी शर्ती व दराने आयुक्तांना निविदा शिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे.

---

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—प्रशासनाने दिलेल्या प्रस्तावानुसार मंजुरी घ्या.

काही सदस्य :—पास—पास......

सभापती, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ३६ :—** उल्हासनगर —४ येथिल, पेट्रोल पंप ते ओटी सेक्शन ४ पर्यंतच्या रस्त्यांचे उर्वरीत कामासाठी सुधारीत प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणे व ठेकेदार मे. कोनार्क इन्र्फास्ट्रक्चर यांच्याशी पूर्वीच्या निविदेतील अटी शर्ती व दराने आयुक्तांना निविदा शिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर—४ पेट्रोल पंप ते ओटी सेक्शन ४ पर्यंतच्या रस्त्यांचे सुधारित वित्त आयोगाचे उपलब्ध निधी व महानगरपालिकेच्या निधीतून करण्याचे कामावरील प्राकलनीय खर्च रु. २,६०,८२,०००/— इतक्या रकमेचे काम वित्त आयोग अनुदान विकास कामे 'अ' अंदाजपत्रक भाग—२, क—४ (**vii**) आणि नविन रस्ते विकास कार्य 'अ' अंदाजपत्रक भाग—२ क—४ (**ii**) या दोन्ही लेखाशिर्षातील तरतुदीमधून करण्याचे प्रस्तावास मा. स्थायी समिती ठराव क्र.४०, दि.२२/०८/२००८ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मंजूरी प्राप्त झाली होती.

सदर कामातील स्थापत्य कामावरील होणारे खर्चाची निविदा रक्कम रु.१,७३,६३,९१०/— इतकी होती. त्याप्रमाणे निविदा मागविल्या असता प्राप्त निविदाकारांपैकी लघुत्तम दराचे मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी या निविदाकारांची १८.१८ टक्के जास्त प्रमाणे होणाऱ्या रु.३१,५६,७५८/— इतक्या वाढीव खर्चानुसार रु. २,०५,२०,६६८/—इतक्या रकमेची मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी या संस्थेच्या निविदेस मा. स्थायी समिती ठराव क्र.९०, दि.२४/११/२००८ अन्वये मंजूरी प्राप्त झाली होती. त्यानुसार मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी या संस्थेला क्र.उमपा/साबांवि/शअ/८८१, दि.०९/०६/२००९ अन्वये कार्यारंभ आदेश देण्यात आले होते. निविदेतील अटी शर्तीनुसार सदर रस्त्याचे काम सुरु आहे.

सदर रस्त्याचे कामाचे मुळ प्राकलन उपलब्ध तरतुदीच्या मर्यादेत मंजूर विकास आराखडयाप्रमाणे ३७५ मीटर लांबीचे व ४५ फुट रुंदीचे अंदाजपत्रकातील उपलब्ध निधीनुसार तयार करण्यात आले होते. परंतु प्रत्यक्षात सदर रस्त्याचा मार्गानुसार या रस्त्याची लांबी ६७७ मी. व रुंदी ४५' —६०' रुंदीची अशी उपलब्ध आहे. त्यामुळे आता मंजूर विकास आराखडयातील रुंदीपेक्षा जास्त जागा उपलब्ध होत आहे. त्यानुसार भविष्यातील वाढत्या वाहतुकीमुळे जागेचा पुर्णत: रस्त्याचे मजबुतीकरण करण्यासाठी संपुर्ण रस्ता सलग पेट्रोल पंप जवळील चौकापर्यंत जुन्या सिमेंट कॉक्रीट रस्त्यापर्यंत मिळविणे आवश्यक आहे. तसेच रस्त्यावरील वाहतुकीचा विचार करुन महानगरपालिकेने नियुक्त केलेल्या सल्लागाराने दिलेल्या सल्ल्याप्रमाणे रस्त्याची जाडी २५ से.मी. न करता ३० से.मी. करणेत येत आहे. त्या दृष्टीने रस्त्याचे काम करण्यासाठी महापालिकेने नियुक्त केलेल्या अनुभवी व तज्ञ स्थापत्य वास्तुविशारद सल्लागार यांचेकडुन सदर रस्त्याचे सुधारित प्राकलन व नकाशे तयार करण्यात आले आहेत.

उपरोक्त कारणास्तव तसेच अन्य कामाचे घटकातील बदलामुळे मुळ प्राकलनीय खर्चामध्ये वाढ होत आहे.

महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकातील लेखाशिर्ष जे.एन.यु.आर.एम.रस्ते विकासासाठी महानगरपालिकेच्या हिश्श्यासाठी रु.५.०० कोटी इतकी तरतुद ठेवली आहे. हा जे.एन.एम.यु.आर.चा डी.पी.आर. केंद्र शासनाकडे मंजुरीसाठी प्रस्तावित आहे. तुर्त या तरतुदीपैकी रु.३.०० कोटी तरतुद कामाकरीता 'अ' अंदाजपत्रकात भाग—२, नवीन रस्ते बांधणे या लेखाशिर्षात समायोजित करणेसाठी प्रस्तावित आहे.

सदयस्थितीत सदर रस्त्याचे काम अर्ध्यापेक्षा जास्त झाले असून उर्वरीत कामासाठी निविदा कार्यवाही केल्यास कालापव्यय होईल व वाढीव दराने निविदा येत असल्याने सध्या कार्यरत या रस्त्याचे ठेकेदार मे. कोनार्क इर्न्फास्ट्रक्चर यांच्याकडुन त्याचे जुन्या निविदेतील दराने व अटी शर्तीवर करण्यास व सदर रस्त्याचे सुधारित प्राकलनीय खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेसाठी व वरिलप्रमाणे समायोजन करणेसाठी स्थायी समिती पुढे प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र. १४३ — दिनांक:— २१/२/२०११

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. सुंदर मंगतानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर —४ येथिल, पेट्रोल पंप ते ओटी सेक्शन ४ पर्यंतच्या रस्त्यांचे उर्वरीत कामासाठी सुधारीत प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देत आहे व सध्या कार्यरत ठेकेदार मे. कोनार्क इर्न्फास्ट्रक्चर यांच्याशी पूर्वीच्या निविदेतील अटी शर्ती व दराने निविदा शिवाय थेट संविदेस आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ३७ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ३७ :—** उल्हासनगर ३ येंथिल डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रवेशद्वाराचे विस्तारीकरण करणेकामी

सुधारीत प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणे व कार्यरत ठेकेदार मे. डी.
एस.कंन्स्ट्रक्शन यांच्याशी पुर्वीच्या निविदेतील अटी, शर्तीवर निविदा शिवाय थेट संविदेस प्रशासनास प्राधिकृत करणे.

---

**सदस्या श्रीमती पंचशिला पवार :–**माझ्या प्रभागातील काम आहे. प्रशासनाने दिलेला प्रस्तावानुसार मंजुर करा.

**काही सदस्य :–**पास–पास......

**सभापती, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:–**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ३७ :–** उल्हासनगर ३ येंथिल डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रवेशद्वाराचे विस्तारीकरण करणेकामी सुधारीत प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणे व कार्यरत ठेकेदार मे. डी. एस.कंन्स्ट्रक्शन यांच्याशी पुर्वीच्या निविदेतील अटी, शर्तीवर निविदा शिवाय थेट संविदेस प्रशासनास प्राधिकृत करणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिकेच्या वर्ष २००९–१० च्या अंदाजपत्रकात उल्हासनगर–३ कल्याण–अंबरनाथ रस्त्यावरील ऑडनस फॅक्टरी फर्स्ट गेट समोरील नियोजित डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रवेशद्वाराच्या दुस–या भागातील बांधकामासाठी रु.५०.०० लक्ष इतकी तरतूद ठेवलेली होती. या ठिकाणी रस्त्याच्या अर्ध्याभागात पूर्वी सदर प्रवेशद्वाराचे आर.सी.सी.चे काम झालेले होते. रस्त्याच्या दुस–या भागात उर्वरीत काम करुन घेण्यासाठी सदर तरतूद ठेवली होती. या तरतूदीच्या मर्यादेत रु.४७,०९,०५०/– खर्चाचे प्राकलन तयार करुन त्यास स्थायी समितीने ठराव क्र.३४ दिनांक १५/७/२००९ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यात आली. त्यानुसार मे.डी.एस.कंन्स्ट्रक्शन यांचेशी निविदा कार्यवाही करुन त्यांचेशी संविदा करणेस मा.स्थायी समिती ठराव क्र.११९ दिनांक ०५/०२/२०१० नुसार मान्यता प्राप्त झाल्यानंतर मे.डी.एस.कंन्स्ट्रक्शन यांचे नावे दिनांक २९/०३/२०१० रोजी कार्यारंभ आदेश निर्गमित केलेले आहेत.

प्रस्तावित केल्याप्रमाणे मंजूर तरतूदीच्या रु.५०.०० लक्ष खर्चाच्या मर्यादेतील काम आता पूर्ण होत आहे. उर्वरीत कामामध्ये दोन्ही भागाचे सुशोभिकरण, विद्युतीकरणाचे व स्टील रेलींगची कामांचे प्राकलन आत तयार करण्यात आले आहे. या कामासाठी अंदाजित आणखी रु.५०.०० लक्ष इतका खर्च अपेक्षित आहे. सदर खर्च वित्तीय वर्ष २०१०–११ च्या अर्थसंकल्पातील लेखाशिर्ष C-4 (4) P – II मधील तरतूद 'प्रवेशद्वार बांधणे' या लेखाशिर्षातून प्रस्तावित आहे. सदर कामासाठी तयार केलेले स्थापत्य कामाच्या सुधारीत प्राकलनास व विद्युत कामाच्या प्राकलनास एकूण खर्च रु.४७,८८,९८७/– प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळून सदर कामाकरीता नेमलेल्या मे.डी.एस.कंन्स्ट्रक्शन यांचेकडून त्यांच्याशी केलेल्या संविदेतील अटी व शर्तीप्रमाणे करुन घेण्यास स्थायी समितीकडून मंजूरी मिळणेस प्रस्तावित आहे.

**स्थायी समिती ठराव क्र.** १४४ **दिनांक:–** २१/२/२०११

सुचकाचे नाव :– श्रीमती पंचशिला पवार

अनुमोदकाचे नाव :– श्रीमती सरोजिनी टेकचंदानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर ३ येंथिल डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रवेशद्वाराचे विस्तारीकरण करणेकामी सुधारीत प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता व कार्यरत ठेकेदार मे. डी.एस. कंन्स्ट्रक्शन यांच्याशी पुर्वीच्या निविदेतील अटी, शर्तीवर निविदा शिवाय थेट संविदेस आयुक्तांस प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही/–
अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. ३८ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ३८ :–** उल्हासनगर शहरातील रस्त्यावरील खड्डें भरण्याकामी पूर्वीच्या दिनांक २५/१०/२०१० रोजीच्या ठराव क्र. ८१ व ८२ मध्ये बदल करणे किंवा कायम करणे.

---

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–</u>शहरातील रस्त्यांवरील खड्डे भरण्याचे काम अति आवश्यक आहे. त्यामुळे महापालिका अधिनियमाचे प्रकरण पाच मधील कलम २(२) मधील तरतुदीनुसार निविदा न मागविता करुन घेणे आवश्यक आहे. या कामास फार उशिर झालेला आहे. त्यामुळे प्रभाग क्षेत्र क्र.१, प्रभाग क्षेत्र क्र. २ व प्रभाग क्षेत्र क्र. ३ मधील रस्त्यांवरील खड्डे भरण्यासाठी जी प्राकलने तयार करण्यात आलेली आहे ती पाहता प्रभाग क्षेत्र क्र. २ मधील ४५,९३,९००/– चे काम मेसर्स जयभारत कन्स्ट्रक्शन यांना व प्रभाग समिती १ व ३ मधील काम मेसर्स ए एम रामचंदानी यांना देवुन खड्डे भरण्याचे काम त्वरीत चालु केले जावे.

<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल :–</u>कधी? पावसाळयापुर्वी?

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>उदयापासुनच सुरु होईल.

<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल :–</u>या अगोदरच झाले आहे का?

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :–</u>या कामास शहाड पासुन सुरुवात होईल.

<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल :–</u>सर्वांना शहाड व गुलशननगरचीच आठवण येते काय?

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>तयार केलेला ठराव मी वाचून दाखवितो.

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार शहरात खोदाई करण्यात आलेल्या रस्त्यांबाबत नागरीकांच्या तक्रारी प्राप्त होत असल्याने त्या रस्त्यांची दुरुस्ती करणे आवश्यक आहे. त्यामुळे ही स्थायी समिती वर नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर शहरातील खोदण्यात आलेले रस्ते तात्काळ दुरुस्ती करण्याकरिता मुबंई प्रंतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे प्रकरण ५ चे कलम २(२) मधील तरतुदीनुसार निविदा न मागविता मे. जयभारत कंन्ट्रक्शन, यांच्याशी रु. ४५,९३,९००/– चे प्रकलन तसेच मे. ए.एम.राचंदानी यांच्याशी रु.५०,५२,९४०/– व रु. ३८,९५,८००/– या दोन प्रकलनांचे काम करुनघेणेसाठी प्रचलीत डी.एस.आर. अन्वये तयार करण्यात आलेल्या प्राकलनीय रक्कमेवर थेट करार करण्यास आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे व येणाऱ्या खर्चास वित्तीय व प्रशासकीय मान्यता देत आहे.

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>सभापती, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:–</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ३८ :–** उल्हासनगर शहरातील रस्त्यावरील खड्डें भरण्याकामी पूर्वीच्या दिनांक २५/१०/२०१० रोजीच्या ठराव क्र. ८१ व ८२ मध्ये बदल करणे किंवा कायम करणे.

<u>प्रस्तावना</u>

मा. आयुक्त सो. यांनी मागील पृष्ठावर दिलेल्या आदेशानुसार सदर प्रकरणाचा खुलासा शिफारशीसह पुढीलप्रमाणे सविनय सादर करण्यात येत आहे.

उल्हासनगर शहरातील प्रभाग समिती क्षेत्र क्र.१ ते ३ मधील पावसाळयात पडलेले खड्डे भरणेकामी तयार केलेल्या प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेकामी प्रस्ताव मा. स्थायी समिती पुढे सादर केला असता त्यास मा. स्थायी समिती ठराव क्र.८१ व ८२ दिनांक २५/१०/२०१० अन्वये सदरचे पावसाळयात पडलेले खड्डे तातडीने भरणे गरजेचे असल्याने मा. आयुक्तांना योग्य कंत्राटदाराशी निविदेशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करण्यास मान्यता दिलेली आहे.

मा.स्थायी समिती ठराव क्र.८१, दि.२५/१०/२०१० अन्वये प्रशासकीय व वित्तीय मंजूरी दिलेली अ) क्षेत्र क्र.१ मध्ये एकुण रु.५०,५२,९४०/— खर्चाची प्रस्तावित कामे. ब) क्षेत्र क्र.२ मध्ये एकुण रु. ४५,९३,९००/— खर्चाची प्रस्तावित कामे. व मा.स्थायी समिती ठराव क्र.८२, दि.२५/१०/२०१० अन्वये प्रशासकीय व वित्तीय मंजूरी दिलेली प्रभाग क्षेत्र क.३ मधील एकुण रु.१,३८,९५,८००/— खर्चाची प्रस्तावित कामासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका व अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ चे कलम २ (२) अन्वये मंजूरी मिळाली आहे. परंतु त्यानंतर लागू झालेल्या आचारसंहितेमुळे कामाची कार्यवाहीसाठी प्रलंबित झाले होते. याबाबत मा. महापौर व उप महापौर यांनी सदर काम तातडीने हाती घेण्यासाठी पत्रे दिलेली आहेत. तरी सदर कामाच्या जाहीर निविदा मागवून एजन्सीची नियुक्ती करणेसाठी मा. स्थायी समितीपुढे ठेवणेस मान्यता मिळणेस प्रस्तावित आहे

स्थायी समिती ठराव क्र. १४५ — दिनांकः— २१/२/२०११

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. सुंदर मंगतानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार शहरात खोदाई करण्यात आलेल्या रस्त्यांबाबत नागरीकांच्या तक्रारी प्राप्त होत असल्याने त्या रस्त्यांची दुरुस्ती करणे आवश्यक आहे. त्यामुळे ही स्थायी समिती वर नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर शहरातील खोदण्यात आलेले रस्ते तात्काळ दुरुस्ती करण्याकरिता मुंबई प्रंतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे प्रकरण ५ चे कलम २(२) मधील तरतुदीनुसार निविदा न मागविता मे. जयभारत कंन्ट्रक्शन, यांच्याशी रु.४५,९३,९००/— चे प्रकलन तसेच मे. ए.एम.राचंदानी यांच्याशी रु. ५०,५२,९४०/— व रु. ३८,९५,८००/— या दोन प्रकलनांचे काम करुनघेणेसाठी प्रचलीत डी.एस.आर. अन्वये तयार करण्यात आलेल्या प्राकलनीय रक्कमेवर थेट करार करण्यास आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे व येणाऱ्या खर्चास वित्तीय व प्रशासकीय मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ३९ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ३९ :—** माहे **ऑगस्ट** २०१० अखेरपर्यंतचा महानगरपालिका लेख्यांच्या छाननीचा मुख्य लेखा परिक्षकांचा अहवाल विचारात घेणे.

---

महापालिका सचिव :—विषय क्र. ३९ ते ४१ हे लेखा परिक्षण विभागाशी संबंधीत आहेत.

श्री. ह.न. जमादार, उप—मुख्य लेखा परिक्षकः—मुख्य लेखा परिक्षक श्री. विकास चव्हाण साहेब आज आलेले नाहीत.

काही सदस्य :—ठीक आहे,पास—पास……

सभापती, श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

☑ **विषय क्र. ३९ :— माहे ऑगस्ट २०१०** अखेरपर्यंतचा महानगरपालिका लेख्यांच्या छाननीचा मुख्य लेखा

परिक्षकांचा अहवाल विचारात घेणे.

प्रस्तावना

मुबंई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ नुसार माहे ऑगस्ट २०१० चा जमा खर्चाचा अहवाल खालील प्रमाणे सादर केलेला आहे. कृपया सदरचा अहवाल मा. स्थायी समितीपुढे मान्यतेसाठी सादर करण्यात यावा.

जमा:—

वित्तीय वर्ष २०१०—२०११ च्या “अ” “ब” व “क” अर्थसंकल्पात अंदाजे अपेक्षित केलेले उत्पन्न खलीलप्रमाणे आहे.

| अर्थसंकल्प | अंदाजपत्रकानुसार जमा रुपये |
|---|---|
| १ | २ |
| “अ” | २,७७,८७,७९,००० |
| “ब” | २,००,००० |
| “क” | २६३,६५,५०,००० |
| एकूण | ५४१,५५,२९,००० |

सदर अपेक्षित जमेमध्ये कर्ज वगळता खालील बाबी अंर्तभूत आहेत.

| अ.क्र. | बाब | अंदाजपत्रकानुसार जमा रुपये |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| २ | महसूल जमा | २८०,७१,३६,००० |
| ३ | शासकीय अनुदान | ४७,८९,६७,००० |
| ४ | अनामत रकमा/दायित्वे इ. | २३,५५,०१,००० |
| ५ | एकुण | ३५२,१६,०४,००० |
| ६ | प्रारंभिक शिल्लक | ५,१३,००० |
| ७ | एकुण :— | ३,५२,२१,१७,००० |

वित्तीय वर्ष २०१०—२०११ च्या अर्थसंकल्पात सुधारीत महसूल जमा रक्कम रुपये २८०,७३,८६,०००/—अपेक्षित धरलेली आहे. माहे ऑगस्ट २०१० मध्ये समप्रमाणात रुपये १,१६,९७,४४,०००/—महसूल उत्पन्न अपेक्षित होते. आरंभिची शिल्लक वगळता प्रत्यक्षात रुपये ६९,३२,१६,०००/—(एकूण अपेक्षित महसूल जमेच्या ५९.२६टक्के) महसूल उत्पन्न प्राप्त झाले.

माहे ऑगस्ट २०१० मध्ये प्रारंभिक अंदाजानुसार अपेक्षित असलेली जमा व प्रत्यक्ष जमा महसूल लेखा शिर्षनिहाय खालीलप्रमाणे आहे.

| लेखा शिर्ष<br>अर्थ संकल्प “अ” | | सन २०१०—११ चे सुधारीत अंदाजित उत्पन्न ;रू. हजारात पुर्णकितद्ध | माहे ऑगस्ट २०१० चे अपेक्षित उत्पन्न ;रू. हजारात पुर्णकितद्ध | माहे ऑगस्ट २०१० चे प्रत्यक्ष जमा उत्पन्न ;रू. हजारात पुर्णकितद्ध |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | जकात | ११४,००,००,००० | ४७,५०,००,००० | ४६,२२,६४,००० |
| २ | मालमत्ता कर | ५०,४९,०६,००० | २१,०३,७८,००० | ५,३१,१८,००० |
| ३ | एम. आर. टी. पी. वसूली | २५,३५,००,००० | १०,५६,२५,००० | १०,३३,१९,००० |
| ४ | अनाधिकृत बांधकाम दंड वसूली | १,५०,००,००० | ६२,५०,००० | ४,६७,००० |
| ५ | रुग्णालय फी | ३,००,००० | १,२५,००० | १,०६,००० |
| ६ | परवाना व इतर फी | ५५,००,००० | २२,९२,००० | १,३९,९२,००० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७ | संकीर्ण | ८९,००,००० | ३७,०८,००० | ५८,८१,००० |
| ८ | महानगरपालिका मालमत्ता उत्पन्न | ११,९५,८०,००० | ४,९८,२५,००० | १६,२०,००० |
| | एकूण “अ” | २०४,७६,८६,००० | ८५,३२,०३,००० | ६४,०७,६७,००० |
| | अर्थसंकल्प “ब” | | | |
| | महसूल उत्पन्न | २,००,००० | ८३,००० | ४०,००० |
| | एकूण “ब” | २,००,००० | ८३,००० | ४०,००० |
| | अर्थसंकल्प “क” | | | |
| १ | पाणी बिल वसुली (कर) | ३६,००,००,००० | १५,००,००,००० | ३,५०,०४,००० |
| १ (अ) | पाणी बिल वसुली (पाणी पट्टी) | २७,७०,००,००० | ११,५४,१६,००० | ३०,८१,००० |
| २ | मालमत्ता कर | १२,१२,००,००० | ५,०५,००,००० | १,३८,९३,००० |
| ३ | परवाना/इतर फी | ११,२५,००० | ४,६९,००० | ३,१७,००० |
| ४ | संकीर्ण | १,७५,००० | ७३,००० | १,१४,००० |
| | एकुण “क” | ७५,९५,००,००० | ३१,६४,५८,००० | ५,२४,०९,००० |
| | एकुण “अ”,“ब” व “क” | २८०,७३,८६,००० | १,१६,९७,४४,००० | ६९,३२,१६,००० |

सन २०१०—११ च्या ‘अ’ ‘ब’ व ‘क’ अंदाजपत्रकात एकूण उत्पन्न रु. ५४१,६०,४२,०००/—(प्रारंभिक शिल्लकेसह)अपेक्षित धरलेले आहे. प्रत्यक्षात माहे ऑगस्ट २०१० अखेरपर्यंत रू. १२०,०१,८१,६००/—(प्रारंभिक शिल्लकेसह) उत्पन्न प्राप्त झाले आहे.

पुरेसा कर्मचारीवृंद नसल्याने उत्पनाचे लेखा परिक्षण अद्यावत ठेवता येत नाही. तथापी आर्थिक वर्ष संपताच मागील वर्षाचे जमेचे लेखापरिक्षण करण्यात येत असून अनियमितता आढळल्यास निदर्शनास आणून देवून योग्य ती कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात येतात.

खर्च—

माहे ऑगस्ट, २०१० अखेर पर्यंत रु. ९१,५७,८०,०४५/— खर्च लेखांकित झालेला आहे. तो एकूण प्रत्यक्ष जमा महसुलाच्या ७६.३० टक्के झाल्याचे दिसून येत आहे. खर्चाचे पूर्व लेखापरिक्षण होत असते व लेखा परिक्षणात उपस्थित केलेल्या आक्षेपांचे निराकरण झाल्यावरच देयकाचे प्रदान करण्यात येत आहे. झालेला खर्च हा सक्षम प्राधिका—याच्या पूर्व मंजुरीने झालेला असून तो अर्थसंकल्पीय तरतूदीच्या अधिन आहे.

माहे ऑगस्ट, २०१० ची जमा व खर्चाची पत्रके सोबत जोडली आहेत.

निवृत्ती वेतन प्रकरणे— माहे ऑगस्ट, २०१० मध्ये महानगरपालिकेच्या सेवेतून निवृत्त झालेल्या / निधन पावलेल्या कर्मचा—यांची १२ निवृत्ती वेतन प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत.

लेखा परिक्षणामध्ये निदर्शनास आलेल्या गंभीर बाबी (मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ कलम १०६(१) अ च्या तरतुदीप्रमाणे)

‘निरंक’

स्थायी समिती ठराव क्र. १४६ दिनांकः— २१/२/२०११

सुचकाचे नाव :— श्रीमती निना नाथानी

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती सरोजिनी टेकचंदानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार माहे **ऑगस्ट २०१०** अखेरपर्यंतचा महानगरपालिका लेख्यांच्या छाननीचा मुख्य लेखा परिक्षकांचा अहवालाची नोंद घेत आहे व उत्पन्न वाढविण्या प्रयोजनार्थ प्रशासनास योग्य उपाययोजना करण्यास व कठोर पावले उचलण्यास निर्देशित करीत आहे..

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ४० वाचुन दाखवितात

---

**विषय क्र.** ४० :— माहे **सप्टेंबर** २०१० अखेरपर्यंतचा महानगरपालिका लेख्यांच्या छाननीचा मुख्य लेखा परिक्षकांचा अहवाल विचारात घेणे.

---

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र.** ४० :— माहे **सप्टेंबर** २०१० अखेरपर्यंतचा महानगरपालिका लेख्यांच्या छाननीचा मुख्य लेखा परिक्षकांचा अहवाल विचारात घेणे.

**प्रस्तावना**

मुबंई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ नुसार माहे सप्टेंबर २०१० चा जमा खर्चाचा अहवाल खालील प्रमाणे सादर केलेला आहे. कृपया सदरचा अहवाल मा. स्थायी समितीपुढे मान्यतेसाठी सादर करण्यात यावा.

जमा:—

वित्तीय वर्ष २०१०—२०११ च्या “अ” “ब” व “क” अर्थसंकल्पात अंदाजे अपेक्षित केलेले उत्पन्न खलीलप्रमाणे आहे.

| अर्थसंकल्प | अंदाजपत्रकानुसार जमा रुपये |
|---|---|
| १ | २ |
| “अ” | २,७७,८७,७९,००० |
| “ब” | २,००,००० |
| “क” | २६३,६५,५०,००० |
| एकूण | ५४१,५५,२९,००० |

सदर अपेक्षित जमेमध्ये कर्ज वगळता खालील बाबी अंर्तभूत आहेत.

| अ.क्र. | बाब | अंदाजपत्रकानुसार जमा रुपये |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| २ | महसूल जमा | २८०,७१,३६,००० |
| ३ | शासकीय अनुदान | ४७,८९,६७,००० |
| ४ | अनामत रकमा/दायित्वे इ. | २३,५५,०१,००० |
| ५ | एकुण | ३५२,१६,०४,००० |
| ६ | प्रारंभिक शिल्लक | ५,१३,००० |
| ७ | एकुण :— | ३,५२,२१,१७,००० |

वित्तीय वर्ष २०१०—२०११ च्या अर्थसंकल्पात सुधारीत महसूल जमा रक्कम रुपये २८०,७३,८६,०००/—अपेक्षित धरलेली आहे. माहे सप्टेंबर २०१० मध्ये समप्रमाणात रुपये १४०,३६,९३,०००/—महसूल उत्पन्न अपेक्षित होते. आरंभिची शिल्लक वगळता प्रत्यक्षात रुपये ८४,१४,६७,०००/—(एकूण अपेक्षित महसूल जमेच्या ५९.१४ टक्के) महसूल उत्पन्न प्राप्त झाले.

माहे सप्टेंबर २०१० मध्ये प्रारंभिक अंदाजानुसार अपेक्षित असलेली जमा व प्रत्यक्ष जमा महसूल लेखा शिर्षनिहाय खालीलप्रमाणे आहे.

| लेखा शिर्ष अर्थ संकल्प “अ” | | सन २०१०—११ चे सुधारीत अंदाजित उत्पन्न ;रू. हजारात पुर्णकितद्ध | माहे सप्टेंबर २०१० चे अपेक्षित उत्पन्न ;रू. हजारात पुर्णकितद्ध | माहे सप्टेंबर २०१० चे प्रत्यक्ष जमा उत्पन्न ;रू. हजारात पुर्णकितद्ध |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | जकात | ११४,००,००,००० | ५७,००,००,००० | ५७,६२,४५,००० |
| २ | मालमत्ता कर | ५०,४९,०६,००० | २५,२४,५३,००० | ६,४२,६४,००० |
| ३ | एम. आर. टी. पी. वसूली | २५,३५,००,००० | १२,६७,५०,००० | ११,३०,३१,००० |
| ४ | अनाधिकृत बांधकाम दंड वसूली | १,५०,००,००० | ७५,००,००० | ४,६७,००० |
| ५ | रुग्णालय फी | ३,००,००० | १,५०,००० | १,४०,००० |
| ६ | परवाना व इतर फी | ५५,००,००० | २७,५०,००० | १,४३,६६,००० |
| ७ | संकीर्ण | ८९,००,००० | ४४,५०,००० | ७९,६२,००० |
| ८ | महानगरपालिका मालमत्ता उत्पन्न | ११,९५,८०,००० | ५,९७,९०,००० | १६,२४,००० |
| | एकूण “अ” | २०४,७६,८६,००० | १०२,३८,४३,००० | ७७,८०,९९,००० |
| | अर्थसंकल्प “ब” | | | |
| | महसूल उत्पन्न | २,००,००० | १,००,००० | ४०,००० |
| | एकूण “ब” | २,००,००० | १,००,००० | ४०,००० |
| | अर्थसंकल्प “क” | | | |
| १ | पाणी बिल वसुली (कर) | ३६,००,००,००० | १८,००,००,००० | ४,१३,५८,००० |
| १ (अ) | पाणी बिल वसुली (पाणी पट्टी) | २७,७०,००,००० | १३,८५,००,००० | ४६,५७,००० |
| २ | मालमत्ता कर | १२,१२,००,००० | ६,०६,००,००० | १,६८,५४,००० |
| ३ | परवाना/इतर फी | ११,२५,००० | ५,६३,००० | ३,४५,००० |
| ४ | संकीर्ण | १,७५,००० | ८७,००० | १,१४,००० |
| | एकुण “क” | ७५,९५,००,००० | ३७,९७,५०,००० | ६,३३,२८,००० |
| | एकुण “अ”,“ब” व “क” | २८०,७३,८६,००० | १४०,३६,९३,००० | ८४,१४,६७,००० |

सन २०१०—११ च्या ‘अ’ ‘ब’ व ‘क’ अंदाजपत्रकात एकूण उत्पन्न रु.५४१,६०,४२,०००/—(प्रारंभिक शिल्लकेसह)अपेक्षित धरलेले आहे.प्रत्यक्षात माहे सप्टेंबर, २०१० अखेरपर्यंत रू. १३५,४४,९३,७००/—(प्रारंभिक शिल्लकेसह) उत्पन्न प्राप्त झाले आहे.

पुरेसा कर्मचारीवृंद नसल्याने उत्पनाचे लेखा परिक्षण अद्यावत ठेवता येत नाही. तथापी आर्थिक वर्ष संपताच मागील वर्षाचे जमेचे लेखापरिक्षण करण्यात येत असून अनियमितता आढळल्यास निदर्शनास आणून देवून योग्य ती कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात येतात.

खर्च–

माहे सप्टेंबर, २०१० अखेर पर्यंत रु. १०,५५,५७,०४३/– खर्च लेखांकित झालेला आहे. तो एकूण प्रत्यक्ष जमा महसुलाच्या ७७.९३ टक्के झाल्याचे दिसून येत आहे. खर्चाचे पूर्व लेखापरिक्षण होत असते व लेखा परिक्षणात उपस्थित केलेल्या आक्षेपांचे निराकरण झाल्यावरच देयकाचे प्रदान करण्यात येत आहे. झालेला खर्च हा सक्षम प्राधिका–याच्या पूर्व मंजुरीने झालेला असून तो अर्थसंकल्पीय तरतूदीच्या अधिन आहे.

माहे सप्टेंबर, २०१० ची जमा व खर्चाची पत्रके सोबत जोडली आहेत.

निवृत्ती वेतन प्रकरणे– माहे सप्टेंबर, २०१० मध्ये महानगरपालिकेच्या सेवेतून निवृत्त झालेल्या / निधन पावलेल्या कर्मचा–यांची ०७ निवृत्ती वेतन प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत.

लेखा परिक्षणामध्ये निदर्शनास आलेल्या गंभीर बाबी (मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ कलम १०६(१) अ च्या तरतुदीप्रमाणे)

'निरंक'

स्थायी समिती ठराव क्र. १४७ दिनांकः– २१/२/२०११

सुचकाचे नाव :– श्रीमती निना नाथानी

अनुमोदकाचे नाव :– श्रीमती सरोजिनी टेकचंदानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार माहे **सप्टेंबर २०१०** अखेरपर्यंतचा महानगरपालिका लेख्यांच्या छाननीचा मुख्य लेखा परिक्षकांचा अहवालाची नोंद घेत आहे व उत्पन्न वाढविण्या प्रयोजनार्थ प्रशासनास योग्य उपाययोजना करण्यास व कठोर पावले उचलण्यास निर्देशित करीत आहे..

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. ४१ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ४१** :– माहे **ऑक्टोंबर २०१०** अखेरपर्यंतचा महानगरपालिका लेख्यांच्या छाननीचा मुख्य लेखा परिक्षकांचा अहवाल विचारात घेणे.

---

काही सदस्य :–पास–पास......

सभापती, श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः–सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ४१** :– माहे **ऑक्टोंबर २०१०** अखेरपर्यंतचा महानगरपालिका लेख्यांच्या छाननीचा मुख्य लेखा परिक्षकांचा अहवाल विचारात घेणे.

प्रस्तावना

मुबंई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ नुसार माहे ऑक्टोंबर २०१० चा जमा खर्चाचा अहवाल खालील प्रमाणे सादर केलेला आहे. कृपया सदरचा अहवाल मा. स्थायी समितीपुढे मान्यतेसाठी सादर करण्यात यावा.

जमा:—

वित्तीय वर्ष २०१०—२०११ च्या “अ” “ब” व “क” अर्थसंकल्पात अंदाजे अपेक्षित केलेले उत्पन्न खलीलप्रमाणे आहे.

| अर्थसंकल्प | अंदाजपत्रकानुसार जमा रुपये |
|---|---|
| १ | २ |
| “अ” | २,७७,८७,७९,००० |
| “ब” | २,००,००० |
| “क” | २६३,६५,५०,००० |
| एकूण | ५४१,५५,२९,००० |

सदर अपेक्षित जमेमध्ये कर्ज वगळता खालील बाबी अंर्तभूत आहेत.

| अ.क्र. | बाब | अंदाजपत्रकानुसार जमा रुपये |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| २ | महसूल जमा | २८०,७१,३६,००० |
| ३ | शासकीय अनुदान | ४७,८९,६७,००० |
| ४ | अनामत रकमा/दायित्वे इ. | २३,५५,०१,००० |
| ५ | एकुण | ३५२,१६,०४,००० |
| ६ | प्रारंभिक शिल्लक | ५,१३,००० |
| ७ | एकुण :— | ३,५२,२१,१७,००० |

वित्तीय वर्ष २०१०—२०११ च्या अर्थसंकल्पात सुधारीत महसूल जमा रक्कम रुपये २,८०,७३,८६,०००/—अपेक्षित धरलेली आहे. माहे ऑक्टोंबर २०१० मध्ये समप्रमाणात रुपये १,६३,७६,४१,०००/—महसूल उत्पन्न अपेक्षित होते. आरंभिची शिल्लक वगळता प्रत्यक्षात रुपये १,००,३४,९७,०००/—(एकूण अपेक्षित महसूल जमेच्या ६१.२७ टक्के) महसूल उत्पन्न प्राप्त झाले.

माहे ऑक्टोंबर २०१० मध्ये प्रारंभिक अंदाजानुसार अपेक्षित असलेली जमा व प्रत्यक्ष जमा महसूल लेखा शिर्षनिहाय खालीलप्रमाणे आहे.

| लेखा शिर्ष अर्थ संकल्प “अ” | | सन २०१०—११ चे सुधारीत अंदाजित उत्पन्न ;रू. हजारात पुर्णंकितद्ध | माहे ऑक्टोबर २०१० चे अपेक्षित उत्पन्न ;रू. हजारात पुर्णंकितद्ध | माहे ऑक्टोंबर २०१० चे प्रत्यक्ष जमा उत्पन्न ;रू. हजारात पुर्णंकितद्ध |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | जकात | ११४,००,००,००० | ६६,५०,००,००० | ६९,०२,२५,००० |
| २ | मालमत्ता कर | ५०,४९,०६,००० | २९,४५,२८,००० | ७,७८,५४,००० |
| ३ | एम. आर. टी. पी. वसूली | २५,३५,००,००० | १४,७८,७५,००० | १२,८७,९४,००० |
| ४ | अनाधिकृत बांधकाम दंड वसूली | १,५०,००,००० | ८७,५०,००० | ४,६७,००० |
| ५ | रुग्णालय फी | ३,००,००० | १,७५,००० | १,५७,००० |
| ६ | परवाना व इतर फी | ५५,००,००० | ३२,०८,००० | १,४९,८५,००० |
| ७ | संकीर्ण | ८९,००,००० | ५१,९२,००० | १,२२,६३,००० |
| ८ | महानगरपालिका मालमत्ता उत्पन्न | ११,९५,८०,००० | ६,९७,५५,००० | २१,७०,००० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | एकूण “अ” | २०४,७६,८६,००० | १,१९,४४,८३,००० | ९२,६९,१५,००० |
| | अर्थसंकल्प “ब” | | | |
| | महसूल उत्पन्न | २,००,००० | १,१७,००० | ९०,००० |
| | एकूण “ब” | २,००,००० | १,१७,००० | ९०,००० |
| | अर्थसंकल्प “क” | | | |
| १ | पाणी बिल वसुली (कर) | ३६,००,००,००० | २१,००,००,००० | ४,८१,४२,००० |
| १ (अ) | पाणी बिल वसुली (पाणी पट्टी) | २७,७०,००,००० | १६,१५,८३,००० | ६७,६५,००० |
| २ | मालमत्ता कर | १२,१२,००,००० | ७,०७,००,००० | २,१०,०३,००० |
| ३ | परवाना/इतर फी | ११,२५,००० | ६,५६,००० | ४,५२,००० |
| ४ | संकीर्ण | १,७५,००० | १,०२,००० | १,३०,००० |
| | एकुण “क” | ७५,९५,००,००० | ४४,३०,४१,००० | ७,६४,९२,००० |
| | एकुण “अ”,“ब” व “क” | २८०,७३,८६,००० | १,६३,७६,४१,००० | १,००,३४,९७,००० |

सन २०१०—११ च्या ‘अ’ ‘ब’ व ‘क’ अंदाजपत्रकात एकूण उत्पन्न रु.५,४१,६०,४२,०००/—(प्रारंभिक शिल्लकेसह)अपेक्षित धरलेले आहे.प्रत्यक्षात माहे ऑक्टोंबर,२०१० अखेरपर्यंत रू. १,५३,१९,४८,३२०/—(प्रारंभिक शिल्लकेसह) उत्पन्न प्राप्त झाले आहे.

पुरेसा कर्मचारीवृंद नसल्याने उत्पनाचे लेखा परिक्षण अद्यावत ठेवता येत नाही. तथापी आर्थिक वर्ष संपताच मागील वर्षाचे जमेचे लेखापरिक्षण करण्यात येत असून अनियमितता आढळल्यास निदर्शनास आणून देवून योग्य ती कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात येतात.

खर्च—

माहे ऑक्टोंबर, २०१० अखेर पर्यंत रु.१,३२,१६,४६,७१३/— खर्च लेखांकित झालेला आहे. तो एकूण प्रत्यक्ष जमा महसुलाच्या ८६.२७ टक्के झाल्याचे दिसून येत आहे. खर्चाचे पूर्व लेखापरिक्षण होत असते व लेखा परिक्षणात उपस्थित केलेल्या आक्षेपांचे निराकरण झाल्यावरच देयकाचे प्रदान करण्यात येत आहे. झालेला खर्च हा सक्षम प्राधिका—याच्या पूर्व मंजुरीने झालेला असून तो अर्थसंकल्पीय तरतूदीच्या अधिन आहे.

माहे आक्टोंबर, २०१० ची जमा व खर्चाची पत्रके सोबत जोडली आहेत.

निवृत्ती वेतन प्रकरणे— माहे आक्टोंबर, २०१० मध्ये महानगरपालिकेच्या सेवेतून निवृत्त झालेल्या / निधन पावलेल्या कर्मचा—यांची १४ निवृत्ती वेतन प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत.

लेखा परिक्षणामध्ये निदर्शनास आलेल्या गंभीर बाबी (मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ कलम १०६(१) अ च्या तरतुदीप्रमाणे)

‘निरंक’

**स्थायी समिती ठराव क्र. १४८** **दिनांक:— २१/२/२०११**

सुचकाचे नाव :— श्री. रविंद्र बागुल

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती मिनाताई सोनेजी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार माहे **ऑक्टोंबर २०१०** अखेरपर्यंतचा महानगरपालिका लेख्यांच्या छाननीचा मुख्य लेखा परिक्षकांचा अहवालाची नोंद घेत आहे व उत्पन्न वाढविण्या प्रयोजनार्थ प्रशासनास योग्य उपाययोजना करण्यास व कठोर पावले उचलण्यास निर्देशित करीत आहे..

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :—प्रशासनाकडुन आयत्यावेळच्या विषयान्वये एक विषय आलेला आहे. आपणामधील बहुसंख्य सदस्यांची संमती असेल तर तो आजच्या सभेच्या कामकाजात समावुन घेता येईल.

<u>काही सदस्य:–</u>नाही, नाही, आयत्यावेळचा हा विषय सभेच्या कामकाजात सामावुन घेण्यात येवु नये.

सायंकाळी ५.०० वाजंता सभेचे कामकाज संपल्याचे सभापती श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

.

# <u>उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर</u>

दिनांक:– २८/३/२०११

दि. २८/३/२०११ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती

१२

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा सोमवार दिनांक २८/३/२०११ रोजी दुपारी १.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | सदस्यांची नावे | पदनाम |
|---|---|---|
| १ | **श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर** | **सभापती** |
| २ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | सदस्या |
| ३ | श्री. रमेश महादेव चव्हाण | सदस्य |
| ४ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | सदस्य |
| ५ | श्री. धनंजय बाबुराव बोडारे | सदस्य |
| ६ | श्रीमती मिनाताई दिपक सोनेजी | सदस्या |
| ७ | श्रीमती पंचशिला नाना पवार | सदस्या |
| ८ | डॉ. निना प्रकाश नाथानी | सदस्या |
| ९ | श्री. सुंदर (बाबु) आसनदास मंगतानी | सदस्य |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.
१. श्री. जीवन (राजु) चंद्रभान इदनानी, २. श्री अंकुश निवृत्ती म्हस्के, ३. श्री. रविंद्र दशरथ बागुल, ४. श्री. दिलीपकुमार देविदास जग्यासी, ५. श्री. दत्तात्रय नारायण पवार, ६. श्रीमती सरोजीनी मुरलीधर टेकचंदानी, ७. श्रीमती संगिता राजेश कंडारे

श्री. संतोष देहेरकर, उप–आयुक्त हे आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ होते.

खालील अधिकारी सभेस हजर होते.

५०.श्री. संतोष देहेरकर, उप–आयुक्त
५१.श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
५२.श्री. प्रविणकुमार जैन, मुख्य लेखा अधिकारी
५३.श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखा परिक्षक
५४.डॉ.जी.टी. जिंदे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी
५५.श्री. बी.ए. महोदय, शाखा अभियंता, पाणी पुरवठा
५६.डॉ. राजा रिझवानी, वैद्यकीय अधिकारी
५७.श्री. दिपक चिमनकारे, वाहन विभाग प्रमुख
५८.श्री. बबीश गंगारामानी, उप अभियंता, विदयुत
५९.श्री. भास्कर मिरपगार, प्र. अग्निशमन अधिकारी
६०.श्री.जी.जी. हिबारे, मुख्य स्वच्छता निरिक्षक
६१.श्री. लाल लालचंदानी, जकात अधिक्षक
६२.श्री. केशव हंबीर, लिपीक

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.

१. श्री. तानाजी पतंगराव
२. सौ. अमिता संखे
३. सौ. नर्गीस खान

दुपारी १.२५ वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ <u>विषय क्र. १ :–</u> मागील सभेचे दिनांक २१/२/२०११ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

**<u>सभापती, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:–</u>**मागील सभेचे दिनांक २१/२/२०११ रोजीचे इतिवृत जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. १** :– मागील सभेचे दिनांक २१/२/२०११ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नांव : श्री. सुंदर मंगतानी
अनुमोदकाचे नांव : श्री. जमनादास पुरस्वानी

<u>स्थायी समिती ठराव क्र. :–१४८ अ</u> <u>दिनांक : २८/३/२०११</u>

ही स्थायी समिती महापालिका सचिवांनी प्रस्तृत केलेले दिनांक २१/२/२०११ रोजीचे पृष्ठ क्र. १ ते ७१ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

.

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. २ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. २ :—** जकात वसुलीकामी उच्चत्तम दराच्या निविदाकाराशी अभिकर्ता म्हणुन नेमणूकीच्या संविदेस मान्यता देणे.

---

<u>काही सदस्यः—</u>पास,पास.......

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>प्रशासनाने हा प्रस्ताव आणलेला आहे. तो सर्व कायदेशीर बाबींची पुर्तता करुनच आणलेला आहे. त्यामुळे तो नाकारण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

<u>सभापती, श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः—</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. २ :—** जकात वसुलीकामी उच्चत्तम दराच्या निविदाकाराशी अभिकर्ता म्हणुन नेमणूकीच्या संविदेस मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

मुंबई प्रातिक महानगरपालिका अधिनियम १९४९ प्रकरण चे नियम ३५ मधील तरतुदी नुसार स्थायी समितीच्या मंजुरीने जकात वसुलीचे कार्य खाजगी अभिकर्त्यामार्फत पार पाडण्याचे अधिकार आयुक्तांना आहेत. त्यानुसार स्थायी समिती ठराव क्र. १०८ दिनांक १०/१२/२०११ व महासभा ठराव क्र. ६९ दि. १८/०२/२०११ अन्वये खाजगी अभिकर्त्यामार्फत जकात वसुली करणेसाठीचा ठराव पारीत करण्यात आला. सदर ठराव जकात अभिकर्ता नेमणेकरीता किमान देकार रक्कम १२६,०७,६०,६७८/— एवढी ठेवण्यात आली होती. तसेच वित्तीय बाबी संबंधीत इतर काही अटी व शर्तीचा अंतर्भाव स्थायी समितीने केला होता.

सन २०११—२०१२ करिता जकात वसुलीकामी अभिकर्ता नेमणेसाठी निविदा सुचना क्रमांक : जनसंपर्क/४०२/२०११ दिनांक १०/०३/२०११ रोजी ४.३० वा. महानगरपालिका उप आयुक्त (मुख्यालय) यांचे दालनात उघडण्यात आली. सदर वेळेस अधिकारी व निविदाधारकांचे प्रतिनिधी उपस्थित होते. वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द केलेल्या जाहिरातीली प्रतिसाद म्हणून चार निविदा प्राप्त झाल्या, त्याचा तपशिल पुढील प्रमाणे.

१) मे. आयआरबी प्रा.लि.,
२) मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि.,
३) मे. सहकार ग्लोबल प्रा. लि.,
४) मे. साई प्रॉपर्टीज

निविदा सुचनेत जाहिर केल्याप्रमाणे प्रत्येक अभिकर्त्याच्या लिफाफयातील लिफाफा क्रमांक : १ सर्वासमक्ष उघडण्यात आला व निविदा सुचनेमध्ये घालून दिलेल्या अटी व शर्तीची सर्वासमक्ष तपासणी करण्यात आली.

मे. सहकार ग्लोबल प्रा. लि व साई प्रॉपर्टीज यांच्या बाबतील लिफाफा क्रमांक १ उघडला असता निविदेतील काही अटी व शर्तीची पुर्तता होत नसल्याने संबंधित निविदा धारकांचा लखोटा क्र. २ (वित्तीय बोली) उघडण्यात आला नाही.

उर्वरीत निविदाधारकांचे लिफाफा क्रमांक १ उघडून कागदपत्रांची तपासणी केली असता अटींची पूर्तता करीत असल्याचे दिसून आल्याने संबंधितांचे लिफाफा क्रमांक २ उघडण्यात आला असता संबंधितांनी खालीलप्रमाणे देकार रक्कमेची बोली नमूद केल्याचे दिसून आले.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नाव | देकार रक्क |
|---|---|---|
| १ | मे. आयआरबी प्रा.लि. | १२६,२७,००,०००/— |
| २ | मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि. | १२७,१०,७०,०००/— |

उपरोक्त तक्ता पाहता मे. कोनार्क इन्फ्रस्ट्रक्चर लि. यांची देकार रक्कम सर्वात जास्त व किमान देकार रक्कमेपेक्षा जास्त असल्याचे निदर्शनास येत आहे.

सबब मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ७३ (क) नुसार आयुक्त यांना निविदाधारकांशी करार करण्यास मंजुरी मिळणेसाठी प्रस्ताव स्थायी समिती समोर ठेवण्यास प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १४९ दिनांकः— २८/३/२०११

सुचकाचे नाव :— श्रीमती मिनाताई सोनेजी

अनुमोदकाचे नाव :— डॉ. निना नाथानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर शहरात जकात वसुली कामी उच्चतम दराचे निविदाकार मे. कोनार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांच्याशी अभिकर्ता नेमणूकीच्या संविदेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

दुपारी १.३० वाजंता सभेचे कामकाज संपल्याचे सभापती श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

.

# <u>उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर</u>

दिनांकः—११/४/२०११

## <u>उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. ११/४/२०११ रोजीच्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.</u>

१

उल्हासनगर महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा सोमवार दिनांक ११/४/२०११ रोजी दुपारी २.३० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत **श्री. सुभाष सोनवणे, जिल्हाधिकारी, रायगड (अलिबाग)** हे पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होते. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

| अ.क्र. | नाव |
|---|---|
| १ | श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर |
| २ | श्री. जीवन (राजु) चंद्रभान इदनानी |
| ३ | श्री. लाल देवनदास पंजाबी |
| ४ | श्री. चंद्रशेखर केशव यादव |
| ५ | श्री. धनंजय बाबुराव बोडारे |
| ६ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी |
| ७ | श्री. बी.बी. मोरे |
| ८ | श्रीमती ज्योती शाम माने |
| ९ | डॉ. निना प्रकाश नाथानी |
| १० | श्री. म्हस्के निवृत्ती अंकुश |
| ११ | श्री. ॲड. अनिल (विद्यार्थी) आयलानी |
| १२ | श्री. प्रशांत किसनराव धांडे |
| १३ | श्री. सुंदर (बाबु) आसनदास मंगतानी |
| १४ | श्रीमती शिला सुभाष मनसुलकर |
| १५ | श्रीमती सरोजीनी मुरलीधर टेकचंदानी |
| १६ | श्रीमती संगिता राजेश कंडारे |

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्री. अशोककुमार रणखांब, आयुक्त
२. श्री. संतोष देहेरकर, उप—आयुक्त
३. श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
४. श्री. प्रविणकुमार जैन, मुख्य लेखा अधिकारी
५. श्री. ह.न. जमादार, उप मुख्य लेखा परिक्षक
६. श्री. दिपक चिमनकारे, वाहन विभाग प्रमुख
७. श्री. भगवान कुमावत, प्र.प्रभाग अधिकारी

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्री. तानाजी पतंगराव
२. श्रीमती अमिता संखे
३. श्रीमती नर्गिस खान

दुपारी २.३५ सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>महापालिका सचिव :—</u> मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती, यांची निवडणूक घेणे) नियम—२००७ मधील नियम—४ अन्वये विशेष समिती सभापती पदाची नेमणूक करण्यासाठी बोलविलेल्या आजच्या या विशेष सभेच्या अध्यक्षस्थानी मा. श्री. सुभाष सोनवणे, जिल्हाधिकारी, रायगड, अलिबाग हे आहेत.

विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. १ :—** स्थायी समिती सदस्यांमधुन एका सदस्याची सभापती पदी निवड करणे.

---

<u>श्री. सुभाष सोनवणे (पीठासीन अधिकारी):—</u>
**स्थायी समिती सभापती** पदासाठी महापालिका सचिव यांचेकडे **दिनांक** ८/४/२०११ रोजी ठरवून दिलेल्या वेळेमध्ये ४ नामनिर्देशन पत्र प्राप्त झाले असून ते अनुक्रमे पुढीलप्रमाणे आहेत:—

| अक्र | उमेदवाराचे नाव व पत्ता | सुचकाचे नाव | अनुमोदकाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | श्री. जीवन (राजू) चंद्रभान इदनानी | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के | श्री. सुंदर (बाबु) आसनदास मंगतानी |
| २ | ॲड. अनिल (विद्यार्थी) सी. ऐलानी | श्रीमती संगिता राजेश कंडारे | श्रीम. सरोजिनी मुरलीधर टेकचंदानी |
| ३ | श्री. लाल देवनदास पंजाबी | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | श्री. चंद्रशेखर यादव |
| ४ | श्री. लाल देवनदास पंजाबी | श्री. धनंजय बाबुराव बोडारे | श्रीमती निना प्रकाश नाथानी |

**स्थायी समिती सभापती** पदाच्या निवडणूका संबंधातील मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती, यांची निवडणूक घेणे) नियम—२००७ नियम—०५ (२) अन्वये, पीठासीन अधिकारी म्हणुन मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये, मी सर्व नामनिर्देशनाची छाननी केली आहे. छाननीमध्ये वैध ठरलेल्या उमेदवारांची नावे मराठी वर्णानुक्रमाने पुढीलप्रमाणे आहेत:—

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव |
|---|---|
| १. | श्री. इदनानी जीवन (राजू) चंद्रभान |
| २. | ॲड. ऐलानी अनिल (विद्यार्थी) सी. |
| ३ | श्री. पंजाबी लाल देवनदास |

यावेळेस २.३५ मिनिटे झाली आहेत.

वरील ३ उमेदवारांपैकी ज्या उमेदवाराला आपली उमेदवारी मागे घ्यावयाची असेल त्यासाठी १५ मिनिटांची वेळ देण्यात येत आहे. अशा उमेदवारास आपली उमेदवारी मागे घेण्यासंबंधातील विहित नमुन्यामधील अर्ज भरुन देवून आपली उमेदवारी मागे घेता येईल.

आता दुपारचे २.५० वाजले आहेत. उमेदवारी मागे घेण्यासाठी देण्यात आलेली वेळ संपली आहे असे मी जाहिर करतो.

दिलेल्या वेळेमध्ये कोणत्याही उमेदवाराने आपली **उमेदवारी मागे घेतली नाही.**

आता, स्थायी समिती सभापती पदाच्या एका जागेसाठी खालील ३ उमेदवार निवडणूक रिंगणात शिल्लक राहिलेले असून त्यांची मराठी वर्णानुक्रमाने नावे पुढील प्रमाणे आहेत :—

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव |
|---|---|
| १. | श्री. इदनानी जीवन (राजू) चंद्रभान |
| २. | ॲड. ऐलानी अनिल (विद्यार्थी) सी. |
| ३. | श्री. पंजाबी लाल देवनदास |

स्थायी समिती सभापती पदासाठी मराठी वर्णानुक्रमाने अनु. क्र. १, २ आणि ३ च्या उमेदवारांची नांवे जाहिर करण्यात येतील. प्रत्येक उमेदवाराच्या बाजूने ज्यांना आपले मत द्यावयाचे आहे त्यांनी आपला हात वर करायचा आहे. उमेदवार निहाय तयार केलेल्या यादीमध्ये उमेदवाराला मतदान करणा—या सदस्यांच्या नावांची नोंद घेण्यात येईल. हात वर केलेल्या प्रत्येक सदस्याच्या नावासमोर ''होय'' म्हणुन नोंद घेण्यात येईल.

सर्वप्रथम स्थायी समिती सभापती पदाचे अनु. क्र. १ चे उमेदवार इदनानी जीवन (राजू) चंद्रभान यांचे नाव पुकारण्यांत येत आहे. इदनानी जीवन (राजू) चंद्रभान यांना मतदान करु इच्छिणा—या सदस्यांनी आपला हात वर करावा:—

**मतदान केलेल्या सदस्यांच्या नावांची नोंद पुढीलप्रमाणे जाहिर करण्यात येत आहे.**

| अ.क्र. | पालिका सदस्यांचे संपूर्ण नाव |
|---|---|
| १ | श्री. जीवन (राजू) इदनानी |
| २ | श्री. बी.बी. मोरे |
| ३ | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के |
| ४ | श्री. सुंदर (बाबु) मंगतानी |

त्यानंतर स्थायी समिती सभापती पदाचे अनु. क्र. २ चे उमेदवार ॲड. ऐलानी अनिल (विद्यार्थी) सी. यांचे नाव पुकारण्यांत येत आहे. ॲड. ऐलानी अनिल (विद्यार्थी) सी. यांना मतदान करु इच्छिणा—या सदस्यांनी आपला हात वर करावा:—

**मतदान केलेल्या सदस्यांच्या नावांची नोंद पुढीलप्रमाणे जाहिर करण्यात येत आहे.**

| अ.क्र. | पालिका सदस्यांचे संपूर्ण नाव |
|---|---|
| १ | ॲड. ऐलानी अनिल (विद्यार्थी) सी. |
| २ | श्रीमती सरोजिनी मुरलीधर टेकचंदानी |
| ३ | श्रीमती संगिता राजेश कंडारे |

त्यानंतर स्थायी समिती सभापती पदाचे अनु. क्र. ३ चे उमेदवार श्री. पंजाबी लाल देवनदास यांचे नाव पुकारण्यांत येत आहे. श्री. पंजाबी लाल देवनदास यांना मतदान करु इच्छिणा—या सदस्यांनी आपला हात वर करावा:—

**मतदान केलेल्या सदस्यांच्या नावांची नोंद पुढीलप्रमाणे जाहिर करण्यात येत आहे.**

| अ.क्र. | पालिका सदस्यांचे संपूर्ण नाव |
|---|---|
| १ | श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर |
| २ | श्री. लाल देवनदास पंजाबी |
| ३ | श्री. चंद्रशेखर यादव |
| ४ | श्री. धनंजय बोडारे |
| ५ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी |
| ६ | श्रीमती ज्योती शाम माने |
| ७ | श्रीमती निना प्रकाश नाथानी |
| ८ | श्री. प्रशांत धांडे |
| ९ | श्रीमती शिला मनसुलकर |

स्थायी समिती सभापती पदाच्या निवडणकीमध्ये ज्या सदस्यांनी मतदान केले नाही अशा सदस्यांच्या मताची नोंद पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | पालिका सदस्यांचे संपूर्ण नाव |
|---|---|
| निरंक | |

आता निवडणूक प्रक्रिया संपल्याने निवडणूक लढविलेल्या प्रत्येक उमेदवाराला मतदानाद्वारे मिळालेल्या मतांची संख्या व निकाल घोषणा मी पुढीलप्रमाणे घोषित करीत आहे.

## निकाल घोषणा

| | | |
|---|---|---|
| १. | इदनानी जीवन (राजू) चंद्रभान | ४ |
| २. | ॲड. ऐलानी अनिल (विद्यार्थी) सी. | ३ |
| ३. | श्री. पंजाबी लाल देवनदास | ९ |
| **एकुण मतदान संख्या –** | | **१६** |
| **तटस्थ** | | ० |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती, यांची निवडणूक घेणे) नियम २००७ च्या नियम–६ मधील पोटनियम (७) अन्वये पीठासीन अधिकारी म्हणुन मला प्रदान करण्यांत आलेल्या अधिकारान्वये स्थायी समिती सभापती पदाचे उमेदवार श्री. पंजाबी लाल देवनदास यांना एकुण १६. मतांपैकी ०९ इतकी म्हणजे सर्वाधीक मते मिळाल्यामुळे त्यांची स्थायी समिती सभापती पदी रितसर नेमणूक झाली आहे असे मी जाहिर करतो.

दिनांक :–११/४/२०११

स्थान :– उल्हासनगर महानगरपालिका
सभागृह

(सुभाष सोनवणे)
जिल्हाधिकारी
तथा
पीठासीन अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

यावेळी दुपारी २.५८ वाजता सभेचे कामकाज संपल्याचे पीठासीन अधिकारी यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—२८/४/२०११

**दि. २८/४/२०११ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती**

(२)

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा गुरुवार दिनांक २८/४/२०११ रोजी सायंकाळी ४.३० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. लाल देवनदास पंजाबी | सभापती |
| २ | श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर | सदस्य |
| ३ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | सदस्य |
| ४ | श्री. धनंजय बाबुराव बोडारे | सदस्य |
| ५ | डॉ. निना प्रकाश नाथानी | सदस्या |
| ६ | श्रीमती सरोजीनी मुरलीधर टेकचंदानी | सदस्या |
| ७ | श्रीमती संगिता राजेश कंडारे | सदस्या |
| ८ | श्री. बी.बी. मोरे | सदस्य |
| ९ | श्रीमती ज्योती शाम माने | सदस्या |
| १० | श्री. ॲड. अनिल (विद्यार्थी) आयलानी | सदस्य |
| ११ | श्री. प्रशांत किसनराव धांडे | सदस्य |
| १२ | श्री. चंद्रशेखर केशव यादव | सदस्य |
| १३ | श्रीमती शिला सुभाष मनसुलकर | सदस्या |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.
१. श्री. जीवन (राजु) चंद्रभान इदनानी, २. श्री. म्हस्के निवृत्ती अंकुश, ३. श्री. सुंदर (बाबु) आसनदास मंगतानी

श्रीमती संगिता धायगुडे, उप—आयुक्त, आरोग्य या आयुक्तांच्यास्थानी प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ होत्या.

खालील अधिकारी सभेस हजर होते.

६३.श्रीमती संगिता धायगुडे, उप—आयुक्त
६४.श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
६५.श्री. माधव जवादे, शहर अभियंता
६६.श्री. प्रविणकुमार जैन, मुख्य लेखा अधिकारी
६७.श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखा परिक्षक
६८.श्री. मुकेश आयलानी, कार्यकारी अभियंता, विदयुत
६९.श्री. एम.जी. गिरगांवकर, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
७०.श्री. विनोद डवले, सहा. आयुक्त, अतिक्रमण विभाग
७१. डॉ. विजया कंठे, कर निर्धारक व संकलक
७२.श्री. आर.बी.शिर्के, कार्यकारी अभियंता अभियंता
७३.श्री. भरत बठिजा, उप अभियंता, साबांवि

७४.डॉ. राजा रिझवानी, वैद्यकीय अधिकारी
७५.श्री. महोदय, शाखा अभियंता, पाणी पुरवठा
७६.श्री. ढाके, शाखा अभियंता, पाणी पुरवठा
७७.श्री. रमेश काजळे, उपकर निर्धारक व संकलक
७८. श्री. दिपक चिमनकारे, वाहन विभाग प्रमुख
७९. श्री. भगवान कुमावत, प्र. प्रभाग अधिकारी
८०. श्री. जी.जी. हिबारे, मुख्य स्वच्छता निरिक्षक
८१. श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक
८२. श्री. शरद वडजकर, अध्यक्ष, निविदा समिती

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.
१. श्री. तानाजी पतंगराव
२. सौ. अमिता संखे
३. सौ. नर्गीस खान

<u>महापालिका सचिव :—</u>स्थायी समितीची नव्याने रचना करण्यात आलेली असून आठ नविन सदस्य निवडुन आले आहेत. त्यांची ही पहिलीच सभा आहे. ते सदस्य आहेत.

१. श्री. लाल पंजाबी
२. श्री. जमनादास पुरस्वानी
३. श्री. बी.बी. मोरे
४. श्रीमती ज्योती माने
५. ॲड. अनिल ऐलानी
६. श्री. प्रशांत धांडे
७. श्री. चंद्रशेखर यादव
८. श्रीमती शिला मनसुलकर

या सदस्यांचे हार्दिक स्वागत आहे. तसेच सन्माननिय सभापती महोदय, सभेचे कामकाज सुरु होण्याअगोदर आपले मनोगत व्यक्त करु इच्छित आहे.

<u>सभापती, श्री. लाल पंजाबी:—</u>सर्व सदस्यगण, अधिकारी, पुर्नरचित स्थायी समितीच्या आजच्या या पहिल्या सभेत आपणासर्वांचे मी हार्दिक स्वागत करतो. व आशा करतो की, आपण सर्वांनी मला सहकार्य करावे. स्थायी समिती सभापती पदी मी पहिल्यांदाच नियुक्त झालो असलो तरी स्थायी समितीमध्ये असलेले याआधीपासुनचे सदस्य, माजी सभापती श्री. राजेंद्रसिहं भुल्लर, श्री. जमनादास पुरस्वानी, श्री. धनंजय बोडारे यांच्याबरोबर मी काम केलेले आहे. त्याचबरोबर स्थायी समितीमध्ये नव्याने नियुक्त झालेले सदस्य श्री. बी.बी. मोरे, श्रीमती ज्योती माने, ॲड. श्री. अनिल ऐलानी, श्री. प्रशांत धांडे, श्री. चंद्रशेखर यादव, श्रीमती शिला मनसुलकर यांचे मी हार्दिक स्वागत करतो व अपेक्षा करतो की, मागील चार वर्षापासुन ज्याप्रमाणे स्थायी समितीचे कामकाज व्यवस्थीतपणे चालत आले आहे तसेच यापुढेही ते चालविण्याकामी मला सहकार्य कराल.

यावेळी सदस्या डॉ. निना नाथानी यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>श्रीमती संगिता धायगुडे, उप—आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी:—</u>स्थायी समितीचे सन्माननिय सभापती व नवनिर्वाचीत सदस्यांचे मी स्थायी समितीत हार्दिक स्वागत करते.

सायंकाळी ४.४५ वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

<u>विषय क्र. १ :—</u> मागील सभेचे दिनांक ३१/०३/२०११ व दिनांक ११/४/२०११ रोजीचे इतिवृत्त

कायम करणे.

---

काही सदस्य :—पास—पास......

सभापती, श्री. लाल पंजाबी:—मागील सभेचे दिनांक ३१/०३/२०११ व दिनांक ११/४/२०११ रोजीचे इतिवृत जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे

---

**विषय क्र. १** :— मागील सभेचे दिनांक ३१/०३/२०११ व दिनांक ११/४/२०११ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नांव : श्री.बी.बी. मोरे

अनुमोदकाचे नांव : श्री. चंद्रशेखर यादव

स्थायी समिती ठराव क्र. :—१ दिनांक : २८/४/२०११

ही स्थायी समिती महापालिका सचिवांनी प्रस्तृत केलेले दिनांक ३१/३/२०११ रोजीचे पृष्ठ क्र. १ ते २२ पर्यंतचे व दिनांक ११/४/२०११ रोजीचे पृष्ठ क्र. १ ते ४ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

.महापालिका सचिव :— विषय क्र. २ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. २** :— विद्युत विभागांअर्तगतच्या चार विविध कामांच्या सविंदेची माहिती नोंद करणे.

---

काही सदस्य:—पास,पास.......

सभापती, श्री. लाल पंजाबी:—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. २ :—** विद्युत विभागांअर्तगतच्या चार विविध कामांच्या सविंदेची माहिती नोंद करणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिका विद्युत विभागाचे कामास दिलेल्या मंजुरीची माहिती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ ( ड ) नुसार पुढील प्रमाणे देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | मंजुर निवीदा रक्कम | कराराचा दिनांक | एजंन्सीचे नांव |
|---|---|---|---|---|
| १ | उल्हासनगर महानगरपालिका सब —डिव्हीजन ।।. क्षेत्र क्र.४ आणि ५ येथिल खराब झालेले पोल बदलि करणे,आणि जुन्या व निकामी झालेल्या फिटींग बदलि करणे तसेच खराब झालेले जुने विद्युत साहीत्य बदली करणे. | ३,८०,०००/— | २२/०३/२०११ | मे.रवीकिरण मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. उल्हासनगर, जि.ठाणे. |
| २ | उल्हासनगर महानगरपालिका उल्हासनगर — ३, येथील मुख्यालयातील पहिला मजला आणि दुसरा मजला तसेच उ.म.पा.च्या मुख्यालयाच्या जवळ असणारी इतर उ.म.पा.च्या कार्यालयाची टेलिफोनची जुनी वायरींग , खराब झालेले टेलिफोनचे जुने विदयुत साहीत्य बदली करण्या करीता. | ९,२०,०००/— | २२/०३/२०११ | मे.रवीकिरण मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. उल्हासनगर, जि.ठाणे. |
| ३ | उ.म.पा.क्षेत्रातील उल्हासनगर — ३, येथिल साईबाबा मंदिरा जवळिल डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रवेशद्वाराच्या विद्युतिकरण करण्याकरीता तसेच कारंजाच्या कामा करीता. | १०,००,०००/—. | २२/०३/२०११ | मे.स्टॅन्डर्ड मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. उल्हासनगर,जि.ठाणे. |
| ४ | उ.म.पा.क्षेत्रातील उल्हासनगर — ३, येथिल चोपडा कोर्ट येथिल डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रवेशद्वाराच्या विद्युतिकरण करण्याकरीता तसेच प्रकाश व्यवस्था करण्याकरीता. | १,५०,०००/— | २२/०३/२०११ | मे.रवीकिरण मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. उल्हासनगर, जि.ठाणे. |

तरी सदरची माहीती स्थायी समिती अवलोकनार्थ प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र. २</u> <u>दिनांकः— २८/४/२०११</u>

सुचकाचे नाव :— श्री. ॲड. अनिल ऐलानी

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती शिला मनसुलकर

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या विद्युत विभागांअर्तगतच्या चार विविध कामांच्या सविंदेची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची <u>सही/—</u>

अनुमोदकाची <u>सही/—</u>

<u>सर्वानुमते</u>

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

————————————————————————————————————

⇨ **विषय क्र. ३** :— उल्हासनगर महापालिकेसाठी स्प्रेंईगसाठी चार ट्रॅक्टर, ट्रॉली, टॅक व पाईप सहीत खरेदी करण्याकामी न्युनतम दराचे निविदाकार में. मोहन मोटर्स कंपनी, बुलढाणा याच्यांशी संविदेस मान्यता देणे.

————————————————————————————————————

<u>काही सदस्य :—</u>पास—पास……

<u>सभापती, श्री. लाल पंजाबी:—</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑

**विषय क्र. ३** :— उल्हासनगर महापालिकेसाठी स्प्रेंईगसाठी चार ट्रॅक्टर, ट्रॉली, टॅक व पाईप सहीत खरेदी करण्याकामी न्युनतम दराचे निविदाकार में. मोहन मोटर्स कंपनी, बुलढाणा याच्यांशी संविदेस मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्प्रेंईगसाठी चार ट्रॅक्टर, ट्रॉली, टॅक व पाईप सहीत खरेदी करण्याच्या निविदा दिनांक २७/१२/२०१० च्या दै.मुंबई, दै.डेली, दै. धनुष्यधारी, फ्री प्रेस जनरल या वृत्तपत्रात प्रसिध्द केलेले जाहीर सुचनेनुसार खाली नमुद केलेल्या चार ठेकेदाराने विहित नमुन्यात कोरे निविदा संच नियमानुसार विकत घेतले.

१) में.मोहन मोटर्स कंपनी, बुलढाणा
२) में.पॉजीटीव्ह ट्रॅक्टर्स,नाशिक
३) में.पवार ट्रॅक्टर्स,अहमदनगर
४) में.सूर्या ट्रॅक्टर्स कंपनी, पुणे

<u>खालील तीन निविदाकारांनी सिलबंद निविदा सादर केल्या.</u>

१) में.मोहन मोटर्स कंपनी, बुलढाणा
२) में.पॉजीटीव्ह ट्रॅक्टर्स,नाशिक
३) में.पवार ट्रॅक्टर्स,अहमदनगर

सदर सादर केलेल्या निविदा दिनांक १३/०१/२०११ रोजी मा. उप आयुक्त (वाहन) यांच्या दालनात मा.मुख्य लेखा अधिकारी, मा. मुख्य लेखा परिषक, वाहन विभागप्रमुख व निविदाकारांच्या प्रतिनिधी समक्ष उघडण्यात आल्या.

लिफाफा कं. १ चा अहवालनुसार तिन्ही निविदाकार पात्र ठरल्याने लिफाफा कं. २ त्याच दिवशी वरिल उपस्थितांच्या समक्ष उघडण्यात आला व त्यांचे दर खालीलप्रमाणे आहेत.

| अनु. क्र | निविदाकाराचे नाव | अंदाजित किंमत | दर %जास्त/कमी |
|---|---|---|---|
| १) | में.मोहन मोटर्स कंपनी, बुलढाणा | रू.१९,२०,०००/— | ५०.४१% जास्त<br>२८,८७,८७२/— |
| २) | में.पॉजीटीव्ह ट्रॅक्टर्स,नाशिक | | २९.९९% जास्त<br>२४,९५,८०८/— |
| ३) | में.पवार ट्रॅक्टर्स,अहमदनगर | | ४१.२२%<br>२७,११,४२४/— |

वरिल दर पहाता वरिल निविदाकारास दर जास्त भरल्याचे कारण वाहन विभागाने पत्रान्वये विचारण्यात आले. सदर ट्रॅक्टरचे स्पेअर्स पार्टसचे दरात वाढ झाल्यामुळे सदर दर

जास्त भरण्यात आले असे तिन्ही निविदाकारांनी कळविले आहे. दिनांक २४/१/२०११ व दिनांक ३/२/२०११ च्या तिन्ही निविदाकांराशी वाटाघाटी केल्या नंतरचे दर खालीलप्रमाणे आहेत.

| अनु. क्र | निविदाकाराचे नाव | अंदाजित किंमत | दर %जास्त/कमी |
|---|---|---|---|
| १) | में.मोहन मोटर्स कंपनी, बुलढाणा | रू.१९,२०,०००/— | ५% जास्त रू.२०,१६,०००/— |
| २) | में.पॉजीटीव्ह ट्रॅक्टर्स,नाशिक | | २९.९९% जास्त रू.२४,९५,८०८/— |
| ३) | में.पवार ट्रॅक्टर्स,अहमदनगर | | ४१.२२% रू.२७,११,४२४/— |

परंतु ब—याच वेळा बोलवुन वाटाघाटी केल्यानंतर में.मोहन मोटर्स, बुलढाणा हे निविदेच्या अंदाजित किमंतीच्या ५% जास्त दराने म्हणजे रू.२०,१६,०००/— हया दराने चार ट्रॅक्टर वाहन पुरवठा करण्यास तयार झाले.

वरिल तिन्ही निविदाकारांपेक्षा में.मोहन मोटर्स, बुलढाणा यांचे रू.२०,१६,०००/— हे निविदेच्या अंदाजित किमतीपेक्षा ५ टक्क्यांनी जास्त असले तरी ते न्युनतम आहे व ते मा.स्थायी समितीपुढे निर्णयास्तव सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ३ दिनांकः— २८/४/२०११

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. धनंजय बोडारे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महापालिकेकरिता स्प्रेंईगसाठी चार ट्रॅक्टर, ट्रॉली, व पाईप सहीत टॅक खरेदी करण्याकामी न्युनतम दराचे निविदाकार में. मोहन मोटर्स कंपनी, बुलढाणा याच्यांशी संविदेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्रमांक. ४ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. ४** :— महानगरपालिका क्षेत्रात नागरिकांना मालमत्ता कराचा भरणा करण्यासाठी रिटेलर नेटवर्क सुविधा पुरविणेकामी में. सुविधा इन्फोसर्व्ह प्रा. लि., मुबंई यांच्याशी निविदा शिवाय थेट संविदा करण्यास प्रशासनास प्राधिकृत करणे.

---

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—हा विषय पुढे ढकलला जावा कारण की, मालमत्ता कर रक्कमेच्या एक टक्के अधिक प्रचलित दरावर सेवाशुल्क इतकी रक्कम मिळकत धारकास रिटेलरकडे भरणा करावी लागणार आहे. आणि रिटेलर मालमत्ता धारकांकडुन करापोटीची रक्कम वसुल करेल. ती महापालिकेच्या कोषागारात भरणा न करता त्या रक्कमेचा अपहार केला तर काय करणार?

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>उदया, उल्हासनगरमधील दहा बारा लोकांनी जर अर्ज दिला की, कर वसुलीचे काम आम्हांला दया, तर त्यांना देणार का तुम्ही? कुणीही दोन लाख रुपये बॅक गॅरंटी आणि नागरीकांकडुन कराच्या रुपाने जमा केलेले पैसे महापालिका कोषागारात भरले नाही तर काय करणार?

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>त्यासाठी हा प्रस्ताव नाकारला जावा.

<u>काही सदस्य :–</u>नाकारण्यांत यावा.

<u>सभापती, श्री. लाल पंजाबी:–</u> सदरचा विषय नाकारण्याबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ४ :–** महानगरपालिका क्षेत्रात नागरिकांना मालमत्ता कराचा भरणा करण्यासाठी रिटेलर नेटवर्क सुविधा पुरविणेकामी में. सुविधा इन्फोसर्व्ह प्रा. लि., मुंबई यांच्याशी निविदा शिवाय थेट संविदा करण्यास प्रशासनास प्राधिकृत करणे.

<u>प्रस्तावना</u>

महानगरपालिकेने कर वसुली व्यवस्थापनातर्गत उल्हासनगर शहराचे संपूर्ण क्षेत्राचे विभाजन ५८ प्रभागात केलेले असून त्यासाठी कर वसुली लिपिकांची नियुक्ती केलेली आहे. सध्या ते घरोघरी जावून मालमत्ता कराची वसुली करतात व हाताने (Manual) तयार केलेली पावती मालमत्ताधारकास देतात. त्यानंतर सदर पावतीच्या अनुषंगाने मिळकतधारकाच्या खात्यात भरणा केलेल्या रक्कमेची नोंद करण्यात येते व सदर रक्कम महापालिका कोषागारात जमा होते. अशी प्रथा पुर्वीपासून चालू होती .

उल्हासनगर महानगरपालिकेने जेएनएनयुआरएम योजनेत भाग घेतला असून सदर योजनेत केंद्र व राज्य शासनाकडून अनुदान प्राप्त करुन घेणेसाठी महानगरपालिकतर्फे पुरविण्यात येणाऱ्या सर्व सेवांचे संगणकीकरण करण्याची हमी दिलेली आहे. त्यानुशंगाने कर विभागात जनतेच्या सोयींसाठी पुढीलप्रमाणे विविध सोयीसुविधा उपलब्ध करण्यात आलेल्या आहेत.

१. मोबाईल एसएमएस व्दारे देयकांची माहिती व भरणा.
२. मोबाईलव्दारे देयकांची माहिती व भरणा.
३. क्रेडीट कार्डद्वारे देयकांचा भरणा.
४. इंटरनेटव्दारे देयकांची माहिती व भरणा.
५. शहरात उभारण्यात आलेल्या किऑक्स सेंटरद्वारे देयकांची माहिती व भरणा.
६. शहरातील नागरिक सुविधा केंद्राद्वारे देयकांची माहिती व भरणा.

सद्यस्थितीत विविध संस्थामार्फत (म.वि.वि.कं, बी.एस.एन.एल, महानगर गॅस लि. आयडीया) पुरविण्यात येणाऱ्या सेवांचे शुल्क रिटेलर नेटवर्कद्वारे भरणा करण्यात येते. त्याचधर्तीवर उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात मालमत्ता कराचा भरणा रिटेलर नेटवर्कद्वारे करणेसंबंधी मे. सुविधा इन्फोसर्व्ह प्रा. लि. हायटेक प्लाझा, दुसरा मजला, महाकाली केव्स रोड, अंधेरी पुर्व मुंबई ४०० ०९३ यांचे मार्फत पुढीलप्रमाणे प्रस्ताव प्राप्त झालेला आहे.

| अ. क्र | प्रस्तावाचा तपशिल | |
|---|---|---|
| १ | सद्यस्थितीत समोर नमुद आस्थापनेतील बिलाचा भरणा संस्थेमार्फत वतीने (रिटेलर नेटवर्कद्वारे) करण्यात येत आहे. | ७. नोयडा पावर कंपनी लिमिटेड.<br>८. दक्षिण हरियाणा बिजली वितरण निगम<br>९. महानगर गॅस लिमिटेड<br>१०. आयडीया<br>११. ॲक्सिस बॅक<br>१२. भारतीय आयुर्विमा महामंडळ<br>१३. एम.टी.एन.एल |

<table>
<tr><td></td><td></td><td colspan="3">१४.    इतर</td></tr>
<tr><td>२</td><td>भारतात संस्थेची कार्यरत रिटेलर नेटवर्कची संख्या</td><td colspan="3">३५०००</td></tr>
<tr><td>३</td><td>महाराष्ट्रात संस्थेची कार्यरत रिटेलर नेटवर्कची संख्या</td><td colspan="3">८०००</td></tr>
<tr><td rowspan="9">४</td><td rowspan="9">उल्हासनगर शहरात पुढीलप्रमाणे ११ रिटेलर कार्यरत आहेत.<br><br>तसेच महानगरपालिकेच्या आवश्यकतेनुसार रिटेलरच्या संख्येत वाढ करण्यात येईल.</td><td>अ. क्र</td><td>रिटेलरचे नाव</td><td>पत्ता</td></tr>
<tr><td>१</td><td>अशोका एजन्सी</td><td>सी ब्लॉक नं. १२, रूम नं. २३, २४ गारगी पॅलेस समोर, हिरामोती सोसायटी जवळ, उल्हासनगर—४</td></tr>
<tr><td>२</td><td>आनंद इन्सुरन्स ॲण्ड इन्वेस्टमेंट कन्सल्टंट</td><td>शॉप नं. ०८, शांती निकेतन (संतू) बिल्डिंग, स्टेशन रोड, उल्हासनगर—४</td></tr>
<tr><td>३</td><td>चंदिनी ट्रव्हल्स</td><td>मदलसा अपार्टमेंट, शॉप नं. ३, दसेरा मैदान, स्टेशन रोड, उल्हासनगर—३</td></tr>
<tr><td>४</td><td>देवता टुर्स ॲण्ड ट्रव्हल्स</td><td>बॅरेक नं. ९६७, रूम नं. ४, कनवाराम चौक, उल्हासनगर—३</td></tr>
<tr><td>५</td><td>गुरूकृपा टुर्स ॲण्ड ट्रव्हल्स</td><td>राधा कॉर्नर, शॉप नं. २, इंदिरा गांधी भाजी मार्केट जवळ, उल्हासनगर—३</td></tr>
<tr><td>६</td><td>इश्वर लखुमल मोटवानी</td><td>प्लॉट नं. ३०, इंडस्ट्रीयल एरीया, माया आईस फॅक्टरी समोर, उल्हासनगर—४</td></tr>
<tr><td>७</td><td>मामा ऑनलाईन</td><td>शॉप नं. ३, मारूती कॉम्पलेक्स, झुलेलाल नगर, उल्हासनगर—५</td></tr>
<tr><td>८</td><td>स्लिझर मोबाईल ॲण्ड ट्रव्हल्स</td><td>शिवनेरी को. ऑ. हौ. शॉप नं. १, ओ. टी. सेक्शन, उल्हासनगर—३</td></tr>
</table>

<table>
<tr><td></td><td></td><td>९</td><td>ठाकुरजी एंटरप्रायझेस</td><td>बॅरेक नं. २९१, रूम नं. १२, ओ. टी. सेक्शन, गुडलक अपार्टमेंट समोर, उल्हासनगर—२</td></tr>
<tr><td></td><td></td><td>१०</td><td>मनिष बालानी</td><td>फर्निचर बाजार, उल्हासनगर—३</td></tr>
<tr><td></td><td></td><td>११</td><td>ठाणे/राहुल नगर—उल्हासनगर—४ दामोदर रामुजी धुवे</td><td>राहुल नगर, ब्लॉक नं. ए २८५/५७० समोर, ठाणे उल्हासनगर—४</td></tr>
<tr><td>५</td><td>वेळ</td><td colspan="3">३६५ दिवस<br>(सकाळी रिटेलर शॉप सुरू होण्यापासुन सायंकाळी बंद होईपर्यंत)</td></tr>
<tr><td>६</td><td>मिळकतधारकाच्या खात्यात रक्कमेची नोंद करणे.</td><td colspan="3">रिटेलर नेटवर्कसेवा महानगरपालिका मालमत्ता कर आकारणी संगणकप्रणालीशी संलग्न करण्यात येणार असल्यामुळे रिटेलरमार्फत वसुल करण्यात आलेल्या रक्कमेची नोंद मिळकतधारकाच्या खात्यात परस्पर होईल.<br>तसेच महानगरपालिकेच्या नमुन्यात मालमत्ता कर भरणा केल्याची पावती संबंधित मिळकतधारकास निर्गमित केली जाईल.</td></tr>
<tr><td>७</td><td>वसुल झालेल्या रक्कमेचा महानगरपालिका कोषागारात भरणा व अहवाल.</td><td colspan="3">रिटेलर नेटवर्कद्वारे वसुल झालेली रक्कम दुसऱ्या दिवशी मे. सुविधा इन्फोसर्व्ह प्रा. लि. यांचे बॅक खात्यातुन थेट महानगरपालिका कोषागारात (महानगरपालिका बॅक खात्यात) जमा केली जाईल.<br>तसेच वसुलीसंदर्भात ताळमेळ घेण्यासाठी जमा झालेल्या रक्कमांचे विवरणपत्रक ;डै त्मचवतजद्ध दैनंदिन तत्वावर महानगरपालिकेस उपलब्ध करून दिले जातील.</td></tr>
<tr><td>८</td><td>खर्च</td><td colspan="3">मालमत्ता कर रक्कमेच्या १ टक्के अधिक प्रचलित दरावर सेवाशुल्क ;ैमतअपबम ज्ंगद्ध इतकी रक्कम मिळकतधारकास रिटेलरकडे भरणा करावी लागणार आहे.<br>त्यामुळे महानगरपालिकेस काहीही आर्थिक खर्च होणार नाही.</td></tr>
<tr><td>९</td><td>संस्थेस महानगरपालिकेत जमा करावी लागणारी सुरक्षा अनामत रक्कम</td><td colspan="3">सुरक्षा अनामत रक्कम रू. २,००,०००/— बॅक गॅरंटीच्या स्वरूपात महानगरपालिकेत जमा करण्यात येईल.<br>तसेच संस्थेच्या व्यवसाय परिणामात वाढ झाल्यास वेळोवेळी वाढीव सुरक्षा अनामत रक्कम संस्थेमार्फत महानगरपालिकेत जमा करण्यात येईल.</td></tr>
<tr><td>१०</td><td>करदात्यास आकर्षित करणेसाठी इतर उपाययोजना</td><td colspan="3">रिटेलर नेटवर्कद्वारे मालमत्ता कराचा भरणा करणेसाठी करदात्यास आकर्षिक करणेबाबत संस्थेच्या स्वखर्चाने विविध योजना राबविण्यात येतील. (उदा. कुपन वगैरे)</td></tr>
</table>

शहराच्या प्रत्येक भागात रिटेलर नेटवर्कद्वारे मालमत्ता कर वसुलीची सुविधा उपलब्ध होणार आहे. रिटेलर नेटवर्कसेवा महानगरपालिका मालमत्ता कर आकारणी संगणकप्रणालीशी संलग्न करण्यात येणार असल्यामुळे रिटेलरमार्फत वसुल करण्यात आलेल्या रक्कमेची नोंद

मिळकतधारकाच्या खात्यात परस्पर होईल. व महानगरपालिकेच्या नमुन्यात मालमत्ता कर भरणा केल्याची पावती संबंधित मिळकतधारकास निर्गमित केली जाईल.

तसेच रिटेलर नेटवर्कद्वारे वसुल झालेली रक्कम दुसऱ्या दिवशी मे. सुविधा इन्फोसर्व्हे प्रा. लि. यांचे बॅंक खात्यातुन थेट महानगरपालिका कोषागारात जमा होणार असल्यामुळे वाहतुक, संरक्षण व विमा इत्यादी उपस्थित होणारे प्रश्न उद्‌भवणार नाहीत. तसेच वसुलीसंदर्भात ताळमेळ घेण्यासाठी जमा झालेल्या रक्कमांचे विवरण ;डै त्मचवतजद्ध दैनंदिन तत्वावर उपलब्ध होतील.

अशा यंत्रणेद्वारे मालमत्ता कराची रक्कम वसुल केल्यास अफरातफर टाळता येईल तसेच नागरिकांचा विश्वास संपादन केल्यासारखे होवुन नागरिक मालमत्ता कराचा भरणा करणेसाठी पुढे येतील. शिवाय लेखा परिक्षणांतर्गत आक्षेपाचे काम देखिल कमी होईल.

स्थायी समिती क्र. ४८, दिनांक २०/८/२००९ अन्वये मालमत्ता कराचा भरणेसाठी इलेक्ट्रॉनिक्स, क्लियरींग सिस्टम, डेबिट कॉर्ड, क्रेडीट कार्ड, आयव्हीआरएस, आयटीझेड कॅश कार्ड सुविधा नागरिकांना उपलब्ध करणेकामी प्रशासनास योग्य त्या अभिकर्तासोबत निविदेशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करण्यात आले आहे.

त्याचधर्तीवर उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात नागरिकांना मालमत्ता कराचा भरणा करणेसाठी रिटेलर नेटवर्क सुविधा उपलब्ध करून देणेसाठी मे. सुविधा इन्फोसर्व्हे प्रा. लि. हायटेक प्लाझा, दुसरा मजला, महाकाली केव्स रोड, अंधेरी पुर्व मुंबई ४०० ०९३ यांना प्राधिकृत करणेसाठी मंजुरीकरीता स्थायी समिती पटलावर प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ४ दिनांक:—२८/४/२०११

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री.बी.बी. मोरे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांना मालमत्ता कराचा भरणा करण्यासाठी रिटेलर नेटवर्क सुविधा पुरविणेकामी प्रशासनास में. सुविधा इन्फोसर्व्हे प्रा. लि., मुंबई यांच्याशी निविदा शिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत नाही.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ५ :—** श्री. डी.आर.पाटील यांना विशेष कार्य अधिकारी (अतिक्रमण निर्मुलन) या पदावर दिनांक २८/४/२०११ पासुन पुढील ६ महिन्याच्या मुदतवाढीस मंजूरी देणे.

---

सदस्य श्री. प्रशांत धांडे :—हे काय काम करतात?

सदस्य श्री. बी.बी. मोरे:—आता या प्रस्तावावर मी बोलले पाहिजे काय? आता मला असे वाटते की, सभापती महोदयांनी बोलावे.

सभापती, श्री. लाल पंजाबी:—प्रशासनाच्यावतीने याबाबत स्पष्टीकरण केले जाईल.

**श्री. विनोद डवले, सहा. आयुक्त, अतिक्रमण:—**या विषयाचा गोषवारा सामान्य प्रशासन विभागाकडे पाठविण्यात आलेला आहे. उल्हासनगर शहरातील अनाधिकृत बांधकामांविषयी मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार अनाधिकृत बांधकामांच्या बाबतीत संबंधित विकासक जमिनमालक तसेच वास्तुविशारद यांचे वि्रुध्द गुन्हे दाखल करण्याचे काम श्री. पाटील करत आहेत. त्यांच्या नेमणूकीची मुदत २७/४/२०११ रोजी संपृष्टात आलेली असून त्यांना मुदतवाढ देण्यासाठी सभागृहापुढे प्रस्तावित करण्यात आलेले आहे. त्यांनी आजपर्यंत ६०५ एफआयआर दाखल केले आहेत.

**सदस्य श्री. प्रशांत धांडे :—**ते किती वर्षापासुन काम करत आहेत?

**श्री. विनोद डवले, सहा. आयुक्त, अतिक्रमण:—**सामान्य प्रशासन विभागाने गोषवारा पाठविलेला आहे.

**सदस्य श्री. प्रशांत धांडे :—**आपणाकडे विधी अधिकारी नाही आहे. विधी अधिकारी नेमा. त्यांच्यामार्फत एफआयआर दाखल केले जावे.

**सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—**श्री. पाटील यांनी किती एफआयआर दाखल केले आहे?

**श्री. विनोद डवले, सहा. आयुक्त, अतिक्रमण:—**श्री. पाटील यांनी ६०५ एफआयआर दाखल केले आहेत.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**त्यांना ही जी मुदतवाढ देत आहोत ती कायदेशीर आहे काय?

**श्री. विनोद डवले, सहा. आयुक्त, अतिक्रमण:—**६०५ एफआयआर दाखल करण्यात आलेले आहेत. ही सर्व प्रकरणे न्यायालयात गेलेली आहेत. न्यायालयांकडुन याविषयी वेळोवेळी कागदपत्रांची मागणी केली जाते. ती पुरविण्यासाठी त्यांना मुदतवाढ देणे आवश्यक आहे.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे:—**सहा महिन्याची मुदतवाढ मागितली आहे ती देवु या. परंतु पुढच्या वेळी जेव्हा यांच्या विषयीचा प्रस्ताव येईल त्यावेळी यांनी मागील सहा महिन्यात काय काय कामे केली आहेत त्यांची माहिती देण्यात यावी.

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्री. लाल पंजाबी:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ५ :—** श्री. डी.आर.पाटील यांना विशेष कार्य अधिकारी (अतिक्रमण निर्मुलन) या पदावर दिनांक २८/४/२०११ पासुन पुढील ६ महिन्याच्या मुदतवाढीस मंजूरी देणे.

**प्रस्तावना**

श्री. डी. आर. पाटील यांची येथिल मा. स्थायी समिती ठराव क्र. ६१, दि. २५/१०/२०१० आणि क्र. उमपा/साप्रवि/आस्था/मुलि/७३८/१०, दिनांक ११/११/२०१० अन्वये विशेष कार्य अधिकारी (अतिक्रमण निर्मुलन) म्हणुन ०६ महिन्यांकरीता तात्पुरत्या स्वरूपात नेमणुक करण्यात आलेली आहे. उल्हासनगर शहरातील अनधिकृत बांधकाम विषयक मा. उच्च न्यायालयात सद्यस्थितीत प्रकरण सुरू आहे. त्याअनुषंगाने मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार अनधिकृत बांधकामाच्या बाबतीत संबधित विकासक, जमीन मालक तसेच वास्तुविषारद यांचेविरूद्ध गुन्हे दाखल करण्याचे काम त्यांचेवर सोपविलेले आहे.

उक्त आदेशानुसार श्री. डी. आर. पाटील यांची महानगरपालिका आस्थापनेवरील विशेष कार्य अधिकारी (अतिक्रमण निर्मुलन) या पदावरील नेमणुकीची मुदत दि. २७/०४/२०११ रोजी संपुष्टात येत आहे. मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार अनधिकृत बांधकामाच्या बाबतीत संबधित विकासक, जमीन मालक तसेच वास्तुविशारद यांचेविरूद्ध गुन्हे दाखल करण्याचे कामासाठी श्री. डी. आर. पाटील यांना मुदतवाढ द्यावयाची असल्यास, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (३) नुसार मा. स्थायी समितीची मंजूरी घेणे आवश्यक आहे. पुढील ०६ महिन्याकरीता मुदतवाढ देणेकामी मा. स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक आहे.

तरी श्री. डी. आर. पाटील यांना विषेश कार्य अधिकारी (अतिक्रमण निर्मुलन) या पदावर दिनांक २८/४/२०११ रोजी ०१ दिवसाचा खंड देवून पुढील ०६ महिन्यांसाठी मुदतवाढ द्यावयाचा प्रस्ताव मंजुरीकरीता मा. स्थायी समितीच्या पटलावर प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ५ दिनांकः—२८/४/२०११

सुचकाचे नाव :— श्री. प्रशांत धांडे

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती ज्योती माने

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार श्री. डी.आर.पाटील यांना विशेष कार्य अधिकारी (अतिक्रमण निर्मुलन) या पदावर दिनांक २८/४/२०११ पासुन पुढील ६ महिन्याच्या मुदतवाढीस मंजूरी देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ६** :— उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील उदयानांच्या सुरक्षिततेकरीता खाजगी सुरक्षारक्षक पुरविणेकरीता नियुक्त केलेल्या मे. सेफ टेकर सेक्युरीटी फोर्स या संस्थेस पुढील एक वर्षासाठी मुदतवाढ देणे.

---

सदस्य श्री. प्रशांत धांडेः—ही संस्था कशाप्रकारचे सुरक्षा रक्षक पुरविते? ती जर म्हातारे सुरक्षारक्षक देत असेल तर काय फायदा?

सदस्य श्री. शेखर यादव :—हे सुरक्षा रक्षक कोठे कोठे पुरविले जातात? मला वाटते फक्त सपना गार्डनमध्ये दोन सुरक्षा रक्षक दिले आहेत.

श्री. भरत बठिजा, उप—अभियंता, साबांविः—नऊ उदयानांमध्ये सुरक्षा रक्षक पुरविण्यात आले आहेत. त्यापैकी तीन उदयानांमध्ये तीन सुरक्षा रक्षक व सहा बगिच्यांमध्ये १२ असे एकुण १५ सुरक्षारक्षक संस्थेमार्फत पुरविण्यात आलेले आहेत आणि सपना गार्डन येथे २ सुरक्षा रक्षक पुरविण्यात आलेले आहेत.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :—तुम्ही गोषवा—यामध्ये लिहिले आहे की, तीन ठिकाणी तीन पाळयांमध्ये तीन—तीन सुरक्षारक्षक पुरवायचे आहेत. या सर्वांच्या उपस्थिती व अनुपस्थितीची नोंद कोण ठेवते?

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :</u>—नाला सफाईच्या कामासाठी १७५ रुपये रोजावर हंगामी कामगार नेमण्यास तुम्हांला तांत्रिक अडचण येते.

<u>श्री. भरत बठिजा, उप—अभियंता,साबांवि:</u>—महापालिकेने लोकप्रतिनिधींच्या मागणीनुसार त्यांच्या प्रभागक्षेत्रातील बगिच्यांचे सुशोभिकरण करण्यासाठी खर्च केलेला आहे. त्यामुळे बगीच्यांच्या सुरक्षीततेसाठी सुरक्षा रक्षक नेमणे आवश्यक आहे यापुर्वी नेमलेल्या सुरक्षा रक्षकांची मुदत संपल्यामुळे १० एप्रिलपासुन या संस्थेकडुन सुरक्षा रक्षक पुरविणे बंद झाले आहे.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :</u>—तर मग त्या अगोदरपासुन गोषवारा सादर का करण्यात आला नाही? आपण या सुरक्षा रक्षकांना प्रतिमाह ७००० रुपये पगार देतो. एवढा पगार का दयावा? एका उदयानासाठी ३ पाळयांमध्ये जर सुरक्षारक्षक पुरवायचा झाला तर एकाच उदयानासाठी दरमहा २१,०००/— रुपये खर्च येईल आणि याच संस्थेला पुन्हा मुदतवाढ का देत आहात? इतर संस्थांनाही बोलाविले असते तर स्पर्धा होवुन कमी दरामध्ये सुरक्षारक्षक उपलब्ध झाले असते.

<u>सदस्य श्री. भरत बठिजा:</u>—तर त्यासाठी निविदा काढावी लागेल.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :</u>—या सुरक्षा रक्षकांवर महापालिकेचे काही नियंत्रण आहे की नाही?

<u>श्री. माधव जवांदे, शहर अभियंता:</u>—यापुर्वी नियुक्त केलेल्या संस्थेची मुदत १० एप्रिलला संपलेली आहे. उदयानांमध्ये पुरविण्यात आलेले साहित्य चोरीला जावु नये तसेच साहित्याचे नूकसान होवु नये म्हणुन तीन महीन्यापर्यंत मुदतवाढ दिली जावी.

<u>श्री. भरत बठिजा, उप—अभियंता, साबांवि:</u>—हे जे पंधरा सुरक्षा रक्षक पुरविण्यात आले होते ते गौल मैदान येथे एक, यात्री निवास येथे एक, सपना गार्डन येंथे दोन, जिजामाता उदयान येथे एक, नाना नानी पार्क येथे दोन, दसेरा मैदान येथे दोन, स्वामी भोजराज उदयान येथे दोन, स्वामी विवेकानंद उदयान येथे दोन व लाललोई गार्डन येथे दोन असे एकुण पंधरा सुरक्षा रक्षक या संस्थेतर्फे नेमण्यात आले होते.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :</u>—महापालिकेच्या मालमत्तांचे सुरक्षिततेकरीता सार्वजनिक बांधकाम विभागाने ११६ सुरक्षा रक्षक भरणे बाबत प्रस्ताव तयार केला आहे. त्याबाबत निविदा का काढण्यात आली नाही? आणि आता या संस्थेमार्फत सुरक्षा रक्षक पुरविले जात आहेत त्यांची दैनंदिन उपस्थिती व अनुपस्थितीची नोंद कोण पाहत आहे? आणि जिजामाता उदयानामध्ये तर सुरक्षारक्षक येत नाहीत असे सांगितले जात आहे.

<u>श्री. भरत बठिजा, उप—अभियंता,साबांवि:</u>—प्रभाग समितीमध्ये जे मेस्त्री आहेत ते सुरक्षा रक्षकांचे हजेरीपट ठेवतात.

<u>सदस्य ॲड श्री. अनिल विदयार्थी :</u>—कॅम्प नं. ५ मधील उदयानांमध्ये एकही वॉचमन नाही.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :</u>— ११६ सुरक्षारक्षकांचा प्रस्ताव मंजुरीस्तव कधी आणणार? आता १५ सुरक्षारक्षकांचा प्रस्ताव कसा आणला?

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :</u>—फक्त तीन महिन्याची मुदवाढ देत आहात ना?

<u>श्री. भरत बठिजा, उप—अभियंता,साबांवि:</u>—ते सुरक्षारक्षक काम करतात, मी स्वत: पाहिले आहे. सुरक्षारक्षक नेमले नाही तर उदयानांमधील सामानांची चोरी होवु शकते.

<u>सदस्य ॲड. अनिल विद्यार्थी:</u>—प्रभाग क्र. ६६ मध्ये पाच उदयाने आहेत परंतु त्यामध्ये एकही सुरक्षा रक्षक नाही.

<u>श्री. भरत बठिजा, उप—अभियंता,साबांवि:</u>—प्रभाग क्रमांक मला माहित नाही परंतु कॅम्प नं. ५ मधील लाललोई उदयानामध्ये सुरक्षारक्षक नेमण्यात आलेला आहे.

**सदस्या डॉ. निना नाथानी:—**एका उदयानामध्ये किती सुरक्षा रक्षक नेमले जात आहेत?

**सदस्य ॲड श्री. अनिल विद्यार्थी :—**तीन महिन्याची मुदतवाढ दिली जात आहे ना?

**श्री. भरत बठिजा, उप—अभियंता,साबांवि:—**सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये मजुरांची संख्या पुरेशी नसल्यामुळे उदयानांच्या सुरक्षीततेसाठी सुरक्षा रक्षक नेमणे आवश्यक आहे यासाठी सुरक्षा रक्षक पुरविणा—या संस्थेस मुदतवाढ दिली जावी.

**सदस्य श्री.बी.बी. मोरे/श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—**ठिक आहे, मुदतवाढ दया.

**सदस्य श्री. प्रशांत धांडे :—**जशी मागणी केली आहे त्याप्रमाणे एक वर्षासाठी मुदतवाढ दिली जावी.

**महापालिका सचिव :—**एक वर्षासाठी?

**काही सदस्य :—**ठिक आहे? पास,पास.............

**सभापती, श्री. लाल पंजाबी:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ६ :—** उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील उदयानांच्या सुरक्षिततेकरीता खाजगी सुरक्षारक्षक पुरविणेकरीता नियुक्त केलेल्या मे. सेफ टेकर सेक्युरीटी फोर्स या संस्थेस पुढील एक वर्षासाठी मुदतवाढ देणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिका सार्वजनिक बांधकाम विभागासाठी महापालिका क्षेत्रातील बगीच्यांच्या सुरक्षिततेकरीता सुरक्षां रक्षकांचा परवाना असलेल्या संस्थेकडून व सुरक्षारक्षक पुरविणेबाबत मा.स्थायी समिती समिती ठराव क्र.१०३ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्राप्त झाल्यावर निविदा प्रक्रिया करुन मा.स्थायी समिती ठराव क्र.१३१ दिनांक ३१/३/२०१० अन्वये मे.सेफ टेकर सेक्युरीटी फोर्स या संस्थेस एक वर्षाकरीता क्र.उमपा/साबांवि/शअ/०४ दिनांक ७/४/२०१० अन्वये प्रति सुरक्षारक्षक रु. ७,०००/— प्रतिमाह प्रमाणे १५ सुरक्षा रक्षक पुरविणेबाबत कार्यारंभ आदेश देण्यात आले होते.

सदरचा कालावधी माहे एप्रिल २०११ मध्ये संपुष्टात येत आहे. त्याअनुषंगाने त्यांनी दिनांक १४/३/२०११ चे पत्राद्वारे पुर्वीच्याच दरात पुढेही एक वर्ष करण्याची तयारी दर्शविली आहे.

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील बगीच्यांचे सौंदर्यीकरण व सुशोभिकरण करण्यात आलेले आहे. महापालिका क्षेत्रातील सुशोभिकरण केलेल्या उद्यानांची संख्या व त्याप्रमाणात महापालिका आस्थापनेवरील सुरक्षा रक्षक कर्मचारी वर्गाची संख्या कमी आहे. बगीच्यांमध्ये विद्युतीकरण, कारंजे, लहान मुलांची खेळणी इत्यादींच्या सुरक्षिततेकरीता तीन पाळयांमध्ये सुरक्षा रक्षक असणे आवश्यक आहे. महानगरपालिकेने लोकप्रतिनिधींच्या मागणीनुसार त्यांचे प्रभाग क्षेत्रातील बगीच्यांचे सुशोभिकरणासाठी खर्च केलेला आहे. त्यामुळे बगीच्यांची सुरक्षितता करणेही गरजेचे आहे.

महापालिकेच्या मालमत्तांचे सुरक्षिततेकरीता सामान्य प्रशासन विभागाकडून पाणीपुरवठा, मालमत्ता विभाग, सार्वजनिक बांधकाम विभागासाठी ११६ सुरक्षा रक्षक खाजगी परवानाधारक शासनमान्य संस्थेकडून भरणेबाबतचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत तयार करण्यात आला आहे. परंतू त्यास अद्याप मंजूरी मिळालेली नाही.

सध्या महानगरपालिकेच्या ०९ बगीच्यांपैकी ०३ बगीच्यांमध्ये ०३ सुरक्षा रक्षक व ६ बगीच्यांमध्ये १२ असे एकूण १५ सुरक्षा रक्षक सदर संस्थेमार्फत पुरविण्यात आलेले आहेत. सदर ०९ ठिकाणांपैकी ०३ ठिकाणी ३ पाळयांमध्ये ०३ सुरक्षारक्षकांप्रमाणे **९ सुरक्षारक्षक** व उर्वरीत ६ बगीच्यांमध्ये ६ सुरक्षारक्षक अशा प्रकारे **३६** असे एकूण ४५ सुरक्षारक्षक व त्यांचेसाठी **०८ रिलिव्हर** असे एकूण **५३** सुरक्षारक्षकांची आवश्यकता आहे. त्यासाठी जुन्या दराप्रमाणे (रु.७०००/— X ५३) रु.३,७१,०००/—

प्रति माह खर्चानुसार वार्षिक( १२ x ३,७१,०००) प्रमाणे रु.४४,५२,०००/— इतका खर्च अपेक्षित आहे. उल्हासनगर महानगरपालिकेच्या वर्ष २०१०—२०११ च्या अर्थसंकल्पमध्ये 'अ' अंदाजपत्रक भाग—१ मधील ए (२७) रोजंदारी/मानधन इत्यादी या लेखाशिर्षाखाली रु.१.०० कोटीची तरतुद केलली आहे.

बगीच्यांच्या सुरक्षिततेकरीता यापूर्वी प्रस्तावित केलेल्या प्रस्तावास अद्यापपर्यंत अंतिम मंजूरी प्राप्त झालेली नाही. मे.सेफ टेकर सेक्युरीटी फोर्स यांची दिनांक ७/४/२०१० अन्वये दिलेल्या कार्यारंभ आदेशाप्रमाणे दिनांक ३०/४/२०१० अन्वये मुदत संपुष्टात येत आहे. बगीच्यांमध्ये पुरविण्यात आलेले विद्युतीकरण, सुशोभिकरण इत्यादी साहित्य सुरक्षित ठेवणे आवश्यक आहे. अन्यथा साहित्य चोरीस जाणे, साहित्यांचे नुकसान, उपद्रव होण्याची शक्यता असल्याने मे.सेफ टेकर सेक्युरीटी फोर्स यांना वरील प्रस्तावित केल्याप्रमाणे पुढील एक वर्षाची मुदत वाढ देणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक असल्याने मा.स्थायी समितीपुढे मान्यतेस्तव प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र. ६ दिनांकः— २८/४/२०११

सुचकाचे नाव :— श्री. प्रशांत धांडे

अनुमोदकाचे नाव :— श्री.बी.बी. मोरे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील उदयानांच्या सुरक्षिततेकरीता खाजगी सुरक्षारक्षक पुरविणेकामी सध्या कार्यरत ठेकेदार मे. सेफ टेकर सेक्युरीटी फोर्स या संस्थेस पुर्वीच्या करारातील अटी, शर्ती व निर्बंधावर पुढील एक वर्षासाठी मुदतवाढ देणे कामी प्रशासनास त्यांच्याशी निविदाशिवाय थेट संविदा करण्यास प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ७ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ७** :— श्री. ताहीलराम रामोमल चांदवानी ग्राहक क्र. यु./०४/३२१ यांचे २३—२४ वर्षापासूनचे पाणी देयकाची रक्कम निर्लेखित करणेस मंजुरी देणे.

---

सदस्य श्री. धनंजय बोडारे :—अतिशय जिनीअन कॅसेस असतील त्या आणा, छोटया अजिबात नको. सर्वांच्या एकत्रित करुन आणा. एक एक प्रकरण आणु नका.

काही सदस्य :—पास—पास......

सभापती, श्री. लाल पंजाबी:—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ७** :— श्री. ताहीलराम रामोमल चांदवानी ग्राहक क्र. यु./०४/३२१ यांचे २३—२४ वर्षापासूनचे पाणी देयकाची रक्कम निर्लेखित करणेस मंजुरी देणे.

प्रस्तावना

श्री. ताहीलराम रामोमल चांदवानी, रा. अशोक होम, उल्हासनगर ०४ यांचेकडे महानगरपालिकेची १९९४ पूर्वीपासून एक नळजोडणी आहे. त्यांचा ग्राहक क्र. यु ०४/३२१ असा आहे. श्री.ताहीलराम रामोमल चांदवानी, यांचे चहाचे हॉटेल आहे. श्री.ताहीलराम यांचा दि. २६/६/१९८४ रोजी मृत्यू झाला. तेव्हांपासून हे दूकान त्यांचे नातू श्री. सुरेश रोचलदास चांदवानी हे चालवत आहेत.

श्री. सुरेश चांदवानी यांनी दि. ०५/१०/२०१० रोजी या कार्यालयाकडे एक अर्ज केला आहे. त्या अन्वये सदर कनेक्शन गेली २३–२४ वर्षापासून अस्तित्वात नाही,परंतु त्यांना देयके दिली जातात. सप्टेंबर २०१० अखेरपर्यंत त्यांचेकडे रू. ४,३७,८४८/– इतकी थकबाकी आहे. सदर थकबाकी रद्द करावी व कनेक्शन रद्द करावे, अशी त्यांची मागणी आहे. अर्जासोबत त्यांनी आजोबांचे मृत्यू प्रमाणपत्र, टॅक्सपावती, दि. १३/०४/२००५ रोजी वकीलामार्फत महापालिकेला दिलेली नोटीस, दि. २९/३/२००५ रोजीचा त्यांचा अर्ज व सत्यप्रतिज्ञालेख इत्यादी कागदपत्रे सादर केली आहेत.

या बाबत या कार्यालयाचे संबंधित लिपिक यांनी प्रत्यक्ष जागेवर पंचनामा केला आहे. संबंधित लिपिक या ठिकाणी १३ – १४ वर्षापासून देयके वाटतात व तेंव्हापासून सदर ग्राहकाकडे नळ कनेक्शन नाही, असा अहवाल त्यांनी सादर केला आहे. सोबत ग्राहकाचा आतापर्यंतच्या देयकांचा तक्ता सादर करीत आहे. त्याप्रमाणे त्यांचेकडे सप्टेंबर २०१० अखेर रू.४,३७,८४८/– इतकी थकबाकी आहे. ग्राहकास व्याज माफी योजनेचा फायदा दयावयाचा झाल्यास त्यांना मुळ मुद्दल रू. १,१३,७१६ इतकी रक्कम भरावी लागेल व रू.३,२४,१४०/– इतके व्याज माफ होइल.

**परंतु २३–२४ वर्षापासून नळ कनेक्शन अस्तित्वात नसल्यामुळे देयके पूर्णपणे रद्द व्हावीत,** असे ग्राहकाचे म्हणणे आहे. हे मान्य केल्यास वरील मुळ मुद्दलाची रक्कम महापालिकेस मिळणार नाही व रू. १,१३,७१६/– इतकी रक्कम वसूल होणार नाही. प्रत्यक्ष जागेवरील परिस्थिती, ग्राहकाचे सत्यप्रतिज्ञा लेख, इतर कागदपत्रे व लिपिकाचा अहवाल पाहता गेल्या १३ वर्षापासुन सदर ठिकाणी नळजोडणी अस्तित्वात नाही, असे दिसते. या काळात महानगरपालिकेकडून ग्राहकास पाणी देण्यात आलेले नाही, त्यामुळे त्या कालावधीतील देयके रद्द करण्यास हरकत नाही,असे वाटते. अश्या परिस्थितीत, ग्राहकास मार्च १९९७ अखेर रू. १०,७१५.०० इतकी रक्कम भरावी लागेल. त्यामुळे त्या कालावधीतील देयके रद्द करण्यास व त्या देयकांची रक्कम निर्लेखित करण्याचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या मंजुरीसाठी सादर.

स्थायी समिती ठराव क्र. ७ दिनांक:–२८/४/२०११

सुचकाचे नाव :– श्रीमती सरोजिनी टेकचंदानी

अनुमोदकाचे नाव :– डॉ. निना नाथानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार श्री. ताहीलराम रामोमल चांदवानी ग्राहक क्र. यु./०४/३२१ यांची गेल्या १३ वर्षापासून सदर ठिकाणी नळजोडणी अस्तित्वात नसल्याने यांचेकडुन मार्च १९९७ अखेरची रु. १०,७१५/– वसुल करुन त्यानंतरच्या १३ वर्षाची देयके रद्द करुन व्याजासह थकबाकीची रक्कम निर्लेखित करण्यास मंजुरी देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. ८ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ८** :– उल्हासनगर महापालिके अंतर्गत असलेले विविध बुस्टर पंपींग स्टेशन चालविणे, देखभाल व दुरुस्ती करणेकामीच्या प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मंजुरी देणे.

---

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>विषय वेगळा आहे. आणि गोषवारा वेगळा आहे. प्राकलनात प्रशासकिय वित्तीय मंजुरी देण्याचा आहे तर खाली गोषवा–यामध्ये लिहिले आहे की अस्तित्वातील निविदेत झालेल्या खर्चास मुदवाढीस मंजुरी मिळावी.

<u>श्री. एम.जी. गिरगांवकर, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा:–</u>निविदा मागवुन काम करण्यासाठी तसेच ही प्रस्तावित निविदा अंतिम होईपर्यंत सध्या अस्त्वित्वातील निविदेनुसार झालेल्या खर्चास मुदतवाढीस मंजुरी मिळावी असे आम्ही प्रस्तावित केले आहे.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>मुदतवाढ का देता? निविदा मागवा.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>निविदेची मुदत कधी संपली आहे?

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>नविन निविदा काढुन ती पुर्ण कधी कराल? दोन महिने वगैरे नको, पंधरा दिवसात पुर्ण करा.

<u>श्री. एम.जी. गिरगांवकर, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा:–</u>निविदा प्रक्रिया पुर्ण करण्यास दोन महिन्याचा कालावधी लागेल.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>दोन महिने नाही, दोन महिने जास्त होतात, पंधरा दिवसात करा. नाहीतर जास्तीत जास्त एक महिन्यामध्ये ही कार्यवाही पुर्ण करा. त्यापेक्षा जास्त कालावधी लागला तर होणारा खर्च आपल्या पगारातुन वसुल केला जाईल. तेव्हा आपणांस या विषयाची गंभीरता कळेल.

<u>श्री. माधव जवांदे, शहर अभियंता:–</u>एक आठवडयाची अल्प मुदतीची टेंडर नोटिस काढावी लागेल.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>हे सर्व गोलमाल करुन विषय आणतात. आणि पास करा म्हणतात. यांनी एक महिन्याच्या आत ही सगळी निविदेची कार्यवाही पुर्ण करावी.

<u>सभापती, श्री. लाल पंजाबी :–</u>होय, विषय वेगळा आहे आणि गोषवारा वेगळा आहे.

<u>काही सदस्य :–</u>पास–पास...... एक महिन्याची मुदतवाढ देवुन हा विषय पारीत केला जावा.

<u>सभापती, श्री. लाल पंजाबी:–</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ८** :– उल्हासनगर महापालिके अंतर्गत असलेले विविध बुस्टर पंपींग स्टेशन चालविणे, देखभाल व दुरुस्ती करणेकामीच्या प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मंजुरी देणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर शहरातील उंच भागात पाणी पुरवठा करणेसाठी विविध ठिकाणी लाईन बुस्टर पंपिग स्टेशन बनविण्यात आलेली आहेत. त्यापैकी हिल लाईन, पटेल नगर, गांधीनगर हे पंपिग स्टेशन उल्हासनगर महानगरपालिकेच्या कर्मचा–यांमार्फत चालविली जातात व इतर बुस्टर पंपिग स्टेशन वार्षिक कंत्राटी पध्दतीने चालविणे, देखभाल व दुरुस्ती करणे हे काम ठेकेदार मे. कल्पतरु इंजिनिअर्स, मुंबई यांना वार्षिक ठेकेदारी पध्दतीने देण्यात आले असुन, सदर कामाची मुदत संपुष्टात आल्याने व निधीची तरतुद नसल्याने सदर काम जुन्या दराने चालू ठेवण्यात आलेले आहे.

म्हणून उपरोक्त कामासाठी पुढील बारा महिन्याच्या कालावधीकरीता रु. ९२,०५,९६९/– इतक्या रकमेचे अंदाजपत्रक तयार केले असुन, किमान वेतन अधिनियम (Min Wages Act.) नुसार सद्या ठाणे महानगरपालिकेकडे चालू असलेले मंजुर निविदेनुसार दर घेण्यात आलेले आहेत. त्यात अभियंता, पंपचालक, मदतनिस, जोडारी, विजतंत्री, यांची तरतुद केलेली आहे. तसेच देखभाल, दुरुस्तीसाठी लागणारे साहित्य महाराष्ट्र

जीवन प्राधिकरण/सार्वजनिक बांधकाम विभाग च्या विद्युत/यांत्रिकी प्रचलित दरसुचीनुसार घेण्यात आलेले आहेत.

सदर खर्च सन २०११–१२ चे मंजुर तरतुद लेखाशिर्ष “B (Xiii) P-I” मधील मंजुर असलेल्या तरतुदी मधून निविदा मागवून करण्याचे प्रस्तावित आहे. तरी सदर प्रस्तावास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये निविदा मागवून काम करण्यासाठी तसेच ही प्रस्तावित निविदा अंतीम होईपर्यंत सद्या अस्तित्वातील निविदेनुसार झालेल्या खर्चास व मुदतवाढीस मंजुरी मिळावी, हि विनंती.

सदर प्रस्ताव प्रशासकीस व वित्तीय मंजुरीसाठी मा. स्थायी समितीच्या पटलावर सादर करीत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ८ दिनांकः– २८/४/२०११

सुचकाचे नाव :– श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :–श्री. बी.बी.मोरे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महापालिके अंतर्गत असलेले विविध बुस्टर पंपींग स्टेशन चालविणे, देखभाल व दुरुस्ती करणेकामीच्या प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देत आहे. तसेच सध्या कार्यरत ठेकेदार मे. कल्पतरु इंजिनिअर्स, मुंबई यांना पुर्वीच्या करारातील अटी, शर्ती व निर्बंधावर निविदा होईपर्यंत एक महिन्याची मुदतवाढ देणेकामी आयुक्तांस त्यांच्याशी निविदा शिवाय थेट संविदा करण्यास प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. ९ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ९ :–** उल्हासनगर महापालिकेच्या ''टप्पा–१'' अंतर्गत असलेले विविध एच.टी. पंपींग स्टेशन चालविणे, देखभाल व दुरुस्ती करणेकामीच्या प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मंजुरी देणे.

---

काही सदस्य :–पास–पास...... एक महिन्याची मुदतवाढ देवुन हा विषय पारीत केला जावा.

श्री. माधव जवांदे, शहर अभियंताः–वरील विषय क्र. ८ व विषय क्र. ९ बाबतच्या कामाची निविदा प्रक्रिया एक महिन्यात पुर्ण करायची असल्यास आठ दिवसाची अल्प कालावधीची निविदा मागवावी लागेल.

काही सदस्य :–होय, मान्य आहे.

सभापती, श्री. लाल पंजाबीः–सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ९ :–** उल्हासनगर महापालिकेच्या ''टप्पा–१'' अंतर्गत असलेले विविध एच.टी. पंपींग स्टेशन चालविणे, देखभाल व दुरुस्ती करणेकामीच्या प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मंजुरी देणे.

प्रस्तावना

उल्हासनगर शहरात पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेसाठी ''टप्पा–१'' अंतर्गत उभारण्यात आलेली विविध एच. टी. पंपिग स्टेशन बारा महिन्याच्या कालावधीकरीता कंत्राटी पध्दतीने चालविणे, देखभाल व दुरुस्ती करणे हे काम ठेकेदार मे. कल्पतरु इंजिनिअर्स, मुंबई यांना वार्षिक ठेकेदारी पध्दतीने देण्यात आलेले होते. सदर त्यांच्या कामाची मुदत संपुष्टात आलेली असुन, निविदेच्या अटी शर्तीनुसार पुढील निविदा होईपर्यंत त्याच दराने काम चालू ठेवणेत आलेले आहे.

म्हणून उपरोक्त कामासाठी पुढील बारा महिन्याच्या कालावधीकरीता रु. ७९,५७,०६९/— इतक्या रकमेचे अंदाजपत्रक तयार केले असुन, किमान वेतन अधिनियम (Min Wages Act.) नुसार सद्या ठाणे महानगरपालिकेकडे चालू असलेले मंजुर निविदेनुसार दर घेण्यात आलेले आहेत. त्यात अभियंता, पंपचालक, मदतनिस, जोडारी, विजतंत्री, व सुरक्षा रक्षकांची तरतुद केलेली आहे. तसेच देखभाल, दुरुस्तीसाठी लागणारे साहित्य महाराष्ट्र जीवन प्राधिकरण/सार्वजनिक बांधकाम विभाग च्या विद्युत/यांत्रिकी प्रचलित दरसुचीनुसार घेण्यात आलेले आहेत.

सदर खर्च सन २०११–१२ चे मंजुर तरतुद लेखाशिर्ष "B (Xiii) P-I" मधील मंजुर असलेल्या तरतुदी मधून निविदा मागवून करण्याचे प्रस्तावित आहे. तरी सदर प्रस्तावास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये निविदा मागवून काम करण्यासाठी तसेच ही प्रस्तावित निविदा अंतीम होईपर्यंत सद्या अस्तित्वातील निविदेच्या झालेल्या खर्चास व मुदतवाढीस मंजुरी मिळावी, हि विनंती.

सदर प्रस्ताव प्रशासकीस व वित्तीय मंजुरीसाठी मा. स्थायी समितीच्या पटलावर सादर करीत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ९ दिनांकः— २८/४/२०११

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :—श्री. बी.बी.मोरे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महापालिकेच्या ''टप्पा–१'' अंतर्गत असलेले विविध एच.टी. पंपींग स्टेशन चालविणे, देखभाल व दुरुस्ती करणेकामीच्या प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देत आहे. तसेच सध्या कार्यरत ठेकेदार मे. कल्पतरु इंजिनिअर्स, मुंबई यांना पुर्वीच्या करारातील अटी, शर्ती व निर्बंधावर निविदा होईपर्यंत एक महिन्याची मुदतवाढ देणेकामी आयुक्तांस त्यांच्याशी निविदा शिवाय थेट संविदा करण्यास प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. १० वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १०** :— पावसाळयापूर्वी प्रोक्लेन मशिनद्वारे लहान—मोठया नाल्यांची सफाई करणे व निघालेल्या गाळाची डंम्परद्वारे डंपिंग ग्राउंडवर वाहतूक करण्याकामी प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणे.

---

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—नाले साफ करुन जो कचरा काढला जातो तो रस्त्याच्या कडेलाच टाकला जातो तो उचलला जात नाही. त्यामुळे तो पुन्हा नाल्यामध्ये जातो.

**श्री. विनोद डवले, उप–आयुक्त, अतिक्रमणः–**नाले साफ करुन निघालेला कचरा गाळ उचलुन डंम्परद्वारे डंम्पींग ग्रउंड पर्यंत वाहतुक करणे व करीत असलेल्या कामाचे व्हिडीओ शुटींग फोटो काढण्याकामी ३४ लाख रुपये खर्चाचे प्राकलन तयार करण्यात आलेले आहे.

**सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–**रस्त्यावर टाकलेला कचरा उचलला नाही तर काय करणार? मागील वर्षी सुध्दा असेच झाले होते. आणि त्याचे परिणाम आम्ही भोगले आहे.

**श्री. माधव जवांदे, शहर अभियंताः–** एक आठवडयाचे अल्पमुदतीची निविदा सूचना काढु.

**सदस्य श्री. प्रशांत धांडे :–**उल्हास नाला ब–याचवर्षापासुन साफ होत नाही. तो नाला माझ्या प्रभागात येतो त्याच्याकडे लक्ष दिले जावे. याबाबत कालच श्री. केणे यांना बोललो आहे.

**सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–**नाले साफ करुन काढलेल्या गाळाचे, कच–याचे ढिग रस्त्यावर पडलेले असतात. आणि तो कचरा लोक उचलत नाहीत. यासाठी त्यांच्यावर दंडात्मक कारवाई केली पाहिजे.

**महापालिका सचिव :–**ती अट करारनाम्यामध्ये अंतर्भुत करावयास पाहिजे. ठरावामध्ये देणार नाही.

**काही सदस्य :–**पास–पास......

**सभापती, श्री. लाल पंजाबीः–**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑

**विषय क्र. १०** :– पावसाळयापूर्वी प्रोक्लेन मशिनद्वारे लहान–मोठया नाल्यांची सफाई करणे व निघालेल्या गाळाची डंम्परद्वारे डंपिंग ग्राउंडवर वाहतूक करण्याकामी प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणे.

**प्रस्तावना**

दरवर्षी प्रमाणे सुरु होणा–या मान्सूनपूर्वी शहरामधील मोठे व प्रमुख नाले यांची पोक्लन मशिनमार्फत खाजगी ठेकेदार नेमून नाला सफाई करणेत येते. यंदाही शहरातील मान्सून पूर्व नाला सफाई काम वेळेवर होणे अत्यावश्यक आहे.

पावसाळयात अतिवृष्टीमुळे पुराचे पाणी शहरातील खोलगट भागात साचु नये, पुरामुळे शहरातील नागरीकांची वित्तहानी व प्राण हानी होऊ नये, तसेच पावसाळयात रोगराई होऊ नये म्हणून महानगरपालिकेस दरवर्षी पावसाळयापूर्वी शहरातील लहान–मोठे नाल्यांची सफाईचे कामे चांगल्या प्रकारे करुन घ्यावी लागतात. पावसाळयापूर्वी शहरातील नाला सफाईचे काम हे अत्यंत जरुरीचे व जनहिताचे असल्यामुळे ते करुन घेणे आवश्यक आहे. दरवर्षी नाले सफाईची कामे चांगल्याप्रकारे करुन घेतल्यामुळे शहरात पावसामुळे जलजन्य स्थिती निर्माण होत नाही.

चालु वर्षी पावसाळयापूर्वी शहरातील सर्व छोटे,मोठे नाल्यांची सफाई पोक्लेन व जेसिबी मशिनद्वारे माहे एप्रिल, २०१० पासुन सुरु करणे आवश्यक आहे. व तसेच प्रभाग समिती क्र. १ ते ४ मधील नाले पोक्लेन मशीन व जेसीबी द्वारे सफाई करुन निघालेला कचरा/गाळ उचलून डंपरद्वारे वाहतूक डंपिंग ग्राउंडवर करणे व करीत असलेल्या कामाचे व्हीडीओ शुटींग व फोटो काढणे बाबतचे प्राकलन तयार करण्यात आलेले आहे. त्याबाबतचे प्राकलन कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग यांचे मार्फत प्राप्त झाले आहे. सदर प्राकलनानुसार नाले सफाईच्या कामास अंदाजे एकूण रु. ३४,१६,१५१/– ( चौतिस लाख सोळा हजार एकशे एक्कावन्न मात्र) खर्च अपेक्षित आहे.

या कामी येणारा खर्च **लेखाशिर्षक ड (iv) नाला व गटार सफाई खर्च** सन २०११–२०१२ अंदाज पत्रकात रुपये ८०,००,०००/– तरतुद करण्यात आलेली असून संपुर्ण तरतूश शिल्लक आहे त्यातून करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

तरी तिन प्रकारच्या पोक्लेन मशिन, जेसीबी व डंपरद्वारे ( Transportation with loading and unloading ) सदरचे नाले सफाई करण्यासाठी व निघालेला कचरा/गाळ डंपिंग ग्राउंडवर वाहतूकीच्या कामासाठी अभिकर्त्याची नेमणूक करण्यासाठी व तातडीने कामास सुरुवात करणे आवश्यक असल्याने अल्प मुदत निविदा सुचना प्रसिद्ध करण्यास मान्यता मिळावी.

सबब उक्त कामास व त्यासाठी तयार करण्यात आलेल्या अंदाजीत खर्चाच्या प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेसाठी व निविदा सुचना प्रसिध्द करण्यासाठी सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीसमोर मान्यतेसाठी सविनय सादर.

स्थायी समिती ठराव क्र. १० दिनांक:—२८/४/२०११

सुचकाचे नाव :— श्रीमती ज्योती माने

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती संगिता कंडारे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार पावसाळयापूर्वी प्रोक्लेन मशिनद्वारे लहान—मोठया नाल्यांची सफाई करणे व निघालेल्या गाळाची डंम्परद्वारे डंपिंग ग्राउंडवर वाहतूक करण्याकामी प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ११ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ११ :—** उल्हासनगर महानगरपालिकेसाठी ''बांधा वापरा व हस्तांतरीत करा'' तत्वावर स्वत:चा पाणी पुरवठयाचा स्त्रोत विकसित करणे व सुधारीत योजना राबविणे कामी संविदा करण्या प्रयोजनार्थ निविदेवर अंतिम निर्णय घेणे.

---

यावेळी विषय क्र ११ विषयी निविदा उल्लंकन समितीने तयार केलेली सविस्तर माहिती असलेली पुस्तिका सभागृहातील सर्व सन्मा. सदस्यांना प्रस्तुत करण्यात आली.

श्री. शरद वडजकर, निविदा समिती अध्यक्ष :— मा.सभापती महोदय,स्थायी समिती सर्व सन्माननिय सदस्य,सदस्या स्थायी समिती, मी शरद वडजकर निवृत — मुख्य अभियंता,मजीप्रा तथा अध्यक्ष निविदा मुल्याकंन समिती उल्हासनगर महानगरपालिका हया नात्याने आज रोजी विषय पटलावर असलेल्या पाणी पुरवठयाच्या बांधा वापरा व हस्तांतरीत करा हया निविदेच्या प्राप्त झालेल्या दराच्या अंनुषंगाने अत्यंत संक्षिप्त स्वरूपात सर्वकष माहिती सभागृहा पुढे ठेवण्याचा प्रयत्न करतो.
सर्व प्रथम मी सभागृहाला माझी वैयक्तिक माहिती सांगतो मी साधारणत:अडीच वर्षापूर्वी औरंगाबाद येथून निवृत झालो.
सध्यास्थितीत अशाच प्रकारच्या पाण्याच्या Project वर लातूर येथे LWSMC कंपनी मध्ये Adviser म्हणून दीड वर्षापासुन काम करतो.
तसेच महाराष्ट्र शासनाच्या गोदावरी Sub –basin च्या Project Report तयार करण्याच्या Team मध्ये Water Supply Consultant म्हणून २ वर्षापासुन काम करत आहे. डिसेंबर २०११ मध्ये सेवानिवृत्त झालो आहे.

सदस्य ॲड श्री. अनिल विदयार्थी :— या विषयाबाबत मार्गदर्शन कोण करेल?

श्री. शरद वडजकर, निविदा समिती अध्यक्ष :— उल्हासनगर महानगरपालिकेने दिनांक ७ जानेवारी २०११ रोजीच्या महासभेचा ठराव क्रमाक ६२ अन्वये सदरच्या निविदा मागविण्यास मंजुरी दिली.

त्या अनुषगाने निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आली त्यानुसार एकदंर १९ निविदा विकल्या गेल्या तथापी विहीत मुदूतीत फक्त ४ कंत्राटदारांनी निविदा सादर केल्या.

त्यापैकी एक कत्राटदार तात्रिक निकष टेंडर कंडिशन प्रमाणे पूर्ण करत नसल्या कारणाने त्या कंत्राटदाराचा Financial Bid चा Envelope उघडण्यात आला नाही.

अहर्ता प्राप्त ठरलेलया कंत्राटदाराचा Envelop क्रं २ दिनांक २९/०३/२०११ रोजी उघडण्यात आले त्यानुसार खालील प्रमाणे पाणी दर प्राप्त झालेले आहेत.

१.में. इगल कन्ट्रक्शन कंपनी — ११= ०७/ हजार लि

२.में. कोणर्क वाबॅग कंपनी — ९= ३६/ हजार लि.

३. में.नागार्जूना कन्ट्रक्शन कंपनी — १०=२५/ हजार लि.

प्राप्त झालेल्या सर्वात कमी दराच्या कंत्राटदारास म्हणजे में. कोणार्क हयाना त्यापेक्षा दर कमी करण्या बाबत पत्र दिले त्यानुसार त्यांनी ९=२७/ हजार लिटर ऐवढा दर अंतिमत: दिलेल्या आहे.

कोनार्क कंपनीने काम करण्यासाठी १३५ कोटी एवढा खर्च दाखवलेला आहे तर योजना Maintain करण्याचा खर्च २२ कोटी ८२ लाख एवढा दर्शविलेला आहे.

सदर बाबतीत निविदा समितीने सखोल अभ्यास केला.

प्रत्यक्ष कामाची व्याप्ती लक्षात घेउन २०१०—११ च्या दरसुची प्रमाणे अंदाजपत्रक सुधारीत करण्यात आले त्याची किंमत १२७.८० कोटी एव्हढी येते.

सदरची योजना महापालिकेत स्वत: Maintain करावयाचे गृहित धरले तर त्यावर अंदाजे २८.७ कोटी एवढा खर्च करावा लागेल व ...

त्यानुसार येणारा हजार लिटर पाण्याच्या दर रु. १२=२० पै. एवढा येतो. हा दर कसा येतो? जे निकष शासन मॅन्युअलमध्ये आहे ते लक्षात घेता सदरची योजना महापालिकेने स्वत: चालवायची गृहित धरले तर अंदाजे २८.७ कोटी एवढा खर्च करावा लागेल.

आज रोजी महापालिका ७ रू दराने MIDC कडून पाणी विकत घेते सदर पाणी ग्राहकापर्यत पोहंचविण्यास Distribution वर ३=१२ एवढा खर्च होतो. म्हणजेच आज ग्राहकांच्या दारापर्यत जाण्यासाठी पाण्यावर महापालिकेस १०=१२ /हजार लि एवढा खर्च होत आहे. आपण तुलनात्मक आणखी अभ्यास करणे आवश्यक आहे. एमआयडीसी ७ रुपये दराने पाणी देते ते नेहमीच देईल असे गृहित धरुन एमआयडीसी ९.५ ते १० टक्के वाढ करते. या ट्रेंन्डने वाढीव पाण्याचे नियोजन करण्याचे झाले तर २०१३—१४ मध्ये एमआयडीसीकडुन १२० एमएलडी पाणी घेवुन ३० वर्षात ते १९५ एमएलडी होणार वाढीव मागणीची त्यांच्याकडे क्षमता नाही त्यामुळे ती पुर्ण होणार नाही. वाढीव मागणीचा विचार करता २०१३—१४ साठी वाढीव दर ८ रुपये ४६ पैसे होईल. आज पाणी ग्राहकांपर्यंत पोहचविण्यासाठी ड्रिस्ट्रीब्युशनवर ३ रुपये १२ पैसैचा खर्च येतो. या हिशोबाने भविष्यात ८.४६ व ३.१२ याची बेरीज केल्यास ११ रुपये १८ पैसे येईल. एमजेपीचे ०९ रुपये ९९ पैसे होईल. लातुरला २०१३—१४ ला हा खर्च येईल ११ रुपये १५ पैसे. सध्याच्या दराप्रमाणे ७ रुपये ०० पैसे अधिक ३.५२ महापालिकेने खर्च केला तर १० रुपये १२ पैसे एवढा खर्च पडतो. जेएनएनयुआरएम चे काम पुर्ण झाल्यानंतर बल्क स्वरुपातील पाण्याचा खर्च ६रुपये ७० पैसे प्रत्येक हजार लिटर होईल आणि २ रुपये ५७ पैसे डिस्ट्रीब्युशनवर खर्च होईल. आपल्या येथे जेएनएनयुआरएमची स्किम चालु आहे. २३ बुस्टर पंप बंद होणार आहे. त्यातील १८ कायम स्वरुपी बंद होवुन

पाच बुस्टर पंप चालु राहतील. या १८ पंपावर होणारा विजेचा खर्च कमी होईल. पाण्याचा दर कसा काढायचा ते धोरण आहे.

अ) १) भांडवली खर्च — 18 %
   २) व्याज — 22 %
   एकुण 40 %

| | | |
|---|---|---|
| 1)Energy Charges | _ | 24.00 % |
| 2)Chemicals | _ | 8.50 % |
| 3)Establisment | _ | 12.00% |
| 4)Raw Water | _ | 5.00% |
| 5)M &R and Suadries | _ | 10.5% |
| एकुण | — | 60% |
| एकुण | — | 100% |

निविदेमध्ये वर्कआउट केलेला पाण्याचा दर एमआयडीसीशी तुलना करुन केलेला आहे. २०१३—१४ मध्ये वितरण व्यवस्थेमध्ये ३.१२ खर्च होईल. कंत्राटदराचा दर मान्य केला तर ४ कोटी ६४ लाख बचत होणार आहे. ३० वर्षात ६०० कोटी होईल. ३० वर्षानंतर ही सर्व मिळकत आपल्या मालकीची होईल. म्हणुन हा सर्व प्रकल्प मान्य करण्यास हरकत नाही. घरगुती व दारिद्रय रेषेखालील ग्रहकांच्या पाण्याच्या दरात वाढ होणार नाही. दारिद्रय रेषेखालील लोकांना आहे त्याच दरात पाणी पुरवठा होईल. तथानी बिगरघरगुती (व्यवसायीक) ग्राहकांच्या पाण्याच्या दरात किरकोळ वाढ होवु शकते. पाणी पट्टी वसुलीमध्ये सुधारणा करावी लागेल.

अशा प्रकारे प्राप्त निविदा धारंकाचा दर Workout केला असता Bulk Water चा दर हा ६ = ७० येतो.

सध्या JNNURM चे अंतर्गत वितरण व्यवस्था व अतिरिक्त टाक्या बांधण्याचे काम शहरामध्ये प्रगतीपथावर आहे.शहरामध्ये कार्यरत असलेल्या एकंदर २३ Boosters पैकी १८ Booster stations ची गरज भासणार नाही व उर्वरीत ५ चा Booster stations चालू ठेवावी लागतील.

त्यामुळे Booster Pumping stations वर विज बिलामध्ये व कर्मचारी वर्गावर होणारा सध्य स्थितीतील खर्चा मध्ये बचत होणार आहे.

अशा प्रकारे २०१३—१४ सालामध्ये JNNURM चे काम पूर्ण झाल्यानंतर वितरण व्यवस्थेवर होणारा ३=५२ च्या ऐवजी २=५७ एव्हढाच खर्च होणार आहे.

कंत्राटदाराच्या दरामधुन म्हणजे ९=२७ मधून वितरण व्यवस्थेचा खर्च २=५७ वजा केला तर बाकी ६=७० Bulk Supply चा दर येतो जो की MIDC च्या ७=०० शी तुलना केली असता कमी आहे.

अशा परिस्थिती मध्ये मा स्थायी समितीने जर सदरच्या कंत्राटदाराचा दर मान्य केला तर त्यामुळे महापालिकेला वितरण व्यवस्थेवर होणा—या अंदाजे ४.६४ कोटी एव्हढया रकमेची भविष्यात बचत होणार आहे व ३० वर्षानंतर आजच्या अंदाजे १३५ कोटीच्या कामाची मालकी जी की अंदाजे ६०० कोटीची होईल त्याची मालकी महापालिकेकडे येणार आहे.

त्याचे प्रमाणे हा दर मंजुर केला तर झोपडीधारक,घरगुती नळ धारकांच्या पाणी पटटीमध्ये अजिबात वाढ करावी लागणार नाही. नाममात्र वाढ Commercial व Industerial च्याा पाणी

दरामध्ये करावी लागणार आहे व ती त्यानां सुसहय अशीच राहणार आहे. म्हणजेच सदयाच्या २४=०० ऐवजी ३१=००असा दर असेल.

सबब जनतेवर जादाचा अर्थिक भार न लादता महापालिका १३५ कोटीच्या मालमतेची मालक होणार असून जनते मध्ये देखील असंतोष पसरणार नाही.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—आता आपल्याकडे जेएनएनयुआरएम अंतर्गत जलवाहिनी टाकली जात आहे. ही योजना कार्यान्वीत झाल्यानंतर जलवाहिनी टाकवी लागली तर ती कोण टाकेल.

श्री. शरद वडजकर, निविदा समिती अध्यक्ष :—निश्चितपणे ठेकेदार.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—पाण्याचे दर कोण निश्चित करेल?

श्री. शरद वडजकर, निविदा समिती अध्यक्ष :—महापालिका.

सदस्य ॲड श्री. अनिल विद्यार्थी :—पाण्याचे दर हेच राहतील की कमी जास्त होतील?

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—जे जलशुध्दीकरण बांधले जाईल त्याची मालकी कुणाची असेल?

श्री. शरद वडजकर, निविदा समिती अध्यक्ष :—महापालिकेची.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—महापालिकेकडुन पैसे देण्यामध्ये काही अडचण आली किंवा विलंब झाला तर ठेकेदाराकडुन शहरवाशियांचा पाणी पुरवठा बंद होता कामा नये.

श्री. शरद वडजकर, निविदा समिती अध्यक्ष :—एक वर्षापर्यंत पैसे भरु शकलो नाही तर पाणी पुरवठा बंद होणार नाही.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—ही योजना हाती घेण्यापुर्वी जुलै २०१० पर्यंतची महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची पाणी देयकापोटी व विलंब शुल्कापोटी असलेली रुपये १७३.५७ कोटीची थकबाकी कशी अदा केली जाईल?

श्री. शरद वडजकर, निविदा समिती अध्यक्ष :—शासनाकडे जावुन ही रक्कम माफ करुन आणावी लागेल. किंवा काही उपाययोजना करावी लागेल.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :—तो विषय वेगळा आहे आणि हा विषय वेगळा आहे.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—रॉ वॉटरचे पैसे कोण देईल?

श्री. शरद वडजकर, निविदा समिती अध्यक्ष :—ठेकेदार देईल.

सदस्य श्री. धनंजय बोडारे :—पुरवणीमध्ये लिहिले आहे की आज रोजी महापालिका ७ रुपये दराने एमआयडीसीकडुन पाणी विकत घेते. पाणी ग्राहकपर्यंत पोहाचविण्यासाठी येणारा खर्च ३ रुपये १२ पैसे एवढा खर्च होतो. म्हणजेच आज ग्राहकांच्या दारापर्यंत जाण्यासाठी पाण्यावर महापालिकेस एकुण १० रुपये १२ पैसे प्रति हजार लिटर साठी खर्च येत आहे. त्यामध्ये दरवर्षी किती वाढ होईल.

<u>श्री. शरद वडजकर, निविदा समिती अध्यक्ष :–</u>साधारणत: २.५ टक्के.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>२०१३–१४ ला एमआयडीसीपेक्षा ३० पैसे कमी. २०३१ मध्ये किती होईल आणि २०४१ मध्ये किती होईल? सर्व खर्चासह हा खर्च किती होईल?

<u>श्री. शरद वडजकर, निविदा समिती अध्यक्ष :–</u>फिनिशींग रेट व फिक्स रेट......... एक्क्ट्रा पैसे दयावे लागते.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>ईस्टॅब्लिसमेंट किती असेल? ॲन्थोनीला काही नाही. आपली काही नियंत्रण असेल की नाही?

<u>श्री. शरद वडजकर, निविदा समिती अध्यक्ष :–</u>महापालिकेचे पुर्णपणे १०० टक्के नियंत्रण असेल.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>काम होत नाही. किंवा झाले नाही तर त्याच्यावर कारवाई काय? यासाठी त्यांच्याकडे किती कर्मचारी असले पाहिजेत? व २०४१ मध्ये आपला पाण्याचा दर किती असेल?आणि मशिनरीची स्थिती काय असणार आहे?

<u>श्री. शरद वडजकर, निविदा समिती अध्यक्ष :–</u>योजना चालु झाल्यानंतर प्रत्येक पंधरा वर्षानंतर मशिनरी बदलायची आहे व निविदा कालावधी पुर्ण होतांना परत नविन मशिनरी बसवायची आहे. म्हणजेच ही योजना आपणाकडे हस्तांतरीत होतांना आपणांस नविन मशिनरी बसवुन दिल्या जातील.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :–</u>याची इतिवृत्तात नोंद येवु दया.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>ईस्टाब्लिशमध्ये काय काय असेल?

<u>श्री. माधव जवांदे, शहर अभियंता:–</u>कमीत कमी किती कर्मचारी असले पाहिजे जसे की, *वॉटर जनरेशन स्टॉफ* कार्यकारी अभियंता १, सुपरीटेंडेंट ॲसीटंट २, कनिष्ठ अभियंता ४, ऑपरेटर १२, हेल्पर १२, इलेक्ट्रीशन ४, मॅकनिकल ४, इलेक्ट्रकल हेल्पर ४, वॉचमन १२, बंदुकधारी १२,सॅम्पल घेणारे....., प्रिंटर ऑपरेटर ४, सफाई कामगार ४, मोबाईल व्हॅन व इतर *ड्रिस्ट्रीब्युशन स्टाफ.*

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>२०३१ मधील पाण्याचा दर काय असेल? अंदाजे २.०५ टक्के वाढ गृहित धरुन सन २०४२–४३ मध्ये १९ रुपये १९ पैसे असा दर असेल ना?

<u>श्री. शरद वडजकर, निविदा समिती अध्यक्ष :–</u> मागील २० वर्षाची आकडेवारी आम्ही काढली आहे. त्याचा ट्रेंन्ड पाहिला तर त्याप्रमाणे पाण्याचे दर वाढतील अशी अपेक्षा आहे.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>गोषवा–यामध्ये शेवटी शेवटी तुम्ही जे लिहिले आहे ते बघा. तुम्ही शिफारस काही केलेली नाही. शेवटच्या परिच्छेदात लिहिले आहे. सदर योजने अंतर्गत होणा–या पाणी पुरवठयाचे दर एकत्रित वितरण व्यवस्थेच्या (एकत्रित वितरण व्यवस्थेच्या खर्चासहित)महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या पाणी दरापेक्षा कमी असतील याबाबत सविस्तर चर्चा करुन अंतिम निर्णय होणे आवश्यक आहे. असे म्हटले आहे. स्पष्टपणे शिफारस आहे असे लिहिले नाही त्यामुळे यामध्ये तुम्हांला काही शंका आहे काय?

<u>श्री. शरद वडजकर, निविदा समिती अध्यक्ष :–</u>ते मी तर दर कमी आहेत हे म्हटलेच आहे.

श्री. माधव जवांदे, शहर अभियंता:—गोषवा—यामध्ये लिहिले आहे की, पाण्याचे दर हे एमआयडीसी व एमजीपीसी तुलना केली तरी कमीच आहे.

सदस्य श्री. धनंजय बोडारे :—आयुक्तांकडे किंवा लेखा विभागाकडे जेव्हा तुम्ही एखादे प्रकरण पाठवितात तेव्हा स्पष्टपणे शिफारस आहे असे लिहितात. मग येथे याबाबत सविस्तर चर्चा होवुन अंतिम निर्णय होणे आवश्यक आहे असे का लिहिता? शिफारस आहे असे का लिहिले नाही.

श्री. माधव जवांदे, शहर अभियंता:—समजा २०१३—१४ मध्ये पाणी पुरवठा दरामध्ये एमआयडीसीने कोणतीही वाढ केली नाही तर त्यावेळचे ठेकेदाराचे दर कमीच असतील.

सदस्य श्री. धनंजय बोडारे :—भविष्यामध्ये जर कोठे जलवाहिनी टाकायची झाली तर तो सर्व खर्च धरुन पाणी पुरवठयाचा ठेकेदाराचा दर भविष्यातील दर काय असेल? फक्त बिलींग आपणाकडे राहिल असेच ना?

श्री. माधव जवांदे, शहर अभियंता:—बिल वसुलीचे अधिकार पुर्णपणे महापालिकेचे असतील.
श्री. शरद वडजकर, निविदा समिती अध्यक्ष :—जेएनएनयुआरएमची योजना पुर्ण झाल्यानंतर २३ कोटींचे दर ॲड करु शकतो. म्हणजे ज्याचा पाण्याचा वापर कमी असेल त्यांना दर कमी असेल. व ज्यांचा वापर जास्त असेल त्यांना पाण्याचा दर जास्त असेल. १० हजार पाचशे लिटर पाण्यासाठी वेगळा दर असेल व त्यापुढील पाणी वापरासाठी वेगळा दर असेल.

सदस्य श्री. धनंजय बोडारे:— ते प्रशासनाचे काम आहे.

महापालिका सचिव :—गोषवारानुसार निविदा व्यतिरिक्त महामंडळाची पाणी देयकापोटी रुपये १७३.५७ कोटीची थकबाकी अदा करणे, जमिन संपदान करणे व इतर बाबींचा विचार करुन निर्णय घेणे गरजेचे आहे. त्याबाबत आपणांस ठरवायचे आहे.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—माझ्याकडे ठरावाचा लेखी मजकुर आहे. त्याची मी सूचना देतो व श्री.बी. बी. मोरे यांचे त्यास अनुमोदन आहे ते सभासदांना वाचुन दाखविणार.

सदस्य श्री.बी.बी. मोरे :—या विषयाकामी करण्यात येणारा ठराव याप्रमाणे असेल. आपणा सर्वांच्या माहितीसाठी मी तो वाचुन दाखवितो.

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणांमुळे उल्हासनगर महानगरपालिकेसाठी ''बांधा वापरा व हस्तांतरीत करा'' तत्वावर स्वत:चा पाणी पुरवठयाचा स्त्रोत विकसित करणे व सुधारीत योजना राबविणे कामी मे. कोनार्क वाबॅग जे.व्ही. कन्साटीयम यांनी सुचविलेल्या दराने त्यांच्याशी संविदेस तसेच निविदा व्यतिरिक्त इतर बाबी प्रशासनास सक्षम प्राधिकाराच्या मंजुरीने उपाययोजना करण्यास निर्देशित करीत आहे.

सदस्य ॲड. श्री. अनिल विद्यार्थी :—पाणी दरांबाबत मी समाधानी नाही. मी अगोदरच सांगितले होते मी या प्रस्तावाशी समर्थन करु इच्छित नाही.

सभापती, श्री. लाल पंजाबी :—आपला विरोध असेल तर मग याबाबत मतदान घ्यावे लागेल.

सदस्य अड श्री. अनिल विद्यार्थी :—मी या प्रस्तावाबाबत तटस्थ राहु इच्छितो. पाणी दराबाबतीत आमचे समाधान होत नसल्यामुळे आम्ही सभात्याग करत आहोत.

यावेळी सदस्य श्री. अनिल विदयार्थी, श्रीमती संगिता कंडारे व श्रीमती सरोजिनी टेकचदांनी हे सभागृहातुन बाहेर गेले.

काही सदस्य :—पास—पास......

सभापती, श्री. लाल पंजाबी:—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑

**विषय क्र. ११** :— उल्हासनगर महानगरपालिकेसाठी ''बांधा वापरा व हस्तांतरीत करा'' तत्वावर स्वत:चा पाणी पुरवठयाचा स्त्रोत विकसित करणे व सुधारीत योजना राबविणे कामी संविदा करण्या प्रयोजनार्थ निविदेवर अंतिम निर्णय घेणे.

प्रस्तावना

उल्हासनगर शहराच्या पाणी पुरवठा व्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी तसेच पाणी पुरवठया बाबत स्वयंपूर्ण होण्याच्या दृष्टीने उपाय योजना राबविण्याकरिता महापालिकेने मे २००३ मध्ये श्वेतपत्रिका प्रसिध्द केली आहे. सदर श्वेतपत्रिकेनुसार शहराच्या पाणी पुरवठा समस्येबाबत अल्पकालीन व दीर्घकालीन उपाय योजना राबविण्याचे धोरण निश्चित करण्यात आले आहे.

महासभेचे निर्णय :—

१) पाणी पुरवठा व मलनि:सारण क्षेत्रात कार्यक्षमता व गुंतवणुक वाढविण्यासाठी खाजगी संस्थाचा सहभाग करणेसाठी महासभेने ठराव क्रं. ९६ दि. २८/१/२००३ अन्वये निर्णय घेतलेला आहे. याचा उद्देश पाणीपुरवठा योजनेत कार्यक्षम व्यवस्थापन निर्माण करणे हा आहे.

२) महानगरपालिकेचे आर्थिक दायित्व, भांडवली खर्च, कर्जाची परतफेड या बाबी लक्षात घेता मा. महासभेमार्फत ठराव क्रं. २८, दि. ७/८/२००४ अन्वये स्वत:चा स्त्रोत विकसीत करण्यासाठी सवलत कराराच्या आधारावर निविदा मागविण्याच्या प्रस्तावास मंजूरी देण्यात आली.

३) निविदा प्रक्रिया :—

त्यानंतर योजना सवलत कराराच्या आधारावर म्हणजेच ''बांधा वापरा व हस्तांतर करा'' या तत्वावर राबवणे करीता दिनांक २२/१०/०४ रोजी जाहिर सूचना वर्तमानपत्रात प्रसिध्द केल्या व निविदा मागविण्यात आल्या होत्या.

४) विशेष महासभा ठराव क्र. १७ दिनांक २०/०९/२००६ अन्वये खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आलेला आहे. ही महासभा विशेष महासभा ठराव क्र. २८ दिनांक ०७/०८/२००४ रद्द करीत असुन, पाणी योजनेचे खाजगीकरण न करता पाणी पुरवठा महानगरपालिकेच्या माध्यमातुन जास्तीत जास्त सुधारणा करून नागरीकांची सेवा चालू ठेवण्यास प्रस्तावीत करीत आहे.

स्थायी समितीचा निर्णय :—

मे प्रतिभा इंडस्ट्रीज यांच्या न्युनतम दराच्या निविदेस मा. स्थायी समितीचा ठराव क्र. ६७ दि. ०८/१२/२००६ नुसार मान्यता देण्यात आली. त्यानंतर महानगरपालिकेचे पत्र क्र. १४८ दि. १२/१२/२००६ नुसार निविदा धारकास निविदा स्वीकृतीबाबत कळविण्यात आले होते.

न्याय प्रविष्ट बाब :—

सदर मे. प्रतिभा इंडस्ट्रीज यांना निविदा स्वीकृतीचे पत्र दिल्यावर वरील तीन निविदा धारकापैकी तांत्रिक अहवालानुसार अपात्र ठरलेले निविदा धारक मे. गॅमन इंडिया लिमिटेड यांनी महानगरपालिकेविरुध्द दावा क्र. ६३५ सन २००७ नुसार मा. उच्च न्यायालयात दावा दाखल केला सदर मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार निविदा प्रक्रीयेला आहे त्या स्थितीत थांबा (ज़ल) देण्यात आला व त्यामुळे कामाचे करारनामे करता आले नाहीत. सदर प्रकरण जानेवारी २००७ पासुन न्यायप्रविष्ट होते.

मा. उच्च न्यायालयात दिवाणी अर्ज दाखल करणे :—

प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे महानगरपालिकेचे होत असलेले नुकसान लक्षात घेता, मा. उच्चन्यायालयाकडे दिवाणी अर्ज दाखल करून योग्य न्याय मागणे आवश्यक होते. या संदर्भात महानगरपालिकेमार्फत, उच्च न्यायालयाचे वकील श्री. एल. एम. आचार्य यांची नियुक्ती करण्यात आली. श्री. एल. एम. आचार्य यांच्या मते उच्च न्यायालयात सिव्हील अप्लीकेशन दाखला करणे पूर्वी मा. स्थायी समितीतर्फे निविदा मंजुरी संदर्भात घेण्यात आलेला निर्णय रद्द करणे आवश्यक आहे.

स्थायी समितीचा निर्णय :—

मुळ प्रस्तावातील तांत्रिक बाबी बघता प्रस्ताव रद्द करणे गरजेचे असल्यामुळे मा. स्थायी समितीचा ठराव क्रं. १०७, दि. १४/१२/२०१० नुसार खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला.

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेस नमुद केलेल्या कारणामुळे दि. ८/१२/२००६ चे स्थायी समितीचे ठराव क्रं. ६७ अन्वये मंजूर केलेली निविदा प्रक्रिया रद्द करणे व उल्हासनगर महानगरपालिकेचा स्वत:चा पाण्याचा स्त्रोत ''बांधा वापरा व हस्तांतरण करा'' या तत्वावरील विकसीत करणे कामी, मुबई उच्च न्यायालयातील याचीका क्रं. ६३५ /२००७ निकाली काढण्या प्रयोजनार्थ महानगरपालिकेमार्फत दिवाणी अर्ज दाखल करण्यात मान्यता देत आहे.

दिवाणी अर्ज व निर्णय:—

उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत दावा क्र. ६३५ सन २००७ नुसार मा. उच्च न्यायालयात सिव्हील ॲप्लीकेशन क्रं. ३१२६ सन २०१० नुसार दावा दाखल केला. या दाव्यावर मा. उच्च न्यायालयात दि. २१/१२/२०१० रोजी सुनावणी झाली सुनावणीत मा. उच्च न्यायालयामार्फत वर नमुद निविदा प्रक्रिया रद्द करणेबाबत व या कामी नविन निविदा मागविणेबाबत आदेश देण्यात आले तसेच मा. उच्चा न्यायालयातील दावा क्रं. ६३५/२००७ निकाली काढण्याचे आदेश देण्यात आले.

महासभेचे निर्णय :—

मा. महासभेमार्फत ठराव क्रं. ६२, दि. ७/१/२०११ अन्वये सवलत करार तत्वावर ठरावातील अटी शर्तीस अधिन राहुन निविदा मागविणेस मंजूरी देण्यात आली.

निविदा प्रक्रिया :—

त्यानंतर योजना ''बांधा वापरा व हस्तांतरीत करा '' या तत्वावर राबवणे करीता दिनांक २१/०१/२०११ रोजी जाहिर सूचना प्रसारित करून निविदा मागविण्यात आल्या.कोरे निविदा संच विक्रीचा कालावधी दिनांक २१/०१/२०११ त ०४/०२/२०११पर्यत होता. मूळ निविदा सुचनेनुसार निविदा सादर करण्याची अंतिम तारीख दिनांक १९/०२/२०११ होती. त्यास प्रतिसाद म्हणून खालील एकूण १६ निविदाधारकांनी कोरे निविदा संच विकत घेतले आहेत.

१.में. एस.आर.प्रोजेक्ट (इंडिया) ली. मुंबई.
२.में. कोनार्क इन्फ्रारास्ट्रक्चर ली. उल्हासनगर.
३.में.गॅमन इंडिया ली.मुंबई.
४.में.तेजस कॅन्स्टक्शन अन्ड इन्फ्रा प्रा.लि.पुणे.
५.में.पी.बी.अे. इन्फ्रारास्ट्रक्चर लि.मुंबई.
६.मे.युनिटी इन्फ्रा प्रोजेक्ट लि.मुंबई.
७में.लेन्को इन्फ्रारास्ट्रक्चर लि.गुरगांव.
८.में.प्रतिभा इन्डस्ट्रीज लि.मुंबई.
९.में.एस.एम.सी. इन्फ्रारास्ट्रक्चर प्रा.लि.ठाणे.
१०.में. जिंदाल मंणिला वॉटर डेव्हपमेन्ट ॲथरिटी दिल्ली.
११.में. नागार्जुना कॅन्स्टक्शन कंपनी हैद्राबाद.
१२.में.एस.पी.एम.एल इन्फ्रा लि. मुंबई.
१३.में.वाटेक वाबॅग लि. चेन्नई.

१४.मे.हिदुस्थान कॅन्स्टक्शन कंपनी लि मुंबई.
१५.मे.जे.एस.पी. प्राज इन्फ्रारास्ट्रक्चर लि.मुंबई.
१६.में.रामकी इन्फ्रारास्ट्रक्चर लि. मुंबई.

निविदाधांरकांच्या संभाव्य प्रश्नाना उत्तरे देणे व शंकाचे समाधान करण्यासाठी दिनांक ११/०२/२०११ रोजी निविदा पूर्व बैठक बोलविण्यात आली होती. सदर निविदापूर्वक बैठक निविदा समितीचे अध्यक्ष श्री आनंद देवधर सेवानिवृत जलअभियंता बृहन मुंबई महानगरपालिका, यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. बैठकीस एकुण १६ निविदा धारकांपैकी १३ निविदाधारकांचे प्रतिनिधी हजर होते. निविदापूर्व बैठकीत निविदाधांरकाच्या मुददयाचे स्पष्टीकरण व शंकाचे निरसन करण्यात आले व त्यांना सदर मुददे लेखी स्वरूपात कळविण्यात येतील असे सांगण्यात आले.

निविदाधारकांनी निविदापूर्व बैठकीत निविदा अर्हते बाबत मुददयावर चर्चा करण्यात आली तसेच निविदा समितीने यावर विचार केला असता उपस्थित केलेल्या विविध मुदयांपैकी काही मुददे निविदा अर्हता विषयक होते सदर मुळ अटी मा. महासभेने ठरवून दिलेल्या असल्यामुळे, अर्हता विषयक अटी सबंधी पुर्नविचार करण्याचे अधिकार मा.महासभेसच असल्याने निविदाधारकां मार्फत उपस्थित मुददे मा. महासभेच्या विचारार्थ सादर करण्यात आले.

मा. महासभेमार्फत ठराव क्रं. ७०, दि. ०८/३/२०११ अन्वये ठरावातील सुधारीत अटी शर्तीस अधिन राहुन मंजूरी देण्यात आली.

त्या अनुषगाने सर्व निविदाधांरकांना पूर्व अर्हता बैठकीतील मुददयाच्या पुर्तते बरोबर दिनांक १०/०३/२०११ पत्रानुसार सुधारीत अटी कळविण्यात आल्या.

सदर वरील कामांच्या अटीत सुधारणा करण्यात आलेली असल्याने योजनेस अधिक चांगला प्रतिसाद मिळण्याच्या दृष्टीने निविदेस प्रसिध्दी देवून निविदा विक्रीचा कालावधी दिनांक १०/०३/२०११ पासुन दिनांक १४/०३/२०११ पर्यत ठेवण्यात आला. निविदा ईसारा रक्कम भरण्याची अंतिम दिनांक १५/०३/२०११ होती. तर निविदा सादर करण्याचा दिनांक १८/०३/२०११ असा ठेवण्यात आला होता.

वाढीव कालावधीत खालील अतिरिक्त निविदा धांरकांनी निविदा खरेदी केल्या.

१.में.ईगल कॅन्स्टक्शन कंपनी जे.व्ही.

२.में.चेतक उदयपुर

३.में.वेलीस्पुन मुंबई.

अशा प्रकारे वरील १६ अधिक ३ अशा एकुण १९ निविदा धांरकानी निविदा खरेदी केल्या आहेत. निविदा ईसारा रक्कम खालील ४ निविदाधांरकांनी महापालिकेत दिनांक १५/०३/२०११ रोजी विविध स्वरूपात जमा केली आहे.

१.में.रामकी इन्फ्रारास्ट्रक्चर लि. मुंबई.
२.में.ईगल कॅन्स्टक्शन कंपनी जे.व्ही.

३.में. कोनार्क वाबॅग जे.व्ही.कन्साटीयम
४.में.नागार्जुना कॅन्स्टक्शन कंपनी हैद्राबाद.

निविदा सादर करण्याची अंतिम तारीख १८/०३/२०११ होती त्यानुसार खालील चार निविदाधांरकांनी त्याच्या निविदा सादर केल्या आहेत.
१.में.रामकी इन्फ्रारास्ट्रक्चर लि. मुंबई.
२.में.ईगल कॅन्स्टक्शन कंपनी जे.व्ही.

३.में. कोनार्क वाबॅग जे.व्ही कन्साटीयम
४.में. नागार्जुना कॅन्स्टक्शन कंपनी हैद्राबाद.

निविदेतील तांत्रिक व अर्थिक बाबीची तपासणी करण्यासाठी महानगरपालिके मार्फत या कामाकरीता स्वतंत्र निविदा समिती गठीत करण्यात आलेली आहे.

वरील प्रमाणे प्राप्त निविदाचा लिफाफा क्रंमाक १ दिनांक १८/०३/२०११ रोजी निविदासंमिती मार्फत उघण्यात आला. व निविदासमिती मार्फत तांत्रिक लिफाफयामधील कागद पत्राची छानंनी निविदेतील अटी व

शर्तीच्या अधिन राहून करण्यात आली. सोबत तांत्रिक लिफाफा छाननी अहवाल जोडला आहे. छाननी अहवालाच्या निर्ष्कशा नुसार खालील निविदाधारंकांनी आवश्यक कागदपत्राची पूर्तता करण्यात आली असुन ते निविदाधारंक निविदासमितीच्या अहवाला नुसार अर्हता प्राप्त ठरलेली आहेत.

१.मे.ईगल कॅन्स्टक्शन कंपनी जे.व्ही

२.मे. कोनार्क वाबॅग जे.व्ही.कन्साटीयम

३.मे. नागार्जुना कॅन्स्टक्शन कंपनी हैद्राबाद.

निविदा सादर केलेल्या निविदाधारंकापैकी मे.रामकी इन्फ्रारास्ट्रक्चर लि. मुंबई. यांनी कागदपत्राची पूर्तता केलेली नसल्याने ते अर्हता प्राप्त ठरू शकलेले नाहीत. त्यामुळे सदर निविदाधारंकांचा लिफाफा क्रमाक २ उघडयात आला नाही.

अर्हता प्राप्त ठरलेल्या उपरोक्त ३ निविदाधारंकांचा लिफाफा क्रंमाक २ उघडण्या बाबत सविस्तर अहवाल दिनांक २९/०३ /२०११ रोजी मा.आयुक्त उमपा यांना सादर करण्यात आला व त्यांच्या कडून प्रस्तावास मंजुरी मिळाल्यावर अर्हता प्राप्त ३ निविदाधारंकांचा लिफाफा क्रमाक २ (Price offer) दिनांक ३१/०३/२०११ रोजी उघडण्यात आला. सदर तीन निविदाधारंकांनी सादर केलेले प्रति हजार लिटर पाण्याचे दर खालील प्रमाणे.

| अ.क्रं. | निविदा धांरकाचें नांव | सादर केलेले पाण्याचे दर |
|---|---|---|
| १ | मे.ईगल कॅन्स्टक्शन कंपनी जे.व्ही | रू. ११.०७ प्रति हजार लि. |
| २ | मे. कोनार्क वाबॅग जे.व्ही.ली कन्साटीयम | रू. ०९.३६ प्रति हजार लि. |
| ३ | मे.नागार्जुना कॅन्स्टक्शन कंपनी हैद्राबाद | रू. १०.२५ प्रति हजार लि. |

वरील अर्हता प्राप्त निविदाधारंकांन पैकी मे. कोनार्क वाबॅग जे.व्ही.ली. उल्हासनगर यांचा पाण्याचा दर रू.०९.३६ प्रति हजार लि. हा तीन निविदाधारंकांन पैकी न्यूनतम दर आहे.

मे.कोनार्क वाबॅग जे.व्ही ली. उल्हासनगर. यांनी निविदेत समाविष्ट केलेलया विविध उपगांची व त्याच्या प्रथम वर्षाच्या देखभाल दुरूस्तीची किंमत खालील प्रमाणे आहे.

**A. Capital Investment:**

| Sl No | Particulars of Sub-Work | Amount (Rs.) in lakhs |
|---|---|---|
| 1. | Construction of intake-well and pump house | 845.94 |
| 2. | Raw water pumping machinery with allied works | 1290.76 |
| 3. | Raw Water Rising Main 1626 mm dia. M.S. 3 Km. | 1783.74 |
| 4. | Construction of 200 MLD Conventional W.T.P. and 20 ML capacity MBR | 7581.28 |
| 5. | Pure Water Transmission main 355 mm to 1550 mm dia. M.S. | 1000.00 |
| 6 | Misc. work - charges involved in procurement of electric energy etc., staff quarter at Water Treatment Plant (WTP) complex, approach road to Intake Well, and WTP, Compound Wall to WTP and Intake well , Water Meters, Street Lights, Trial Run, land development approach bridges, Road and Railway crossing etc., | 1000.00 |
| 7 | Additional distribution system | Included in sl .no 6 |
| 8 | Automation of the system | Included in sl .no 6 |
| | **Total** | **13501.72** |

**B. Operation & Maintenance (O & M) Charges**

| Sl No | Particulars | Amount (Rs.) in lakhs |
|---|---|---|
| 1. | Establishment Charges | 400.00 |
| 2. | M & R Charges | 141.50 |
| 3. | Chemical Charges | 104.00 |
| 4 | Energy Charges | 976.10 |
| 5 | Raw Water Charges | 202.21 |

| | | |
|---|---|---|
| 6 | Administrative Charges | 154.80 |
| 7 | M & R Charges for existing Distribution system | 300.00 |
| 8 | Insurance @ 2% of capital cost | 4.20 |
| | **Total** | **2282.81** |

निविदाधारंकामार्फत निविदेत सादर केलेला पाण्याचा प्रति हजार लिटरचा दर जरी न्युनत्तम असला तरी निविदाधारंकांस वाटाघाटी साठी दिनांक ०१../.०४./२०११ च्या पत्रानुसार कळविण्यात आले तसेच त्यांना त्याच्या अंदाजपत्रकांचे तसेच पाण्याच्या दराचे विविरण सादर करण्यास सांगण्यात आले.

निविदा समिती अहवाल

निविदा समिती मार्फत प्रथम निविदाधारंकांनी दिलेलया अंदाजपत्रकांतील किमंतीची तपासणी करण्यात आली सदर निविदेतील अटी नुसार निविदा समिती मार्फत मजीप्रा मार्फत दिलेलया प्राथमिक अहवालातील अंदाजपत्रक सन २०१०—११च्या दर सुची नुसार व पत्यक्ष कामाची व्याप्ती लक्षात घेवुन सुधारीत करण्यात आले. त्यानुसार कामांची किमंत रू. १२७.८० कोटी येते. सदरची किंमत हि निविदाधारंकांने दिलेल्या रू. १३५.०२ कोटी रक्कमे पेक्षा ५.०२ टक्के दराने कमी येते व तुलनात्मक आहे.

निविदाधारंकामार्फत अंदाजपत्रकातील देखभाल दुरूस्तीच्या कामासाठी दिलेलया रू २२.८२ कोटी रक्कमेची तुलना निविदा समिती मार्फत काढण्यात आलेलया अंदाज पत्रकीय रक्कमेशी करण्यात आली असता निविदा समितीची रक्कम रू.२८.६९ कोटी इतकी निविदाधारंकांमार्फत सादर केलेल्या रक्कमे पेक्षा २५.६७ टक्के जास्त येते.

एकुण अंदाजपत्रकीय रक्कम व देखभाल दुरूस्तीची रक्कम यांची तुलना केली असता निविदा धारंकामार्फत सादर केलेली रक्कम निविदा समितीच्या रक्कमे पेक्षा १.१८ टक्के जास्त येते.

सदर निविदाधारंकामार्फत योजनेचे काम त्याच्या स्वत:च्या खर्चाने करवायाचे असल्याने त्याला योजनेची देखभाल व दुरूस्ती करून महानगरपालिकेस शुध्द पाण्याचा पुरवठा करावयाचा आहे.

निविदा समिती मार्फत समितीच्या अंदाजपत्रका नुसार व सी पी एच ई ई ओ च्या मार्गदर्शक तत्वा नुसार पाण्याचे दर काढले असता सन २०१३ —१४ या वर्षी प्रत्यक्षात निविदा धारंकामार्फत पाणी पुरवठा करण्यात येईल ही बाब लक्षात घेवून पाण्याचा दर काढला असता तो रू. १२.२० प्रति हजार लिटर येतो. तसेच निविदा समिती मार्फत सदया पाणी पुरवठा करण्या—या विविध संस्था जसे म.औ.वि. महामंडळ,मजीप्रा व स्टेम प्रधिकरण यांच्या पाण्याच्या दराची माहिती प्राप्त केली. या संस्थामार्फत आकारण्यात येणारे दर खालील प्रमाणे आहेत.

| अ. क्रं | शहराचे नांव | पाणी पुरवठा करणारी संस्था व त्यांचे प्रति हजार लिटर पाण्याचे दर | | |
|---|---|---|---|---|
| | | म.औ.वि. महामंडळ | मजीप्रा | स्टेम प्रधिकरण |
| १ | अंबरनाथ | ८.७५ | ८.३५ | .... |
| २ | उल्हासनगर | ७.०० | .... | .... |
| ३ | कल्याण डोबिवली | ८.७५ | .... | .... |
| ४ | ठाणे | ८.७५ | .... | ४.५० |
| ५ | नवी मुंबई | ८.७५ | .... | .... |

वरील दराचा विचार करता म.जी.प्राधिकाराणाचे दर वगळता इतर संस्थाचे दर हे ठोक स्वरूपात (Bluk Supply) पाणी पुरवठा करण्याचे दर आहेत. मजीप्राचे दर हे ग्राहकांपर्यत पाणी पुरवठा करण्याचे म्हणजेच जल शुध्दीकरण केंद्राच्या देखभाल व दुरूस्तीच्या कामाबरोबर व वितरण व्यवस्थेच्या देखभाल दुरूस्तीचा खर्च धरून येणारे दर आहे. या योजनांच्या दरात भांडवली खर्चाचा समावेश नाही.

सदर वरील सस्था पैकी म.औ.वि. महामंडळ ही संस्था शहाड जलशुध्दीकरणा केंद्रातून उल्हासनगर शहरात सन १९७२ पासुन, स्टेम प्रधिकरण सन १९८५ पासुन तर मजीप्रा बदलापुर बॅरेज मधुन सन १९३० पासुन शहराना पाणी पुरवठा करीत असल्याने या संस्थाना पाणी शुध्दीकरणाच्या व शहरा पर्यत पाणी पोहचविण्याच्याच कामावर खर्च करावा लागतो. या योजनांचा भांडवली खर्च हया पुर्वीच वसुल झालेला असल्याने वरील पाण्याचे दर हे पाणी शुध्दीकरणाच्या कामाच्या खर्चावरच अंवलंबुन आहेत.

उल्हासनगर शहरात सन १९७२ पासुन म.औ.वि.महामंडळा मार्फत पाणी पुरवठा करण्यात येतो. उपलब्ध आकडेवारीनुसार सन १९८४ पासून म.औ.वि.महामंडळाकडील पाणी पुरवठयाच्या दरात खालील प्रमाणे वाढ झालेली आहे. त्याबाबतचा सविस्तर तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ. क्रं. | वर्षे | दर प्रति हजार लिटर | कालावधी | | दर वाढ टक्यात | दर वाढ प्रति वर्षि |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | वर्षे | महिना | | |
| १ | ऑगस्ट १९८४ | 0-85 | & | | | |
| २ | मेंं १९८६ | 1-10 | 1 | 9 | 30 % | 17 % |
| ३ | जुलै १९८९ | 1-50 | 3 | 2 | 36 % | 11-40 % |
| ४ | जुलै १९९२ | 2-00 | 3 | 0 | 33 % | 11 % |
| ५ | जुन १९९३ | 2-50 | 0 | 11 | 25 % | 27 % |
| ६ | डिसेंबर १९९४ | 3-00 | 1 | 7 | 20 % | 12-60 % |
| ७ | संप्टेबर १९९५ | 3-50 | 1 | 0 | 16 % | 16 % |
| ८ | मेंं १९९८ | 4-50 | 2 | 7 | 28 % | 11 % |
| ९ | जुन १९९९ | 4-75 | 1 | 2 | 5 % | 4-30 % |
| १० | एप्रिल २००० | 5-00 | 0 | 10 | 5 % | 5-40 % |
| ११ | एप्रिल २००१ | 5-50 | 1 | 0 | 10% | 10 % |
| १२ | नोब्हैबर २००१ | 5-75 | 0 | 7 | 5% | 7-50 % |
| १३ | जुन २००३ | 7-00 | 1 | 7 | 21% | 13-30 % |
| १४ | जुलै २०१० | 8-75 | & | | | |

सन १९८४ पासुनचे दरामध्ये एकुण २७ वर्षात वेळोवेळी केलेली दर वाढ लक्षात घेता सरासरी वर्षिक दर वाढ हि ९.९६ टक्के दिसुन येते.

## म.औ.वि.महामंडळाकडील भविष्यातील पाणी पुरवठया बाबत असमर्थता

उल्हासनगर शहरात म.औ.वि.महामंडळाकडून शहड योजनेतुन व बारावी योजनेतून सध्या रू. ७.०० प्रति हजार लिटर दराने सरासरी १२० दलली पाणी पुरवठा करण्यात येतो. तसेच महामंडळामार्फत नजीकच्या शहराना सन २०१० पासुन रू. ८.७५ प्रति हजार लिटर दराने ठोक स्वरूपात पाणी पुरवठा करण्यात येतो. म.औ.वि.महामंडळाचे उल्हासनदी उद्‌भव असलेल्या १५० दलली क्षमतेच्या जलशुदधीकरण केंद्रातून उल्हासनगर शहरास सरासरी ८५ दलली पाणी पुरवठा होतो तर उरर्वरीत ६५ दलली पाणी पुरवठा कल्याण शहरास होतो. या जल शुध्दीकरण केंद्राची क्षमता संपली असून भविष्यात या योजनेतून म.औ.वि.महामंडळ वाढीव पाणी पुरवठा करू शकणार नाही. शहराची भविष्यातील पाण्याची गरज पूर्ण करण्यासाठी म.औ.वि.महामंडळास वाढीव क्षमतेचे जलशुध्दीकरण केंद्र बांधावे लागेल.तसेच अस्तित्वातील जलशुध्दीकरण केंद्राचे आयुष्य जास्त झालेले असल्याने त्याची मोठया प्रमाणात दुरूस्ती करावी लागेल या बाबीचा विचार करता या सर्व खर्चाचा भार पाण्याच्या दरावर पडणार आहे. तसेच वाढीव भांडवली खर्चा मुळे पाण्याच्या दरात मोठया प्रमाणात वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तसेच उल्हासनगर शहरास बारवी योजनेतील पाले येथून होणारा पाणी पुरवठा वाढविण्यास म.औ.वि.महामंडळाचा नेहमीच नकार असतो. कारण या योजनेतून म.औ.वि.

महामंडळ जादा दराने इतर महानगरपालिकाना तसेच औदयोगिक क्षेत्राना पाणी पुरवठा करते.त्यामुळे त्याच्या उत्पनात घट करून ते उल्हासनगर शहरास वाढीव पाणी देणार नाही. जरी अपवादात्मक परिस्थीत म.औ.वि.महामंडळाने पाले कडून शहराची भविष्यातील पाणी पुरवठयाची गरज भागविण्यास मंजुरी दिली. तरी महानगपालिकेकडे तेवढयाच क्षमतेचे पाणी शहरातील उत्तर व दक्षिण भागास पोहचविण्याची जलवहिनी / पंप सामुग्रीची व्यवस्था नाही म्हणजेच पाणी उपलब्ध झाले तरी महानगरपालिकेस जलवाहिण्या टाकणे व पंपीग मशिनरी या उपांगानं करीता मोठया प्रमाणात खर्च करावा लागेल.

म.औ.वि.महामंडळ एक तर भविष्यात पाण्याच्या दरात वाढ करेलच त्याच प्रमाणे शहराची भविष्यातील पाणी पुरवठयाची वाढीव गरज भागवू शकणार नसल्याने उल्हासनगर महानगरपालिकेने स्वत:चा स्त्रोत विकसित करण्याच्या योजनेतील पाण्याचा दराचा विचार करणे गरजेचेच आहे.

<u>निविदा समितीच्या निर्ष्कषानुसार पाण्याचे दर</u>

त्यानुसार प्रत्यक्ष कामाची व्याप्ती व सद्य:स्थितीच्या दरा प्रमाणे अंदाज पत्रकीय किमंत १२७.८० कोटी एवढी येते.

सदरचे काम महानगरपालिकेने स्वत: पुर्ण खर्च करुन केले तर त्या योजनेव्दारे प्रक्रिया करुन पाणी शहरास पुरवठा करायचे झाले तर त्या पाण्याचा दर प्रत्यक्ष पाणी पुरवठा करण्याच्या दिवशी रु. १२.२० प्रति हजार लिटर्स एवढा येतो

सदरच्या दराचे सविस्तर पृथ:करण खालील प्रमाणे आहे.

| अ. क. | खर्चाचा प्रकार | खर्च प्रति हजार लिटर |
|---|---|---|
| अ | **देखभाल दुरुस्ती खर्च** | |
| १ | विदयुत खर्च | २.८९ |
| २ | रसायने खर्च | ०.२२ |
| ३ | आस्थापना खर्च | १.४५ |
| ४ | अशुध्द पाणी खर्च | ०.५९ |
| ५ | देखभाल दुरुस्ती व इतर खर्च | २.२० |
| | एकुण खर्च | ७.३४ |
| ब | **भाडवली खर्च** | |
| १ | भाडवली खर्च | २.१६ |
| २ | व्याज १२ टक्के दराने | २.७० |
| | एकुण खर्च | ४.८६ |
| | पाण्याचा दर अ + ब = ७.३४ + ४.८६ | १२.२० प्रति हजार लिटर |

उपरोक्त विवेचना वरुन असा निप्कर्ष काढता येवु शकतो की, अभिकर्त्याने प्रस्तावित केलेला दर हा तुलनात्मक रित्या कमी आहे.

<u>महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे दर :—</u>

अंबरनाथ व बदलापुर शहरास मजीप्रा मार्फत पाणी पुरवठा करण्यात येतो.

सन १९८४ पासून मजीप्रा कडील पाणी पुरवठयाच्या दरात खालील प्रमाणे वाढ झालेली आहे. त्याबाबतचा सविस्तर तपशील खालील प्रमाणे —

| अ. क्रं. | वर्षे | दर प्रति हजार लिटर | कालावधी | | दर वाढ टक्यात | दर वाढ प्रति वर्षि |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | वर्षे | महिना | | |
| १ | जुलै १९८९ | 1-50 | & | | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | जुन १९९१ | 1-60 | २ | **0** | 7 % | 3 % |
| ३ | संप्टेबर १९९२ | 1-90 | १ | **4** | 19 % | 14 % |
| ४ | नोब्हैबर १९९३ | 2-30 | १ | **3** | 21 % | 17 % |
| ५ | डिसेंबर १९९४ | 3-00 | १ | **2** | 30 % | 26 % |
| ६ | संप्टेबर १९९६ | 3-45 | १ | **10** | 15 % | 8 % |
| ७ | जुलै १९९७ | 3-95 | ० | **11** | 14 % | 16 % |
| ८ | में १९९९ | 4-75 | १ | **11** | 20 % | 11 % |
| ९ | में २००० | 5-50 | १ | **1** | 16 % | 15 % |
| १० | में २००१ | 6-05 | १ | **1** | 10 % | 9 % |
| ११ | में २००२ | 6-60 | १ | **1** | 9 % | 8 % |
| १२ | जुन २००६ | 6-90 | १ | **2** | 5 % | 1 % |
| १३ | में २००७ | 7-60 | १ | | 10 % | 10 % |
| १४ | एप्रिल २०१० | 8-35 | | | 10 % | 10 % |

मजीप्रा मार्फत मागील २२ वर्षाची दर वाढ लक्षात घेता सरासरी वार्षिक दर वाढ ९.३८ टक्के दिसुन येते.

खाजगी तत्वावर चालविली जाणारी लातुर पाणी पुरवठा योजना .

लातूर नगरपलिके मार्फत शहरातील अस्तित्वातील पाणी पुरवठा योजनेच्या देखभाल दुरूस्तीचे काम करण्यात येत होते. सदरच्या योजना म.जी.प्रा. मार्फत राबविण्यात आलेल्या आहेत. योजना कार्यक्षमपणे चालावी व पाणी पटटीची पुरेषा प्रमाणात वसुली व्हावी या उदेषाने नगरपालिका व मजीप्रा यांनी देखभाल व दुरूस्तीचे व पाणी पटटी वसुलीचे काम ठेकेदारामार्फत करण्याचे ठरविले या कामी ठेकेदाराने मजीप्रा मार्फत ठरवून दिलेलया पाण्याच्या दरा नुसार वसुली करावयाची असून या बददल्यात ठेकेदारास राबविलेलया योजने पोटी मजीप्राची नगरपालिकेकडे प्रलबित असलेली रू. २२ कोटीची थकबाकी भरावयाची आहे. म्हणजे या कामावर भांडवली खर्च २२ कोटी असून खालील प्रमाणे मंजुर दराने पाणी बिलाची वसुली करायची आहे.

| अ.क्र | सन | पाण्याचे दर प्रति हजार लिटर | | |
|---|---|---|---|---|
| | | घरगुती | समाजिक संस्था | बिगर घरगुती |
| १ | २००८—०९ | ८.८० | १७.०० | ४०.०० |
| २ | २००९—.१० | ९.६० | १८.७० | ४२.०० |
| ३ | २०१०—..११ | ९.६० | १८.७० | ४२.०० |
| ४ | २०११—१२ | १०.६० | २०.५० | ४४.०० |
| ५ | २०१२—१३ | १०.६० | २०.५० | ४४.०० |
| ६ | २०१३—१४ | ११.१५ | २१.५० | ४६.२० |
| ७ | २०१४—१५ | ११.१५ | २१.५० | ४६.२० |
| ८ | २०१५—१६ | ११.७० | २२.६० | ४८.५० |
| ९ | २०१६—१७ | ११.७० | २२.६० | ४८.५० |
| १० | २०१७—१८ | १२.३० | २३.७५ | ५०.५९ |

वर उल्लेखीत सध्या आकारण्यात येणा—या मंजुर दरांचा सखोल अभ्यास करण्यात आला. यापुर्वीच मजीप्राने पुर्ण केलेली लातुर पाणी पुरवठा योजना खाजगी अभिकर्त्यास चालविण्यात देण्यात आली. या योजनेत अभिकर्त्याची भांडवीली गुंतवणूक अल्प प्रमाणात आहे. याचाच अर्थ पणी पुरवठयावर येणा—या खर्चात मुख्यव्ये देखभाल दुरुस्तीच्या खर्चाचा समावेश आहे. या उलट उल्हासनगर महापालिकेल्या प्रस्तावीत

प्रकल्पात भांडवली गुंतवणुक पुर्णपणे अभिकर्त्यांने करावयाची आहे. याबाबीचा तुलनात्मक विचार केला असता, सन. २०१३—१४ सालचा अभिकर्त्याचा दर हा लातुर येथील पाण्याच्या दरापेक्षा मोठया प्रमाणात कमी आहे.

वरील पाण्याच्या दराचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| अ. क्र | सन | म.औ.वि.महामंडळ ९.९६टक्के प्रति वर्ष वाढ [ Bulk Supply ] | मजीप्रा ९.३८ टक्के प्रति वर्ष वाढ | लातुर नगरपालिका १०.००टक्के प्रति दोन वर्ष वाढ |
|---|---|---|---|---|
| १ | २०१०—११ | ७.०० | ७.६० | ९.६० |
| २ | २०११—१२ | ७.०० | ८.३५ | १०.६० |
| ३ | २०१२—१३ | ७.७० | ९.१३ | १०.६० |
| ४ | २०१३—१४ | ८.४६ | ९.९९ | ११.१५ |

निविदा धारकांमार्फत रू.९.३६ प्रति हजार लिटर शुल्क पाण्याचा दर निविदेत नमुद करण्यात आला त्यानंतर वाटाघाटी करून अंतिम दर रू. ९.२७ प्रति हजार लिटर या प्रमाणे देण्यास अभिकर्त्याने संमती दर्शवली

**अहवालातील निविदा संदर्भात मुख्य बाबी खालील प्रमाणे.**

१. मुल्याकंन समितीने सुंचविल्याप्रमाणे में. कोनार्क वाबॅग जे.व्ही.यांनी त्यांचे दिनांक .. ८/.०४./२०११च्या पत्रान्वये कळविलेला दर रू ९.२७ पर्यत कमी केलेला आहे. व हा दर प्रकल्प कार्यान्विणित झाल्यानंतर पहिलया वर्षापासुन लागु होणार आहे.
२. मुल्याकंन समिती मार्फत त्याच्या अहवालात विविध संस्थाच्या वार्षिक सरासरी दर वाढीचे विषयी तसेच सी पी एच ई ई ओ. च्या वार्षिक दर वाढी विषयी नमुद केले आहे.परंतु अभिकर्त्यास निविदेतील शुडयुलेड के मधील अटी नुसार दर वाढ लागु राहील.
संबधित आभिकर्त्या सोबत दिनांक ७/०४/२०११ रोजी वाटाघाटी करण्यात आल्या. वाटाघाटीतील चर्चेनुसार अभिकर्त्यामार्फत दिनांक ८/०४/२०११ पत्रानुसार अंतिम देकार सादर करण्यात आला आहे.

१.अभिकत्याने रू ९.२७ प्रति हजार लिटर दराने पाणी पुरवठा करण्यास संमती दर्शविली असुन हा दर प्रत्येक्षात पाणी पुरवठा सुरू करण्याच्या दिनांकापासुन (COD) लागू होणार आहे.

२.पाणी पुरवठयाच्या दरात प्रति वर्षी निविदेतील शुडयुलेड के मधील अटी नुसार दर वाढ लागु राहील

.

3.निविदेतील अट क्रंमाक २७.१.०३मध्ये सन १९६१ च्या आयकर कायादयानुसार येणा—या प्रकल्पाची घसारा रक्कम देण्या ऐवजी ३.३३ % प्रति वर्षे मुळ प्रकल्पाच्या किमतींत घट करून देण्याबाबत सुचविले आहे. निकषा प्रमाणे काढलेली प्रकल्पाची रक्कम अभिकर्त्यास ३ वर्षात अदा करावी लागणार आहे

**वरील निविदेतील बाबी व्यतिरिक्त खालील बाबीचा विचार होणे गरजेचे आहे.**

१) खाजगी अभिकर्त्यास देयकांची नियमीत अदायगी न झाल्यास शहराचा पाणी पुरवठा अभिकर्त्यातर्फे बंद होण्याची शक्यता आहे. अशा परिस्थिती निर्माण झाल्यास महापालिके समोर इतर पर्याय उपलब्ध राहणार नाहीत. अभिकर्त्याचे पाणी देयकापोटी असणारे देयक वेळेत अदा करण्याच्या दृष्टीने सध्याच्या प्रचलित पध्दती ऐवजी मिटर पध्दतीचा अवलंब

करून मासिक पाण्याची वसुली वाढविणे बाबत ठोक उपाय योजना करणे आवश्यक आहे.

२) सदर प्रकल्प राबविण्याकरिता पाणी पुरवठा योजना राबविलेल्या कुशल व अनुभवी अभियंत्याची आवश्यकता आहे. 'बांधा, वापरा व हस्तांतर करा' तत्वावरील योजनेची जरी निविदा धारकाची पूर्ण जबाबदारी असली तरी योजना महानगरपालिकेच्या मालकीची असल्यामुळे योजनेतील कामांची तांत्रीक तपासणी संकल्पनेची तपासणी, महानगरपालिकेमार्फत करणे गरजेची आहे. परंतु सध्या महानगरपालिकेकडे असलेला तांत्रीक कर्मचारी /अधिकारी वर्ग हा पुर्णत: देखभाल दुरुस्तीच्या कामात व्यस्त असल्यामुळे नविन योजनेच्या कामावरील तांत्रीक पाहणीसाठी प्रकल्प सल्लागार व Project Managing Consultancy नेमावी लागेल. या बाबतचा खर्च महानगरपालिकेस करावा लागेल.

३) योजना हाती घेण्यापुर्वी जुलै २०१० पर्यंत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची पाणी देयकापोटी व विलंब शुल्कापोटी असलेले **रु १७३.५७ कोटी** रक्कमेची थकबाकी अदा करणे महापालिकेस क्रमप्राप्त आहे.

४) .कामास काही कारणास्तव उदा. भुसंपादन/शासन जमिन भाडे तत्वावर वर्ग करणे, पाणी आरक्षण व इतर शासकिय मंजू—यामुळे विलंब झाला तरी, निविदा धारकास पाणी दर वाढ देता येणार नाही. तसेच विलंबामुळे कामाच्या किमतीमध्ये वाढ झाल्यास अभिकर्त्याने अतिरिक्त खर्चाची मागणी किवा विलंबा करीता मागीतलेली नुकसान भरपाई ठेकेदाराने मागणी करू नये. . तसेच कामे सुरू करण्याआधी, कामासाठी खालील बाबींच्या शासनाकडुन व विविध विभागाकडुन परवानग्या घेणे आवश्यक आहे.
.५) सदर प्रकल्प राबविणेसाठी निरनिराळे उपांगे बांधण्याकरिता एकुण ९ हेक्टर जमिनीचे भुसंपादन प्रस्तावित होते. त्याऐवजी शासन जमिन शासनाकडुन नाममात्र भाडे तत्वावर जमिन वर्ग करुन घेणे व खाजगी जमिन भूसंपादन करुन घेणे आवश्यक आहे.
.६) सदर प्रकल्प हा सन २०४३ ची पाण्याची मागणी १९५ द.ल.लि. मागणी धरून प्रस्तावित करण्यात आलेला आहे. सध्या म.औ.वि.मंडळाकडुन पाणी पुरवठा होत असल्यामुळे उल्हानगर महानगरपालिकेस स्वत:चे स्त्रोत विकसीत करण्यासाठी उल्हास नदीतून १७० द.ल.लि. पाणी आरक्षणाची व पाणी उचलण्याच्या प्रस्तावास दिनांक १७/०५/२००५ रोजी मा. मंत्री, जलसंपदा विभाग यांच्यासमवेत झालेल्या बैठकित खालील अटीवर तत्वत: मान्यता प्राप्त झाली.

अ. उल्हासनगर महानगरपालिकेकडुन उल्हास नदीत सोडले जाणारे प्रदुषित पाणी तात्काळ बंद करुन आवश्यक उपाययोजना करण्यात यावी.
ब. महाराष्ट्र औदयोगिक विकास मडंळाची उल्हासनगर महानगरपालिकेकडे असलेल्या पाण्याच्या थकबाकीपोटी अथवा बारवी येथील धरणाच्या भाडंवली खर्चासंबधी निर्णय घेणे आवश्यक आहे.

७) योजनेत चाचणीच्या वेळेस पाणी पुरवठा टप्पा टप्प्याने सुरू केल्यास म.औ.वि. मंडळाकडील पाणी पुरवठा टप्प्या टप्प्याने बंद करण्यात येईल. याबाबत म.औ.वि.मंडळास योजनेचे काम सुरु झाल्या नंतर त्वरीत कळविणे आवश्यक आहे.

**सांराशः—**
स्वत:चा पाणी पुरवठयाचा स्वंतत्र स्त्रोत. "बांधा वापरा व हस्तान्तरण करा" या तत्वावर विकसित करणे हा ३० वर्षाच्या कालावधी साठीचा प्रकल्प असुन महानगरपालिकेच्या आर्थिक बाबीवर परिणाम करणारा आहे. ही बाब लक्षांत घेता, निवीदा समिती मार्फत निविदाधारंकाने सादर केलेल्या दराची वेगवेगळया प्रकारे उपलब्ध झालेल्या विविध

पर्यायांची तुलना करुन शक्य तेवढया जास्त प्रमाणात तपासणी करण्यात आली. त्या आधारे तपासणी अहवालाच्या सारांश खालील प्रमाणे.

१. उल्हासनगर महानगरपालिकेस म.औ.वि.महामंडळाकडून शुध्द पाण्याचा ठोक स्वरूपात पुरवठा करण्यात येतो व उ.म.पा. कडे स्वत:चा पाणी पुरवठयाचा स्त्रोत नसल्यामुळे ती पूर्णपणे म.औ.वि.महामंडळावर अवंलबून आहे. म.औ.वि.महामंडळाच्या शुध्द पाण्याच्या देयका सोबत पाणी लाभार्थ्यापिर्यत पोहचविण्या करीता उल्हासनगर महानगरपालिकेस वितरण व्यवस्थेच्या देखभाल दुरूस्तीसाठी खर्च करावा लागतो.

२. मा.महासभेच्या दिनांक ०८/०३/२०११ च्या सभेत स्विकृत निविदाधारका मार्फत उमपा मार्फत पाण्याच्या देयकाची अदायगी सुरळीत न झाल्यास पाणी पुरवठा खंडीत केलयास काय होईल या विषयावर चर्चा झाली. चर्चेत काही मा.सदस्याचे म्हणणे होते की सध्या उमपास पाणी पुरवठा करणारी म.औ.वि.महामंडळ ही शासकीय यंत्रणा असुन उमपा मार्फत पाण्याचा पाण्याच्या देयकात विलंब झाला तरी त्यांचे मार्फत पाणी पुरवठा खंडीत करण्यात येत नाही यावर सविस्तर चर्चा झाल्यावर निविदेत उमपा मार्फत पाणी पुरवठयाच्या देयाकास विलंब झाला तरी निविदा धारकांस,शहराच्या पाणी पुरवठा १ वर्षापर्यत बंद करण्याचा अधिकार राहणार नाही या अटीचा समावेश करण्यात आला व दरम्यानच्या काळात उमपा मार्फत निधीची व्यवस्था करण्यास पुरेसा वेळ मिळेल व निविदा धारकाचे देयक अदा करण्यात येईल.

३.निविदा समिती मार्फत पाण्याच्या दराची तपासणी करते वेळेस विविध शहरांना पाणी पुरवठा करणाच्या संस्थाच्या पाण्याचा दरांची माहिती गोळा करण्यात आली व त्यांचेशी निविदा धारका मार्फत सादर केलेलया दराची तुलना केली असता निविदा धारकांचे दर त्याच्या दरा पेक्षा कमी असल्याचे आढळले.

४. उपरोक्त मुददा क्रमाक १ मध्ये नमुद केल्या नुसार म.औ.वि.महामंडळा मार्फत सदयाच्या रू ७.०० प्रती हजार लिटर दराने शहरास ठोक स्वरूपात पाणी पुरवठा करण्यात येतो. म.औ.वि.महामंडळा मार्फत म.औ.वि.महामंडळामार्फत अदयाप उमपाच्या पाण्याच्या दरात वाढ केलेली नाही. परंतु त्याच्या मार्फत नजीकच्या अंबरनाथ, कल्याण,ठाणे,नवी मुंबई व मिरा भांईदर या शहराच्या पाण्याच्या दरात वाढ केलेली असुन या शहरासाठी सदयाचा पाण्याचा दर रू. ८.७५ प्रति हजार लिटर आहे. यावरून म.औ. वि.महामंडळ उल्हासनगर शहराच्या पाणी दरात वाढ करण्याची शक्यता नाकारता येत नाही असे दिसून येते.

उमपास ग्राहकांपर्यत पाणी पोहचविण्यासाठी वितरण व्यवस्थेच्या देखभाल दुरूस्तीवर खर्च करावा लागतो त्या अनुषगांने निविदा समिती मार्फत,निविदाधारंकाच्या दराची प्रत्यक्षात पाणी पुरवठा सुरु करण्याच्या तारखेस (COD) येणा—या दराची तुलना करण्यात आली. म.औ.वि.महामंडळाचे मागील २७ वर्षात वेळावेळी केलेली पाण्याच्या दरातील वाढ लक्षात घेउन त्यांच्या दराची सरासरी वाढ काढण्यात आली व त्या सरासरी दराने प्रत्यक्ष पाणी पुरवठा सुरु करण्याच्या तारखेस (COD) येणारा दर हा रू ८.४६ प्रती हजार लिटर येतो. उमपा मार्फत सन २०१०—११ च्या पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेच्या देखभाल व दुरूस्तीवर होणा—या खर्चाच्या आधारावर वितरण व्यवस्थेंचा दर काढण्यात आला व CPHEEO च्या मार्गदर्शिक तत्वानुसार या दराने पुढील संभाव्य सरासरी दर काढण्यात आले.

त्या अनुषघाने म.औ.वि.महामंडळाने पुरवठा केलेल्या दर प्रत्यक्ष पाणी पुरवठा सुरु करण्याच्या तारखेस (COD) रू.८.४६ व वितरण व्यवस्थेचा दर रू.३.५२ येतो. म्हणजेच म.औ.वि.मं चा एकुण दर रु.११.९८ एवढा असेल. या वरुन असे दिसुन येते की, अभिकर्त्याने दिलेला दर म.औ.वि.म पेक्षा कमी आहे.

५. मजीप्राचा दर हा वितरण व्यवस्थेच्या देखभाल दुरूस्तीचा खर्च धरून आहे हा दर प्रत्येक्ष पाणी पुरवठा करण्याच्या दिवशी (COD) रू.९.९९ येतो. सदरच्या दरात भांडवली खर्चाचा समावेश नाही. म.जी.प्रा. च्या तुलनेत अभिकर्त्याने दिलेला दर कमी आहे.

६. सन २००४ मध्ये या कामाकरीता निविदा मागविण्यात आल्या होत्या त्या वेळेस निविदा धारकाचा रू. ५.०८ प्रति हजार लिटर हा ठोक स्वरूपात पाणी पुरवठा करण्याचा दर मंजुर करण्यात आला होता.सदरच्या दरात अंशुध्द पाण्याची किंमत व विदयुत दराच्या फरकानुसार येणारा रक्कमेचा समावेश नव्हता. या मंजुर दरात वरील बाबी संमाविष्ठ करून भविष्यातील संभाव्य पाण्याचा दर काढण्यात आला अंशुध्द पाण्याचा दर CPHEEO च्या मार्गदर्शक तत्वानुसार काढण्यात आला त्या अंनुषघाने प्रत्यक्षात पाणी पुरवठा सुरू करण्याच्या दिवशी (COD) पाण्याचा दर रू. ७.६५ प्रति हजार लिटर येतो.

वितरण व्यवस्थेचा देखभाल दुरूस्तीचा संभाव्य रू.३.५२ प्रति हजार लिटर खर्च लक्षात घेवून प्रत्यक्षात पाणी पुरवठा सुरू करण्याच्या दिवशी (COD) पाण्याचा दर रू.११.१७ प्रति हजार लिटर येतो. या दराच्या तुलनेत अभिकर्त्याने दिलेला दर कमी आहे.

७ .लातुर नगरपालिके मार्फत सुध्दा अंशाच प्रकारे खाजगी सहभागाच्या (PPP) च्या आधारावर प्रकल्प राबविण्यात येत असुन त्यांचा सदयाचा पाणी पुरवठयाचा दर हा रू. १०.६०प्रती हजार लिटर आहे. या तुलनेत अभिकर्त्याने दिलेला दर कमी आहे.

**विवरण पत्र**

विविध संस्थाच्या मार्फत शहरांना प्रत्येक्षात पाणी पुरवठा सुरू करण्याच्या दिवशी (COD) असणारा पाण्याचा दराचा तक्ता.

| अ. क्रं. | Year | म.औ.वि. महामंडळ ९.९६टक्के प्रति वर्ष वाढ | मजीप्रा ९.३८ टक्के प्रति वर्ष वाढ | लातुर नगरपालिका १०.००टक्के प्रति वर्ष वाढ | मागील अभिकत्याचे दर | अभिकत्याचे दर |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २०१३.१४ | ११.९८ | ९.९९ | ११.१५ | ११.१७ | ०९.२७ |

## निष्कर्ष

१.वरील सर्व बाबी व दराचा सखोल विचार केला असता असा निष्कर्ष निघतो की उमपा मार्फत जर या कामाच्या निविदा स्विकृत केल्या तर उमपा कडे पाण्याच्या उदभावाची मालकी राहणार असून दोन वर्षानंतर रू.१३५.०२ कोटी रक्कमेच्या स्वता:च्या पाणी पुरवठयाच्या प्रकल्पाची मालकी राहणार आहे.

२.सदर प्रकल्प राबविल्यानंतर पाणी देयकापोटी महापालिकेस येणारा खर्च विचारात घेता घरगुती व द्रारिद्रय रेषेखालील ग्राहकांच्या पाण्याच्या दरात वाढ करावी लागणार नाही. तथापी बिगर घरगुती ग्राहकांच्या पाण्याच्या दरात किरकोळ वाढ करावी लागेल ती त्यानां पेलणारी असेल.

३.अभिकर्त्यास पाणी देयका पोटीची रक्कम प्रत्येक महिण्यास अदा करावी लागणार आहे. सबब ग्राहकांना मसिक किंवा व्दिमासिक पाणी देयके पाठविण्याची पध्दत अंवलंबांवी लागेल

४.महानगरपलिका सदया पाणी पुरवठयावर अंदाजे रू.४४ कोटी ऐवढा खर्च करते. महानगरपलिकेस पाणी देयका पोटी मिळणारा महसुल सरासरी १२ कोटी ऐवढा आहे याचाच अर्थ सरासरी तूट रू.३२ कोटीची आहे. सदर तूट १०० टक्के मिटरीग करून व

वाया जाणा—या पाण्याचे प्रमाण कमी करून भरून काढता येईल. तसेच पाण्याच्या वापरानुसार दर (Telescopic water rates ) या पध्दतीचा महानगरपालिकेस विचार करावा लागेल,जेणे करून ग्राहकांना मिटर घेण्यास प्रोत्सहन मिळेल.

५.विविध संस्था मार्फत आकारण्यात येणा—या पाणी दराची तुलना केली असता निविदाधांरकाचे पाण्याचे दर तुलनात्मक दृष्टया कमी आहेत.

६.सदर योजने अंतर्गत होणा—या पाणी पुरवठयाचे दर (एकत्रित वितरण व्यवस्थेच्या खर्चासहीत) म.औ.वि.महामंडळाच्या पाणी दरापेक्षा कमी असतील या बाबत सविस्तर चर्चा होवूनच अंतिम निर्णय होणे आवश्यक आहे.

उपरोक्त प्रमाणे मा. आयुक्तांनी दिलेल्या मान्यतेनुसार मा. स्थायी समितीमध्ये निविदेतील पाणी दराबाबत मुददेनिहाय सविस्तर चर्चा होवून योग्य अंतिम निर्णय होणे कामी मा. स्थायी समितीच्या विचारार्थ व निर्णयास्तव सविनय सादर.

स्थायी समिती ठराव क्र. ११ दिनांकः— २८/४/२०११

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री.बी.बी. मोरे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणांमुळे उल्हासनगर महानगरपालिकेसाठी ‘‘बांधा वापरा व हस्तांतरीत करा’’ तत्वावर स्वत:चा पाणी पुरवठयाचा स्त्रोत विकसित करणे व सुधारीत योजना राबविणे कामी मे. कोनार्क वाबॅग जे.व्ही. कन्साटीयम यांनी सुचविलेल्या दराने त्यांच्याशी संविदेस तसेच निविदा व्यतिरिक्त इतर बाबी प्रशासनास सक्षम प्राधिकाराच्या मंजुरीने उपाययोजना करण्यास निर्देशित करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

सांयकाळी ५.४३ वाजंता सभेचे कामकाज संपल्याचे सभापती श्री. लाल पंजाबी यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—१८/५/२०११

## दि. १८/५/२०११ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

३

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा बुधवार दिनांक १८/५/२०११ रोजी सायंकाळी ४.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. लाल देवनदास पंजाबी | सभापती |
| २ | श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर | सदस्य |
| ३ | श्री. जीवन (राजु) चंद्रभान इदनानी | सदस्य |
| ४ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | सदस्य |
| ५ | डॉ. निना प्रकाश नाथानी | सदस्या |
| ६ | श्री. म्हस्के निवृत्ती अंकुश | सदस्य |
| ७ | श्री. सुंदर (बाबु) आसनदास मंगतानी | सदस्य |
| ८ | श्री. बी.बी. मोरे | सदस्य |
| ९ | श्रीमती ज्योती शाम माने | सदस्या |
| १० | श्री. प्रशांत किसनराव धांडे | सदस्य |
| ११ | श्री. चंद्रशेखर केशव यादव | सदस्य |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्री. धनंजय बाबुराव बोडारे, २. श्रीमती सरोजीनी मुरलीधर टेकचंदानी, ३. श्रीमती संगिता राजेश कंडारे, ४. श्री. ॲड. अनिल (विद्यार्थी) आयलानी, ५. श्रीमती शिला सुभाष मनसुलकर

श्री. विजयकुमार म्हसाळ, उप—आयुक्त, मुख्यालय हे आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ होते.

खालील अधिकारी सभेस हजर होते.

८३.श्री. विजयकुमार म्हसाळ, उप—आयुक्त
८४.श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
८५.श्री. प्रविणकुमार जैन, मुख्य लेखा अधिकारी
८६.श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखा परिक्षक
८७.श्री. हरेश इदनानी, उप मुख्य लेखा अधिकारी
८८.श्री. मुकेश आयलानी, कार्यकारी अभियंता, विदयुत
८९.श्री. एम.जी. गिरगांवकर, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
९०.श्री. आर.बी.शिर्के, कार्यकारी अभियंता
९१. डॉ. राजा रिझवानी, वैद्यकीय अधिकारी
९२.श्रीमती विजया कंठे, कर निर्धारक व संकलक
९३.श्री. विनोद डवले, सहा. आयुक्त, अतिक्रमण
९४.श्री. दिपक चिमनकारे, वाहन विभाग प्रमुख

९५.श्री. के. सुंदरम, शाखा अभियंता, पाणी पुरवठा
९६.श्री. जी.जी. हिबारे, मुख्य स्वच्छता निरिक्षक
९७.श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
९८.श्री. भास्कर मिरपगारे, प्र. अग्निशमन अधिकारी
९९.श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक
१००. श्री. नंदु समतानी,मुख्य लिपिक, साप्रवि
१०१. श्री. बाबासाहेब साळुंखे, लिपिक, साबांवि
१०२. श्री. सुरेश चंदने, लिपिक, भांडार विभाग
१०३. श्री. यशवंत सगळे, लिपिक, जनसंपर्क कार्यालय

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.
१. श्री. तानाजी पतंगराव
२. श्रीमती नर्गीस खान

सायंकाळी ४.२५ वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

श्री. विजयकुमार म्हसाळ, उप—आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ होते.

यावेळी सदस्य श्री. जीवन इदनानी हे सभागृहातुन बाहेर गेले. 

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ <u>विषय क्र. १ :—</u> मागील सभेचे दिनांक २८/४/२०११ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>सभापती, श्री. लाल पंजाबी:—</u>मागील सभेचे दिनांक २८/४/२०११ रोजीचे इतिवृत जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे 

---

☑ **विषय क्र. १ :—** मागील सभेचे दिनांक २८/४/२०११ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नांव : श्री. जमनादास पुरस्वानी
अनुमोदकाचे नांव : श्री. बी.बी. मोरे

<u>स्थायी समिती ठराव क्र. :—</u> ११ अ <u>दिनांक : १८/५/२०११</u>

ही स्थायी समिती महापालिका सचिवांनी प्रस्तुत केलेले दिनांक २८/४/२०११ रोजीचे पृष्ठ क्र. १ ते ३९ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

**.महापालिका सचिव :—** विषय क्र. २ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. २ :—** शहरात अस्तित्वात असलेल्या मिळकतींचा आधुनिक मशिन छायाचित्रणाद्वारे शोध घेणेसाठी
अभिकर्ता नेमण्याकामी न्युनत्तम दराचे निविदाकार जिनेसेस इंटरनेशनल कॉर्पोरेशन लिमिटेड यांच्याशी संविदेस मान्यता देणे.

---

**सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—**या प्रस्तावाबाबतीत प्रशासनाला धन्यवाद दिले पाहिजेत. मिळकत कर विभागामध्ये या अगोदर २०० करोड रुपये घोटाळयाचे प्रकरण गाजले होते. यांनी आमच्या खांदयावर बंदुक ठेवुन ते प्रकरण झाकण्याचा प्रयत्न करत आहेत. याबाबतीत जर कुणास उत्तरच दयायचे नसेल तर हा प्रस्ताव नाकारला जावा.

**सदस्य श्री. प्रशांत धांडे :—**घोटाळा काय झाला होता ते तर सांगितले जावे.

यावेळी सदस्य श्री. जीवन इदनानी यांनी सभागृहात पुनः प्रवेश केला.

**सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—**मिळकत कर विभागामध्ये दिडशे ते दोनशे करोड रुपयाचा घोटाळा झाला होता. आता आपण या लोकांना काम देत आहात. खाजगी संस्थेचे लोक प्रत्येकाच्या घरी जातील, त्यांच्या घरांचे फोटो घेतील व म्हणतील की तुमचे घर असे आहे तसे आहे. आणि मोठया प्रमाणावर भ्रष्टाचार करतील. या प्रस्तावाबाबतीत जर कुणी उत्तर देत नसेल तर हा प्रस्ताव नाकारला जावा.

**सदस्य श्री. प्रशांत धांडे :—**या प्रस्तावाबाबतीत कुणीच उत्तर कसे देत नाही?

**श्री. विजयकुमार म्हसाळ, उप—आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :—**आता नविन टेक्नॉलॉजी आलेली आहे त्यानुसार आधुनिक मशिन छायाचित्रणाद्वारे मिळकतींचा शोध घेता येणार आहे.

**सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—**कसली नविन टेक्नॉलॉजी आहे? त्या संस्थेचे लोक घरोघरी जावुन फोटो काढतील लोकांना धमकावतील त्यापेक्षा मिळकत कराची वसुली करण्यासाठी घरोघर फिरुन मिळकत कराची वसुली करणारे आपल्या महापालिकेचे कर्मचारी या कामासाठी सक्षम नाहीत काय?

**श्री. हरेश इदनानी, उप मुख्य लेखा अधिकारी:—** १९६० मध्ये उल्हासनगर नगरपालिका अस्तित्वात आल्यानंतर शहरात अस्तित्वात असलेल्या मिळकतींवर मालमत्ता कराची आकारणी करण्यात आली. त्यावेळेस संगणक प्रणाली अस्तित्वात नव्हती. त्यामुळे कर आकारणीमध्ये ब—याचशा उणिवा निदर्शनास आलेलया आहेत. जसे की, काही मिळकतींची दुबार नोंद आलेली आहे. त्यांचीही कारणे अशी आहेत की काही ठिकाणी जुनी मिळकत किंवा बॅरेक तोडुन तेथे इमारती बांधण्यात आल्या. परंतु तोडण्यात आलेल्या जुन्या मिळकतीचे/बॅरेकचे चालु असलेली कर आकारणी रद्द करण्यात आली नाही. तसेच काही मिळकती दुस—यास विकण्यात आल्या. परंतु त्यांनी नाव बदली करुन न घेता आपल्या नावे नविन मिळकत कराचे बिल काढुन घेतले. त्यामुळे काही मिळकतींची दुबार नोंद झालेली आहे. याच बरोबर मिळकत करांपासुन सुट असलेल्या स्मशानभुमी, तसेच महापालिकेच्या काही मिळकती, केंद्र व राज्य शासनाच्या मिळकती यांचाही यामध्ये समावेश आहे. त्यामुळे मालमत्ता कराची मागणी जास्त दिसुन येते वास्तविक सदरची मागणी निर्लेखित करणे आवश्यक आहे. या आधुनिक मशिन छायाचित्रणातील कॅमेरा तीनशे साठ अंशामध्ये फिरुन मिळकतींचे छायाचित्रण करणार आहे. त्यामुळे आपल्या महापालिकेच्या दप्तरी नोंद असलेले मिळकती छायाचित्रणाद्वारे संलग्न करुन वादग्रस्त असलेल्या मिळकती निदर्शनास येतील. त्यासाठी त्या संस्थेचे लोक कुणाच्याही घरोघर जाणार नाहीत. मशिनद्वारे केलेल्या चित्रीकरणात मिळकतीच्या बांधकामाचे स्वरुप, क्षेत्रफळ, आणि वापर यामध्ये बदल झाला आहे की नाही, नविन बांधकाम करण्यात आले आहे किंवा नाही, त्याचबरोबर त्यांवर कर आकारणी करण्यात आली आहे किंवा नाही? त्याचा शोध घेणे शक्य होईल तसेच राजीव गांधी आवास योजनेअंतर्गत लाभार्थी निश्चित करणे सोयीचे होईल. अशाप्रकारे या योजनेअंतर्गत मिळणारे विविध फायदे यांचा गोषवा—यामध्ये सविस्तर उल्लेख केला आहे.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>आपल्या महापालिकेच्या कर विभागातील जे कर्मचारी घरोघरी जावुन मिळकत कराची वसुली करतात ते या कामासाठी सक्षम नाहीत काय?

<u>श्री. हरेश इदनानी, उप मुख्य लेखा अधिकारी:—</u>तसे तर सायकलही चालते, स्कुटरही चालते. दोन्हींच्या वेगात फरक आहे.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u> मिळकत कर विभागात १५० ते २०० करोडचा घोटाळा झाला असल्याचे विरोधी पक्षाच्या सदस्यांनी एक वर्षापुर्वी स्थानिक वृत्तवाहिनीवर एक मोहिम चालविली होती. यासाठी हा प्रस्ताव नाकारला जावा.

<u>सभापती, श्री. लाल पंजाबी:—</u>हा प्रस्ताव आपण पुढे ढकलु या.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>नाही, पुढे ढकलायचा नाही. हा प्रस्ताव नाकारला जावा. कारण की त्या खाजगी संस्थेचे लोक काहीही करु शकतात. प्रत्येक घराचे रस्त्यावरुनच फोटो घेता येतील काय? महापालिकेच्या कर्मचा—यांना आम्ही काही सांगितले तर ते आमचे ऐकु शकतात.

<u>काही सदस्य:—</u>ठिक आहे हा प्रस्ताव नाकारला जावा.

<u>सभापती, श्री. लाल पंजाबी:—</u>सदरचा विषय नाकारण्याबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. २ :—** शहरात अस्तित्वात असलेल्या मिळकतींचा आधुनिक मशिन छायाचित्रणाद्वारे शोध घेणेसाठी अभिकर्ता नेमण्याकामी न्युनत्तम दराचे निविदाकार जिनेसेस इंटरनेशनल कॉर्पोरेशन लिमिटेड यांच्याशी संविदेस मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

वर्ष १९६० मध्ये उल्हासनगर नगरपालिका अस्तित्वात आल्यानंतर कार्य व कर्तव्य पार पाडणेसाठी आवश्यक निधीसाठी शहरात अस्तित्वात असलेल्या मिळकतींवर मालमत्ता कराची आकारणी करण्यात आली. सर्वांना याची जाणीव असेल कि, उल्हासनगर शहर हे पुवी लष्करी छावणी म्हणुन अस्तित्वात होते त्यामुळे मिळकतींची संख्याही अत्यल्प प्रमाणात होती. जागतिकरणाची व्याप्ती, प्रगत तंत्रज्ञान, दैनंदिन वाढती लोकसंख्या व घनता यामुळे मिळकतींचे बांधकामात वाढ होत असल्याने सद्यस्थितीत उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात अंदाजे १.५५ लक्ष मिळकतींवर मालमत्ता कर आकारणी करण्यात आली आहे.

मालमत्ता कराची आकारणी इमारतीचे किंवा जमिनीचे क्षेत्रफळ, बांधकाम प्रकार (आर.सी.सी, पत्रेविटा, टियर गरडर), मिळकतीचा वापर (निवासी/अनिवासी) व परिसरातील उपलब्ध मुलभूत सोयीसुविधा यावर आधारीत करयोग्य मुल्यावर असते. मालमत्तांवर कर आकारणी व वसुली व्यवस्थापन तसेच त्यासंबंधी इतर बाबींची पुर्तता करणेसाठी मिळकतींची विभागणी १ ते ५८ प्रभागात करण्यात आलेली आहे. ५० वर्षापासुन अस्तित्वात असलेल्या कर आकारणी व्यवस्थापनात बऱ्याच उणिवा निदर्शनास आल्या असुन त्याचा सारांश पुढीलप्रमाणे आहे.

१. महानगरपालिका कर आकारणी पुस्तकाची छाननी केली असता काही मिळकतींची दुबार नोंद आहे, व त्याची मुख्य कारणे खालीलप्रमाणे आहेत.

(अ) मिळकत निष्कासित करून त्या जागेवर इमारत बांधण्यात आली, परंतु जुन्या निष्कासित करण्यात आलेल्या मिळकतीवर चालू असलेली कर आकारणी रद्द करण्यात आली नाही.

(ब) व्यक्तीच्या जागेसंबंधीच्या किंवा जागेवरील मालकी हक्काचे हस्तांतरण संलेख करून देण्यात आल्यानंतर सदर मिळकतींसाठी किंवा त्याची नोंदणीनंतर किंवा कोणताही लेख करून देण्यात आल्यानंतर महानगरपालिकेत अर्ज करून कर आकारणी नोंदवहीत मालमत्ता कर देण्यास प्रथमत: पात्र म्हणुन मिळकतधारकाने जुन्या नावाऐवजी स्वत:च्या नावाची नोंद करून घेणे आवश्यक आहे. परंतु बहुतांश नागरिकांनी

सर्वसाधारण कर निर्धारणामध्ये स्वतंत्ररित्या आपले नावे  दुसरे मालमत्ता कर बिल काढुन घेतले आहे. त्यामुळे काही मिळकतींची दुबार नोंद झाली असल्याचे समजते.

(क)  मिळकतधारक त्यांच्या मिळकतीची खरेदी–विक्री करतात, अशावेळी मिळकतीचे भाग पाडून विक्री करण्यात आलेल्या भागाचे स्वतंत्र बिल व उर्वरीत भागाचे स्वतंत्र बिल न काढता विक्री केलेल्या मिळकतीच्या भागाचे स्वतंत्र बिल व पुर्वीप्रमाणे मिळकतीचे मुळ बिल (विक्री करण्यात आलेल्या भागासह) असे एकाच मिळकतीची दोन बिले काढण्यात आली आहेत.

वास्तवित पाहता अशा मिळकतीसंदर्भातील कर आकारणी वसुल न होण्याजोगे आहे, त्याअनुशंगाने एक किंवा त्यापेक्षा जास्त मिळकतींची दुबार नोंद असलेल्या मिळकतीं शोधुन त्यावरील कर आकारणी (वसुल न होण्याजागे रक्कम) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १५२ नुसार निर्लेखित करणे आवश्यक आहे.

२.  मालमत्ता कराची आकारणी करण्यात आलेल्या मिळकतींमध्ये झोपडपट्टयांचा  समावेश आहे. अशा मिळकतीस बॅरेक क्रमांक, सदनिका क्रमांक, ब्लॉक क्रमांक याप्रमाणे ठोस ओळख नसल्याने वसुलीसाठी त्यांचा शोध करणे कठिण होते.

३.  महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत केंद्र शासन, राज्य शासन तसेच महानगरपालिका मालकीच्या असलेल्या मिळकतींवर करण्यात आलेल्या कर आकारणीचा समावेश आहे. त्यामुळे मालमत्ता कराची मागणी जास्त दिसुन येते. वास्तविक सदरची मागणी निर्लेखित करणे आवश्यक आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेने जेएनएनयुआरएम योजनेत भाग घेतला असून सदर योजनेत केंद्र व राज्य शासनाकडून अनुदान प्राप्त करुन घेणेसाठी महानगरपालिकतर्फे पुरविण्यात येणा–या सर्व सेवांचे संगणकीकरण करून सर्व मिळकतींवर मालमत्ता कर आकारणी व जास्तीत जास्त वसुली करण्याची हमी दिलेली आहे. त्यानुशंगाने कर विभागात जनतेच्या सोयींसाठी विविध सोयी व सुविधा. उदा. मोबाईल एसएमएस व्दारे देयकांची माहिती, मोबाईलव्दारे देयकांचा भरणा, क्रेडीट कार्डव्दारे देयकांचा भरणा, तसेच इंटरनेटद्वारे देयकांची माहिती इत्यादी सोयी उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

इतक्या सुविधा उपलब्ध असल्यातरीही उपरोक्त नमुद उणीवांसंदर्भात सुधारणा करणेसाठी ठोस उपाययोजना करणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत आधुनिक मशिनद्वारे छायाचित्रण करण्याची यंत्रणा विकसित झाली आहे. मालमत्ता कर आकारणी व वसुली व्यवस्थापन अंतर्गत महानगरपालिका कर आकारणी पुस्तकाप्रमाणे नोंद असलेल्या मिळकतीं छायाचित्रणाद्वारे संलग्न करून उक्त कारणास्तव वादग्रस्त असलेल्या मिळकतीं निदर्शनास येतील. तसेच याचा उपयोग खालील बाबींकरीता होवु शकेल.

१.  ज्या मालमत्तांच्या क्षेत्रफळ/बांधकाम प्रकार/वापर इ. बाबींत बदल झालेला आहे किंवा ज्या मालमत्तांची पुर्नबांधणी झालेली आहे / नवीन बांधकाम करण्यात आलेले आहे किंवा ज्यावर कर आकारणी झालेली नाही अशा मिळकतींचा शोध घेणे शक्य होईल.

२.  झोपडपट्टी किंवा सरकारी जागेवर उभारण्यात आलेल्या मिळकतीं तसेच मिळकतधारकाचा अचुक शोध घेता येईल.

३.  उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामे, बांधकाम परवानगी नंतर होणारे व्हॉयलेशन, सरकारी जागेवरची अतिक्रमणे यावर प्रभावीपणे नियंत्रण ठेवणे.

४.  राजीव गांधी आवाज योजनेअंतर्गत लाभार्थी निश्चित करणे सोईचे होईल.

५.  महानगरपालिका विविध विभागामार्फत पुरविण्यात येणाऱ्या सेवासुविधा (उदा. रस्ते. विद्युतरोशनाई वगैरे) यासाठी सदर यंत्रणा उपयोगी ठरणार आहे.

मालमत्ता कर आकारणी व वसुली व्यवस्थापन अंतर्गत महानगरपालिका क्षेत्रात अस्तित्वात असलेल्या मिळकतींचा छायाचित्रणाद्वारे शोध घेणे याकामी अभिकर्ता नियुक्त करणेसाठी जा. क्र.

युएमसी/पीआरओ/१३/११, दिनांक ०८/०४/२०११ अन्वये वृत्तपत्रात निविदा सुचना प्रसिध्द् करण्यात आली होती. त्याअनुशंगाने खालील निविदाधारकांनी आपली निविदा सादर केली आहे.

| अ.क्र | निविदाधारकांचा तपशिल |
|---|---|
| १ | जिनेसेस इंटरनॅशनल कॉर्पोरेशन लि. [Genesys International Corporation Ltd.] |
| २ | एडीसीसी इन्फोकॅड प्रा. लि. [ADCC Infocad Pvt. Ltd.] |
| ३ | बियॉड साफ्टवेअर टेक्नोलॉली प्रा. लि [Biond Software Technology Pvt. Ltd.] |

प्राप्त झालेल्या निविदा दिनांक २१/०४/२०११ रोजी कर निर्धारक व संकलक यांचे दालनात निविदाधारकाचे प्रतिनिधी समक्ष उघडण्यात आली आहे.

निविदापत्रकात नमुद केलेप्रमाणे प्रथम लिफाफा क्रमांक १ (तांत्रिक बाबी) उघडण्यात आला. त्यानुसार खालीलप्रमाणे निविदाधारक पात्र ठरले आहेत.

| अ.क्र | पात्र निविदाधारकांचा तपशिल |
|---|---|
| १ | जिनेसेस इंटरनॅशनल कॉर्पोरेशन लि. [Genesys International Corporation Ltd.] |
| २ | एडीसीसी इन्फोकॅड प्रा. लि. [ADCC Infocad Pvt. Ltd.] |

बियॉड साफ्टवेअर टेक्नोलॉली प्रा. लि. [Biond Software Technology Pvt. Ltd.] यांच्या बाबतीत लिफाफा क्रमांक १ उघडला असता निविदेतील काही अटी व शर्तींची पुर्तता होत नसल्याने संबंधित निविदाधारकास अपात्र ठरविण्यात आले. तसेच त्यांनी सादर केलेला लिफाफा क्रमांक २ (वित्तीय बोली) उघडण्यात आलेला नाही.

त्यानंतर पात्र निविदाधारकांनी सादर केलेला लिफाफा क्रमांक २ (वित्तीय बोली) उघडण्यात आला असता खालीलप्रमाणे देकार रक्कमेची बोली नमुद केली आहे.

| Sr. NO | PARTICULARS | Total Area in Liner km (Approx) | जिनेसेस इंटरनॅशनल कॉर्पोरेशन लि. **[Genesys International Corporation Ltd.]** | | एडीसीसी इन्फोकॅड प्रा. लि. **[ADCC Infocad Pvt. Ltd.]** | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | Unit Price in Rs. (Per Linear kilometer) | Total Price in Rs. | Unit Price in Rs. (Per Linear kilometer) | Total Price in Rs. |
| 1. | Cost of Spherical Videographic Survey in Residential and business areas (survey by vehicle mounted cameras) | 175 | 11070 | 1937250 | 12500 | 2187500 |
| 2. | Cost of Spherical Videographic Survey in slum (survey by individual persons carrying spherical cameras on back pack) | 40 | 12300 | 492000 | 14000 | 560000 |
| 3 | Cost of Application development and data Integration | Lump sum | - | 490000 | - | 750000 |
| 4 | **Total** | | | 2919250 | | 3497500 |
| 5 | Service tax and all other Taxes | | | 300683 | | 360242.5 |
| 6 | **Grand Total in Rs.** | | | **3219933** | | **3857742.5** |

उपरोक्त तक्ता पाहता जिनेसेस इंटरनॅशनल कॉर्पोरेशन लि. [Genesys International Corporation Ltd.] यांनी सादर केलेली देकार रक्कम सर्वांत लघुत्तम असल्याचे दिसुन येते.

मालमत्ता कर आकारणी व वसुली व्यवस्थापन अंतर्गत महानगरपालिका क्षेत्रात अस्तित्वात असलेल्या मिळकतींचा छायाचित्रणाद्वारे शोध घेणेसाठी वर्ष २०११–१२ चे अंदाजपत्रकात माहिती व तंत्रज्ञान या लेखा

शिर्षाखाली तरतुद करण्यात आली आहे.

तरी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ७३ (क) नुसार मालमत्ता कर आकारणी व वसुली व्यवस्थापन अंतर्गत महानगरपालिका क्षेत्रात अस्तित्वात असलेल्या मिळकतींचा छायाचित्रणाद्वारे शोध घेणेसाठी जिनेसेस इंटरनॅशनल कॉर्पोरेशन लि. [Genesys International Corporation Ltd.] यांचेशी करार करणेबाबत मंजुरीकरीता स्थायी समितीपुढे प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १२ दिनांकः– १८/५/२०११

सुचकाचे नाव :– श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :– श्री.बी.बी. मोरे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार शहरात अस्तित्वात असलेल्या मिळकतींचा आधुनिक मशिन छायाचित्रणाद्वारे शोध घेणेसाठी अभिकर्ता नेमण्याकामी न्युनत्तम दराचे निविदाकार जिनेसेस इंटरनेशनल कॉर्पोरेशन लिमिटेड यांच्याशी संविदेस मान्यता देत नाही.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ३ :–** उल्हासनगर महानगरपालिकेच्या हद्दीतील नोपार्किंग जागेवर उभ्या असलेल्या दुचाकी चार चाकी व अवजड वाहने वाहतुक शाखेचे अधिकारी, ट्राफिक पोलिसामार्फत टोईंग वाहनाद्वारे उचलुन दंड वसुली करणेकामी मे. केस्ट्रल इंन्फ्रस्ट्रक्चर प्रा.लि., उल्हासनगर या सर्वात जास्त दराचे निविदाकाराशी संविदेस मान्यता देणे.

---

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः–या प्रस्तावाबाबत स्पष्टीकरण कोण करेल? कोणत्या हिशोबाने हा प्रस्ताव आणला आहे?

श्री. दिपक चिमनकारे, वाहन विभाग प्रमुख :–वाहतुक पोलिसांनी महापालिकेकडे याबाबत मागणी केली होती. त्यानुसार आम्ही असा विचार केला की, याबाबत निविदा काढावी आणि त्यातुन महापालिकेला काही रॉयल्टी मिळु शकेल आणि त्यातुन महापालिकेच्या उत्पन्नात भर पडेल.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–वाहन पार्कींगसाठी आपणाकडे जागा कुठे आहे? वाहनपार्किंगसाठी लोकांना जागा उपलब्ध करुन दया नाहीतर हा मुद्दा आमच्या माथी मारला जाईल. आपण पार्किंगसाठी जागा उपलब्ध करुन दिली आहे का? पार्किंगसाठी जागा उपलब्ध करुन देत असाल तरच आपणांस ना पार्किंगमध्ये असलेली वाहने उचलण्याचा अधिकार आहे. परंतु आपण पार्किंगसाठी जागाच उपलब्ध करुन दिली नसल्याने अशी रस्त्यावर पार्क केलेली वाहने उचलण्याचा आपणांस कोणताही अधिकार नाही यासाठी हा प्रस्ताव नाकारला जावा.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :–व्यापारी लोक आपली वाहने कुठे उभी करणार?

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–यासाठी हा प्रस्तावही नाकारला जावा. पार्किंगसाठी अगोदर जागा उपलब्ध करुन दया. त्यानंतरच ना पार्किंगमध्ये असलेली वाहने उचला आणि या प्रस्तावामुळे महापालिकेस मिळणारा महसुल

फार मोठा काही नाही आहे. पाहिजे तर आमचे मानधन कपात करुन घ्या. आणि तरीही काही निधी कमी पडत असेल तर किती रक्कम कमी पडते ते सांगा.

<u>काही सदस्य :—</u>हा प्रस्ताव नाकारला जावा.

<u>सभापती, श्री. लाल पंजाबी:—</u>सदरचा विषय नाकारण्याबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ३ :—** उल्हासनगर महानगरपालिकेच्या हद्दीतील नोपार्किंग जागेवर उभ्या असलेल्या दुचाकी चार चाकी व अवजड वाहने वाहतुक शाखेचे अधिकारी, ट्राफिक पोलिसामार्फत टोईंग वाहनाद्वारे उचलुन दंड वसुली करणेकामी मे. केस्ट्रल इंन्फ्रस्ट्रक्चर प्रा.लि., उल्हासनगर या सर्वात जास्त दराचे निविदाकाराशी संविदेस मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

महापालिकेतील वाहन विभागाने दिनांक ९/०७/२०१० च्या दै.धनुष्यधारी, दै.लोकनायक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द केलेल्या जाहिर सुचनेनुसार खाली नमुद केलेल्या उत्पादकांनी/अधिकृत पुरवठादारांनी विहित नमुन्यात कोरे निविदा संच नियमानुसार विकत घेऊन विहित वेळेत सिलबंद निविदा सादर केल्या.

१) में.केस्ट्रल इंन्फ्रस्ट्रक्चर प्रा.लि, उल्हासनगर
२) में.शुभम कंस्ट्रक्शन, उल्हासनगर
३) में.किशीन ट्रेडर्स, भिवंडी
४) में.के.गुंजन, उल्हासनगर
५) में.नव भारत टोंईग, उल्हासनगर

दिनांक १९/७/१० रोजी प्राप्त झालेल्या मोहरबंद निविदा दिनांक २७/७/१० रोजी सायंकाळी ठिक १६:०० वाजता उप आयुक्त (वाहन) यांच्या कार्यालयात मा. मुख्यलेखा अधिकारी, मा. मुख्यलेखा परिक्षक, वाहन विभागप्रमुख व निविदाकार यांच्या समक्ष उघडते वेळी एका निविदाकाराने लाखेने सिलबंद नसलेल्या निविदा उघडण्यात येऊ नये असा लेखी आक्षेप घेतला व त्याबाबत त्यांनी कोर्टात दावा दाखल केला व कोर्टाने सदर निविदा सुचनेप्रमाणे आलेल्या निविदा विचारात घेऊ नये व त्या उघडून पुढील कार्यवाही दाव्याचा निकाल लागेपर्यंत करू नये असा आदेश केला.यास्तव वरिल निविदा त्यावेळेस उघडता आल्या नाहीत.

परंतु आता सदर में.नव भारत टोंईग, उल्हासनगर ने सदर कोर्टात दाखल केलेला दावा मागे घेतला व कोर्टाने सदर दावा रद्द केल्याने सदर निविदा दिनांक २३/३/२०११ रोजी सायंकाळी ठिक १५:०० वाजता उप आयुक्त (वाहन) यांच्या कार्यालयात मा. मुख्यलेखा अधिकारी, मा. मुख्यलेखा परिक्षक, वाहन विभागप्रमुख व निविदाकार यांचे समक्ष लिफाफा कं. १ उघडण्यात आला.

लिफाफा कं. १ मध्ये में.नव भारत टोंईग, में.केस्ट्रल इंन्फ्रस्ट्रक्चर प्रा.लि, उल्हासनगर, में.किशीन ट्रेडर्स, भिवंडी पात्र झाल्याने सदर तिन्ही निविदाकारांचा लिफाफा कं. २ उघडण्यात आला व त्याचा अहवाल खालीलप्रमाणे आहे.

| अनु. क्र | निविदाकाराचे नाव | महापालिकेस मिळणारी विभागाने ठरविलेली वार्षिक रॉयल्टी रक्कम | निविदाकाराने भरलेली रॉयल्टी रक्कम |
|---|---|---|---|
| १) | में.नव भारत टोंईग, उल्हासनगर | | रू. १,२१,०००/— |

| | | | |
|---|---|---|---|
| २) | में.केस्ट्रल इंन्फ्रस्ट्रक्चर प्रा.लि, उल्हासनगर | रू. १,३०,०००/— | रू. १,३३,३३३/— |
| ३) | में.किशीन ट्रेडर्स, भिवंडी | | रू. ६५,०००/— |

वरिल अहवालानुसार में.केस्ट्रल इंन्फ्रस्ट्रक्चर प्रा.लि, उल्हासनगर यांची सर्वात जास्त महापालिकेस मिळणारी रू. १,३३,३३३/— एवढी वार्षिक रॉयल्टी रक्कम मंजुर होणेस गोषवारा मा.स्थायी समिती पुढे निर्णयास्तव सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १३ दिनांकः— १८/५/२०११

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. चंद्रशेखर यादव

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिकेच्या हद्दीतील नोपार्किंग जागेवर उभ्या असलेल्या दुचाकी चार चाकी व अवजड वाहने वाहतुक शाखेचे अधिकारी, ट्राफिक पोलिसामार्फत टोईंग वाहनाद्वारे उचलुन दंड वसुली करणेकामी मे. केस्ट्रल इंन्फ्रस्ट्रक्चर प्रा.लि., उल्हासनगर या अधिकतम दराचे निविदाकाराशी संविदेस मान्यता देत नाही.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्रमांक. ४ वाचून दाखवितात.

---

विषय क्र. ४ :—''जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय पुर्ननिर्माण अभियानाअंतर्गत'' नागरीकांच्या अस्तित्वातील नळजोडण्या नव्या पाईप लाईनवर विनामुल्य जोडणे व नविन नळजोडण्या सवलतीच्या दरामध्ये देणे या योजनेमध्ये ग्राहकांकडुन अर्ज भरुन घेणे, कागदपत्र गोळा करणे व सादर करणे इत्यादी कामे परवानाधारक प्लंबरकडुन करुन घेण्याप्रयोजनार्थ कामाचा मोबदला म्हणुन रु. १०० /— इतके नाममात्र शुल्क नागरीकांकडुन आकारण्यास मान्यता देणे.

---

सदस्य श्री.बी.बी. मोरे :—हा प्रस्ताव कुणी आणला आहे, अदयाप काही झोपडपट्टयांमध्ये जलवाहिन्या टाकलेल्या नाहीत. गोषवा—यामध्ये तुम्ही लिहिले आहे की, जुन्या जलवाहिनीवरुन नविन जलवाहिनीवर नळजोडण्या करुन दिल्या जातील वगैरे.

श्री. एम.जी. गिरगांवकर, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठाः—जेथे रस्ते अरुंद आहे तेथे नव्याने जलवाहिन्या टाकण्याचे काम बाकी आहे.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :—काही ठिकाणी नविन जलवाहिन्या टाकल्या आहेत ना? मग त्या ठिकाणी जुन्या जलवाहिनीवरील नळजोडण्या नविन जलवाहिनीवर स्थानांतरीत का केल्या नाहीत? महासभेत पारीत झालेल्या ठरावामध्ये या प्रकारची अट समाविष्ट आहे ना? मग हा प्रस्ताव स्थायी समितीपुढे आपण कसा आणला?

श्री. एम.जी. गिरगांवकर, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा:—जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय पुर्ननिर्माण योजनेअंतर्गत नविन नळजोडणी मंजुरी करीता विशेष मोहिमेस महासभेने ठराव क्र. ६१, दिनांक २८/१२/२०१० अन्वये मंजुरी दिली आहे. या मोहिमे अंतर्गत ग्राहकांना त्यांची जुन्या वाहिनीवरील वैध नळजोडणी नविन जलवाहिनीवर विनामुल्य बदलुन देण्यात येणार आहे.तसेच ग्राहकांना जुने नाव बदलुन नविन नाव लावुन घ्यायचे असल्यास नावात बदल विनामुल्य करुन देण्यात येणार आहे. तसेच अस्तित्वातील नळजोडणी कायम स्वरुपी खंडीत करावयाची असल्यास ती विनामुल्य खंडीत करुन देण्यात येणार आहे. याचबरोबर नविन जलवाहिनीवर जोडणी साहित्य व जलमापकासह नविन जोडणी सवलतीच्या दरात देण्यात येणार आहे. याकामी अर्ज वितरीत करुन अर्ज भरुन घेणे, अर्जांची छाननी करणे प्रत्यक्ष जागेवर पाहणी करुन नविन नळजोडणी मंजुर करणे अथवा जुनी नळजोडणी नविन पाईप लाईवर बदलण्याची मंजुरी देणे, नकाशा काढणे इत्यादी कामे पुर्वीपासुन करीत असलेले परवानाधारक, प्लंबर मार्फत करुन घेण्यासाठी १०० रुपये इतके नाममात्र शुल्क आकारण्यात येणार आहे.

सदस्य श्री. जीवन इदनानी :—नाही, नाही हे सर्व काम निशुल्क केले जावे.

श्री. एम.जी. गिरगांवकर, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा:—हे जे १०० रुपये शुल्क आहे ते महापालिका घेणार नसुन प्लंबर घेणार आहे. व ही सर्व कामे करुन देईल.

सदस्य श्री. जीवन इदनानी :—नाही, नाही, कोणत्याही प्रकारचे शुल्क घेतले जावु नये.

सदस्य श्री. अंकुश म्हस्के :— नळजोडणी करुन देण्यासाठी प्लंबर लोकांकडुन अडीच अडीच, तीन तीन हजार रुपये घेतात आणि त्यामध्ये मग आमचेही नाव खराब होईल. यासाठी हा प्रस्ताव नाकारला जावा.

काही सदस्य :—ठिक आहे, हा प्रस्ताव नाकारला जावा.

सभापती, श्री. लाल पंजाबी:— सदरचा विषय नाकारण्याबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ४ :—** ''जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय पुर्ननिर्माण अभियानाअंतर्गत'' नागरीकांच्या अस्तित्वातील नळजोडण्या नव्या पाईप लाईनवर विनामुल्य जोडणे व नविन नळजोडण्या सवलतीच्या दरामध्ये देणे या योजनेमध्ये ग्राहकांकडुन अर्ज भरुन घेणे, कागदपत्र गोळा करणे व सादर करणे इत्यादी कामे परवानाधारक प्लंबरकडुन करुन घेण्याप्रयोजनार्थ कामाचा मोबदला म्हणुन रु. १०० /— इतके नाममात्र शुल्क नागरीकांकडुन आकारण्यास मान्यता देणे.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये " जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय पुर्ननिर्माण अभियाना अंतर्गत " पाणी पुरवठा वितरण व्यवस्था टाकणे व नवीन उंच जलकुंभ बांधण्याचे काम सध्या सुरु असून हे काम डिसेंबर २०११ पर्यत पुर्ण होणे अपेक्षित आहे. ज्या भागात जलकुंभ बाधकाम पुर्ण होईल व वितरण वाहिनीचे काम वितरण विहिनीच्या चाचणीसह पुर्ण होईल, त्या भागातील अस्तित्वातील जुन्या वितरण वाहिनीवरील वैध नळजोडण्या काढुन नवीन जलवाहिनीवर जलमापकासह विनामुल्य जोडुन देणे. तसेच नवीन जलवाहिनीवर जोडणीसाहित्य व जलमापकासह नविन नळजोडणी सवलतीच्या दरात देणे, यासाठी मा.महासभेने ठराव क्र. ६१ दि. २८/१२/२०१० अन्वये " जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय पुर्ननिर्माण अभियाना अंतर्गत नविन नळजोडणी मंजुरीकरिता विशेष मोहिमेस " मंजूरी दिली आहे. या माहिमे अंतर्गत खालील कामे करण्यात येतील.

१) ग्राहकांना त्यांची जुन्या वाहिनीवरील वैध नळ जोडणी नवीन जलवाहिनीवर जलमापकासह विनामुल्य बदलून देण्यात येईल.

२) ग्राहकांना जूने नाव बदलुन नळजोडणीवर नवीन नाव लावावयाचे असल्यास नावात बदल विनामुल्य करुन देण्यात येईल.

३) अस्तित्वातील नळजोडणी कायमस्वरुपी खंडीत करावयाची असल्यास ती विनामुल्य करुन देण्यात येईल.

४) नवीन जलवाहिनीवर जोडणी साहित्य व जलमापकासह नवीन नळजोडणी सवलतीच्या दरात देण्यात येईल.

यासाठी विहित नमुन्यातील अर्ज महानगरपालिका क्षेत्रामध्ये सर्व नागरिकांना वितरित करण्यात येत आहेत. वॉर्ड क्र. १३,४३,६०,६८ व ३० मध्ये सुमारे १२००० अर्ज वितरीत करण्यात आले आहेत. हे अर्ज भरुन पाणी पुरवठा विभागात परत करण्यासाठी दि. ३१/०३/२०११ ही मुदत ठेवण्यात आली होती. परंतु यापैकी परिपुर्ण भरलेले जवळपास १००० अर्ज पाणी पुरवठा विभागात नागरिकांकडुन प्राप्त झाले आहेत. त्यामुळे या मोहिम अंतर्गत अर्ज भरण्याची अंतिम मुदत आता वाढवून दि. ३१/०७/२०११ अशी प्रस्तावित करण्यात आली आहे. सध्या पाणी पुरवठा विभागाकडे उपलब्ध कर्मचारी अपुरे असुन ते दैनंदिन देखभाल व दुरुस्तीच्या कामामध्ये व्यस्त असतात. तसेच हे काम करण्यासाठी देयक उप विभागाकडे उपलब्ध असलेल्या कर्मचारी वर्गही अपूरा आहे. अर्ज वितरित करुन पुर्ण भरलेले अर्ज छाननी करणे, प्रत्यक्ष जागेवर पाहणी करुन नवीन नळजोडणी मंजुर करणे अथवा जुनी नळ जोडणी नवीन पाईप लाईनवर बदलण्याची मंजुरी देणे.नकाशा काढणे इ. कामे करण्यासाठी उपलब्ध कालावधी व कर्मचारी अंत्यत अपूरे आहेत. अस्तित्वातील सुमारे १,५०,००० मालमत्ताची संख्या पाहाता हे काम उपलब्ध कर्मचा—यांकडुन विहित कालमर्यादेत करुन घेणे शक्य होईल, असे वाटत नाही. तसेच ग्राहकांना अर्ज भरणे, अर्ज सादर करण्यासाठी प्रवास भाडे, लागणारा वेळ, करारनामा टंकलिखीत करणे इ. बाबीमध्ये अडचणी येत असुन आर्थिक नुकसान होत आहे व शारिरीक श्रमही पडत आहे. महिला व जेष्ठ नागरिकांना याचा जास्त त्रास होत आहे.

वरील बाबींचा विचार करता पुर्वीपासुन असे काम करत असलेल्या व महानगरपालिकेकडे नोंदणीकृत असलेल्या परवानाधारक प्लंबरमार्फत नळजोडणीचे अर्ज नागरिकांना वितरित करुन घरोघरी जावुन नागरिकांकडुन पुर्णपणे भरुन घेवुन व्यवस्थित छाननीकरुन, आवश्यक कागदपत्रे व नकाशासह पाणी पुरवठा कार्यालयाकडे सादर करुन घेतल्यास विहित कालमर्यादेत पाणी पुरवठा कार्यालयामार्फत अर्जाची छाननी होवुन ग्राहकांना नळजोडण्या देणे सोईचे होईल.

सदर नोंदणीकृत परवाना धारक प्लंबरांचा चांगला जनसंपर्क असुन गेली कित्येक वर्ष काम केल्याने त्यांना सदरच्या कामाचा अनुभव आहे. या करिता त्यांनी केलेल्या कामाचा मोबदला म्हणून रु. १००/— इतके नाममात्र शुल्क (करारनामा शुल्क व झेरॉक्स सोडुन) नागरिकांकडुन आकारण्यास परवानगी देण्याचे प्रस्तावीत करण्यात येत आहे.यामुळे महानगरपालिकेवर कोणत्याही प्रकारचा आर्थिक बोजा न पडता विहित कालमर्यादेत हे काम व्यवस्थित पुर्ण करणे शक्य होईल. करिता हे काम परवानाधारक प्लंबरना देण्यास व कामाचा मोबदला म्हणून रु. १००/— इतके नाममात्र शुल्क (करारनामा शुल्क व झेरॉक्स सोडुन) नागरिकांकडुन आकारण्यास परवानगी देण्याचा प्रस्ताव मंजुरी मिळणेसाठी मा. स्थायी समितीच्या पटलावर सादर करीत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १४ दिनांक:— १८/५/२०११

सुचकाचे नाव :— श्री. जीवन इदनानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. सुंदर मंगतानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार ''जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय पुर्ननिर्माण अभियानाअंतर्गत'' नागरीकांच्या अस्तित्वातील नळजोडण्या नव्या पाईप लाईनवर विनामुल्य जोडणे व नविन नळजोडण्या सवलतीच्या दरामध्ये देणे या योजनेमध्ये ग्राहकांकडुन अर्ज भरुन घेणे, कागदपत्र गोळा करणे व सादर करणे इत्यादी कामे परवानाधारक प्लंबरकडुन करुन घेण्याप्रयोजनार्थ कामाचा मोबदला म्हणुन नागरीकांकडुन रु. १००/— इतके नाममात्र शुल्क आकारण्यास मान्यता देत नाही.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ५ :–**महापालिका सेवेतील लाभार्थी कर्मचा–यांना गणवेश पुरविणेकामी प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणे.

---

**सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–**हा गोषवारा कोणाचा आहे? कोणत्या विभागाचा आहे? काय लिहिले आहे ते काही दिसत नाही. बाकीचे गोषवारे पहा कसे आहेत?

**श्री. सुरेश चंदने, लिपिक, भांडार :–**टोनर संपलेला असल्याने या गोषवा–याची प्रिंट पुसट आलेली आहे. नविन टोनरची नागरी सुविधा केंद्राकडे मागणी केलेली आहे.

**काही सदस्य :–**पास–पास......

**सभापती, श्री. लाल पंजाबी:–**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ५ :–** महापालिका सेवेतील लाभार्थी कर्मचा–यांना गणवेश पुरविणेकामी प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिकेतील विविध विभागातील सेवेत असलेल्या लाभार्थी कर्मचा–यांना आवश्यक त्या रंगाचे गणवेश जसे पुरूष कर्मचारी यांना शर्ट, पेन्टपिस आणी महिला कर्मचारी यांना साडी, पेटीकोट, ब्लाऊजपिस इत्यादी नगरपालिका ठराव क्र. २८३ दिनांक १५/०६/९४ अन्वये प्रत्येक वर्षी खाली दिलेल्या विविरणानुसार वाटप करावे लागते.यापुर्वी सन २००९ मध्ये कर्मचा–यांना गणवेश वाटप करण्यात आले होते.

| अ. क्र | पदनाम | कपडयाचा रंग | प्रत्येकी कापड | कर्मचा–यांची संख्या | एकूण कापड |
|---|---|---|---|---|---|
| १ | मजुर, हेल्पर, वॉलमन, झारीवाला– २८७<br>माळी –३०<br>सुरक्षा रक्षक – ८४<br>कॅटल कॅच्चर – ०४<br>सुतार – ०<br>गवंडी – १०<br>जोडारी – ०९<br>पंपचालक – १५<br>मिटर दुरूस्ती – ०२<br>रंगारी – ०१<br>तारतंत्री – ३६<br>विजतंत्री – ०८<br>विद्युतमददनीस – ४९ | खाकी | ६.५ मीटर प्रमाणे २ ड्रेसचे कापड | ५३५ | ३४७७.५० मिटर |
| २ | सफाई कामगार (पुरूष) –७४५ | खाकी | ९.७५ मीटरप्रमाणे ३ ड्रेसचे कापड | ७४५ | ७२६३.७५ मिटर |
| ३ | अग्निशमन कर्मचारी अधिकारी<br>उप–अग्निशमन अधिकारी – ०२<br>लिडिंग फायरमॅन – ११<br>फायरमॅन – २२<br>वाहन चालक – ०९ | पांढरा शर्टींग | ५ मीटर प्रमाणे २ ड्रेसचे कापड | ४४ | २२० मिटर |
| | अग्निशमन कर्मचारी अधिकारी<br>उप–अग्निशमन अधिकारी – ०२ | नेव्ही ब्लू पॅन्ट | २.५ मीटर २ ड्रेसचे कापड | ४४ | ११० मिटर |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | लिडिंग फायरमॅन – ११<br>फायरमॅन – २२<br>वहन चालक – ०९ | | | | |
| ४ | शिपाई – ८८<br>बिलसर्वेअर – ०६<br>वाहन मदतनीस – ०४ | पांढरा शर्टींग | ५ मिटर प्रमाणे<br>२ ड्रेसचे कापड | ९८ | ४९० मिटर |
| | शिपाई – ८८<br>बिलसर्वेअर – ०६<br>वाहन मदतनीस – ०४ | पांढरा सुटींग | २.५<br>मीटर<br>२ ड्रेसचे कापड | ९८ | २४५ मिटर |
| ५ | आरोग्य निरिक्षक – १७ | पांढरा शर्टींग | २.५<br>मीटर प्रमाणे<br>३ ड्रेसचे कापड | १७ | १२७.५० मिटर |
| | | पांढरा सुटींग | ३.७५<br>मीटर प्रमाणे<br>३ ड्रेसचे कापड | १७ | ६३.७५ मिटर |
| ६ | आरोग्य मुकादम – ९० | नेव्ही ब्लू<br>पॅन्टे | ३.७५<br>मीटर प्रमाणे<br>३ ड्रेसचे कापड | ९० | ३३७.५० मिटर |
| | | स्काय ब्लू शर्ट | ७.५<br>मीटर प्रमाणे<br>३ ड्रेसचे कापड | ९० | ६७५ मिटर |
| | मिस्त्री (सा.बा.वि) – १३<br>मुकादम (सा.बा.वि)– ५४ | नेव्ही ब्लू<br>पॅन्टे | २.५मीटर प्रमाणे<br>२ ड्रेसचे कापड | ६७ | १६७.५० मिटर |
| | | स्काय ब्लू शर्ट | ५ मीटर प्रमाणे<br>३ ड्रेसचे कापड | ६७ | ३३५ मिटर |
| ७ | सफाई मुकादम<br>(महिला) | साडी.सफेद<br>ब्राऊन बॉर्डरसह<br>५.५ मी. | प्रत्येकी ३ साडया<br>प्रमाणे | ०४ | १२ नग |
| | | पेटीकोट कापड<br>पांढरा | ५ मिटर प्रमाणे | ०४ | २० मिटर |
| | | ब्लाउज<br>पीस | ०३ मिटर प्रमाणे | | १२ मिटर |
| ८ | सफाई कामगार<br>(महिला) | साडी निळी डार्क<br>निळया बॉर्डरसह<br>५.५ मी. | प्रत्येकी ३ साडया<br>प्रमाणे | ३९३ | ११७९ नग |
| | सफाई कामगार<br>(महिला) | साडी निळी डार्क<br>निळया बॉर्डरसह<br>८.२ मी. | प्रत्येकी ३ साडया<br>प्रमाणे | ७५ | २२५ नग |
| | | पेटीकोट कापड<br>निळा | ५ मिटर प्रमाणे | ३९३ | १९६५ मिटर |
| | | ब्लाउज<br>पीस निळा | ०३ मिटर प्रमाणे | ४६८ | १४०४ मिटर |
| ९ | मजुर (सा.बा.वि)<br>(महिला) | साडी निळी डार्क<br>निळया बॉर्डरसह<br>५.५ मी. | प्रत्येकी २ साडया<br>प्रमाणे | ८० | १६० नग |
| | | पेटीकोट कापड<br>निळा | ५ मिटर प्रमाणे | ८० | ४०० मिटर |
| | | ब्लाउज<br>पीस निळा | ०२ मिटर प्रमाणे | ८० | १६० मिटर |
| १० | सुरक्षा रक्षक<br>(महिला) | खाकी साडी<br>५.५. मिटर<br>काळया बॉर्डरसह<br>साडी मीटर | प्रत्येकी २ साडया<br>प्रमाणे | ०२ | ०४ नग |
| | | पेटीकोट कापड<br>खाकी | ५ मिटर प्रमाणे | ०२ | १० मिटर |
| | | ब्लाउज<br>पीस खाकी | ०२ मिटर प्रमाणे | ०२ | ०४ मिटर |
| ११ | महिला कर्मचारी<br>शिपाई+बिल – २३<br>कॅटल कॅचर–१<br>माळी – १<br>विद्युत मदतनीस – २ | सफेद साडी<br>५.५. मिटर<br>ब्राऊन बॉर्डरसह | प्रत्येकी २ साडया<br>प्रमाणे | २७ | ५४ नग |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | पेटीकोट कापड सफेद | ५ मिटर प्रमाणे | २७ | १३५ मिटर |
| | | ब्लाउज पिस सफेद | ०२ मिटर प्रमाणे | २७ | ५४ मिटर |

## गोषवारा

| अ. क्र. | कपडयाचा रंग | सन २०११–१२ साठी लागणारे एकुण कापड | मागील वर्षातील शिल्लक कापड | सन २०११–१२ साठी मागवावे लागणारे कापड. | अंदाजीत दर प्रती मिटर | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | खाकी कापड | १०७४१.२५ मिटर | १००० मिटर | ९७४१.२५ मिटर | ३००/– | २९२२३७५/– |
| २ | सफेद कापड शर्टींग | ८३७.५० मिटर | निरंक | ८३७.५० मिटर | २००/– | १६७५००/– |
| ३ | सफेद कापड शुर्टींग | ३०८.७५ मिटर | निरंक | ३०८.७५ मिटर | ३००/– | ९२६२५/– |
| ४ | स्काय ब्लू शर्टींग | १०१० मिटर | निरंक | १०१० मिटर | २००/– | २०२०००/– |
| ५ | नेव्ही ब्लू सुटिंग | ६१५ मिटर | निरंक | ६१५ मिटर | ३००/– | १८४५००/– |
| ६ | साडया निळया ६ वारी | १३६४ नग | निरंक | १३६४ नग | ४००/– | ५४५६००/– |
| ७ | साडया निळया व पांढ–या ९ वारी | २०० नग | | २०० नग | ६००/– | १२००००/– |
| ८ | साडया सफेद ६ वारी | ६६ नग | निरंक | ६६ नग | ४००/– | २६४००/– |
| ९ | साडया खाकी ६ वारी | ०४ नग | निरंक | ०४ नग | ४००/– | १६००/– |
| १० | पेटीकोट कापड निळा | २२४० मिटर | निरंक | २२४० मिटर | ८०/– | १७९२००/– |
| ११ | पेटीकोट कापड सफेद | १५५ मिटर | निरंक | १५५ मिटर | ८०/– | १२४००/– |
| १२ | पेटीकोट कापड खाकी | २० मिटर | निरंक | २० मिटर | ८०/– | १६००/– |
| १३ | ब्लाऊज पिस कापड निळा | १५६४ मिटर | निरंक | १५६४ मिटर | १००/– | १५६४००/– |
| १४ | ब्लाऊज पिस कापड सफेद | ६६ मिटर | निरंक | ६६ मिटर | १००/– | ६६००/– |
| १५ | ब्लाऊज पिस कापड खाकी | ०४ मिटर | निरंक | ०४ मिटर | १००/– | ४००/– |
| | | | | | एकुण | ४६,१९,२००/– |

१) सन २००८–०९ मध्ये वाटप करण्यात आलेल्या गणवेश कापड खरेदी बाबतचे सादरीकरणा बाबतची टिप्पणी दिनांक ०३/०५/२००७ रोजी सादर करण्यात आली होती. व गणवेश कापड २००९ मध्ये वाटप करण्यात आले होते. त्याची तफावत पाहता मधील कालावधी २ वर्षाचा आहे त्या दोन वर्षात अनेक कर्मचारी सेवानिवृत्त झाले त्यामुळे भांडार विभागात काही गणवेश कापड शिल्लक आहेत ते गणवेश कापड सन २०११–१२ मध्ये वाटप करताना सफाई कामगांराना ३ ड्रेस असल्यामुळे त्यातील १ ड्रेस जुने (शिल्लक राहिलेले कापड) गणवेश कापडाचा वाटप करण्यासाठी मान्यता मिळावी.

२) सन २०११–१२ साठी मागविण्यात येणारे गणवेश कापड हे सन २०१० च्या सेवा जेष्टता यादी अनुसार बनविण्यात आले आहे. त्यामुळे काही कर्मचारी गणवेश कापड येई पर्यन्त सेवानिवृत्त होणार आहेत तसेच काही कर्मचारी दिर्घकाळ रजेवर आहेत. त्याचा विचार करता चालु मागणीच्या १०% कापड कमी मागविण्यासाठी मान्यता मिळावी.

मा. आयुक्त सो. यांनी दिलेल्या मान्यतेनुसार उपरोक्त गणवेश कापड सुटींग व शर्टींग नावाजलेल्या कंपन्यांचे म्हणजेच रेमंड, एस कुमार, सियाराम इत्यादी खरेदी करण्यासाठी भांडार विभागास अंदाजे ४६,००,००००/– (शेचाळीस लाख) खर्च अपेक्षीत आहे. सदर खर्चाची तरतुद कर्मचारी गणवेश व इतर साहिंत्य खरेदी लेखा शिर्ष A-2 (8) मध्ये सन २०११–१२ वर्षासाठी रु ९०,००,०००/– तरतुद करण्यात आली असुन पुरेशी तरतुद शिल्लक असल्यामुळे उपरोक्त खर्च भागविता येईल.

तरी सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीसमोर प्रशासकींय व वित्तींय मान्यता मिळणेस्तव सविनय सादर.

स्थायी समिती ठराव क्र. १५ दिनांकः– १८/५/२०११

सुचकाचे नाव :– श्रीमती ज्योती माने

अनुमोदकाचे नाव :– डॉ. निना नाथानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणांमुळे गणवेश कापड वाटप प्रयोजनार्थ सुचविलेल्या दोन अटींप्रमाणे महापालिका सेवेतील लाभार्थी कर्मचा–यांना गणवेश पुरविणे कामी रू. ४६,००,०००/ च्या प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ६ :–** आंतरराष्ट्रीय हॅण्डबॉल स्पर्धेत भाग घेण्या प्रयोजनार्थ तीन खेळाडुंना प्रत्येकी रुपये ५०,०००/– आर्थिक मदत देणे.

---

काही सदस्य :–पास–पास……

सभापती, श्री. लाल पंजाबी:–सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ६ :–** आंतरराष्ट्रीय हॅण्डबॉल स्पर्धेत भाग घेण्या प्रयोजनार्थ तीन खेळाडुंना प्रत्येकी रुपये ५०,०००/– आर्थिक मदत देणे.

प्रस्तावना

१) श्री. तेजसिंग चतरसिंग बोहरा, २) कुमारी वैशाली फाटे, ३) स्टूनी पील्ले, यांची मुंबई हॅन्डबॉल असोसिएशन तर्फे माहे जुलै, २०११ या कालावधीत बेल्झीयम व स्वीडन या देशामध्ये होणा–या अंतरराष्ट्रीय हॅन्डबॉल स्पर्धेमध्ये खेळाडु हे म्हणुन निवड करण्यात आलेली आहे.

उपरोक्त तिन्ही खेळाडू हे उल्हासनगर महानगरपालिका हद्दीतील असून त्यांची आर्थिक परिस्थिती हलाकीची असल्यामुळे त्यांना महापालिकातर्फे आर्थिक मदत करण्यात यावी अशी विनंती करण्यात आलेली आहे. आंतरराष्ट्रीय हॅन्डबॉल स्पर्धेत भाग घेण्याकरीता प्रत्येक खेळाडूस ८५,०००/– रुपये ची मागणी मा. उप–महापौर, यांचेकडे केलेली आहे. महानगरपालिका अर्थसंकल्प २०१०–११ मधील इ. संकीर्ण अंतर्गत अनुक्रमांक ९ क्रिडा खर्च रुपये ५० लाख तरतुद असून

प्रत्येक खेळाडूस रुपये ५०,०००/— अदा करण्यासाठी मा. स्थायी समितीपुढे प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १६ दिनांकः— १८/५/२०११

सुचकाचे नाव :— श्री. प्रशांत धांडे

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती ज्योती माने

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार आंतरराष्ट्रीय हॅण्डबॉल स्पर्धेत भाग घेण्या प्रयोजनार्थ १) श्री. तेजसिंग चतरसिंग बोहरा, २) कुमारी वैशाली फाटे, ३) स्टूनी पील्ले या तीन खेळाडुंना प्रत्येकी रुपये ५०,०००/— आर्थिक मदत देण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ७ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ७ :—** महापालिका सेवेतील लाभार्थी कर्मचा—यांना सन २०११—१२ करीता रेनकोट, गमबुट,ॲकलबुट, कोल्हापुरी चप्पल पुरविणेकामी प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणे.

---

सदस्य श्री. प्रशांत धांडे :—पावसाळयामध्ये कोल्हापुरी चप्पल कशी वापरणार?

श्री. सुरेश चंदने, लिपिक, भांडार :—प्रत्येक वर्षी आपण कोल्हापुरी चप्पल देत असतो.

सदस्य श्री. प्रशांत धांडेः—पावसाळयामध्ये? पावसाळयानंतर तरी कामगार कोल्हापुरी चप्पल घालुन येतात काय? गमबुट घालुन येतात काय? गणवेशामध्ये कोणी कामावर येतो काय? माझ्या प्रभागात एक सुध्दा कामगार गणवेश घालुन कामावर येत नाही. यासाठी मला असे वाटते की, आपण हे साहित्य कामगारांना देता किंवा नाही हे काही कुणाला माहित नाही. महिला सफाई कामगार रंगीबेरंगी साडया नेसुन येतात त्यामुळे माहित पडत नाही की कोण कामगार आहे किंवा कोण मुकादम आहे. यासाठी मी आपणांस सांगु इच्छितो की, आपण जर त्यांना गणवेश पुरवत असाल तर या कामगारांनी गणवेश घालुनच कामावर आले पाहिजे. आणि त्यांना ज्या काही कोल्हापुरी चपला दिल्या जातात, आणि कोल्हापुरी चप्पल घालुन त्यांनी कामावर आले पाहिजे, महापालिकेमध्ये ती करकर वाजली पाहिजे.

सदस्य श्री. अंकुश म्हस्के :—पावसाळयात या चपला घरात पडुन राहतात त्यांना बुरसी येते.

काही सदस्य :—पास—पास......

सभापती, श्री. लाल पंजाबी:—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

विषय क्र. ७ :— महापालिका सेवेतील लाभार्थी कर्मचा—यांना सन २०११—१२ करीता रेनकोट, गमबुट,ॲकलबुट, कोल्हापुरी चप्पल पुरविणेकामी प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणे.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिकेतील विविध विभागातील आस्थापनेवर पात्र लाभार्थी कर्मचा—यांना महापालिकेव्दारे दर तीन वर्षातून एक वेळा रेनकोट, गमबूट वाटप करावे लागतात. तसेच सफाई कामगारांना प्रत्येक वर्षी कोल्हापुरी चप्पल व विद्युत विभागातील कर्मचा—यांना दोन वर्षातुन एक वेळ ॲकल बुट व रेनकोट वाटप करावे लागतात. यापुर्वी सन २००८—२००९ सालचे साहित्य २००९—१० मध्ये वाटप करण्यात आले होते.

सन २०११—२०१२ यावर्षात कर्मचा—यांना पावसाळया पुर्वी रेनकोट, गमबूट, ॲकलबुट तसेच कोल्हापुरी चप्पल वाटप करणे आवश्यक असल्याने सन २०११—२०१२ साली कर्मचा—यांसाठी अंदाजे २००० रेनकोट, १४०० गमबूट जोडया, १२०० जोडया कोल्हापुरी चप्पल तसेच विद्युत विभागाती कर्मचा—यांना ९३ जोडया ॲकल बुट कर्मचा—यांना वाटप करणे आवश्यक आहे.

सन २००९—१० मध्ये निविदे व्दारे डकबॅक कंपनीचे रेनकोट पुरषांनसाठी प्रती रेनकोट १०५०/— प्रमाणे, स्त्रीयांनसाठी प्रती रेनकोट ९५०/— प्रमाणे, ॲकल बुट प्रती जोडी ५५०/— प्रमाणे, कोल्हापुरी चप्पल पुरषांसाठी १७६/— प्रमाणे व स्त्रीयांसाठी १६६/— प्रमाणे तसेच गमबुट सन २००८—०९ मध्ये गमबूट ५६८/— प्रती जोडी प्रमाणे खरेदी करण्यात आले होते त्याच अंदाजाने कर्मचा—यांनसाठी लागणा—या साहिंत्य खरेदीचा अंदाज काढल्यास अंदाजे रुपये ३१,००,०००/— खर्च होणार आहे सदर खर्चाची तरतुद कर्मचारी गणवेश व इतर साहिंत्य खरेदी लेखा शिर्षAB A-2 (8) मध्ये सन २०११—१२ साठी रुपये ९०,००,०००/— लाखाची तरतुद करण्यात आली असुन पुरेशी तरतुद शिल्लक असल्यामुळे सदरचा खर्च भागविता येईल.

तरी उपरोक्त साहिंत्य जाहिर निविदे व्दारे खरेदी करण्यासाठी लागणा—या अंदाजीत खर्चास व सदर साहिंत्य खरेदी करण्यासाठी जाहिर निविदा मागविण्यासाठी तसेच सदर प्रस्ताव प्रशासकींय व वित्तीय मान्यतेसाठी मा. स्थायी समितीच्या मंजुरीसाठी सविनय सादर.

स्थायी समिती ठराव क्र. १७     दिनांक:— १८/५/२०११

सुचकाचे नाव :— श्री. प्रशांत धांडे

अनुमोदकाचे नाव :— डॉ. निना नाथानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार महापालिका सेवेतील लाभार्थी कर्मचा—यांना सन २०११—१२ करीता रेनकोट, गमबुट,ॲकलबुट, कोल्हापुरी चप्पल पुरविणेकामी रु. ३१,००,०००/— च्या प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

महापालिका सचिव :— विषय क्र. ८ वाचुन दाखवितात

विषय क्र. ८ :— उल्हासनगर शहरातील छोटी गटारे/नाले व कल्व्हर्ट सफाईसाठी व काढलेला गाळ /कचरा वाहतुकीसाठी आवश्यक मशिनरी व मनुष्यबळ पुरविणेकामी न्युनत्तम दराचे निविदाकाराशी संविदेस मान्यता देणे.

---

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :—</u>विषय क्र. ८ मनुष्यबळ पुरविणेबाबतचा आहे ना? प्रत्येक प्रभागात किती किती कामगार देत आहात?

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>विषय पत्रिकात विषय क्र. ८ वेगळा आहे. आणि गोषवाराप्रमाणे हा विषय क्र.९ आहे.

<u>सभापती, श्री. लाल पंजाबी:—</u>गोषवा—यामध्ये चुक आहे. विषय क्र. ८ व ९ चे गोषवारे मागे पुढे झाले आहे.

<u>महापालिका सचिव :—</u>विषय क्र. ८ उल्हासनगर शहरातील छोटी गटारे/नाले व कल्व्हर्ट सफाईसाठी व काढलेला गाळ /कचरा वाहतुकीसाठी आवश्यक मशिनरी व मनुष्यबळ पुरविणेकामी न्युनत्तम दराचे निविदाकाराशी संविदेस मान्यता देणे, असा आहे. तर विषय क्र. ९ पावसाळयापूर्वी प्रोक्लेन मशिनव्दारे छोटया मोठया नाल्यांची सफाई करणे व निघालेला गाळ डम्पंरव्दारे डम्पींग ग्राऊडवर वाहतुक करणेकामी न्युनतम दराने निविदाकाराशी संविदेस मान्यता देणे, असा आहे.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>पावसाळयापुर्वी नाले सफाई कामी प्रत्येक प्रभागात १०,१० कामगार दिले पाहिजेत.

<u>सदस्य श्री.जीवन इदनानी :—</u>या प्रस्तावास माझा विरोध आहे. पावसाळयापुर्वी नाले सफाईसाठी प्रत्येक प्रभागात १०,१० कामगार दिवाळीपर्यंतच्या कालावधीसाठी दिले पाहिजेत.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>होय, बरोबर आहे. १०,१० कामगार दिवाळीपर्यंतच्या कालावधीसाठी दिले पाहिजेत. आणि तसा सुधारीत गोषवारा घेवुन या.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :—</u>सुधारीत गोषवारा आणला जावा.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :—</u>पहिले आपण हा प्रस्ताव पारीत करु या. आणि नंतर १०,१० कामगारांची मागणी करु या.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>पहिले तर हा प्रस्ताव प्रशासकिय व वित्तीय मान्यतेसाठी आला पाहिजे होता. प्रत्येक वर्षी पावसाळयापुर्वी नाले सफाई होत असते. त्यानुसार हा प्रस्ताव एप्रिल महिन्यापुर्वीच स्थायी समितीपुढे यावयास पाहिजे होता.

<u>श्री. विनोद डवले, सहा. आयुक्त, अतिक्रमण :—</u>या कामासाठी हंगामी सफाई कामगार नेमण्यास उच्च न्यायालयाची स्थगित आदेश असल्याने याबाबतीत आम्ही विधी विभागाकडुन अभिप्राय मागविला होता. त्यांनी सांगितले की, हे नाले सफाईचे काम खाजगी संस्थेकडुन आपण करुन घेवु शकता, त्यानुसार नाल्यांची लांबी रुंदी आणि खोलीबाबत स्वच्छता निरिक्षकांकडुन माहिती घेवुन प्राकलन तयार केले आहे. आणि ते स्थायी समितीसमोर मंजुरीस्तव पाठविले होते. दरम्यानच्या कालावधीत स्थायी समिती सभापती महोदयांनी सांगितले की, याकामी निविदा काढुन संविदेस मान्यता मिळविण्याचा प्रस्ताव स्थायी समितीपुढे आणा. जेसीबी व फोटोग्राफी वगैरे कामाच्या तीस दिवसाच्या हिशोबाने आम्ही प्राकलन तयार केले आहे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>मागील वर्षी हंगामी सफाई कामगार नेमुन आपण हे काम करुन घेतले होते त्यावेळी किती पगार दिला होता, प्रतिदिन किती पगार दिला होता.

<u>श्री. विनोद डवले, सहा. आयुक्त, अतिक्रमण :—</u>१४० रुपये प्रति दिन पगार देण्यात आला होता. आता हे प्राकलन डीएसआर दरानुसार तयार केले आहे.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—त्यावेळी १४० रुपये दरावर कामगार मिळत नव्हते. दहा, दहा कामगारांऐवजी जेमतेम चार,चार, पाच, पाच कामगार कामावर येत होते. आता आपण यांना डीएसआर दरानुसार पगार देत आहात. त्यावेळी डएसआर दरानुसार पगार दिला असता तर मोठया प्रमाणावर कामगार मिळु शकले असते.

सदस्य श्री. जीवन इदनानी :—आम्हांला २०,२० कामगार पाहिजेत. मागील वर्षी आपण २०,२० कामगार दिले होते.

श्री. विनोद डवले, सहा. आयुक्त, अतिक्रमण :—जे नाले साफ करायचे आहे त्यांची लांबी, रुंदी आणि खोली विचारात घेवुन प्राकलन तयार केले आहे.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—हे काम २०० कामगारांनी होवु शकेल काय?

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—आपण जबाबदारी घेता का?

सदस्य श्री. प्रशांत धांडे:—आज सुध्दा रिमझिम पाउस पडला आहे. शहरातील नाले कच—याने भरले आहे. ते साफ होत नाहीत. आणि पावसाळयात नाले सफाईसाठी माणसे मिळत नाहीत.

सदस्य श्री. जीवन इदनानी:—यासाठीच प्रत्येक प्रभागात २०,२० कामगार दिले जावेत आणि त्या हिशोबाने प्रस्ताव पारीत केला जावा.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—परंतु जी निविदा काढण्यात आलेली आहे, ती आपण दसपट कशी करु शकतो? यासाठी अर्थसंकल्पात तीन कोटी रुपयाची तरतुद आहे काय? आपण हे कसे करु शकतो?

सदस्य श्री. जीवन इदनानी:—तर मग आपले म्हणणे आहे की, लोकांनी पाण्यात बुडायचे काय? चुक कुणाची आहे.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—यामध्ये चुक कुणाची आहे?

सदस्य श्री. जीवन इदनानी :—नाले सफाई करुन घेणे आयुक्तांचे काम आहे, ते काम आमचे थोडे आहे. जेथे कामाची आवश्यकता आहे, त्याबाबतीत सांगितले जाते की, असे नाही, तसे आहे, हे होवु शकणार नाही. आणि जेथे आवश्यकता नाही तेथील कामाचे प्रस्ताव पारीत केले जातात.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—दरवर्षी पावसाळयापुर्वी नाले सफाई केली जाते हे माहित असतांनाही नाले सफाईसाठीची निविदा जी एप्रिल महिन्यामध्ये स्थायी समिती सभागृहापुढे मंजुरीस यावयास पाहिजे होती ती आता मे महिन्यामध्ये सभागृहापुढे येत आहे.

सदस्य श्री. अंकुश म्हस्के :—प्रभागामध्ये तीन सफाई कामगार कामावर येतात बरेचसे सफाई कामगार लग्न कार्यासाठी आपापल्या गावी गेले आहेत.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :—माझ्या प्रभागामध्ये रेल्वेचा एक मोठा नाला आहे तो पुर्ण भरला आहे. वर्षभर तो साफ केला जात नाही. त्यामुळे पाणी रस्त्यावर येत आहे.

श्री. विजयकुमार म्हसाळ, उप—आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :—मागील वर्षी नाले सफाईसाठी नेमलेल्या हंगामी सफाई कामगारांना १४० रुपये रोज दिला जात होता. कामगारांचे कमाल वेतनाबाबतची माहिती सहा. कामगार आयुक्त यांच्याकडुन मार्च महिन्याच्या शेवटी आपणाकडे प्राप्त झाली आहे, त्यामुळे त्यानुसार आकडेमोड करुन प्रस्ताव सादर करण्यास उशिर झाला आहे. तसेच रोजंदारीवर कामगार नेमण्यास मा. उच्च न्यायालयाचे निर्बंध असल्यामुळे नाले सफाईसाठी हंगामी स्वरुपात कामगार नेमता येणार नाहीत. म्हणुनच हे काम खाजगी संस्थेकडुन करुन घेण्यासाठी प्रस्तावित केले आहे.

<u>सदस्य श्री. जमनादास परस्वानी:—</u>नाल्यांची जी लांबी रुंदी आपण काढली आहे त्या प्रमाणे नाले सफाईचे काम होईल काय?

<u>श्री. विनोद डवले, सहा. आयुक्त, अतिक्रमण:—</u>नाल्यांची लांबी, रुंदी व खोली विचारात घेवुन पाणी पुरवठा विभागाकडुन प्राकलन तयार करण्यात आलेले आहे.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :—</u>तळापर्यंत गटारी किंवा नाले सफाई केली जाते काय? मला येथे उत्तर दया. आम्ही स्वत: पावसाळयात त्याठिकाणी उभे राहतो व नाल्याचा तळ दिसेपर्यंत नाला साफ करुन घेतो. दोन महिन्यामध्ये तुम्ही ७६ प्रभागांच्या नाल्यांची लांबी, रुंदी व खोली मोजली आहे काय?

<u>श्री.जी.जी. हिबारे, मुख्य स्वच्छता निरिक्षक:—</u>दरवर्षी आपण शहरातील लहान मोठे सर्व नाले साफ करत असतो.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे:—</u>तळापर्यंत कोणत्या प्रभागात कोणता नाला साफ केला आहे ते मला दाखवा.

<u>सभापती, श्री. लाल पंजाबी:—</u>पावसाळयापुर्वी शहरातील सर्व नाल्याची सफाई झाली पाहिजे.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :—</u>कुणाची निविदा आली आहे?

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>नाले सफाई कामी २०० कामगार लावणे कामीची निविदा आलेली आहे. आता आपण प्रत्येक प्रभागामध्ये २०,२० याप्रमाणे १५०० कामगार लावावेत असे बोलत आहात. १५०० कामगारांची मागणी करुन आपण निविदा मागविली असती तर ब—याचशा लोकांनी निविदा भरली असती. २०० लोकांसाठी निविदा मागविल्यामुळे १५०० कामगार पुरविण्याची क्षमता असलेल्या ब—याचशा निविदाधारकांनी आपल्या निविदा भरल्या नाहीत.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :—</u>याकामी निविदा प्राप्त झाली आहे ती प्राकलनीय रक्कमेपेक्षा सोळा टक्के जास्त दराची आहे. आम्हांला असेही माहित पडले आहे की, प्राकलनीय रक्कमेपेक्षा २१ टक्के कमी दराची सुध्दा निविदा आलेली आहे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>२१ टक्के कमी दराची निविदा जरा स्विकारल्यास तर महापालिकेचे नुकसान वाचवता येईल. १ कोटी २२ लाख होतात. ५०,५० लाख रुपयाचे महापालिकेचे नुकसान होत आहे, त्याने निविदा सिलबंद केली नाही, त्यामध्ये त्याची चुक काय आहे?

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>दिड महिन्यासाठी नोटिस काढुन नाले सफाई करुन प्रत्येक प्रभागामध्ये नाले सफाईसाठी १०,१० हंगामी कामगार देण्यास आपण सक्षम असाल तर बोला. प्रत्येक प्रभागामध्ये नाले सफाईसाठी १० १० हंगामी कामगार मिळाले पाहिजे.

<u>श्री. विनोद डवले, सहा. आयुक्त, अतिक्रमण:—</u>आयुक्त साहेबांनी त्यास सांगितले होते. त्यानुसार त्यांनी हो म्हटले होते परंतु लेखी दिलेले नाही.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>सिलबंद केलेली ती निविदा उघडली असती तर आपल्याला माहित पडले असते. निविदा प्राकलनीय रक्कमेपेक्षा १० टक्के कमी दराची आली असली की ती २० टक्के कमी दराची आली असती.

<u>श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक:—</u>या कामी चार निविदाधारकांनी निविदा सादर केल्या होत्या. त्यात मेसर्स अजित ट्रान्सपोर्ट कंपनी यांनी आवश्यक त्या अटी शर्तीची पुर्तता केली असल्यामुळे ते निविदा प्रक्रियेत पात्र ठरले होते आणि त्यांनी प्राकलनीय रक्कमेपेक्षा ४५ टक्के जास्त दराची निविदा सादर केली होती. मेसर्स ईगल कंन्स्ट्रक्शन कंपनी यांनी आवश्यक त्या अटी शर्तीच पुर्तता केल्यामुळे ते निविदा प्रक्रियेत पात्र ठरले होते त्यांनी प्राकलनीय रक्कमेपेक्षा ३५.२० टक्के जास्त दराची निविदा सादर केली होती. मेसर्स जकनुश मजुर कामगार सहकारी संस्था यांनी सादर केलेल्या निविदा लाख लावुन सिलबंद केली नसल्याने निविदा समिती

सदस्यांनी त्यांना अपात्र ठरविले. तसेच मेसर्स जयहिंद इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी उल्हासनगर यांनी लिफाफा क्र. १ मध्ये कामाच्या अनुभवाचे प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे त्यांना निविदा समितीने अपात्र ठरविले.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :—या दोन निविदाधारकांना अपात्र कशासाठी केले? त्याचे काही कानरण असेल ना?

श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक:—एक तर मेसर्स जकनुश कामगार सहकारी संस्था यांनी निविदा लाख लावुन सिलबंद केली नव्हती. व दुसरे मेसर्स जयहिंद इन्फ्राक्ट्रचर कंपनी यांनी अनुभवाचे प्रमाणपत्र सादर केले नव्हते.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—अनुभव काय पाहिजे होता?

श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक:—नाला सफाईचे काम केल्याबाबत अनुभव हवा होता. त्यासाठी लागणारी मशिनरी वगैरे त्यांच्याकडे असणे आवश्यक होते. नाला सफाई किंवा त्याचप्रकारे काम केल्याचा अनुभव असणे आवश्यक होते.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—त्याच प्रकारचा अनुभव म्हटला तर जकात वसुलीचा सुध्दा होवु शकतो.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :—जकनुश मजुर कामगार सहकारी सोसायटी, उल्हासनगर यांनी पत्र दिले आहे की, त्यांची निविदा स्टॅपल केलेली आणि चिकटवलेली निविदा सिल आहे असे समजुन उघडण्यात यावी. मला वाटते की त्यांची निविदा प्राकलनीय रक्कमेपेक्षा २१ टक्के कमी दराची होती. निविदा सिलबंद केली नाही ही त्यांची चुक आहे.

श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक:—मेसर्स अजित ट्रान्सपोर्ट कंपनी यांनी हरकत घेतली होती की, ज्या निविदा नियमानुसार सिलबंद केल्या नसतील त्या उघडण्यात येवु नये.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :—मेसर्स जकनुश मजुर कामगार सोसायटी यांची निविदा प्राकलनीय रक्कमेपेक्षा कमी दराची होती. महापालिकेच्या फायदयाची होती. त्यांना काम न देता प्राकलनीय रक्कमेपेक्षा जास्त दराच्या निविदाकारास तुम्ही काम देता. महापालिकेतील कर्मचारी तुम्ही महापालिकेचा फायदा करता की तोटा करता?

सदस्य श्री. जीवन इदनानी :—श्री. जकनुश मजुर कामगार सोसायटी आणि मेसर्स जयहिंद इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी यांच्या निविदा अपात्र ठरविण्याचा निर्णय कोणी घेतला तुम्ही घेतला की निविदा समितीने घेतला?

श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक:—निविदा समितीने घेतला.

सदस्य श्री. जीवन इदनानी :—तर मग तुम्ही उत्तर का देत आहात?

सदस्य श्री. प्रशांत धांडे:—प्राकलनीय रक्कमेपेक्षा २१ टक्के कमी दराच्या निविदाकारास काम का देत नाहीत? प्राकलनीय रक्कमेपेक्षा जास्त दराच्या निविदाकारास काम देत आहात यामध्ये फार मोठा घोटाळा होत आहे. तुम्ही महापालिकेचे कर्मचारी महापालिकेचे आर्थिक नुकसान करत आहात.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—नाले सफाईसाठी उदयापासुनच १०,१० कामगार पंधरा दिवसासाठी दिले पाहिजेत. कामासाठी लोक वणवण फिरत आहेत. त्यांना तुम्ही बोलावुन घ्या. पंधरा दिवसाच्या कामासाठी न्यायालयाचा आदेशाचा काही परिणाम होणार नाही.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—अशा प्रकारे पंधरा दिवसासाठी कामगारांना नेमणुक दिली जावु शकते काय?

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—कायदेशीर सल्ला घेण्यासाठी विधी अधिका—यांना बोलवा.

सदस्य श्री. जीवन इदनानी :—नाले सफाईसाठी प्रत्येक प्रभागात दहा, दहा हंगामी कामगार दिवाळी पर्यंतच्या कालावधीसाठी दिले जावे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>नाले सफाईसाठी आम्हांला उदयापासुनच कामगार पाहिजेत. आपण ते देवु शकता किंवा नाही ते सांगा.

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे :–</u>श्री. म्हसाळ साहेब, कामगार दिले जावु शकतात किंवा नाही ते सांगा.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>पाहिजे तर पंधरा मिनिटासाठी सभा स्थगित करा. यांना सल्लामसलत करु दया.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :–</u>निविदा उघडण्याच्या वेळेस निविदा समितीचे सर्व सदस्य हजर होते का?

<u>सभापती, श्री. लाल पंजाबी:–</u>सभा पंधरा मिनिटासाठी स्थगित केली जात आहे.

**सांयकाळी ५ वाजुन १० मिनिटांनी सभा पंधरा मिनिटासाठी स्थगित करण्यात येत असल्याचे सभापती, श्री. लाल पंजाबी यांनी जाहिर केले.**

**सांयकाळी ५ वाजुन २५ मिनिटांनी सभेचे कामकाज पुन्हा सुरु झाले. त्यावेळी खालील स्थायी समिती सदस्य उपस्थित होते.**

१. श्री. लाल देवनदास पंजाबी, २. श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर, ३. श्री. जीवन (राजु) चंद्रभान इदनानी, ४. श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी, ५. डॉ. निना प्रकाश नाथानी, ६. श्री. म्हस्के निवृत्ती अंकुश, ७. श्री. सुंदर (बाबु) आसनदास मंगतानी, ८. श्री. बी.बी. मोरे, ९. श्रीमती ज्योती शाम माने, १०. श्री. प्रशांत किसनराव धांडे, ११. श्री. चंद्रशेखर केशव यादव

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ, उप–आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी:–</u>कामगार नेमण्याबाबतीत उच्च न्यायालयाचे निर्बंध असल्यामुळे नाले सफाईच्या कामासाठी आपणांस हंगामी कामगार घेता येणार नाही.

<u>श्री. विनोद डवले, सहा. आयुक्त, अतिक्रमण:–</u>विधी विभागाकडुन अभिप्राय घेण्यात आलेला आहे. त्यांचे म्हणणे आहे की, हे काम खाजगी संस्थेकडुन करुन घेतले जावे. त्यानंतर हे काम कसे करता येईल यासाठी प्राकलन तयार केले आहे. महापालिकेला आपल्या हजेरीपत्रकावर कामगारांची नियुक्ती करता येवु शकता येणार नाही. या निविदेसंदर्भातील आर्थिक तरतुदी बघाव्या लागतील. ४० लाखाच्या अर्थसंकल्पीय तरतुदी पैकी २० लाख रुपये खर्च झाले आहेत आणि २० लाख रुपये बाकी आहेत.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>लेखा विभागाचे अधिकारी कोठे गेले?

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>नाले साफ करुन काढलेला कचरा कोण उचलणार?

<u>श्री. विनोद डवले, सहा. आयुक्त, अतिक्रमण:–</u>तो ठेकेदार स्वतः उचलेल.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>आपला कचरा वाहतुक ठेकेदार अन्थोनी कचरा उचलत नाही.

<u>श्री. विनोद डवले, सहा. आयुक्त, अतिक्रमण:–</u>मागील वर्षाचे दस्तऐवज आम्ही पाहिले आहेत.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>हा ठेकेदार आपणांस प्रत्येक प्रभागात दहा, दहा कामगार देवु शकेल काय?

<u>श्री. विनोद डवले, सहा. आयुक्त, अतिक्रमण:–</u>४८ लाखाचीच अर्थसंकल्पात तरतुद आहे, त्यातुन ही निविदा मंजुर झाली तर ८ ते १० लाखच उरतील.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>तर मग नाले साफ होवु शकत नाही?

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी :–</u>आरोग्य विभागासाठी अर्थसंकल्पात असलेल्या तरतुदीमध्ये वाढ करण्यात यावी. परंतु आम्हांला प्रत्येक प्रभागाला दहा दहा कामगार पुरविले जावे.

<u>सदस्य श्री. अंकुश म्हस्के :—</u>दहा, दहा कामगारांची नेमणुक केल्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय नाही, तीन कामगारांमध्ये तर प्रभागामध्ये झाडु सुध्दा मारला जावु शकत नाही.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>आपण आपल्या परिने काम करा. परंतु स्थायी समितीचे सोळा सदस्य प्रत्येक तीन दिवसानंतर आपणाबरोबर बैठक घेतील आणि साफसफाईची स्थिती काय आहे त्याचा आढावा घेतील त्यावेळी आपणांस उत्तर दयावे लागेल.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>शहरात एवढे मोठ मोठे नाले आहेत ते पावसाळयापुर्वीच झाले पाहिजे.

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी :—</u>महापालिकेबाहेर जी नाली आहे, तिची लांबी रुंदी किती आहे, तिचे काही रेकॉर्ड आहे का तुमच्याकडे? तुम्ही नाल्यांची लांबी वगैरे मोजली असेल ना?

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>शहरातील नाले साफ झाले पाहिजेत. ७६ नगरसेवकांपैकी कुणाचीही तक्रार येता कामा नये की, माझ्या प्रभागातील अमुक अमुक हा नाला पुर्ण भरलेला आहे, तो साफ करण्यात आलेला नाही.

<u>श्री. विनोद डवले, सहा. आयुक्त, अतिक्रमणः—</u>या निविदे व्यतिरिक्त कामगार लावुन नाले साफ करायचे झाले तर आरोग्य विभागासाठी अर्थसंकल्पीय तरतुद वाढवावी लागेल.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>दोनशे कामगार लावण्याबाबतचे निविदा आहे, आपणांस आता ७६० कामगार पाहीजेत. त्यासाठी अर्थसंकल्पीय तरतुद वाढविण्यासाठी पर्याय नाही. प्रत्येक प्रभागामध्ये नाले सफाईसाठी दहा दहा कामगार पाहिजेच पाहिजे. पाहिजे तर यासाठी दोन तीन दिवसानंतर सभा बोलवा. प्रत्येक प्रभागात दहा दहा कामगार याप्रमाणे ७६ प्रभागामध्ये ७६० कामगार दोन महिन्यासाठी नेमले तर त्यांच्यां पगारावरील खर्च अंदाजे ६३ लाख ८४ हजार इतका होईल.

<u>श्री. विनोद डवले, सहा. आयुक्त, अतिक्रमणः—</u>नाल्यांच्या लांबी रुंदीच्या मोजमापानुसार प्राकलन तयार करावे लागेल.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>काहीही करा आम्हांला दहा दहा कामगार दिवाळीपर्यंतच्या कालावधीसाठी पाहिजेत. नाहीतर तुम्ही तुमच्या पध्दतीने काम करा परंतु नाले सफाईबाबतची कोणतीही तक्रार येता कामा नये.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :—</u>नाहीतर तो कचरा महापालिकेसमोर आणुन टाकु.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>नाले सफाईचे काम आपण आपल्या पध्दतीने करा परंतु त्याबाबत दिवाळीपर्यंत कोणत्याही नगरसेवकाची किंवा नागरीकांची कोणतीही तक्रार येता कामा नये.

<u>सदस्या डॉ. निना नाथानी :—</u>शहरातील कोणताही नाला भरता कामा नये. सर्व नाले साफ झाले पाहिजेत हेच आम्हांला पाहिजे.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>नाले सफाईसाठी दोनशे कामगारांचे प्राकलन आपण कसे तयार केले?

<u>श्री. विनोद डवले, सहा. आयुक्त, अतिक्रमणः—</u>नाल्यांची लांबी, रुंदी व खोलीच्या हिशोबाने केलेली आहे, आता आपण सांगत आहात त्यापध्दतीने काम करायचे झाले तर ते मोजमाप वाढवावे लागेल.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>नाले सफाईच्या कामासाठी आम्ही आपणांस पाहिजे ती मंजुरी देण्यास तयार आहोत. परंतु आम्हांला शहरातील नाले साफ करुन पाहिजेत आमची दुसरी काही हरकत नाही.

<u>श्री. विनोद डवले, सहा. आयुक्त, अतिक्रमणः—</u>नाले सफाई कामावर पर्यवेक्षण करण्यासाठी आमच्याकडे जी यंत्रणा आहे ती पाहता त्यानुसार आम्ही प्रयत्न करु.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>**शहरातील नाले सफाईचे काम निविदाकारामार्फत पंधरा दिवसात पुर्ण केले जावे. त्यानंतर चार प्रभाग समित्यांमार्फत प्रत्येक प्रभागात दहा दहा कामगार लावण्याकामी मजुर कामगार सहकारी सोसायटीची नियुक्ती केली जावी.

**<u>सदस्य श्री. जीवन इदनानी :–</u>**सभापती महोदय, यांचे निर्देश आहेत की, निविदाकारामार्फत पंधरा दिवसाच्या आत नाले सफाईचे काम पुर्ण केले जावे.

**<u>सभापती, श्री. लाल पंजाबी :–</u>**या प्रस्तावाबाबत सर्वांचे एकमत झाले आहे की, निविदाकाराने पंधरा दिवसामध्ये नाले सफाईचे काम पुर्ण करावे.

**<u>श्री. विनोद डवले, सहा. आयुक्त, अतिक्रमण:–</u>**जशी आपण सातशे साठ कामगारांची मागणी केली आहे.

**<u>सदस्य श्री. जीवन इदनानी :–</u>**नाल्यांचे आपण जे मोजमाप घेतलेले आहे ते चुकीचे आहे, कार्यालयात बसुन आपण ते माप लिहिले आहे. संपुर्ण प्राकलन चुकीचे आहे. आणि प्रभागातील नाल्यांच्या लांबी रुंदीशी ते मिळुन येत नाही.

**<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :–</u>**श्री. जीवन इदनानी यांच्या या निवेदनाची इतिवृत्तात नोंद घेतली जावी.

**<u>काही सदस्य :–</u>**पास–पास......

**<u>सभापती, श्री. लाल पंजाबी:–</u>**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑

**विषय क्र. ८ :–** उल्हासनगर शहरातील छोटी गटारे/नाले व कल्व्हर्ट सफाईसाठी व काढलेला गाळ /कचरा वाहतुकीसाठी आवश्यक मशिनरी व मनुष्यबळ पुरविणेकामी न्युनत्तम दराचे निविदाकाराशी संविदेस मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

मा. आयुक्त यांचे मान्यतेनुसार व मा. स्थायी समिती सभापती यांच्या मौखिक आदेशा नुसार दिनांक १०/५/२०११ रोजी दैनिक पुण्य नगरी, दैनिक नगर न्युज व दै. खबरे आजतक या वर्तमान पत्रात निविदा सुचना प्रसिद्ध करुन दिनांक १०/५/२०११ ते १३/५/२०११ रोजी पर्यंत ५ कोरी निविदा पुस्तिका वेगवेगळया ठेकेदारांनी खरेदी केल्या, व दिनांक १६/५/२०११ रोजी सकाळी १२.०० वाजेपर्यंत सदर सिलबंद निविदा स्विकारण्यात आल्या व प्राप्त ५ निविदा दि. १६/०५/२०११ रोजी दुपारी १.०० वाजता उप – आयुक्त (आरोग्य) यांचे दालनात उप – आयुक्त (आरोग्य), मुख्य लेखा अधिकारी, मुख्य लेखा परिक्षक, सहा. सार्व. आरोग्य अधिकारी यांचे उपस्थितीत निविदाकारांचे प्रतिनिधी यांचे समोर उघडण्यात आल्या.

प्राप्त ५ निविदांचे पहिला लिफाफा (लिफाफा क्र.१) उघडून आवश्यक कागदपत्रे तपासणी करीत असतांनाचा दरम्यानच्या कालावधीत मे. अजित ट्रान्सपोर्ट कंपनीने लेखी पत्र देवून ज्या निविदा नियमानुसार सिल केल्या नसतील त्या उघडण्यात येवू नये अशी विनंती केली होती. सदरचे पत्र सोबत जोडून सादर. प्राप्त निविदाकारां पैकी जक्नुश मजूर कामगार सहकारी सोसा. यांनी सादर कलेल्या निविदा लाख लावून सिल बंद केलेल्या नसल्याने निविदा समिती सदस्यांनी त्यांना अपात्र ठरविले. तसेच मे. जयहिंद इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी, उल्हासनगर यांनी लिफाफा क्र.१ मध्ये केलेल्या कामाचे अनुभवाचे प्रमाण पत्र न जोडल्याने त्यांना निविदा समितीने अपात्र ठरविले. दरम्यानच्या कालावधीत जक्नुश मजूर कामगार सहकारी सोसा. उल्हासनगर यांनी पत्र देवून त्यांची स्टॅपल आणि चिटकवलेली निविदा सिल आहे समजून उघडण्यात यावी असे दिलेल्या लेखी पत्रात नमूद केले आहे. सोबत सदरचे पत्र जोडून सादर. तरी पात्र तिन निविदाकारांचा लिफाफा क्र. २ उघडण्यात आला.

सदर निविदेचा तपशील व प्राप्त झालेले दर खालील प्रमाणे.

| अ. क्र. | निविदाकाराचे नाव | अटी व शर्ती नुसार जोडलेली कागदपत्रे | शेरा | प्राप्त झालेले दर |
|---|---|---|---|---|

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | मे. अजित ट्रान्सपोर्ट कंपनी | आवश्यक अटी व शर्ती पुर्ण. | पात्र | अंदाजीत प्राकलना पेक्षा ४५.०० टक्के जास्त |
| २ | मे. ईगल कंन्स्ट्रक्शन | आवश्यक अटी व शर्ती पुर्ण. | पात्र | अंदाजीत प्राकलना पेक्षा ३५.२० टक्के जास्त |
| ३ | मे. जक्नुश मजूर कामगार सहकारी सोसा. | | अपात्र | —— |
| ४ | मे. जय हिंद इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी | अनुभवाचे प्रमाण पत्र सादर केलेले नव्हते. | अपात्र | —— |
| ५ | मे. शुभम कंन्स्ट्रक्शन | आवश्यक अटी व शर्ती पुर्ण. | पात्र | अंदाजीत प्राकलना पेक्षा १६ टक्के जास्त |

तरी वरील प्राप्त निविदांत मे. शुभम कंन्स्ट्रक्शन कंपनी यांचे दर तुलनात्मक रित्या कमी असल्याने व सदरचे दर/रक्कम अंदाजीत प्राकलनापेक्षा १६ टक्के जास्त म्हणजेच रुपये ३५,२९,६३१/— असल्यामुळे मे. शुभम कंन्स्ट्रक्शन, उल्हासनगर यांना लगेचच निविदा समिती सदस्यांकडून वाटाघाटीसाठी पत्र देऊन बोलविण्यात यावे अशा सुचना करण्यात आल्या, त्यानुसार जा.क्र. उमपा/उप—आ/आवि/५५/११ दिनांक १६/५/२०११ अन्वये वाटाघाटासाठी पत्र देण्यात आले. त्यानुसार संबंधीत निविदाकराने १४ टक्के अंदाजीत प्राकलनापेक्षा जास्त रक्कम म्हणजेच रुपये ३४,६८,७७६/— (चौतिस लाख अडुसष्ट हजार सातशे शहात्तर मात्र) या दराने काम करण्यास तयार असल्याचे दिनांक १६/५/२०११ रोजीच्या पत्रात नमुद केले आहे. सोबत सदरचे पत्र जोडून सादर. आरोग्य विभागाने प्राप्त निविदा दराबाबत दिलेल्या अभिप्रायाशी इतर विभाग असहमत असल्यास त्याचे देखील स्वयंस्पष्ट अभिप्राय नमूद करणे आवश्यक आहे. तसेच सदर दरांबाबत प्राकलन बनविणा—या संबंधीत आधिका—यांना दिनांक १६/५/२०११ रोजीच्या पत्रान्वये चालू तारखेस असलेल्या दरांबाबत विचारणा केली असता त्यांनी सादर केलेल्या दरांबाबतचा तुलनात्मक तक्ता विचारात घेता त्यानुसार सदर कामाचे अंदाजीत प्राकलन रक्कम रुपये ३२,७१,९०८/— (रुपये बत्तीस लाख एकात्तर हजार नऊशे आठ मात्र) येत आहे. सदर दरानुसार न्युनतम निविदाकाराचे प्राप्त दर सुमारे ६ टक्के जास्त रक्कम सादर करण्यात आलेली आहे.

सदरचे काम हे ' नैसर्गिक आपत्तीची पुर्व तयारी ' या बाबीशी निगडीत असल्याने पावसाळयात पूरस्थिती निर्माण होऊ नये म्हणून तातडीने करणे आवश्यक आहे. नाले सफाईचे काम नागरीकांच्या आरोग्याशी व जिवीताशी निगडीत असल्याने सदर काम करणे अत्यावश्यक आहे. तरी मे. शुभम कंन्स्ट्रक्शन कंपनी, उल्हासनगर यांनी सादर केलेले न्युनतम दर ३४,६८,७७६/— (चौतिस लाख अडुसष्ट हजार सातशे शहात्तर मात्र) स्विकृत करुन त्यांच्याशी संविदा करण्यास मान्यता मिळण्यासाठी सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समिती समोर सविनय सादर.

स्थायी समिती ठराव क्र. १८ दिनांक:— १८/५/२०११

सुचकाचे नाव :— श्री. सुंदर मंगतानी

अनुमोदकाचे नाव :— श्री.बी.बी.मोरे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणामुळे उल्हासनगर शहरातील छोटी गटारे/नाले व कल्व्हर्ट सफाईसाठी व काढलेला गाळ /कचरा वाहतुकीसाठी आवश्यक मशिनरी व मनुष्यबळ पुरविणेकामी मे. शुभम कंन्स्ट्रक्शन कंपनी, उल्हासनगर या न्युनत्तम दराचे निविदाकाराशी संविदेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

महापालिका सचिव :– विषय क्र. ९ वाचुन दाखवितात

---

विषय क्र. ९ :– पावसाळयापूर्वी प्रोक्लेन मशिनव्दारे छोटया मोठया नाल्यांची सफाई करणे व निघालेला गाळ डम्पंरव्दारे डम्पींग ग्राऊडवर वाहतुक करणेकामी न्युनतम दराने निविदाकाराशी संविदेस मान्यता देणे.

---

काही सदस्य :–पास–पास......

सभापती, श्री. लाल पंजाबी:–सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑

**विषय क्र. ९ :–** पावसाळयापूर्वी प्रोक्लेन मशिनव्दारे छोटया मोठया नाल्यांची सफाई करणे व निघालेला गाळ डम्पंरव्दारे डम्पींग ग्राऊडवर वाहतुक करणेकामी न्युनतम दराने निविदाकाराशी संविदेस मान्यता देणे.

प्रस्तावना

मा. आयुक्त यांचे मान्यतेनुसार व स्थायी समिती ठराव क्र. १० दिनांक २८/४/२०११ रोजीच्या मा. स्थायी समितीने दिलेल्या मंजुरी नुसार दिनांक ३/५/२०११ रोजी दैनिक वार्ताहार, व दैनिक धनुष्यधारी या वर्तमान पत्रात निविदा सुचना प्रसिद्ध करुन दिनांक ३/५/२०११ ते १०/५/२०११ रोजी पर्यंत ३ कोरी निविदा पुस्तिका वेगवेगळया ठेकेदारांनी खरेदी केल्या, व दिनांक ११/४/२०१० रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत सदर सिलबंद निविदा स्विकारण्यात आल्या व प्राप्त ३ निविदा दि. ११/०५/२०११ रोजी दुपारी ४.०० वाजता उप – आयुक्त (आरोग्य) यांचे दालनात उप – आयुक्त (आरोग्य), मुख्य लेखा अधिकारी, मुख्य लेखा परिक्षक यांचे उपस्थितीत निविदाकारांचे प्रतिनिधी यांचे समोर उघडण्यात आल्या.

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार प्रभाग क्र. ५१, बॅ.नं. १६६५ आणि बॅ.नं. १६६६ जवळ, उल्हासनगर–४ येथिल जुन्या व वापरात नसलेल्या शौचालयांचे निष्कासनास व जागेवरील परिस्थिती पाहता प्रशासनास इष्ट वाटेल त्या प्रयोजनासाठी सदर जागेचा उपयोग/विनियोग करणेस मान्यता देत आहे.

परंतु

सदरचे शौचालय तोपर्यंत निष्कासित करु नये जो पर्यंत त्याठिकाणी विकास काम सुरु होत नाही.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. १६ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १६ :–** प्रभाग क्र. ६३, महात्मा फुले कॉलनी, उल्हासनगर–३ येथिल जुन्या व वापरात नसलेल्या शौचालयांचे विनियोगास मान्यता देणे.

---

सदस्य, श्री. प्रशांत धांडे:– या विषयाचा गोषवारा कोणी तयार केला आहे, तेथील शौचालय तोडल्यानंतर तेथे काय करणार? त्याठिकाणचे शौचालय तोडल्यानंतर तेथील लोक कुठे जातील, त्या विभागामध्ये दुसरे शौचालय नाही आणि हे जे शौचालय आहे ते वापरातील आहे, याविषयाबाबत जो अहवाल देण्यात आलेला आहे तो चुकीचा आहे, त्या विभागातील काही लोक कालच माझेकडे आले होते, ते सांगत होते की शौचालय मोडकळीस आले असले तरी ते वापरात आहे, ते जर तोडले जाणार असेल तर पर्यायी व्यवस्था काय? एम. एम.आर.डी.ए. च्या माध्यमातुन पैसे दया व वापरा या तत्वार काही ठिकाणी जी शौचालये बाधंण्यात आली आहेत त्याप्रकारची शौचालये या विभागामध्ये बांधण्यात आलेली नाहीत.त्यामुळे नागरिकांची गैरसोय होणार आहे.

सभापती, श्री. लाल पंजाबी:– त्या प्रभागाच्या नगरसेविका श्रीमती लता निकम यांनी पत्र देवुन सदर शौचालय निष्कासित करण्याची विनंती केली आहे.

सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:– नगरसेविकेने पत्र दिल्यानंतर स्वच्छता निरिक्षकांचा त्याबातीत अहवाल आला असेल ना?.

श्री. समीर घोलप, मालमत्ता व्यवस्थापक:– शौचालय निष्कासित करण्यास हरकत नाही असे त्या विभागातील ५ लोकांनी सहया करुन पत्र दिले आहे.

सदस्य, श्री. प्रशांत धांडे:– महात्मा फुले कॉलनी येथे एक सुध्दा सार्वजनिक शौचालय नाही, हे शौचालय तोडल्यानंतर तेथील हजार पधंराशे लोक शौचास कुठे जातील,? यासाठी हा विषय सभेच्या कार्यसुची वरुन वगळण्यात यावा.

सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:– होय, हा विषय सभेच्या कार्यसुची वरुन वगळण्यात यावा.

काही सदस्य:–विषय वगळा.

<u>सभापती, श्री. लाल पंजाबी:—</u>सदरच्या विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. १६** :— प्रभाग क्र. ६३, महात्मा फुले कॉलनी, उल्हासनगर—३ येथिल जुन्या व वापरात नसलेल्या शौचालयांचे विनियोगास मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

प्रभाग क्र. ६३ महात्मा फुले कॉलनी उल्हासनगर ३ येथील १० सिट्चे जुने षौचालय नागरीकांच्या मागणीनुसार निश्कासित करणेबाबत मा. नगरसेविका श्रीमती. लता षांताराम निकम उल्हासनगर महानगरपालिका यांनी विनंती केलेली आहे.

प्रभाग क्र. ६३ महात्मा फुले कॉलनी उल्हासनगर ३ येथील १० जुने षौचालय मोडकळीस आलेले आहे, असा संबंधीत आरोग्य निरीक्षक उल्हासनगर महानगरपालिका यांनी प्रत्यक्ष पाहणी करून पंचनामा सादर केलेला आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ अन्वये महापालिकेच्या मालमत्तेचा अन्य प्रकारे विनियोग करावयाचा झाल्यास मा. स्थायी समितीची मंजुरी घेणे आवष्यक आहे.

उक्त बाबी विचारात घेता, सी. सी. पॅसेच बांधणे करिता निधी उपलब्ध होताच, प्रस्तावित षौचालय निश्कासित करून सदर मालमत्तेचा महानगरपालिकेच्या आवष्यकतेनुसार विनियोग करणेकरीता सदर मालमत्ता निश्कासित करणेसाठी त्या ठिकाणी सी. सी. पॅसेज बांधणेसाठी किंवा स्थायी समिती ठरवेल अषा अन्ये प्रकार विनियोग करणेकरीता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ अन्वये मान्यता मिळणेसाठी प्रस्तावित आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> ३३ अ <u>दिनांक:— २४/६/२०११</u>

सुचकाचे नाव :— श्री. प्रशांत धांडे

अनुमोदकाचे नाव :— श्री. बी.बी.मोरे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार प्रभाग क्र. ६३, महात्मा फुले कॉलनी, उल्हासनगर—३ येथिल जुन्या व वापरात नसलेल्या शौचालयांचे निष्कासन करण्याचा प्रस्ताव पुढील सभेत घेण्याप्रयोजनार्थ या सभेच्या कार्यसूचीवरुन वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची <u>सही/—</u>

अनुमोदकाची <u>सही/—</u>

<u>सर्वानुमते</u>

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. १७ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १७** :— कर आकारणी पुस्तकात करपात्र मालमत्ता क्र. *१८ठ७०१६०३१५००* (*व्सक छवण १८६०२४०*) रद्द करुन थकित मालमत्ता कर रक्कम रुपये ८०३१ + शास्ती निर्लेखित करणेस मंजुरी देणे.

---

**सदस्य (ॲड) श्री. अनिल (विद्यार्थी) ऐलानी:—**या मिळकतीचे जे क्षेत्रफळ दाखविले आहे, त्यामध्ये फरक आहे, अगोदर १९६ चौ.फुट होते आता २२८ चौ.फुट दर्शविले आहे.

**महापालिका सचिव :—** मिळकती मध्ये वाढ किंवा फेरफार होत असते, त्यामुळे क्षेत्रफळामध्ये थोडाफार फरक होत असतो.

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्री. लाल पंजाबी:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. १७ :—** कर आकारणी पुस्तकात करपात्र मालमत्ता क्र. १८७०१६०३१५०० (व्सक छवण १८६०२४०) रद्द करुन थकित मालमत्ता कर रक्कम रुपये ८०३१ + शास्ती निर्लेखित करणेस मंजुरी देणे.

**प्रस्तावना**

उपरोक्त विषयास अनुसरून सादर करण्यात येते की, श्री. सुनील श्रीमलानी(होल्डर)**c/o** रमेश मुलचंद राहणार बॅ.नं.209/ए जवळ, रुम नं.2,उल्हासनगर—1 यांनी दि. 15/2/2011 रोजीच्या अर्जान्वये महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत करपात्र मालमत्ता क **18BI016030700 (old No.18/0229)** या एकाच मालमत्तेची मालमत्ता क. **18BI016031500 (old No.18/0240)** अन्वये झालेली दुबार नोंद रद्द करणेसाठी विनंती केली आहे.
विषयांकित प्रकरणा संदर्भात कार्यालयीन दप्तरी नोंदीचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अक | तपशिल | मालमत्ता क 18BI01603 (old No.18/0229) | मालमत्ता क.18BI01603 (old No.18/0240) |
|---|---|---|---|
| 1 | मिळकतीचे कर भरण्यास प्रथमतः जबाबदार व्यक्तीचे नाव | श्री. रमेश मुलचंद | श्री. रमेश मुलचंद |
| 2 | मलमत्तेचा पत्ता | बॅ.नं.209/ए,रुम नं.2, उल्हासनगर—2 | बॅ.नं.209/ए,रुम नं.2, उल्हासनगर—2 |
| 3 | प्रथम कर निर्धारण वर्ष | 1991 | 1986 |
| 4 | क्षेत्रफळ | 196 चौ. फुट | 228 चौ. फुट |
| 5 | *बांधकाम प्रकार* | टिअर गरडर | एसी शीट ब्रिक्स |
| 6 | मिळकतीचा वापर | निवासी | निवासी |
| 7 | भाडेकरून असल्यास भाडे रक्कम | — | — |
| 8 | प्रथम कर निर्धारणानंतर नावात बदल झालेला असल्यास ते नाव आदेश क. | — | — |
| 9 | प्रथम कर निर्धारणानंतर सुधारीत कर निर्धारण झाले असल्यास मालमत्तेचा तपशिल | मालमत्ता क 18BI016030700 (old No.18/0229) सुधारीत कर निर्धारण वर्ष 2003 | — |
| 9अ | सुधारीत क्षेत्रफळ | 68चौ.फुट<br>187 चौ.फुट | — |
| 9ब | सुधारीत बांधकाम प्रकार | टिअर गरडर<br>एसी शीट ब्रिक्स | — |

| | | | |
|---|---|---|---|
| 9क | सुधारीत वापर | निवासी | – |
| 9ड | सुधारीत कर निर्धारणात भाडेकरू असल्यास भाडे रक्कम | – | – |
| 10 | वर्ष 2010–11 अखेर मालमत्ता करापोटी थकीत रक्कम (चालु मागणीसह) | रु.16712/– | रु.1431/– |
| 11 | वर्ष 2010–11 अखेर पाणीपट्टी करापोटी थकीत रक्कम (चालु मागणीसह) | रु.15600/– | रु.6600/– |
| 12 | एकूण थकीत रक्कम (चालु मागणीसह) | #-32312$ kkLrh@& | #-8031$ kkLrh@& |
| 13 | मालमत्ता कराचा भरणा केला असल्यास त्याचा तपशिल (पावती क्रमांक,दिनांक, रक्कम) | प्रथम करनिर्धारणापासुन मालमत्ता कराचा भरणा करण्यात आलेला नाही. | पावती क्र 64697 दि. 28/12/2001 रु.2000/– |

विषयांकित प्रकरणी स्थळ पाहणी करण्यात आली असुन पाहणी अहवाल पुढीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| .1 | स्थळ पाहणी करणा–या अधिका–याचे नाव पदनाम व दिनांक | श्री.दामोदर शर्मा लिपीक,कार्यरत प्र.कर निरिक्षक युनिट क्र.3, दि. 7/3/2011 |
| 2 | महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीप्रमाणे दोन्ही मिळकतीकरीता मालमत्ता कर भरण्यास जबाबदार असलेली व्यक्ती म्हणून असलेल्या नोंदीत समानता आहे काय?नसल्यास मालमत्तानिहाय नोंदीचा तपशिल | होय |
| 3 | महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीप्रामणे संदर्भित दोन्ही मिळकतीकरीता पत्त्यात असलेल्या नोंदीत समानता आहे काय? नसल्यास मालमत्तेप्रमाणे पत्त्याचा तपशिल | होय |
| 4 | दोन्ही मालमत्तेचे क्षेत्रफळ, बांधकाम प्रकार व वापर इ. करपात्र बाबींत समानता आहे काय ? | दोन्ही मालंमत्तांचे करपाकत्र बाबीत(क्षेत्रफळ,बांधकाम प्रकारात अशंता फरक आहे.)वापर प्रकारात समानता आहे. |
| 5 | स्थळ पाहणी केली असता सध्यास्थितीत जागेवर एकच मिळकत अस्तिवात असल्याचे आढळून आले आहे काय ? | होय मालमत्ता क्र **18BI016030700 (old No.18/0229)** |

संबंधीत कर निरिक्षक यांनी दि. 7/3/2011 रोजी संदर्भित दोन्ही मिळकतीची प्रत्यक्ष पाहणी केली असता दोन्ही मिळकतीचे प्रथम कर निर्धारण तसेच सुधारीत कर निर्धारण वेगवेगळया वर्षात झाल्याचे दिसुन येते. सध्यास्थितीत जागेवर श्री.रमेश मुलचंद यांचे नावे असलेली मालमत्ता क्र **18BI016030700 (old No.18/0229)** ही अस्तित्वात असून मंहानगरपालिका कर आकारणी नोंदवहीनुसार नमुद करपात्र बाबी प्रत्यक्ष जागेवर असल्याचे आढळुन आले आहे. या मिळकतीचे खात्यात वर्ष 2010–11 अखेर रक्कम रु.32312+शास्ती/–(चालु मागणीसह) थकीत असुन मिळकतीचे खात्यात मालमत्ता कराचा भरणा करण्यात येत असल्याचे दिसुन येत आहे.

तसेच संबंधीत प्रभाग क्र.18 मध्ये मालमत्ता क्र **18BI016031500 (old No.18/0240)** ही कोठेही अस्तित्वात असल्याचे आढळुन येत नाही. या मिळकतीचे खात्यात वर्ष 2010–11 रक्कम रु. 8031+शास्ती/–(चालु मागणीसह) थकीत असुन मालमत्ता कराचा भरणा केल्याचा दिसुन येत नाही. उक्त बाबी विचारात घेता महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत करपात्र मालमत्ता क्र. **18BI016030700 (old No.18/0229)** या एकाच मालमत्तेची मालमत्ता क्र. **18BI016031500 (old No.18/0240)** ही दुबार नोंद असल्याचे दिसुन येते. या मालमत्तेपोटी आकारण्यात आलेला मालमत्ता कर रक्कम रु.8031+शास्ती/– वसुल न होण्याजोगे आहे. असे इकडील मत आहे.

सबब, महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत करपात्र मालमत्ता क्र. 18BI016031500 (old No.18/0240) ही रद्द करुन त्यापोटी आकारण्यात आलेला मालमत्ता कर रक्कम रु. 8031+शास्ती/– मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 152 नुसार निर्लेखित करणेसाठी मा. स्थायी समिती पटलावर मंजुरीकरीता प्रस्तावित करण्यात येत आहे

स्थायी समिती ठराव क्र. ३४ दिनांकः— २४/६/२०११

सुचकाचे नाव :— श्री. चंद्रशेखर यादव

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती शिला मनसुलकर

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणामुळे कर आकारणी पुस्तकात करपात्र मालमत्ता क्र. १८ठ्प०१६०३१५०० (व्सक छवए १८६०२४०) खाता रद्द करुन थकित मालमत्ता कर रक्कम रुपये ८०३१ + शास्ती निर्लेखित करणेस मंजुरी देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. १८ वाचुन दाखवितात

---

विषय क्र. १८ :— उल्हासनगर महानगरपालिकेस ८००० लिटर क्षमतेची वाहन सिव्हरेज लाईन क्लिनिंग मशीन संक्शन (जेटींग व संक्शन) सह पुरविणेकामी लघुत्म दराचे निविदाकार में.एम.एस.एस.आय.डी.सी, ठाणे यांच्याशी सविंदेस मान्यता देणे.

---

यावेळी श्री. धनंजय बोडारे व श्री. चंद्रशेखर यादव यांनी सभागृहात प्रवेश केला.

सभापती, श्री. लाल पंजाबीः— वाहन विभाग प्रमुख श्री. दिपक चिमणकारे आज आलेले नाहीत.

सदस्य (ॲड.) श्री. अनिल (विद्यार्थी) ऐलानीः— तर मग हा विषय सभेच्या कामकाजातुन वगळण्यात यावा, ही ३९ लाख रुपयांची जी रक्कम दाखविली आहे याबाबतची आकडेमोड कशी केली आहे.सांगु शकता काय?

श्री. संतोष देहेरकर, उप—आयुक्तः— सिव्हरेज लाईन क्लिनिंग मशीन खरेदी करण्यासाठी जाहिर निविदा सुचना, दैनिक लोकमत, दैनिक वृत्तमानस, दैनिक आपले महानगर या वर्तमान पत्रामध्ये प्रसिध्दीस दिली होती, त्यानुसार या तीन संस्थानी आपली दरपत्रके सादर केली होती.

सदस्य (ॲड.) श्री. अनिल (विद्यार्थी) ऐलानीः—या विषयी आम्ही जे दरपत्रक आणले आहे ते पहा, हे तर २९ लाखाचे आहे.एवढा फरक कसा?

सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः— त्याचे ते दरपत्रक कोणत्या कंपनीचे आहे ते पहा, त्या कंपनीचे लेटरपॅडवर ते आहे का?

सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः— गोषवाऱ्यामध्ये जी किंमत दर्शविलेली आहे, ती अदांजीत किंमत आहे, याबाबत तीन निविदा आलेल्या आहेत आणि कुणीही प्राकलनीय किंमतीपेक्षा कमी दराची निविदा भरलेली नाही. तसे असते तर कुणीतरी प्राकलनीय रक्कमेपेक्षा कमी दराची निविदा भरावयास पाहिजे होती ना?

सदस्य (ॲड.) श्री. अनिल (विद्यार्थी) ऐलानीः— जर कुणी प्राकलनीय रक्कमेपेक्षा कमी दराची निविदा भरली असती तर, तेवढे महापालिकेचे पैसे वाचले असते.

सदस्य, श्री. धंनजय बोडारेः— त्यांनी कमी रक्कमेचे दरपत्रक दिले आहे तर जेव्हा निविदा प्रक्रिया चालु होती, तेव्हा त्यांनी निविदा का नाही भरली? नतंर दरपत्रक देवून काय फायदा?

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी</u>:–_निविदा भरण्यापासुन त्याना कोणी अडविले होते का? लोकमत, वृत्तमानस, महानगर अशा वर्तमान पत्रामध्ये जाहिर सुचना प्रसिध्दीस दिली असताना

<u>सदस्य (ॲड.) श्री. अनिल (विद्यार्थी) ऐलानी:–</u> निविदेची कार्यवाही पुर्ण केली नाही, असे मी म्हणत नाही परंतु प्राकलनीय रक्कमेपेक्षा कमी दराची निविदा आली असती तर महापालिकेचे पैसे वाचले असते.

<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:–</u> हा विषय पारित केला जावा.

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>सभापती, श्री. लाल पंजाबी:–</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. १८ :–** उल्हासनगर महानगरपालिकेस ८००० लिटर क्षमतेची वाहन सिव्हरेज लाईन क्लिनिंग मशीन संक्शन (जेटींग व संक्शन) सह पुरविणेकामी लघुत्तम दराचे निविदाकार में.एम.एस.एस.आय. डी.सी, ठाणे यांच्याशी सविंदेस मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिकेसाठी सिव्हरेज लाईन क्लिनिंग मशीन संक्शन (जेटींग व संक्शन) वाहन खरेदी करण्याबाबतच्या निविदा दिनांक १३/०१/२०११ च्या दै.लोकमत, दै. वृत्तमानस, दै.आपल महानगर या वृत्त्पत्रात प्रसिध्द केलेले जाहीर सुचनेनुसार खाली नमुद केलेल्या ठेकेदाराने विहित नमुन्यात कोरे निविदा संच नियमानुसार विकत घेतलेले होते.
१) में.इंडस्टरियल प्लांटस ॲन्ड वेस्ट ट्रिटमेंट
२) में.कॅमविडा इनवारो इंजिनियर, प्रा.लि,
३) में.एम.एस.एस.आय.डी.सी, ठाणे
४) में.लिफ्टमाक उदययोग प्रा.लि, हारयाणा

दिनांक २४/०१/२०११ रोजी नियमानुसार खालील उत्पादकांनी आपल्या सिलबंद निविदा सादर केलेल्या आहेत.
१) में.कॅमविडा इनवारो इंजिनियर, प्रा.लि,
२) में.एम.एस.एस.आय.डी.सी, ठाणे
३) में.लिफ्टमाक उदययोग प्रा.लि, हारयाणा

दिनांक २४/०१/२०११ रोजी प्राप्त झालेल्या मोहरबंद निविदा दिनांक ७/०२/२०११ रोजी
सायंकाळी ठिक १६:०० वाजता उप आयुक्त (वाहन) यांच्या कार्यालयात मा. मुख्यलेखा अधिकारी, मा. मुख्यलेखा परिक्षक, वाहन विभागप्रमुख व निविदाकार यांच्या समक्ष लिफाफा कं. १ उघडण्यात आला.सदर लिफाफा कं. १ मध्ये तिन्ही निविदाकार पात्र झाल्याने सदर तिन्ही निविदाकांराचा लिफाफा कं. २ उघडण्यात आला व त्याचा अहवाल खालीलप्रमाणे आहे.

| अनु.क्र | निविदाकाराचे नाव | अंदाजित किंमत | दर % जास्त/कमी | थ्नविदाकाराने सादर केलेली किंमत |
|---|---|---|---|---|
| १) | में.कॅमविडा इनवारो इंजिनियर, प्रा.लि, | | ३% जास्त | ४१,१४,१३० |
| २) | में.एम.एस.एस.आय.डी.सी, ठाणे | रू.३९,९४,३०१/– | २% जास्त | ४०,७४,१८७ |
| ३) | में.लिफ्टमाक उदययोग प्रा.लि, हारयाणा | | ५% जास्त | ४१,९४,०१६ |

वरिल अहवालानुसार में.एम.एस.एस.आय. डी.सी, ठाणे चे रू. ४०,७४,१८७/— दर इतर निविदाकारांपेक्षा न्युनतम आहे, परंतु अंदाजित किंमतीच्या २% नी जास्त आहेत.

सदर दराच्या वाटाघाटीसाठी में.एम.एस.एस.आय.डी.सी, ठाणे यांना पत्र क्रं. उमपा/वाहन/२९८ दिनांक २५/०३/२०११ अन्वये बोलविण्यात आले व में.एम.एस.एस. आय.डी.सी, ठाणे ने पत्र क्रं. KDO/MRK/UMC/2010-2011/1660 दिनांक २६/३/२०११ अन्वये वरिल दर हे स्पार्धात्मक आहे व बाजारभावा प्रमाणे बरोबर आहे व सदर दर या पेक्षा कमी करणे शक्य होणार नाही असे कळविले आहे.

तरी वरिल में.एम.एस.एस.आय.डी.सी, ठाणे चे दर रू. ४०,७४,१८७/— एवढे मा.स्थायी समिति पुढे मंजुरीस्तव सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ३५ दिनांकः— २४/६/२०११

सुचकाचे नाव :— श्री. बी.बी. मोरे

अनुमोदकाचे नाव :— श्रीम. निना नाथानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिकेस ८००० लिटर क्षमतेची वाहन सिव्हरेज लाईन क्लिनिंग मशीन संक्शन (जेटींग व संक्शन) सह पुरविणेकामी लघुत्तम दराचे निविदाकार में.एम.एस.एस.आय.डी.सी, ठाणे यांच्याशी सविंदेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. १९ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १९** :— वर्ष २०११—१२ च्या अर्थसंकल्पीय अंदाजातील विकास शुल्क निधी विकास या लेखा शिर्षाच्या कामातील रुपये ५०.०० लक्ष समायोजन करुन उल्हासनगर शहर विकास आराखडा तयार करण्यासाठी तज्ञ सल्लागार म्हणुन मे. क्रिसल रिस्क ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर सोल्युशन लिमिटेड यांच्याशी निविदाशिवाय थेट संविदेस आयुक्तांना प्राधिकृत करणे व अंतर्भुत खर्चास मान्यता देणे.

---

सदस्य, श्री. जीवन इदनानीः— शहर विकास आराखडयात सुधारणा करण्याकामी तज्ञ सल्लागार म्हणुन ज्यांची नेमणुक करण्यांत येणार आहे त्याना अगोदरच पैसे दयायचे आहेत की, आराखडा मंजुर होवुन आल्यानंतर दयायचे आहेत?

श्री. माधव जवादे, शहर अभिंयताः— आम्ही जो प्रस्ताव पाठविला आहे त्यानुसार शहर विकास आराखडा तयार करण्यासाठी फी म्हणुन त्याना ही रक्कम दयायची आहे, याकामी शासन निर्णया अन्वये शहराचा विकास आराखडा तयार करण्यासाठी तज्ञ सल्लागाराची नेमणुक करण्याकरीता शासनाने नियुक्त केलेल्या २३ संस्थाच्या यादीतील मुबंई परिसरातील ६ सल्लागारांची संक्षिप्त यादी तयार करण्यात आलेली आहे, या यादीतील सल्लागाराकडुन हे काम करुन घ्यायचे आहे.

सदस्य, श्री. जीवन इदनानीः— म्हणजे त्याच्यांचकडून हे काम करून घेणे बधंनकारक आहे.?

श्री. माधव जवादे, शहर अभिंयताः—होय.

काही सदस्य :—पास—पास......

<u>सभापती, श्री. लाल पंजाबी:–</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑

**विषय क्र. १९ :–** वर्ष २०११–१२ च्या अर्थसंकल्पीय अंदाजातील विकास शुल्क निधी विकास या लेखा शिर्षाच्या कामातील रुपये ५०.०० लक्ष समायोजन करुन उल्हासनगर शहर विकास आराखडा तयार करण्यासाठी तज्ञ सल्लागार म्हणुन मे. क्रिसल रिस्क ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर सोल्युशन लिमिटेड यांच्याशी निविदाशिवाय थेट संविदेस आयुक्तांना प्राधिकृत करणे व अंतर्भुत खर्चास मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

महाराष्ट्र शासनाच्या, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियानात सहभागी होण्याबाबत मा. महासभेमार्फत ठराव क्र. १९ दि. १२/०७/२०१०नुसार ठराव पारीत करण्यात आला आहे. या अभियानातील शासनाच्या अटी नुसार, शहराचा विकास आराखडा तयार करणे बंधनकारक आहे. उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत JNNURM योजने अंतर्गत सन २००७ मध्ये शहराचा विकास आराखडा तज्ञ सल्लागाराकडून करुन घेण्यात आला होता. त्यानंतर शहराच्या विकासात झालेले बदल लक्षात घेऊन विकास आराखडा सुधारित करणे गरजेचे आहे व त्यासाठी तज्ञ सल्लागारांची नेमणूक करावी लागणार आहे.

त्या अनुषंगाने शासन निर्णय क्र.नगरो/२०१०/प्रकप्र–२६७/नवि–३३, दि.०३/११/२०१० अन्वये शहराचा विकास आराखडा तयार करण्यासाठी तज्ञ सल्लागारांची नेमणूक करण्याकरिता शासनाने नियुक्त केलेल्या मुंबई परिसरातील खालील सहा सल्लागाराकडून प्रस्ताव आर एफ पी सादर करण्याबाबत दिनांक ०८/०६/२०११ च्या पत्रान्वये तसेच ई मेलद्वारे कळविण्यात आले होते.

१. मे. फोरटेस इन्फ्रास्ट्रक्चर सोलुशन ॲडवायझारी सर्व्हिस, मुंबई
२. मे. टंडन आरबन सोलुशन प्रा.लि. मुंबई
३. मे. कन्सन्टिंग इंजिनिअर्स सर्व्हिसेस प्रा.लि. मुंबई
४. मे. टाटा कन्सल्टन्सी कन्सल्टींग इंजिनिअर्स लिमिटेड
५. मे. ईक्रा मॅनेजमेंट कन्सल्टींग सर्व्हिसेस, मुंबई
६. मे. क्रिसल रिस्क ॲण्ड इंन्फ्रास्ट्रक्चर सोलूशन लि. दिल्ली.

सदर आर. एफ. पी. सादर करण्याचे दिनांक १५/०६/२०११ होती त्या अनुषंगाने वरील सहा सल्लागारांपैकी मे. क्रिसल रिस्क ॲण्ड इंन्फ्रास्ट्रक्चर सोलूशन लि. दिल्ली यांनी आपले आर एफ पी प्रस्ताव सादर केलले आहे. याकामी स्पर्धात्मक प्रतिसाद मिळणे करीता शासनाने नियुक्त केलेल्या सहा सल्लागारांना कळविण्यात आले होते. परंतु मे. क्रिसल रिस्क ॲण्ड इंन्फ्रास्ट्रक्चर सोलूशन लि. दिल्ली वगळता इतर सल्लागारांनी प्रस्ताव सादर केले नाही.

उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियाना अंतर्गत १) रु. ४६.६० कोटी रकमेच्या – खेमाणी नाला वळविणे कामी त्या परिसरात भुयारी गटार योजना राबविणे २) रु. २५७ कोटी रकमेच्या – उल्हासनगर भुयारी गटार योजना ३) रु. ६४.००कोटी रकमेच्या एकात्मिक रस्ते विकास करणे या योजना आधीच शासनाकडे मंजुरीसाठी सादर करण्यात आल्या आहेत. परंतु सदर उल्हासनगर शहराचा विकास आराखडा तयार नसल्याने व त्यास शासनाची मंजुरी नसल्याने वरील प्रकल्पांच्या मंजुरीस विलंब होत आहे. मा. सचिव नगरविकास विभाग यांचे सोबत दि.२७/०५/२०११ रोजी झालेल्या बैठकीत महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियानाच्या आढावा घेण्यात आला व त्यांनी २ महिन्याच्या आत शहराचा विकास आराखडा सादर करण्याच्या सुचना दिल्या आहेत.

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियाना अंतर्गत उल्हासनगर शहराचा विकास आराखडा तातडीने तयार करणे गरजेचे आहे. वरील सहा सल्लागारांपैकी फक्त एकाच सल्लागारांचा मे. क्रिसल रिस्क ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर सोलूशन लि. दिल्ली यांचेच आर.एफ.पी. प्रस्ताव प्राप्त आहे. सदर JNNURM योजने अंतर्गत शहराचा विकास आराखडा तयार करते वेळेस मे. एस.टी.सी. कन्सल्टंट यांच्या समवेत मे. क्रिसल रिस्क ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर सोलूशन लि. यांचा ही कामात सहभाग होता.

वरील बाबी लक्षात घेता उल्हासनगर शहराचा विकास आराखडा तातडीने तयार करुन शासनास मंजुरी करीता शासनाकडे सादर करणे गरजेचे असल्याने मे. क्रिसल रिस्क ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर सोलूशन लि. यांचा

आर.एफ.पी. प्रस्तावातील लिफाफा क्र.१ उघडण्याचा निर्णय सर्वानुमताने घेण्यात आला व त्या अनुषंगाने दि.१६/०९/२०११ रोजी आर.एफ.पी. मधील तांत्रिक व आर्थिक बाबींचा लिफाफा क्र.१ उघडण्यात आला.

निविदेतील अटी नुसार लिफाफा क्र.१ मधील सर्व बाबींची तपासणी करण्यात आली मे. क्रिसल रिस्क ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर सोलूशन लि. यांचेकडे विविध ३२ शहरांचा विकास आराखडा तयार करण्याच्या कामाचा अनुभव असून इतर अटींचीही त्यांनी पुर्तता केलेली असल्याने त्याचे आर.एफ.पी. प्रस्तावानुसार लिफाफा क्र.१ नुसार ते शहराचा विकास आराखडा तयार करण्याच्या कामा करिता पात्र ठरत आहे. त्या अनुषंगाने सर्वानुमताने मे. क्रिसल रिस्क ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर सोलूशन लि. यांचा लिफाफा क्र.२ उघडण्याचे ठरले व दि. १७/०६/२०११ रोजी लिफाफा क्र.२ प्रमाणे मे. क्रिसल रिस्क ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर सोलूशन लि.यांनी या कामासाठी रु.३२५००००/–इतके शुल्क आकारल्याचे देकार दिले आहे. उक्त प्रकरणी महाराष्ट्र शासनाने शहर विकास आराखडा तयार करण्याकामी नेमलेल्या कन्सल्टंट सूचीमध्ये मे. क्रिसल रिस्क ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर सोलूशन लि. हे अंतर्भूत आहे व त्यांनी यापूर्वी उल्हासनगर शहर विकास आराखडा करण्याचा भांडवली गुंतवणूक योजना **City Investment Plan & FOP** तयार केला आहे. त्यामुळे मे. क्रिसल रिस्क ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर सोलूशन लि. यांचेशी त्यांनी दिलेले रु.३२५००००/– शुल्कावर व शहर विकास आराखडा सुधारणा काम सोपविण्यास स्थायी समिती कडून मान्यता घेणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनेअंतर्गत शहर विकास आराखडा व विकास योजनांचे सविस्तर प्रकल्प आराखडे तयार करणे ही कामे उल्हासनगर महानगरपालिकेच्या वर्ष २०११–२०१२ च्या अंदाजपत्रकीय अ अंदाजपत्रक भाग–२ क–४ (४०) महाराष्ट सुवर्ण जयंती नगरोत्थान योजना या लेखाशिर्षात रु.१ लक्ष इतकी तरतुद ठेवलेली आहे. सार्वजनिक बांधकाम खात्याच्या इतर कोणत्याही लेखाशिर्षात लेखाशिर्ष अंदाजपत्रक भाग–२ क–४ (२३) विकास शुल्क निधीत विकास वगळा तरतूद समायोजनासाठी उपलब्ध नाही. तरी विकास शुल्क निधी विकास या लेखाशिर्षाचे कामामधील रु.५०.०० लक्ष इतकी तरतुद समायोजित करण्यासाठी मे. क्रिसल रिस्क ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर सोलूशन लि. यांना उल्हासनगर शहर विकास आराखडा सुधारणा करण्याचे काम सोपविण्यास मा.स्थायी समितीकडून मंजूरी करिता प्रस्तावित आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> ३६ <u>दिनांकः–</u> २४/६/२०११

सुचकाचे नाव :– श्रीमती निना नाथानी

अनुमोदकाचे नाव :– श्रीमती सरोजिनी टेकचंदानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार वर्ष २०११–१२ च्या अर्थसंकल्पीय अंदाजातील विकास शुल्क निधी विकास या लेखा शिर्षाच्या कामातील रुपये ५०.०० लक्ष समायोजन करुन उल्हासनगर शहर विकास आराखडा सुधारणा कामी तज्ञ सल्लागार म्हणुन मे. क्रिसल रिस्क ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर सोल्युशन लिमिटेड यांच्याशी निविदाशिवाय थेट संविदेस आयुक्तांना प्राधिकृत करणे व अंतर्भुत खर्चास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. २० वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. २०** :– महानगरपालिका सेवेतील लाभार्थी कर्मचा–यांना रेनकोट, गमबुट, कोल्हापूरी चप्पल व ॲंकलबुट पुरविणेकामी मे. अमरज्योत इन्टरप्रायझेस, उल्हासनगर–३, मे. मोहिनी इंटरप्रायजेस, उल्हासनगर–४ व मे. मोहित इन्टरप्रायजेस, उल्हासनगर–३ या लघुत्तम दराच्या निविदाकाराशी बाबनिहाय संविदेस मान्यता देणे.

**<u>सदस्य (ॲड.) श्री. अनिल (विद्यार्थी) ऐलानी:—</u>** काही बाबींचे दर जास्त आहेत.

**<u>सदस्य. श्री. राजेद्रसिंह भुल्लर:—</u>** सर्व कर्मचाऱ्यांना रेनकोट, गमबुट व हे काही इतर साहित्य आहे ते मिळते का? काही कर्मचारी म्हणतात ते आम्हाला मिळत नाही.

**<u>सदस्य. श्री. प्रशांत धांडे:—</u>** गमबुट, चप्पल आणि इतर जे काही साहित्य आहे त्याचा दर्जा कसा आहे ते पहाण्यासाठी ते आम्हाला दाखवा.

**<u>सदस्य (ॲड.) श्री. अनिल (विद्यार्थी) ऐलानी:—</u>** जर कुणाला हे साहित्य मिळत नसेल तर, त्यांनी तशी लेखी तक्रार केली पाहिजे ना?.

**<u>सदस्य. श्री. प्रशांत धांडे:—</u>** तर मग यापुढे हे साहित्य वाटप करताना फोटो काढा.

**<u>सदस्य. श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>** याबाबतीत माझी अशी सुचना आहे की, हे साहित्य वाटप करण्यासाठी सन्मा. सदस्य श्री. प्रशांत धांडे यांना नियुक्त केले जावे.?

**<u>काही सदस्य :—</u>**पास—पास......

**<u>सभापती, श्री. लाल पंजाबी:—</u>**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. २०** :— महानगरपालिका सेवेतील लाभार्थी कर्मचा—यांना रेनकोट, गमबुट, कोल्हापूरी चप्पल व ॲकलबुट पुरविणेकामी मे. अमरज्योत इन्टरप्रायझेस, उल्हासनगर—३, मे. मोहिनी इंटरप्रायजेस, उल्हासनगर—४ व मे. मोहित इन्टरप्रायजेस, उल्हासनगर—३ या लघुत्तम दराच्या निविदाकाराशी बाबनिहाय संविदेस मान्यता देणे.

**<u>प्रस्तावना</u>**

महापालिका सेवेतील लाभार्थी कर्मचा—यांना सन २०११—१२ करीता भांडार विभागाव्दारे खुल्या बाजारात उपलब्ध असलेल्या न्यु झिल, रेन प्रुफ, पॉलीवेल्ड व नेक्सस, ॲपेक्स, सिको, हिप्पो कंपनीचे रेनकोट महापालिका लोगो छपाई करुन, गमबूट, विद्युत विभागागील कर्मचा—यांना ॲकलबूट व नमुन्यानुसार कोल्हापूरी चप्पल पुरवठा करणे बाबत भांडार विभागाव्दारे सादर केलेल्या टिपणीस लेखा शाखा व मा आयुक्त सो. यांचे दिनांक ०५/०५/२०११ रोजीच्या च्या मान्यतेनुसार तसेच मा. स्थायी समिती ठराव क्र १७ दिनांक १८/०५/११ रोजीच्या मान्यतेनुसार जाहीर निविदा सुचना हि दिनांक २५/०५/११ रोजीच्या दै. धनुष्य धारी, दै ठाणे वैभव व दै सकाळ हया वृत्तपत्रामध्ये व महापालिका वेबसाईडवर प्रसारीत करण्यात आली होती. त्या अनुषंगाने दिनांक २५/०६/११ ते ०२/०६/११ या कालावधी मध्ये खालील प्रमाणे पुरवठादारांनी/निविदाकारांनी निविदा फार्मस विकत घेतले होते.

| अनु. क्र | पुरवठादारांचे नाव | पावती क्र | दिनांक |
|---|---|---|---|
| १ | मे. न्यु झिल रेन वेअर. भिवंडी | ६९९१९ | ०१/०६/११ |
| २ | मे. हरी ओम ट्रेडींग अेजन्सी, डोबीवली | ६९९२० | ०१/०६/११ |
| ३ | मे. व्ही. एन. एम. एंटरप्रायजेस, उल्हासनगर—५ | ६९९२१ | ०२/०६/११ |
| ४ | मे. मुरबाडकर बिजनेस इंडस्ट्रीज, कल्याण. | ६९९२३ | ०२/०६/११ |
| ५ | मे मोहिनी एंटरप्रायजेस, उल्हासनगर—४ | ६९९२५ | ०२/०६/११ |
| ६ | मे. अमरज्योत एंटरप्रायजेस, उल्हासनगर—३ | ६९९२९ | ०२/०६/११ |
| ७ | मे मोहित एंटरप्रायजेस, उल्हासनगर—३ | ६९९३१ | ०२/०६/११ |

उपरोक्त अनु क्रमांक ०१ ते ०७ पुरवठादारांनपैकी अनु. क्रमांक ५,६,७ यांनी आपल्या सिलबंद निविदा आवश्यक त्या दस्त ऐवजासह दिनांक ०३/०६/११ रोजी दुपारी ३.०० वाजे पर्यत भांडार विभागात सादर केल्या होत्या. प्राप्त पुरवठादारांच्या सिलबंद निविदा हया आज दिनांक ०७/०६/११ रोजी ४.०० वाजता उप–आयुक्त(मु) यांच्या दालनामध्ये उपस्थित निविदाकार,मुख्य लेखा अधिकारी, मुख्य लेखा परिक्षक यांच्या उपस्थितीमध्ये उघडण्यात आल्या होत्या. अनु क्र ०५,०६,०७ यांचे पाकीट क्र १ प्रथम उघडण्यात येऊन निविदेच्या अटी व शर्ती नुसार पाकीट क्र १ मध्ये अनु क्र ०५,०६,०७ यांनी आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता केलेली असल्याने अनु क्र ०५,०६,०७ यांचे पाकीट क्र २ उघडण्यात आले निविदाकारांनी सादर केलेले दर उपस्थित निविदाकारांना वाचुन दाखविण्यात आले व त्याचा तुलनात्मक तक्ता पुढील प्रमाणे तयार करण्यात आला आहे.

## तुलनात्मक तक्ता

| अ. क्र. | साहित्यांचा तपशील | एकूण मागणी | Amar Jyot Enterprises | Mohini Enterprises | Mohit Enterprises | Total |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | हाय कॉलीटी पॉलीस्टर रेनसुट पुरूषांसाठी (तिन पीस) पॅन्ट, जॅकेट, टोपी, साईज स्मॉल, मिडीयम, लार्ज, जादा लार्ज इत्यादी नमुन्यानुसार. | अंदाजे १४५० नग | | | | |
| | ट) न्यु झिल कंपनी | | ११५०/– | ११७०/– | ११४०/– | |
| | ब) रेन प्रुफ गार्मेंट कंपनी | | ११३०/– | ११९०/– | ११३०/– | १६३८५००/– |
| | क) पॉली वेल्ड कंपनी | | ११६०/– | ११९९/– | ११५०/– | |
| | ड) नेक्सस क्लोथींग कंपनी | | १२००/– | १२२०/– | ११६०/– | |
| २ | रेनकोट महिलांसाठी (दोन पीस टोपीसह) रबराईजड अथवा पि.व्ही.सि. कोटींग साईज स्मॉल,मिडीयम, लार्ज, जादा लार्ज. | अंदाजे ५५० नग | | | | |
| | ट) न्यु झिल कंपनी | | ११००/– | १०६०/– | ११००/– | |
| | ब) रेन प्रुफ गार्मेंट कंपनी | | १०७५/– | १०४५/– | १०९०/– | ५७४७५०/– |
| | क) पॉली वेल्डकंपनी | | १११०/– | १०७०/– | १११०/– | |
| | ड) नेक्सस क्लोथींग कंपनी | | ११२५/– | १०७५/– | ११२०/– | |
| ३ | ॲकल बुट पि. व्ही. सि. अथवा रबर वेगवेगळया साईजचे नमुन्यानुसार | अंदाजे ९३ जोडी | | | | |
| | ॲपेक्स/डकबॅक कंपनी | | ५७८/– | ५९०/– | ५९०/– | ५३७५४/– |
| | सिको कंपनी | | ५९०/– | ६१०/– | ६००/– | |
| ४ | कोल्हापुरी चप्पल चांगल्या बांधणीची वेगवेगळया साईजच्या पुरषांसाठी नमुन्यानुसार | अंदाजे ७७५ जोडी | २२५/– | २३५/– | २४०/– | १७४३७५/– |
| ५ | कोल्हापुरी चप्पल चांगल्या बांधणीची वेगवेगळया साईजच्या स्त्रीयांसाठी नमुन्यानुसार | अंदाजे ४२५ जोडी | २१०/– | २००/– | २१०/– | ८५०००/– |
| ६ | गमबूट फुल साईज नमुन्यानुसार वेगवेगळया साईज प्रमाणे पुरवठा करणे | अंदाजे १४०० जोडी | | | | |
| | सिको कंपनी | | ६७५/– | ६६०/– | ६६०/– | ९२४०००/– |
| | हिप्पो कंपनी | | ७००/– | ६७०/– | ६७५/– | ३४५०३७९/– |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

तुलनात्मक तक्त्यामध्ये पुरवठादारांनी प्रस्तावित केलेले दर दर्शविलेले असून १) अनु. क्र ०१ चे मे. अमर ज्योत एंटरप्रायजेस, उल्हासनगर–३, २) अनु. क्र ०२,०६ चे मे. मोहिनी एंटरप्रायजेस, उल्हासनगर–३, ३) अनु. क्र ०१,०६ मे. मोहित एंटरप्रायजेस, उल्हासनगर–३, यांनी निविदेत सादर केलेले दर न्युनतम आहेत परंतु अनु. क्रमांक ०१,०२,०६ साहिंत्याचे दर जास्तीचे वाटत असल्याने मे. अमर ज्योत एंटरप्रायजेस, मे. मोहिनी एंटरप्रायजेस, मे. मोहित एंटरप्रायजेस यांना भांडार विभागाचे पत्र क्र ६४ दिनांक १७/०६/२०११ रोजी दर वाटाघाटी साठी उपायुक्त(मु) यांचे दालनात बोलावण्यात आले होते. उपायुक्त(मु) व पुरवठादार यांचे समवेत झालेल्या दर वाटाघाटी चर्चेअंती मे. मोहित एंटरप्रायजेस, उल्हासनगर–३, मे. मोहिनी एंटरप्रायजेस, उल्हासनगर–४, मे. अमरज्योत एंटरप्रायजेस, उल्हासनगर–३ यांनी खालील प्रमाणे अनु. क्र ०१ ,०२ व ०६ रेनकोट, गमबूट चे दर कमी करुन देण्याात आले आहेत त्याचा तक्ता खालील प्रमाणे.

| Sr No | Details of Material | Nos | Tender rate | Reduce rate | Difference |
|---|---|---|---|---|---|
| १ | हाय कॉलीटी पॉलीस्टर रेनसुट पुरूषांसाठी (तिन पीस) पॅन्ट, जॅकेट, टोपी, साईज स्मॉल, मिडीयम, लार्ज, जादा लार्ज इत्यादी नमुन्यानुसार. | | | | |
| | रेन प्रुफ गार्मेंट कंपनी | अंदाजे १४५० नग | 1130/- | 1095/- | 50750/- |
| २ | रेनकोट महिलांसाठी (दोन पीस टोपीसह) रबराईजड अथवा पि.व्ही.सि. कोटींग साईज स्मॉल,मिडीयम, लार्ज, जादा लार्ज. | | | | |
| | रेन प्रुफ गार्मेंट कंपनी | अंदाजे ५५० नग | 1045/- | 995/- | 27500/- |
| ६ | गमबूट फुल साईज नमुन्यानुसार वेगवेगळया साईज प्रमाणे पुरवठा करणे | | | | |
| | सिको कंपनी | अंदाजे १४०० जोडी | 660/- | 610/- | 70000/- |
| | | | | | 1,48,250/- |

उपरोक्त वाटाघाटीअंती सादर केलेल्या दरानुसार तुलनात्मक तक्ता क्र १ बनविण्यात आला तो खालील प्रमाणे

## तुलनात्मक तक्ता क्र १

| अ. क्र. | साहित्यांचा तपशील | एकूण मागणी | Amar Jyot Enterprises | Mohini Enterprises | Mohit Enterprises | Total |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | हायकॉलीटी पॉलीस्टर रेनसुट पुरूषांसाठी (तिन पीस) पॅन्ट, जॅकेट, टोपी, साईज स्मॉल, मिडीयम, लार्ज, जादा लार्ज इत्यादी नमुन्यानुसार. | अंदाजे १४५० नग | | | | |
| | ट) न्यु झिल कंपनी | | ११५०/– | ११७०/– | ११४०/– | |
| | ब) रेन प्रुफ गार्मेंट कंपनी | | १०९५/– | ११९०/– | १०९५/– | १५८७७५०/– |
| | क) पॉली वेल्डकंपनी | | ११६०/– | ११९९/– | ११५०/– | |
| | ड) नेक्सस क्लोथींग कंपनी | | १२००/– | १२२०/– | ११६०/– | |
| २ | रेनकोट महिलांसाठी (दोन पीस टोपीसह) रबराईजड अथवा पि. व्ही.सि. कोटींगसाईज स्मॉल,मिडीयम, लार्ज, जादा लार्ज. | अंदाजे ५५० नग | | | | |
| | अ) न्यु झिल कंपनी | | ११००/– | १०६०/– | ११००/– | |
| | ब) रेन प्रुफ गार्मेंट कंपनी | | १०७५/– | ९९५/– | १०९०/– | ५४७२५०/– |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | क) पॉली वेल्डकंपनी | | ११९०/— | १०७०/— | १११०/— | |
| | ड) नेक्सस क्लोथींग कंपनी | | ११२५/— | १०७५/— | ११२०/— | |
| ३ | ॲकल बुट पि. व्ही. सि. अथवा रबर वेगवेगळया साईजचे नमुन्यानुसार | अंदाजे ९३ जोडी | | | | |
| | ॲपेक्स/डकबॅक कंपनी | | ५७८/— | ५९०/— | ५९०/— | ५३७५४/— |
| | सिको कंपनी | | ५९०/— | ६१०/— | ६००/— | |
| ४ | कोल्हापुरी चप्पल चांगल्या बांधणीची वेगवेगळया साईजच्या पुरषांसाठी नमुन्यानुसार | अंदाजे ७७५ जोडी | २२५/— | २३५/— | २४०/— | १७४३७५/— |
| ५ | कोल्हापुरी चप्पल चांगल्या बांधणीची वेगवेगळया साईजच्या स्त्रीयांसाठी नमुन्यानुसार | अंदाजे ४२५ जोडी | २१०/— | २००/— | २१०/— | ८५०००/— |
| ६ | गमबूट फुल साईज नमुन्यानुसार वेगवेगळया साईज प्रमाणे पुरवठा करणे | अंदाजे १४०० जोडी | | | | |
| | सिको कंपनी | | ६७५/— | ६१०/— | ६१०/— | ८५४०००/— |
| | हिप्पो कंपनी | | ७००/— | ६७०/— | ६७५/— | ३३०२१२९/— |

महापालिका सेवेतील लाभार्थी कर्मचा—यांना सन २०११—१२ करीता रेनकोट गमबूट व कोल्हापूरी चप्पल तसेच विद्युत विभागागील कर्मचा—यांना ॲकलबूट पुरवठा करणे बाबत. १) मे. अमर ज्योत, एंटरप्रायजेस, उल्हासनगर—३ यांनी अनु. क्र ०१,०३,०४ साहिंत्याचे वाटाघाटीअंती सादर केलेले दर न्युनतम असुन वाजवी आहेत. सदर वाजवी दराने अनु. क्र ०१,०३,०४ साहिंत्य खरेदी करण्याकरीता एकुण रुपये १०,२२,००४/— (दहा लाख बावीस हजार चार मात्र) खर्च होणार आहे. २) मे. मोहिनी एंटरप्रायजेस, उल्हासनगर—४ यांनी अनु. क्र ०२,०५,०६ साहिंत्याचे वाटाघाटीअंती सादर केलेले दर न्युनतम असुन वाजवी आहेत. सदर वाजवी दराने अनु. क्र ०२,०५,०६ साहिंत्य खरेदी करण्याकरीता एकुण रुपये १०,५९,२५०/— (दहा लाख एकुणसाठ हजार दोनशे पन्नास मात्र) खर्च होणार आहे. ३)मे. मोहित एंटरप्रायजेस, उल्हासनगर—३ यांनी अनु. क्र ०१,०६ साहिंत्याचे वाटाघाटीअंती सादर केलेले दर न्युनतम असुन वाजवी आहेत. सदर वाजवी दराने अनु. क्र ०१,०६ साहिंत्य खरेदी करण्याकरीता एकुण रुपये १२,२०,८७५/— (बारा लाख विस हजार आठशे पंचाहत्तर रुपये मात्र) खर्च होणार आहे.

सबब मे. अमरज्योत एंटरप्रायजेस, उल्हासनगर—३, मे. मोहिनी एंटरप्रायजेस, उल्हासनगर—४, मे. मोहित एंटरप्रायजेस, उल्हासनगर—३ यांनी सादर केलेले दर स्विकृत करण्यात येउन अनु.क्र ०१ ते ०६ कर्मचारी साहिंत्य खरेदी करण्यासाठी लागणारी एकुण रक्कम रुपये ३३,०२,१२९/—( तेहतीस लाख दोन हजार एकशे एकोणतीस मात्र ) हे वित्तीय वर्ष २०११—१२ अंदाजपत्रकामधील कर्मचारी गणवेश व ईतर साहिंत्य खरेदी लेखा शिर्ष AB A-2 (8) मध्ये रुपये ९०,००,०००/— तरतुद करण्यात आली असुन पुरेशी तरतुद शिल्लक असल्यामुळे सदरचा खर्च भांगविता येईल.

तरी सदरचा प्रस्ताव मुंबई प्रांतीक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ७३ क अन्वये मा. स्थायी समिती समोर प्रशासकींय व वित्तीय मंजुरीसाठी सविनय सादर.

**स्थायी समिती ठराव क्र. ३७** **दिनांक:— २४/६/२०११**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री.बी.बी. मोरे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत उल्लेखलेल्याप्रमाणे महानगरपालिका सेवेतील लाभार्थी कर्मचा—यांना रेनकोट, गमबुट, कोल्हापूरी चप्पल व ॲकलबुट पुरविणेकामी मे. अमरज्योत इन्टरप्रायझेस, उल्हासनगर—३, मे. मोहिनी इंटरप्रायजेस, उल्हासनगर—४ व मे. मोहित इन्टरप्रायजेस, उल्हासनगर—३ या लघुत्तम दराच्या निविदाकारांशी बाबनिहाय संविदेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—
अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

**महापालिका सचिव :—** विषय क्र. २१ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. २१ :—** उल्हासनगर महानगरपालिकेला फर्निचर पुरविणेकामी प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणे

---

**सदस्य. श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—** याबाबत निविदा काढली जावी.

**सभापती, श्री. लाल पंजाबी :—** अगोदर प्राकलन मंजुर होईल, त्यानंतर निविदा मागविली जाईल.

**काही सदस्य :—**पास—पास.....

**सभापती, श्री. लाल पंजाबी:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. २१ :—** उल्हासनगर महानगरपालिकेला फर्निचर पुरविणेकामी प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणे

**प्रस्तावना**

महापालिका मुख्यालयातील सर्व विभाग व पदाधिकारी कार्यालय, सर्व समित्या तसेच प्रभाग समिती कार्यालय, प्रभाग समिती मधील असलेले सर्व तज्ञ समित्या यांचे कडून खालिल प्रमाणे फर्निचर साहित्यांची तात्काळ मागणी प्राप्त झाली आहे तसेच वेळोवेळी होणार आहे तसेच सार्वत्रीक निवडणूक २०११ विचारात घेऊन खालील प्रमाणे विविध विभागांकडून मागणी करण्यात आलेल्या फर्निचर साहित्यांचा तपशील सोबत जोडला आहे. तसेच मा. उपायुक्त मुख्यालय यांचे पत्र. जा.क्र. उमपा/साप्रवि/आस्था/मुली/३६८, दिनांक १४/३/२०११ नुसार सन २०११—२०१२ करीता आवश्यक फर्निचर साहित्यांची मागणी खालिल प्रमाणे आहे.

| अ. क्र | विभागाचे नांव | साहित्याचे नांव | मागणीसंख्या व अंदाजीत होणारीपुढील मागणीसंख्या | अंदाजीत दर | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | सहांयक आयुक्त,प्रभाग क्र २,उप विभागीय अभियंता, पा.पु व मलनिसा:रण,लेखा विभाग नागरिक सुविधा केंद्र, एस. आय कार्यालय प्रभाग १,२,३,४,सहाय्यक आयुक्त, प्रभाग समिती क्र.४, सामान्य प्रशासन विभाग, नगर भुमापन कार्यालय, उल्हासनगर, पाणी पुरवठा देंयकविभाग. | कपाट मोठे | ३८ + १२ = ५० नग | ६५००/— | ३२५०००/— |
| २ | सहाय्यक आयुक्त, प्रभाग क्र.२, सभापती, महसुल समिती, नागरिक सुविधा केंद्र, एस. आय कार्यालय प्रभाग १,२,३,४ | कपाट छोटे | ३२ + ८ = ४० नग | ३८००/— | १५२०००/— |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | सहाय्यक आयुक्त, प्रभाग क्र.२, सहाय्यक आयुक्त, प्रभाग समिती क्र.४, सुरक्षा रक्षक कार्यालय, सहाय्यक आयुक्त, प्रभाग समितीक्र.१ | लोखंडी लॉकर कपाट | ०६ + ०४ =१० नग | ८५००/— | ८५०००/— |
| ४ | सहाय्यक आयुक्त, प्रभाग क्र.२, एस.आय कार्यालय प्रभाग १,२,३,४, सहाय्यक आयुक्त, प्रभाग समिती क्र. ४, सहाय्यक आयुक्त, प्रभाग समिती क्र.१ | ऑफीस टेबल | ६५ + ५ =७० नग | ५०००/— | ३५००००/— |
| ५ | सचिव कार्यालय | केन खुर्ची | ०१ + ५ =०६ नग | १५००/— | ९०००/— |
| ६ | कर विभाग | सेमि एक्सीकेटीव्ह रिव्हालविंग चेअर | ०३ + ०७ =१० नग | ४२००/— | ४२०००/— |
| ७ | एस. आय कार्यालय प्रभाग १,२,३,४ | प्लॅस्टीक खुर्च्या | ५३ + ४७ =१०० नग | ५००/— | ५००००/— |
| ८ | एस. आय कार्यालय प्रभाग १,२,३,४,सहाय्यकआयुक्त, प्रभाग समिती क्र ४, सहाय्यक आयुक्त, प्रभाग समिती क्र.१, सभापती, प्रभाग समिती क्र २,स्थायी समिती सभागृह, सभागृह नेता कार्यालय | व्हीजिटर्स चेअर | ११५ + ३५ =१५० नग | २६००/— | ३९००००/— |
| ९ | सभागृह नेता कार्यालय, सहाय्यक आयुक्त, प्रभाग समिती क्र.१ | लॉकर संगणक ट्राली | ०३ + ०७ =१० नग | ८९००/— | ८९०००/— |
| १० | विधी विभाग | गॅलव्हनाईज ट्रंक | २० + ८० =१०० नग | २०००/— | २०००००/— |
| ११ | सहाय्यक आयुक्त, प्रभाग समिती क्र.१ | नोटीस बोर्ड | ०१ + ०९ =१० नग | १०००/— | १००००/— |
| १२ | सभापती, प्रभाग समितीक्र२ | एक्सीकेटीव्ह रिव्हालविंग चेअर | ०२ + ०८ =१० नग | ५५००/— | ५५०००/— |
| १३ | स्थायी समिती | टीपॉय मोठे | ०१ + ०४ = ०५ नग | ६०००/— | ३००००/— |
| १४ | सभागृह नेता कार्यालय | सोफा सेट दोन खुर्चीसह | ०१ + ०२ = ०३ नग | १६०००/— | ४८०००/— |
| १५ | | पटटी कर्टन | १००० स्के. फुट | ८५/— | ८५०००/— |
| १६ | | पडदे | ३०० मिटर | ११५/— | ३४५००/— |
| १७ | | Adjustable Table Unit | १० नग | ३६००/— | ३६०००/— |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १८ | रिव्हालविंग चेअर्स दुरुस्ती | | २५ नग | १५००/— | ३७५००/— |
| १९ | व्हीजिटर्स चेअर्स दुरुस्ती. | | १०० नग | ७५०/— | ७५०००/— |
| २० | ऑफीस टेबल दुरूस्ती | | २५ नग | २४००/— | ६००००/— |
| २१ | लोखंडी कपाट दुरुस्ती करणे | | २० नग | २८००/— | ५६०००/— |
| | एकुण | | | | २२१९०००/— |

सन २०११—२०१२ करीता भांडार विभागास उपरोक्त फर्निचर साहित्य खरेदी करणे करीता अंदाजे रूपये २२,१९,०००/— (बावीस लाख एकोणीस हजार मात्र) खर्च अपेक्षीत आहे सदर खर्च हा फर्निचर साहिंत्य खरेदी, निगा व दुरुस्ती महापालिका अंदाज पत्रकात AB A-3 (iv) या लेखाशिर्षका अंतर्गत रूपये २५,००,०००/— खर्चाची तरतूद करण्यात आली असुन पुरेशी तरतुद शिल्लक असल्यामुळे उपरोक्त खर्च भागविता येईल.

तरी सदरचा प्रस्ताव मुंबई प्रातीक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ७३ क अन्वये मा. स्थायी समितीसमोर प्रशासकींय व वित्तींय मान्यता मिळणेस्तव सविनय सादर.

स्थायी समिती ठराव क्र. ३८ दिनांकः— २४/६/२०११

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती निना नाथानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिकेला फर्निचर पुरविणेकामी प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. २२ वाचुन दाखवितात

---

विषय क्र. २२ :— मा. आमदार निधीतून दोन चेसीस शासकिय दराने पुरविणे व त्यावर वाडी बांधणेकामी मे. टाटा मोटर्स व मे. शिव स्टील कॉर्पोरेशन यांच्याशी निविदा शिवाय थेट संविदा करण्यास आयुक्तांस प्राधिकृत करणे.

---

काही सदस्य :— कोणत्या दराने.खरेदी करणार?

सभापती, श्री. लाल पंजाबी :— शासकीय दराने.

काही सदस्य :—पास—पास......

सभापती, श्री. लाल पंजाबी:—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

विषय क्र. २२ :— मा. आमदार निधीतून दोन चेसीस शासकिय दराने पुरविणे व त्यावर वाडी

बांधणेकामी मे. टाटा मोटर्स व मे. शिव स्टील कॉर्पोरेशन यांच्याशी निविदा शिवाय थेट संविदा करण्यास आयुक्तांस प्राधिकृत करणे.

**प्रस्तावना**

उपरोक्त संदर्भित पत्रान्वये लेखाधिकारी, जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी यांनी मा.आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत मा. आमदार श्री. कुमार ऐलानीयांच्या निधीतुन उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे दोन रूग्णवाहिका खरेदी करण्यास रू. १५,९०,०००/— एवढा रक्कमेचा धनादेश प्राप्त झाला असून तो उल्हासनगर महानगरपालिकेच्या लेखाशाखेत जमा करण्यात आलेला आहे.

सदर निधीतुन मा. आमदार यांचे सोबत झालेल्या चर्चेनुसार मे.टाटा मोटर्स कडून शासकिय दराने चेसीस विकत घेऊन मे.शिव स्टील कॉरपोरेशन यांचे कडून बॉडी बांधण्याचे काम करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

सदर मे. टाटा मोटर्स कडून SFC-410 EX/31 BS-3 CLB या मॉडेलच्या एका चेसीस पोटी शासकिय दराने सोबत जोडलेल्या दरपत्रकानुसार रू. ६,२३,६९४/— एवढी रक्कम व त्यावर बॉडी बांधण्यासाठी में. शिव स्टील वर्क्स यांना रू. १,७०,०००/— एवढी रक्कम अदा करावी लागेल.

दोन वाहनासाठी.

में. टाटा मारर्स लि. = २ X ६,२३,६९४ = रू. १२,४७,३८८/—
में. शिव स्टील कॉरपोरेशन = २ X १,७०,००० = रू. ३,४०,०००/—

या अनुषंगाने मा. आमदार निधीतुन दोन रूग्णवाहिकेसाठी में. टाटा मोटर्स यांना दोन ४१० चेसीस पोटी शासकिय दराने रू. १२,४७,३८८/— एवढी डिमांड ड्राफ्ट व्दारे अग्रिम स्वरुपात व में. शिव स्टील कॉरपोरेशन यांना दोन चेसीसवर बॉडी बांधण्यासाठी रू. ३,४०,०००/— एवढी रक्कम अदा करावी लागेल. तरी वरिल दोन चेसीस शासकिय दराने मे. टाटा मोटर्स कडून घेण्यास व मे. शिव स्टील कॉरपोरेशन यांचे कडून सदर चेसीसवर बॉडी बांधण्यास प्रस्ताव मा. स्थायी समितीपुढे निर्णयास्तव सादर करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र.** २२ **दिनांक:— २४/६/२०११**

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती निना नाथानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार मा. आमदार निधीतून दोन चेसीस शासकिय दराने पुरविणे व त्यावर वाडी बांधणेकामी मे. टाटा मोटर्स व मे. शिव स्टील कॉर्पोरेशन अनुक्रमे यांच्याशी निविदा शिवाय थेट संविदा करण्यास आयुक्तांस प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. २३ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. २३ :—** डंपिंग ग्राउंड येथिल कच—याचे सपाटीकरण करणेकामी प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणे.

---

**सदस्य. श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—** याबाबत सुध्दा निविदा मागविली जावी.

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्री. लाल पंजाबी:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. २३ :—** डंपिंग ग्राउंड येथिल कच—याचे सपाटीकरण करणेकामी प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणे.

प्रस्तावना

डंपिंग ग्राउंडवरील कच—याचे सपाटीकरण नियमीत करण्याच्या दृष्टीने अभिकर्त्याची नेमणुक करणे आवश्यक असल्याने व तसेच घनकचरा व्यवस्थापन नियम २००० नुसार डंपिंग ग्राउंडवरील कच—याची विल्हेवाट शास्त्रीयोक्त पध्दतीने होणे अत्यावश्यक असल्याने डंपिंग ग्राउंड वरील कच—याचे सपाटिकरण करण्यासाठी प्रतिदिन दर मागवून आवश्यक मशिनरी (पोक्लेन/डोझर/जेसीबी/बॅक लोडर जेसीबी, ऑन कॉल पुरविणे) भाडेतत्वावर उपलब्ध करुन घेण्यासाठी व संपुर्ण डंपिंग ग्राउंड मॅनेजमेंट अंतर्गत सपाटीकरण करणे अत्यावश्यक आहे.

उल्हासनगर शहरातून निघणारा दैनंदिन अंदाजे ३२० टन कचरा, नाले सफाईमधून निघणारा गाळ व इतर अतिरीक्त कचरा, राणा ट्रेडिंग कंपनीजवळ, म्हारळ गांव येथिल डंपिग ग्राउंडवर टाकण्यात येत असतो. सदरील ठिकाणी कच—याचे प्रमाण वाढल्याने व पर्यायी जागेची व्यवस्था न झाल्याने तेथिल कच—याचे प्रमाण वाढून त्याचे रुपांतर मोठया ढिगात होते. त्यामुळे नियमीत कचरा सपाटीकरण करणे आवश्यक आहे. अतिरीक्त कच—याचे सपाटीकरण योग्य रितीने होत नसल्यामुळे कच—याच्या गाडया रस्त्यावर खाली कराव्या लागतात. त्यामुळे पुढील कचरा गाडयांच्या वाहतुकीस अडथळा निर्माण होत असतो व पर्यायाने कचरा वाहतुकीवर परिणाम होऊन नागरीकांच्या आरोग्यास धोका निमार्ण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच डंपिंग ग्राउंड जवळील परिसरात नियमीत जंतुनाशक फवारणी न झाल्यास व कच—याचे सपाटीकरण नियमीत न झाल्यास तेथिल परिसरातील नागरीक/रहिवाशी नेहमीच कचरा वाहतूकीच्या गाडया थांबवून कामात व्यत्यय आणून शहरातील नागरीकांस व प्रशासनास वेठीस धरीत असतात.

सन २००९—२०१० साठी उल्हासनगर महानगरपालिकेच्या डंम्पिंग ग्राऊंडवरील कच—याचे सपाटीकरण करण्यासाठी अभिकर्त्याची नेमणुक करणेबाबत मा.स्थायी समिती ठराव क्र. १४० दिनांक २७/२/२००९ रोजी अन्वये प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिलेली होती. त्यानूसार निविदा सुचना दैनिक हमारा महानगर, फ्री प्रेस व दैनिक वृत्त मानस या वर्तमानपत्रात दि. १९/०६/२००९ रोजी निविदा सुचना प्रसिध्द करण्यात येऊन दर मागविण्यात आली होते. दिनांक १९/६/०९ ते २६/०६/९ या कालावधीत मे. नंदिनी कंन्स्ट्रक्शन, अंधेरी, मुंबई व बॉम्बे जसीबी अथमुवर्स, नवी मुंबई अशा दोन निविदाकारांनी निविदा पुस्तिका खरेदी केल्या व दि. २९/०६/२००९ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यत उक्त दोन निविदारांपैकी फक्त मे. बॉम्बे जसीबी अथमुवर्स, नवी मुंबई यांनी निविदा सादर केलेली होती. निविदा प्रक्रीया पुर्ण करण्यासाठी किमान तिन निविदाकारांची आवश्यकता असल्याने निविदा प्रक्रीया पुर्ण करुन अभिकर्त्याची नेमणुक करणे शक्य झाले नव्हती. तसेच मा. आयुक्तांची परवानगीने पुन्हा दि. २६/१०/२००९ ते ९/११/०९ रोजी फेरनिविदा सुचना प्रसिध्द करण्यात आलेली होती. परंतु सदर कालावधीत एकही कोरी निविदा निविदाकारांकडून खरेदी करण्यात आलेली नसल्याने निविदा प्रक्रीया पुर्ण करणे शक्य झाले नाही. अशा प्रकारे सन २०१०—११ पर्यंत नविन अभिकर्त्याची नेमणुक करणे शक्य झालेले नाही. व त्याच प्रमाणे मा. स्थायी समिती ठराव क्र. १३१ दिनांक २७/२/२००९ रोजी अन्वये डंपिंग ग्राउंडवरील कच—याचे सपाटीकरणाच्या कामास निविदा प्रक्रीया पुर्ण होवून निविन ठेकेदार नियुक्त होईपर्यंत प्रशासनास मे. ॲन्टोनी वेस्ट हॅ. सेल. प्रा. लि., नवी मुंबई यांच्याशी मागील निविदेच्या अटी, शर्ती व दरानुसार निविदा शिवाय थेट संविदा करण्यास मान्यता दिली आहे. त्यामुळे सद्यास्थितीत मे. ॲन्टोनी वेस्ट हॅ. सेल प्रा. लि. यांच्या मार्फत डंपिंग ग्राउंडवरील सपाटीकरणाचे काम नियमीत सुरु आहे. त्यानुसार सन २००९—१० पासुन मे. ॲन्टोनी वेस्ट हॅ. सेल प्रा.ली. कंपनी, नवी मुंबई यांच्या मार्फत डंपिंग ग्राउंडवरील कच—याच्या सपाटीकरणाचे काम सुरु आहे. सन २०११—१२ साठी निविदा प्रक्रीया अंती कार्यादेश दिलेल्या दिनांका पासुन एक वर्षासाठी डंपिंग ग्राउंडवरील कच—याचे सपाटी करण्यासाठी नविन अभिकर्त्याची नेमणुक करणे आवश्यक आहे.

डंपिंग ग्राउंडवरील कच—याचे सपाटीकरण घनकचरा व्यवस्थापन नियम २००० अंतर्गत डंपिंग ग्राउंड मॅनेजमेंट करण्यासाठी मागील निविदेतील अटी,शर्ती नुसार व दरानुसार प्रतिदिन रु. १२,७६०/— प्रमाणे अंदाजीत रुपये ४६,५७,४००/— (सेहचाळीस लाख सत्तावन्न हजार चारशे मात्र.) खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च भागविण्यासाठी अंदाजपत्रक सन २०११—२०१२ च्या भाग—१ सी—१(1), कचरा वाहतुक खर्च या लेखाशिर्षकात रुपये ६,००,००,०००/— तरतुद करण्यात आली आहे, सदरचा खर्च त्यातून करण्याचे प्रस्तावित करण्यात येते.

तरी उक्त कामास व त्यासाठी येणा—या अंदाजीत खर्चाच्या प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेसाठी व निविदा सुचना प्रसिध्द करण्यासाठी सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीसमोर मान्यतेसाठी सविनय सादर.

**स्थायी समिती ठराव क्र.** ४०      **दिनांक:—** २४/६/२०११

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती निना नाथानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार डंपिंग ग्राउंड येथिल कच—याचे सपाटीकरण करणेकामी प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. २४ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. २४** :—शासनाच्या व महापालिकेच्या निधीतुन इंटीग्रटेड स्ट्रीट लाईट मॅनेजमेंट सिस्टिम विथ रिमोट ॲक्सेस थ्रु वेब बेस्डटेक्नॉलॉजी"ल्क्ा व ळच्रै द्वारे उर्जा वापराची कार्यक्षमता वाढविणे कामी मे. ईरटज ट्रान्सलेक्ट्रो या लघुत्तम दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता देणे.

---

काही सदस्य :—पास—पास......

सभापती, श्री. लाल पंजाबी:—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. २४** :— शासनाच्या व महापालिकेच्या निधीतुन इंटीग्रटेड स्ट्रीट लाईट मॅनेजमेंट सिस्टिम विथ रिमोट ॲक्सेस थ्रु वेब बेस्डटेक्नॉलॉजी"ल्क्ा व ळच्रै द्वारे उर्जा वापराची कार्यक्षमता वाढविणे कामी मे. ईरटज ट्रान्सलेक्ट्रो या लघुत्तम दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता देणे.

प्रस्तावना

काही वर्षापुर्वी Automation पध्द्तीचा अवलंब केल्यामुळे ऊर्जेची बचत झाली त्याच Technology ला आम्ही आणखीन Modification करून व त्याला काही नवीन Technology ची जोड देऊन हया System ची कार्यक्षमता अजुन वाढवण्याचा प्रयत्न करण्याकरीता महानगरपालिकेच्या क्षेत्रात **इंटीग्रेटेड स्ट्रीट लाईट मॅनेजमेंट सिस्टीम विथ रिमोट ॲक्सेस थ्रु वेब बेस्ड टेक्नॉलॉजी— SCADA व GPRS** द्वारे उर्जा वापराची कार्यक्षमता वाढवण्याकरीता संयत्रे आस्थापित करून महाऊर्जा व शासनाकडुन बनविलेल्या योजनेचा लाभ घेणेकामी मा. महासभेने ठराव क्र. ७८, दिनांक १७/३/२०११ अन्वये मान्यता देउन धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे.

महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा) यांचेकडुन पत्र क्र. *इसीएन/२०१०—११/प्र. क्र.४७०/१४६२, दि.१३/०४/२०११ अन्वये रू.२० लाखाचे अर्थसहाय्य मंजुर करण्यात आले आहे.* या धनादेशाचा क्रमांक ६८४७८९, दि.३१/०३/२०११ असुन सदर धनादेश दि.१३/०४/२०११ रोजी प्राप्त झाला आहे.

उल्हासनगर शहरातील पथदिव्यांमध्ये ऊर्जा बचतीसाठी वित्तीय वर्ष २०११—२०१२ मधील महापालिकेच्या अंदाजपत्रकामध्ये **'शोध विकास व अपारंपारिक वीज व ऊर्जा संवर्धन इत्यादी'** या बजेट हेडमध्ये रू.२० लाखाची तरतुदही केलेली आहे.

या मंजुर अनुदान व महापालिकेच्या निधीतून नवीन Technology मध्ये आम्ही SCADA, GPRS Modem हया Technology चा वापर करणार आहोत हयाचे सर्वात मोठे फायदे म्हणजे,

१) शहरातील सर्व Switching Units चे Observation व Control हे कार्यालयातील Base Station मधुन शक्य आहे.

२) सर्व Switching Units मध्ये घडणा—या सर्व घडामोंडींचे Log Base Station च्या Computer मध्ये save करता येते.

हे स्पष्ट फायदे असले तरी हया system चा खरा फायदा हा **अदृष्य** आहे व तो ही तितकाच किंबहुना जास्त महत्वाचा आहे. तो असा कि जसे एखादया व्यक्तीच्या जर तब्येतीत सुधारणा करायची असली तर त्याच्या तब्येतीचे (आरोग्याचे व त्याच्या system चे) Diagnosis आणि Diagnosis नंतर जी माहिती (Data) मिळेल त्याचे Analysis जर योग्यरित्या झाले तर पुढे याच्यात ब—याच improvement आपण
करू शकतो पण हे तेव्हा जर आपल्याला त्याच्या तब्येतीची योग्य माहिती (Data) मिळाली.

वर्तमानात काय घडते आहे हयाची पुर्ण माहिती असल्याशिवाय भविष्यात त्या विषयीच्या सुधारणा शक्य नसतात हया विधानाला अनुसरून जर एखादया System ची वर्तमानातील माहिती (Data) जर आपल्याकडे असेल तर त्याचे Analysis करून भविष्यात त्यामध्ये असलेल्या त्रुटी दुर करून आणखी चांगली पध्दत विकसित करता येईल.

सदर कामासाठी जनसंपर्क कार्यालय, नागरी सुविध केंद्र व सुरक्षा विभाग यांना निविदा सुचना प्रसिध्द् करण्यासाठी पत्र क्र. उमपा/विदयुत/२/३६, दिनांक ९/५/२०११ देण्यात आले होते. त्याच्या प्रतिसादात 1) **M/s. Asian Control & Equipments, Mumbai 2) M/s. Aditya Computer Services, Ulhasnagar-3 3) M/s. Hertz Transelectro, Unr-3 4) M/s. Prithvi Technologies Pvt.Ltd., Thane 5) M/s. The Hind Electric & Engineering Corporation, Vasai 6) M/s. Nayan Electronics, Pune** या ०६ इच्छुक निविदाकारांनी कोरे निविदा फॉर्म खरेदी केले होते. त्यापैकी विहित मुदतीत दिनांक ३०/०५/२०११ रोजी दुपारी ३—०० वाजेपर्यंत 1) **M/s. Asian Control & Equipments, Mumbai 2) M/s. Aditya Computer Services, Ulhasnagar-3 3) M/s. Hertz Transelectro, Unr-3 4) M/s. Nayan Electronics, Pune** या ०४ निविदाकारांनी सिलबंद निविदा विदयुत विभागात इसारा रक्कमेसह दाखल केल्या आहेत. त्याचा तुलनात्मक तक्ता खालिलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | निविदाकार/संस्थेचे नांव | दर |
|---|---|---|
| 1. | **M/s. Asian Control & Equipments,Mumbai** | अंदाजपत्रकीय रक्कम रू.३८,०५,०००पेक्षा 3% Above |
| **2.** | **M/s. Aditya Computer Services,Ulhasnagar-3** | अंदाजपत्रकीय रक्कम रू.३८,०५,०००पेक्षा 12% Above |
| **3.** | **M/s. Hertz Transelectro, Unr-3** | अंदाजपत्रकीय रक्कम रू.३८,०५,०००पेक्षा1.05% Below |
| **4.** | **M/s. Nayan Electronics, Pune** | अंदाजपत्रकीय रक्कम रू.३८,०५,०००पेक्षा 18% Above |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्यानुसार **M/s. Hertz Transelectro** यांनी सादर केलेले दर हे सर्वात कमी असुन वाजवी आहेत.

त्यामुळे सदर कामासाठी **M/s. Hertz Transelectro** यांची निविदा स्विकृत करून त्यांनी सादर केलेले दर अंदाजपत्रकीय रक्कम रू. ३८,०५,००० पेक्षा 1.05% ने कमी म्हणजे लागणारा खर्च रू. ३८,०३,०९८/— इतक्या रक्कमेस मान्यता देवुन करार करण्याच्या प्रस्तावास मा. स्थायी समिती पुढे मंजुरीसाठी सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ४१ दिनांकः— २४/६/२०११

सुचकाचे नाव :— श्री.बी.बी. मोरे

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसारशासनाच्या व महापालिकेच्या निधीतुन इंटीग्रटेड स्ट्रीट लाईट मॅनेजमेंट सिस्टिम विथ रिमोट ॲक्सेस थ्रु वेब बेस्डटेक्नॉलॉजी "*GPRS* व *GSM*" द्वारे उर्जा वापराची कार्यक्षमता वाढविणे कामी मे. ईरटज ट्रान्सलेक्ट्रो या लघुत्तम दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. २५ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. २५ :—** प्रभाग क्र. ७३ मधील बॅरेक नं. २०२९, मठ मंदिर जवळ, उल्हासनगर—५ येंथे पैसे दया व वापरा या तत्वावर शौचालय बांधणेस मान्यता देणे.

---

वरील प्रमाणे तक्त्यानुसार मे. मोहित इंटरप्राईझेस, उल्हासनगर यांनी अ.क्र.१ साठी न्युनतम दर सादर केलेले आहेत. तर अ.क्र. २साठी मे. मोहिनी इंटरप्राईझेस, उल्हासनगर यांनी न्युनतम दर सादर केलेल आहेत. सादर केलेल्या दरानुसार लोखंडी रॅक व वहया खरेदीसाठी रुपये ७,३७,१००/– (सात लाख सदोतीस हजार शंभर मात्र) खर्च येणार आहे. सदरचा खर्च पुर्व प्राथमिक व माध्यमीक शिक्षण सी–४ (२)या लेखा शिर्षकात रु. १५,००,०००/– तरतुद करण्यात आली आहे त्यापैकी रुपये ७,९३,१२५ शिल्लक आहे त्यातून करण्यात येणार आहे. तरी सदर खर्चास व मे. मोहित इंटरप्राईझेस व मे. मोहिनी इंटरप्राईझेस, उल्हासनगर यांच्याशी संविदा करण्याकरीता व वित्तीय मान्यतेसाठी मा. स्थायी समितीची मान्यता आवश्यक आहे. करिता सदरचा प्रस्ताव मान्यतेसाठी मा. स्थायी समिती समोर सविनय सादर.

**स्थायी समिती ठराव क्र.** ६० **दिनांकः–८/८/२०११**

सुचकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार महापालिका क्षेत्रातील गरीब व गरजु विदयार्थ्यांना वहया व ३० मनपा शाळांसाठी प्रत्येकी २ लोखंडी रॅक पुरविण्याकामी लघुत्तम दराचे निविदाकार अनुक्रमे मे. मोहिनी इंटरप्राईजेस– व मे. मोहित इंटरप्राईझेस उल्हासनगर यांच्याशी संविदेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–** विषय क्र. १९ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. १९ :–** महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियानांतर्गत महापालिका अग्निशमन सेवेचे सक्षमीकरण प्रयोजनार्थ अग्निशमन केंद्र बांधणेकामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे.

---

**सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–**हा प्रस्ताव पारीत करुन लवकरात लवकर निविदा मागविल्या जाव्यात.

**सभापती, श्री. लाल पंजाबी:–**लवकरात लवकर निविदा आल्या पाहिजेत.

**काही सदस्य :–**पास–पास......

**सभापती, श्री. लाल पंजाबी:–**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. १९ :–**महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियानांतर्गत महापालिका अग्निशमन सेवेचे सक्षमीकरण प्रयोजनार्थ अग्निशमन केंद्र बांधणेकामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे.

**प्रस्तावना**

उपरोक्त विषयान्वये मा.सचिव नगर विकास विभाग यांनी शासन निर्णय क्र.अशस/१४०७/३६०/प्र.क्र.२११ दिनांक ३१/८/२००९ अन्वये राज्यातील अग्निशमन सेवेचे सक्षमीकरण करणेबाबत निर्देश दिले आहेत.

महाराष्ट्र राज्यातील सर्व अग्निशमन सेवेवचे सक्षमीकरण करणेकरीता राज्य शासनाने महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ दिनांक ६/१२/२००८ पासून राज्यातील नागरी भागात व विशेष नियोजन प्राधिकरण क्षेत्रात लागू केलेला आहे. या संबंधी महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक व उपाययोजना नियम २००९ दिनांक २३/६/२००९ रोजी शासन राजपत्रात प्रसिध्द केले आहे.

सबब या अधिनियमातील तरतूदींची प्रभावीपणे अंमलबजावणी करुन त्यामध्ये असणारी तुट भरुन काढून अग्निशमन सेवेचे बळकटीकरण / सक्षमीकरण करणेबाबत निर्देश दिले आहे. यासाठी आवश्यक असलेला DPR शासनाकडे सादर केलेला आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे उल्हासनगर–३ येथील तरणतलाव शेजारी अग्निशमन केंद्र बांधणेच्या स्थापत्य कामाचे मे.अनिरुध्द नाखवा, स्थापत्य सल्लागार यांचेकडून ढोबळमानाने प्राकलन तयार करणेत आले आहे. सदर कामाची प्राकलनिय किंमत रु.१.२५ कोटी इतकी आहे. महानगरपालिकेच्या वर्ष २०११–१२ च्या अर्थसंकल्पात विपरीत परिस्थिती व्यवस्थापन व अग्निशमन इमारत अंतर्गत B-2 (1) अग्निशमन इमारत बांधणे या लेखाशिर्षात सदर कामासाठी रु१.२५ कोटी इतकी तदतूद ठेवण्यात आलेली आहे.

तरी सदर प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यतेसाठी स्थायी समितीपुढे ठेवणेस प्रस्तावित.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> ६१ <u>दिनांकः–८/८/२०११</u>

सुचकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियानांतर्गत महापालिका अग्निशमन सेवेचे सक्षमीकरण प्रयोजनार्थ अग्निशमन केंद्र बांधणेकामी रु. १.२५ कोटीचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

सुचकाची <u>सही/–</u>

अनुमोदकाची <u>सही/–</u>

<u>सर्वानुमते</u>

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. २० वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. २०** :– उल्हासनगर शहरातील रस्त्यांमध्ये पडलेले खड्डे पावसाळया दरम्यान व पावसाळयानंतर भरणेकामी सन २०१०–२०११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात इमारत दुरुस्ती या लेखाशिर्षातुन रस्ते दुरुस्ती या लेखाशिर्षात रु. ५०.०० लक्ष इतकी रक्कम समायोजित करुन सदर कामाचे प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणे.

---

यावेळी सदस्य श्री. अंकुश म्हस्के यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>सार्वजनिक बांधकाम विभागातील श्री. जवांदे व श्री. शिर्के हे सभागृहात उपस्थित नाहीत, त्यांना बोलावुन घेतले जावे.

<u>सभापती, श्री. लाल पंजाबी :–</u>श्री. शिर्के व श्री. जवांदे यांना बोलावुन घ्या.

यावेळी श्री. विजयकुमार म्हसाळ, हे सभागृहातुन बाहेर गेले आणि त्यांच्या आसनावर श्री. विनोद डवले हे आसनस्थ झाले.

यावेळी सदस्य श्री. जीवन इदनानी यांनी सभागृहात प्रवेश केला.

यावेळी श्री. माधव जवांदे, श्री. आर.बी. शिर्के यांनी सभागृहात प्रवेश केला.

यावेळी श्री. विजयकुमार म्हसाळ, हे आयुक्तांच्या स्थानी आसनस्थ झाले व श्री. विनोद डवले हे आपल्या आसनावर आसनस्थ झाले.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—रस्त्यांवरील खड्डे भरण्यासाठी इमारत दुरुस्ती या शिर्षातील निधी घेतला जात आहे, रस्ते विकास या लेखाशिर्षांतर्गत तरतुद शिल्लक नाही आहे काय?

श्री. आर.बी. शिर्के, कार्यकारी अभियंता, स्थापत्य:—रस्ते अनुदानात या अर्थसंकल्पीय शिर्षात रुपये १ कोटी उपलब्ध आहे तो निधी यासाठी वळविणेस योग्य राहिल.

सभापती, श्री. लाल पंजाबी :—रस्त्यांसंदर्भात शासनाकडुन ५० लाख रुपये अनुदान येणार आहे.

सदस्य श्री. जीवन इदनानी :—शासनाकडुन पैसे आले आहेत काय? तुमच्या हातात आहेत काय?

श्री. प्रविणकुमार जैन, मुख्य लेखा अधिकारी :—चालु वर्षी शासनाकडुन रस्ते अनुदान अदयाप आलेले नाहीत.

सदस्य श्री. जीवन इदनानी :— पैसे वेळेवर आले नाहीत तर काम कसे करणार? मध्येच काम बंद करणार काय?

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—तर मग इमारत दुरुस्ती या लेखाशिर्षातील हे ५० लाख रुपयेही असेच राहु दया. ५० लाखामध्ये रस्त्यावरील खड्डे भरण्याचे काम होणार नाही.

सदस्य श्री.बी.बी. मोरे :—आपण लोक प्रशासनाला धारेवर धरत नाहीत त्यामुळे असे होत आहे.

सदस्य श्री. जीवन इदनानी :—मुंबई येथिल रस्त्यांवरील खड्डयांसंदर्भात मा. मुख्यमंत्रयांनी संबंधीत अधिका—यांना जबाबदार धरुन त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यास सुरुवात केली आहे. त्याचबरोबर ठेकेदारांवरही दंड आकारणे सुरु केले आहे. आपल्या शहरातही रस्त्यांची स्थिती अतिशय खराब आहे, त्यामुळे येथिल अधिकारी आणि ठेकेदार यांच्यावरही दंडात्मक कारवाई केली जावी.

सदस्य श्री. अंकुश म्हस्के :—श्री. महाराज भुल्लर यांच्या प्रभागातील सी—ब्लॉक रस्त्याचे काम आता आताच तर करण्यात आले होते ना? ते काम कोणत्या संस्थेने केले होते ते पहा.आणि त्यांना या कामासाठी जबाबदार धरा.

सदस्य श्री. जीवन इदनानी :—काही नगरसेवकांच्या प्रभागातील कामांसाठी जी ५०—५० लाख रुपयांची तरतुद करण्यात आलेली आहे, त्यातुन रस्त्यांवरील खड्डे भरण्याचे हे काम केले जावे. आणि हे काम संपुर्ण शहराचे आहे.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :—आमच्या येथे कालच मनसेच्या कार्यकर्त्यांने रस्त्यांवरील खड्डयांसंदर्भात आंदोलन केले आहे. आपण सत्ताधारी पक्षामध्ये असल्यामुळे आपली बेईज्जत होत आहे. आता गणपती व दुसरे सण जवळ येत आहेत. अशावेळी रस्त्यांवरील खड्डे लवकरात लवकर बुंजविणे आवश्यक आहे.

सदस्य श्री. जीवन इदनानी :—रस्त्यांवरील खड्डे या ५०—५० लाखात भरुन होणार नाहीत, यासाठी कमीत कमी चार करोड रुपयाची तरतुद केली पाहिजे.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—हे ५० लाख रुपयेपण ठेवुन दया. शासनाकडुन ५० लाखाचे रस्ते अनुदान आले नाहीत तर या ५० लाखात रस्त्यावरील खड्डे भरण्याचे काही काम होणार नाही.

श्री. प्रविणकुमार जैन, मुख्य लेखा अधिकारी:—आयुक्तांनी अर्थसंकल्पीय अंदाज तयार करण्यासाठी उत्पन्न व खर्चाची अपेक्षा केली होती. त्याच प्रमाणे खर्चाचे प्रमाण असणे गरजेचे आहे.

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी :—</u>जसा आयुक्तांनी प्रस्ताव दिला आहे, त्याप्रमाणे जशी अर्थसंकल्पात तरतुद आहे, त्याप्रमाणे काम केले जावे.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :—</u>रस्त्यांवरील खड्डे भरण्यासाठी कमीत कमी दोन ते अडीच करोड रुपयांची तरतुद केली पाहिजे. गणपती सणापर्यंत रस्त्यावरील खड्डे भरण्याचे काम पुर्ण झाले पाहिजे. नाहीतर गणपतीच्या सणाच्या वेळेस एखादा अपघात झाला आणि त्यावेळेला जर लोकांच्या भावना भडकल्या आणि काही गंभीर प्रकार घडला तर त्यास जबाबदार कोण राहील ते सांगा. पवईच्या रस्त्याची स्थिती पहा किती खराब आहे.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>५० लाखामध्ये रस्त्यावरील खड्डे भरण्याचे काही काम होवु शकणार नाही, हे ५० लाख रुपये व शासनाकडुन अनुदान म्हणुन येणार ५० लाख रुपये हे सर्व एक कोटी रुपये होतील. एका रस्त्यावरील खड्डे भरण्यासाठीच ५० लाख रुपये जातील, यासाठी शहरातील रस्त्यांवरील खड्डे भरण्याचे काम अतिशय महत्वाचे असल्याने नगरसेवक निधीतुन १०, १० लाख रुपये काढुन आणखी ५० लाखाची तरतुद केली जावी. अशा प्रकारे रस्त्यावरील खड्डे भरण्यासाठी दिड कोटी रुपयाची तरतुद केली जावी.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :—</u>कमीत कमी दोन कोटी रुपयाची तरतुद करा.

<u>श्री. आर.बी. शिर्के, कार्यकारी अभियंता, स्थापत्यः—</u>रस्त्यावरील खड्डे भरण्याचे कामासाठी लेखा शिर्षात १ कोटीची तरतुद केली होती.

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी :—</u>गणपतीचा सण आला आहे, शहरातील रस्त्यांवर मोठया प्रमाणावर खड्डे पडले आहेत. ज्या रस्त्यांचे काही दिवसापुर्वी काम करण्यात आलेले आहे, त्यांवरती जे खड्डे पडलेले आहेत त्यासाठी त्या ठेकेदाराला / त्या संस्थेला जबाबदार धरले जावे आणि शासनाकडुन येणा—या अनुदानावर अवलंबुन न राहता नगरसेवक निधीतुन हे काम केले जावे. लहान—मोठया वित्तीय अनियमिततांमुळे अकोला महानगरपालिकेला शासनाने कारणे दाखवा नोटिस बजावली आहे. त्याची मुख्य लेखा अधिकारी सभागृहास माहिती तर दया.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u> सीएजी अहवालात ज्यांचे नाव आलेले आहे अगोदर त्यांना वित्तीय अनियमीतांसाठी जबाबदार धरा. व रस्त्यांवरील खड्डे भरण्यासाठी दिड कोटी रुपयांची तरतुद केली जावी.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :—</u>या दिड कोटी रुपयांमध्ये रस्त्यावरील खड्डे भरण्याचे काय काम होणार आहे?

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>नगरसेवक निधी तसेच अर्थसंकल्पात आपण जसे लिहिले होते की, मिळकत करापोटी इतक्या रक्कमेची वसुली होईल, पाणी पट्टी पोटी अमुक इतक्या रक्कमेची वसुली होत आहे.

<u>श्री. प्रविणकुमार जैन, मुख्य लेखा अधिकारीः—</u>पाणी पट्टी व मालमत्ता करापोटी होणारी वसुली ८५ करोड रुपयांची वसुली होईल असा आयुक्तांनी अर्थसंकल्प सादर करतांना अंदाज वर्तविला होता त्यामध्ये मा. स्थायी समिती व महासभेने ११० कोटीची वाढ करुन १९५ कोटी रुपयाचे लक्ष ठरवुन दिले आहे. ही १९५ कोटीची वसुली एक वर्षात काय दोन वर्षात सुध्दा होवु शकणार नाही. सध्या तीन महिन्यामध्ये ११ कोटी रुपये माझ्याकडे आहेत. प्रत्यक्ष उत्पन्न व खर्चाच्या आकडयांचा विचार न करता अवास्तव उत्पन्न होणार असल्याचे अर्थसंकल्पामध्ये प्रस्तावित केले आहे. स्थायी समिती व महासभेने वर्तविलेल्या ४ महिन्याच्या अंदाजाच्या फक्त १२ टक्के इतका महसुल चार महिन्यात प्राप्त झालेला आहे. मागील चारही वर्षाच्या सरासरीचा विचार करता ती वार्षिक रु. ३९.६१ इतकी येते. किंवा सन १०—११ मध्ये आलेली प्रत्यक्ष वसूली ५५ कोटी होती. याचा विचार करता चालू वर्षाची (११—१२) कर वसूली (जकात वगळून) ही अंदाजे ५५—६० कोटी इतकी होण्याची अपेक्षा आहे. तसेच जकातीपासूनचे उत्पन्न अंदाजे १२७ कोटी इतके येणार आहे. सध्याची वसुली पाहाता, उत्पन्न व खर्च यांचा मेळ घालण्याच्या दृष्टीने, उत्पन्न व खर्चाचे समायोजन मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०४ (१) (२) अन्वये करणे आवश्यक राहिल. त्यासाठी मी एक अहवाल तयार केला आहे, त्याची प्रत प्रत्येक पालिका सदस्यांना प्रस्तृत करण्यात येईल.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>ठिक आहे आपण अभ्यास करुन सांगा. आपण अभ्यासु आहात. ५० लाख इमारत दुरुस्ती निधीतून व ७५ लाख वित्त आयोगाकडुन येणारे अनुदान असे एकुण १.२५ कोटी रुपयातुन

रस्त्यांवरील खड्डे भरण्याचे काम करण्यात यावेत. हे काम अतिशय तातडीचे असल्यामुळे ५ (२) (२) अंतर्गत करण्यात यावे. कारण रस्त्यांवर फार मोठया प्रमाणावर खड्डे असल्याने लोक ओरड करत आहेत.

श्री. विजयकुमार म्हसाळ, आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी:— वित्त आयोगाकडुन मिळणारा निधी रस्त्यांवरील खंडड्े भरण्याकामी घेता येईल का? याबाबत कार्यकारी अभिंयता श्री. शिर्के साहेब, आपण आपला अभिप्राय नोदंवा.

श्री. शिर्के, कार्यकारी अभिंयता, सा.बा.वि:— या बाबतचा शासननिर्णयाचा अभ्यास करावा लागेल, रस्त्यांच्या विषयीचा जो विषय आपण पारित केला, त्यामध्ये वित्त आयोगाकडुन येणारी ७५ लाख रुपये व इमारत दुरुस्ती लेखा शिर्षातील ५० लाख रुपये, असे एकुण १.२५ कोटी खर्च करुन रस्त्यांवरील खडड्े भरण्याचे हे काम केले जाणार आहे, त्या विषयीचा शासन निर्णय माझे कडे आहे, त्याचा मी अभ्यास करतो, त्यातील तरतुदी नुसार जर हे काम करता येण्यासारखे असेल तर हे काम केले जाईल.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:— त्या शासन निर्णयातील तरतुदी नुसार जर हे काम करता येत नसेल तर मग काय करणार?

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:— शहरातील रस्त्यांवरील खडड्े जर भरले नसतील तर हे पैसे आपण आपले दालने तयार करण्यासाठी खर्च करा. शासनाकडुन जे रस्त्याविषयीचे अनुदान येणार आहे ती कधीपर्यंत येईल?

श्री. प्रविणकुमार जैन, मुख्य लेखा अधिकारी:—शासनाकडुन येणारे अनुदान मार्च पर्यंत येत असते. परंतु रस्त्यांवरील खड्डे भरण्याचे काम शासनाकडुन येणा—या रस्ते अनुदानातुन करता येवु शकते किंवा नाही ते मला माहित नाही. या विषयी जे नॉर्मस आहेत ते कार्यकारी अभियंता किंवा शहर अभियंता यांना माहित असतील तेच यावर अधिक खुलासेवार सांगु शकतील.

सदस्य श्री. जीवन इदनानी :— रस्ते अनुदान काय असते ते हे शहर अभियंता आणि कार्यकारी अभियंता यांनी सांगावे.

श्री. आर.बी. शिर्के, कार्यकारी अभियंता, स्थापत्य:—रस्ते अनुदान रस्त्यांवरील कामांवर खर्च केले जावु शकते.

सदस्य श्री. जीवन इदनानी :—कोणत्या रस्त्यांवर?

श्री. आर.बी. शिर्के, कार्यकारी अभियंता, स्थापत्य:—शहरातील रस्त्यांवर.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—२४ व्या क्रमांकावरील विषयानुसार वित्त आयोगाकडुन जे ७५ लाख रुपये येणार आहेत, ते या कामासाठी वर्ग केले जावे.

श्री. प्रविणकुमार जैन, मुख्य लेखा अधिकारी:—तो निधी या कामासाठी वर्ग केला जावु शकतो किंवा नाही, याबाबत अभ्यास करुन सांगतो.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :—श्री. जैन साहेब, प्रत्येक वेळी तुम्ही सांगाता की, हा माझा विषय नाही, हे काय आहे?

श्री. प्रविणकुमार जैन, मुख्य लेखा अधिकारी:—याबाबतचे नॉमर्स जे आहे ते सार्वजनिक बांधकाम विभागाने पाहिले पाहिजे. शासनाकडुन येणारे जे रस्ते अनुदान आहे ते नॉमर्स नुसार दुस—या कामासाठी वापरले जावु शकते किंवा नाही? हे सार्वजनिक बांधकाम विभागाने पाहिले पाहिजे.

सदस्य श्री. बी.बी. मोरे :—पुढील सभेपासुन प्रत्येक विभागाच्या अधिका—याने आपापल्या विभागातील विषयासंदर्भात पुर्णपणे अभ्यास करुन तयारी नुसार यावे नाहीतर त्यांनी स्थायी समितीच्या सभेत येवुच नये.

काही सदस्य :—पास—पास......

सदस्य श्री. जीवन इदनानी:—मी व श्री. अंकुश म्हस्के या प्रस्तावाबाबतीत तटस्थ आहोत.

<u>महापालिका सचिव :–</u>या प्रस्तावाबाबतीत सदस्य श्री.   जीवन इदनानी व श्री. अंकुश म्हस्के हे तटस्थ आहेत.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–</u> नविन रस्ते निधीतुन नेमलेले प्रभागाचे दोन दोन, तीन तीन लाख रुपये काढुन दोन करोड रुपयात रस्त्यावरचे खडड्‍ भरण्याचे काम केले जावे.

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी:–</u> रस्त्यांवरील खडड्‍ भरण्याचे काम सर्वच नगरसेवकांच्या प्रभागामध्ये होईल.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे:–</u> साडे सोळा लाखाचा जो निधी दिली आहे, त्यातील निधी न देता उर्वरित जो निधी आहे त्यातुन या कामासाठी निधी दिला जावा.

<u>सदस्य श्री. अकुंश म्हस्के:–</u> हा प्रस्ताव इतरही नगरसेवकांनी मान्य केला पाहिजे ना?

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे:–</u> श्री. शिर्के साहेब, यासाठी महासभेची परवानगी घ्यावी लागेल का?

<u>श्री. आर. बी. शिर्के, कार्यकारी अभिंयता, सा.बा.वि:–</u> एकाच विभागा अंतर्गतच्या लेखा शिर्षामध्ये बदल करायचा असल्याने स्थायी समिती असा बदल करु शकते. महासभेने प्रत्येक लेखा शिर्षात निधीचे वाटप करुन दिलेले आहे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–</u> अश्या प्रकारे १.९० कोटी रक्कमेतुन रस्त्यावरील खडड्‍ भरण्याचे काम होवु शकते.

<u>श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखा परिक्षक:–</u>जसे श्री. शिर्के साहेबांनी सांगितले एका लेखा शिर्षातुन दुसऱ्या लेखा शिर्षात निधी समायोजित केल्यानंतर हे काम होवु शकते.

<u>श्री. आर. बी. शिर्के, कार्यकारी अभिंयता, सा.बा.वि:–</u> ५० लाख रुपयांचा निधी समायोजित करण्याबाबतचा आमचा जो प्रस्ताव आलेला आहे, त्यानुसार निधी समायोजित केल्यानंतर हे काम होवु शकते.

<u>सदस्य श्री. जिवन इदनानी:–</u> रस्त्यावंरील खडड्‍ भरण्यासाठी आता पन्नास लाखाच्या निधीस मंजुरी दया, बाकी पुढील सभेत एका लेखा शिर्षातुन दुसऱ्या लेखा शिर्षात अर्थसंकल्पीय तरतुद समायोजित करुन केले जावे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–</u> ४७ प्रभागांमध्ये पन्नास पन्नास लाख रुपयाचा जो निधी देण्यात आलेला आहे त्यातुन तीन तीन लाख रुपयांचा निधी व इमारत दुरुस्ती लेखा शिर्षातील पन्नास लाख रुपयांचा निधी समायोजित करुन एकुण १.९१ कोटी रुपयातुन रस्त्यांवरील खडड्‍ भरण्याचे काम केले जावे.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:–</u>पास करा.

<u>श्री. आर. बी. शिर्के, कार्यकारी अभिंयता, सा.बा.वि:–</u> परंतु हे काम आम्ही दोन टप्प्यामध्ये करु.

<u>सदस्य श्री. जिवन इदनानी:–</u> स्थायी समितीशी विचार विमर्ष करुन आपण हे काम करा. जर आपण नविन रस्ते या शिर्षातून नेमलेले ४७ प्रभागाचे प्रत्येकी ३ लक्ष वळविले तर आमची हरकत नाही आणि आमची तटस्थ राहण्याची भुमिका बदलेल कारण शहराचा हित आमचे सर्वश्रेष्ठ प्राधान्य आहे.

<u>काही सदस्य :–</u>सूचना नुसार पास करा.

<u>सभापती, श्री. लाल पंजाबी:–</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. २०** :– उल्हासनगर शहरातील रस्त्यांमध्ये पडलेले खड्डे पावसाळया दरम्यान व पावसाळयानंतर भरणेकामी सन २०१०–२०११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात इमारत दुरुस्ती या लेखाशिर्षातुन

रस्ते दुरुस्ती या लेखाशिर्षात रु. ५०.०० लक्ष इतकी रक्कम समायोजित करुन सदर कामाचे

प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणे.

प्रस्तावना

उक्त विषयाच्या प्रस्तावास टी–१ प्रमाणे रु.९०.०० लक्ष खर्चाचे प्रस्ताव मंजूरीकरीता तयार करुन लेखा विभागाकडे दिनांक २१/०६/२०११ रोजी पाठविण्यात आला होता. सदर प्रस्ताव मुख्य लेखा अधिकारी यांनी कार्यकारी अभियंता (साबांवि) यांचेशी खालीलप्रमाणे चर्चा करुन परत पाठविला आहे.

या चर्चेच्या दरम्यान मुख्य लेखा अधिकारी यांनी उपरोक्त खड्डे भरण्याचे काम ज्या लेखाशिर्षातून घेण्यात आले आहे (लेखाशिर्ष अ अंदाजपत्रक भाग–१ क–५ (४) रस्ते दुरुस्ती ) त्या लेखाशिर्षातील ठेवलेली रु.१.०० कोटीची तरतूद महानगर निगमने गॅस वाहिनी टाकण्यासाठी खोदलेल्या खंदकाची दुरुस्ती करण्याच्या कामासाठी वापरण्यात आलेली आहे. याबाबत कार्यकारी अभियंता यांनी असेही निदर्शनास आणून दिले की महानगर निगमने खोदकाम केलेल्या खंदकाच्या दुरुस्तीसाठी महानगर गॅस निगमने महानगरपालिकेकडे आगाऊ रु.१.२४ कोटी इतकी रक्कम जमा केली आहे. त्यामुळे या रक्कमेतून सदर खंदक पूर्ववत करणे महानगरपालिकेचे काम आहे. सदर जमा रक्कम उपरोक्त लेखाशिर्षात जमा करुन घेणेसाठी व त्याप्रमाणे प्रस्तावास मान्यता मिळणेस सादर केले होते.

मा.मुख्य लेखा अधिकारी यांनी चर्चेमध्ये सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये अन्य लेखाशिर्षातील तरतूद या कामी वळविण्यासाठी सुचविले आहे. त्यांनी इमारत दुरुस्ती (इतर) या लेखाशिर्षातील तरतूद रु.१.०० कोटी इतकी रक्कम या कामासाठी रस्ते दुरुस्ती लेखाशिर्ष वळविण्यासाठी सुचविले आहे. परंतू या लेखाशिर्षात एकूण तरतूद रु.१.०० कोटी इतकी असून त्याप्रमाणे रु.४५.८९ लक्ष इतकी तरतूद वापरण्यात आलेली आहे. तरी या लेखाशिर्षातील उर्वरीत रु.५०.०० लक्ष इतकी तरतूद रस्ते दुरुस्ती या लेखाशिर्षात वळविणेस व त्याप्रमाणे उपलब्ध होणा–या तरतूदीमधून उक्त रस्त्याच्या कामास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळून निविदा कार्यवाहीस मा.स्थायी समितीपुढे मान्यतेस्तव प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र. ६२ दिनांकः–८/८/२०११

सुचकाचे नाव :–श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर शहरातील रस्त्यांमध्ये पडलेले खड्डे पावसाळया दरम्यान व पावसाळयानंतर भरणेकामी सन २०१०–२०११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात इमारत दुरुस्ती या लेखाशिर्षातुन रु. ५०.०० लाख व नविन रस्ते (डांबरीकरण) लेखा शिर्ष क्रमांक क–४ (५) या शिर्षातुन – प्रत्येकी नेमलेले ४७ प्रभागाचे रू. ३.०० लाख वळवून – ३ ग ४७ त्र रुपये १.४१ कोटी – इतकी रक्कम रस्ते दुरुस्ती या लेखा शिर्षात समायोजनास अधिन राहुन एकुण रक्कम रु. १.९१ कोटी रक्कमेच्या कामाचे प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देत आहे आणि कामाची तातडी पाहता आयुक्तास योग्य ठेकेदाराशी निविदा शिवाय थेट संविदा करण्यास प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. २१ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. २१ :—** उल्हासनगर शहराच्या स्वच्छता व साफसफाईचे प्रयोजनार्थ साहित्य पुरविणे कामी
प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणे.

---

<u>काही सदस्य :—</u>पास—पास.....

<u>सभापती, श्री. लाल पंजाबी:—</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. २१ :—** उल्हासनगर शहराच्या स्वच्छता व साफसफाईचे प्रयोजनार्थ साहित्य पुरविणे कामी प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

सार्वजनिक आरोग्य विभागास उल्हासनगर शहराची स्वच्छता व साफसफाई करण्याच्या कामासाठी व कामगारांच्या आरोग्याच्या व संरक्षणासाठी लागणा—या साहित्यांची दरवर्षी खरेदी करण्यात येते. त्याअनुषंगाने सफाई साहित्यांची आवश्यकता लक्षात घेऊन स्वच्छता व साफसफाई कामासाठी खालील प्रमाणे साहित्य खरेदी करणे आवश्यक आहे.

<u>आरोग्य विभागास लागणा—या साहित्याची यादी</u>

| अ.क्र | सफाई साहित्याचे नाव (मुख्य स्वच्छता निरिक्षक यांचे कार्यालयात असलेल्या नमुन्या प्रमाणे.) | अंदाजीत आवश्यक मागणी |
|---|---|---|
| १ | प्लॅस्टीक टोपल्या १८ इंच व्यासाची, ८ ते ९ इंच उंचीची, दोन नायलॉन दोरीच्या हॅन्डलसह, नमुन्या प्रमाणे. | २३० नग |
| २ | फुलझाडू | ५०० नग |
| ३ | गोवा ब्रुम झाडू (७५० ग्रॅम) | १५००० नग |
| ४ | गॅल्वनाइज बादल्या १० लिटर | ३२० नग |
| ५ | हात मोजे रबरी | २४०० जोडया |
| ६ | कापडी मास्क | ६००० नग |
| ७ | लोखंडी टिकाव, फुल साईज | ७८ नग |
| ८ | दातारी २ दातवाली | १५२ नग |
| ९ | ब्रुम झाडू पाच फुट दांडयासहित, उभ्याने झाडू मारण्यासाठी कार्यालयीन नमुन्याप्रमाणे | ७६० नग |
| १० | २ व्हील बिन्स (मोबाईल कंटेनर) | १५२ नग |
| ११ | काथ्या ब्रश ३'' | ५०० नग |
| १२ | फावडे ४ इंच ४ फुट दांडयासहीत | ३२० नग |
| १३ | फावडे ६ इंच ४ फुट दांडयासहीत | ३२० नग |
| १४ | फावडे ८ इंच ३ फुट दांडयासहीत | ३२० नग |
| १५ | साबण लाइफबॉय किंवा मेडीमीक्स ९० ग्रॅम | ४८०० नग |
| १६ | रबरी स्क्वाईझर, ३ फुट, दांडयासहीत | १०० नग |
| १७ | विम पावडर | २०० किलो |
| १८ | चिंधी डस्टर लादी सफाई करितां २४ इंच लांबीचे | ४०० नग |
| १९ | दांडयासहीत रबरी बुच, मोठी साईज | १०० नग |
| २० | बांबु २ ते ३ इंचाचे, १८ ते २० फुटाचे | २२८ नग |
| २१ | लोंखडी पार | २५ नग |
| २२ | हात रुमाल (नॅपकीन) (१०'' *ग* १८'' ) | ४८०० नग |

| | | |
|---|---|---|
| २३ | लोखंडी हातगाडया, दोन बीन्ससहीत | ७६ नग |
| २४ | रीफलेक्टर जॅकेट (ॲपरोन) फुल साईज | ६० नग |
| २५ | डोअर मॅट, महापालीका प्रवेशद्वारासमोर, (५'' x ८'' ) | १ नग |

उक्त २५ प्रकारची सफाई साहित्य उपलब्ध करुन घेण्यासाठी त्यांचे दर मागविणे आवश्यक आहे. तरी सन २०११—१२ आर्थिक वर्षासाठी आवश्यक साहित्यांचे दर मागवित असलो तरी जा.क्र./उमपा/५३०/११ दिनांक ६/४/२०११ रोजीच्या मा. आयुक्त यांच्या परिपत्रकानुसार एक तृतियांश आर्थिक तरतूदीनुसार आवश्यक सफाई साहित्याचा पुरवठा करुन घेण्यात येईल. तद्नंतर माहे ऑगस्ट २०११ मध्ये उर्वरीत सफाई साहित्य मा. आयुक्त यांची मान्यता घेऊन पुरवठा करुन घेण्यात येतील.

उपरोक्त प्रकारचे साहित्य माहे एप्रिल ते जुलै २०११ साठी उपलब्ध एकुण तरतुदीच्या एक तृतीयांश रक्कम रुपये ८,३३,३३३/— पैकी रुपये ८,३३,३३३/— (आठ लाख तेतिस हजार तिनशे तेतिस मात्र.) शिल्लक आहेत, तेवढयाच रक्कमेची आवश्यक साहित्ये खरेदी करण्यात येतिल. उक्त २५ प्रकारच्या साहित्याची खरेदी संपुर्ण वर्षासाठी करावयाची असल्याने उक्त नमुद परीपत्रकानुसार मा. आयुक्त साो. यांच्या मान्यतेने पुढील कार्यवाही करण्यात येईल. तसेच उक्त साहित्याचे परीमाण आवश्यकतेनुसार शिल्लक अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार कमी जास्त करण्यात येतिल. सदर खर्च २०११—१२ भांडवली खर्च भाग—२, सी—१ (1) साफसफाई साहित्य खरेदी या लेखाशिर्षक अंतर्गत रु. २५,००,०००/— तरतूद करण्यात आली आहे. सदरचा खर्च त्यातून करण्याचे प्रस्तावित करण्यात येते. सदर साहित्यांचे दर मागविण्यासाठी निविदा सुचना प्रसिध्द करण्यासाठी प्रस्तावित करण्यात येते. सदर साहित्य खरेदीसाठी अंदाजीत रुपये २५,००,०००/— खर्च अपेक्षीत आहे.

तरी सदर साहित्यांचे दर मागविण्यासाठी निविदा सुचना प्रसिध्द करण्यास व खरेदीसाठी येणा—या अंदाजीत खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळण्यासाठी सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समिती समोर सविनय सादर.

स्थायी समिती ठराव क्र. ६३ दिनांकः—८/८/२०११

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :—श्रीम. ज्योती माने

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर शहरातील स्वच्छता व साफसफाईचे प्रयोजनार्थ साहित्य पुरविणे कामी रु. २५,००,०००/— चे प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. २२ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. २२** :— उल्हासनगर शहरातील स्वच्छता व साफसफाईचे प्रयोजनार्थ जंतुनाशक/किटकनाशक औषधे पुरविणे कामी बाबनिहाय न्युनत्तम दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता देणे.

---

काही सदस्य :—पास—पास......

<u>सभापती, श्री. लाल पंजाबी:—</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. २२ :—** उल्हासनगर शहरातील स्वच्छता व साफसफाईचे प्रयोजनार्थ जंतुनाशक/किटकनाशक औषधे पुरविणे कामी बाबनिहाय न्युनत्तम दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

सार्वजनिक आरोग्य विभागास उल्हासनगर शहराच्या स्वच्छता, साफसफाईचे कामासाठी व नागरीकांच्या आरोग्याच्या दृष्टीने किटकनाशक/जंतुनाशक/ औषधे दरवर्षी खरेदी करणे आवश्यक असते. त्यानुसार मा. स्थायी समिती ठराव क्र. ३२ दि. २४/६/२०११ रोजी अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता घेऊन सदर औषधे खरेदीची निविदा सुचना १) दै. सकाळ २) दै. नगर न्युज व ३) दै. प्रात:काळ या दैनिक वृत्तपत्रात दि.१/७/२०११ रोजी प्रसिध्द करून दिनांक १५/७/२०११ रोजी पर्यंत निविदा मागविण्यात आल्या होत्या.

यामध्ये प्राप्त सहा निविदा दिनांक १६/७/२०११ रोजी दुपारी १२.०० वाजता उप—आयुक्त (आरोग्य), मुख्य लेखा परिक्षक, मुख्य लेखा अधिकारी तसेच निविदाधारक व त्यांचे प्रतिनिधि यांचे समोर उघडण्यात आल्या. पैकी मे. एस. एल. आर. डायकेम, अंबरनाथ यांनी निविदेतील अटी व शर्तीनुसार लिफाफा क्र. १ मध्ये अद्यावत व्यवसाय कर निपटारा प्रमाणपत्र व २ वर्षाचा अनुभवाचे प्रमाणपत्र जोडलेले नसल्याने निविदा समिती सदस्यांनी त्यांना अपात्र ठरविले उर्वरीत ५ निविदाकारांनी लिफाफा क्र. १ मध्ये आवश्यक कागदपात्रांची पुर्तता केलेली असल्याने त्यांचा निविदेचा दुसरा लिफाफा उघडण्यात आला. पात्र झालेल्या निविदाकारांकडुन सादर केलेल्या सदर जंतुनाशक / किटकनाशक / अळीनाशक/डासनाशक औषधे दरपत्रकांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | किटकनाशक,जंतूनाशक,अळीनाशक, डासनाशक दुर्गंधीनाशक, शौचालये व डंपिंग ग्राउंडसाठी आवश्यक औषधांचे नांव | आवश्यक परिमाण | निविदाधारकाचे नाव व त्यांचे प्राप्त दर | | | | | अंदाजीत खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | मे. डॉल्फीन | मे. मित्र हर्बल | मे. नियो लॅब | मे. रविराज | मे. रॉयल | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ब्लीचींग पावडर ३३% क्लोरीन आय. | ७५०० | ३५ | ३० | ४६ | २७ | २९ | २०२५०० |
| १४ | एलोआ हर्बल, दुर्गंधीनाशक, [illegible] | किलो | १६२ | १५५ | १८९ | १३५ | १६० | ५४०००० |
| २ | काळे फिनाईल ग्रेड-१, शौचालयांसाठी [illegible] | लिटर | ८९.२० | निरंक | ७० | ६५ | ६८ | ४५५००० |
| | (२५ लि. प्लास्टीक कॅनमध्ये) | लि. | | | | | | |
| ३ | सफेद फिनाईल, शौचालयांसाठी (२५ लि. प्लास्टीक कॅनमध्ये) | ७००० लि. | ४९.५० | निरंक | ६५ | ५० | ५५ | ३४६५०० |
| ४ | ओडोफ्रेश, हर्बल, दुर्गंधीनाशक फीशमार्केट, भाजीमार्केटसाठी | ५०० लि. | ११७५ | १०६० | १२३३ | १२३५ | १२०० | ५३०००० |
| ५ | सॅनिटेक्स व्हाईट क्लिनर, सुगंधीत, शौचालयासाठी व कार्यालयांसाठी (२५ लि. प्लास्टीक कॅनमध्ये) | ५००० लि. | ५६ | ६३ | ६६ | ६६ | ६० | २८०००० |
| ६ | जर्मिटॉक्स प्लस पावडर, डिसन्फेक्टंट पावडर | ५००० कि. | ६२ | ६५ | ७२ | ७० | ६५ | ३१०००० |
| ७ | पिपेक्स केक, १०० ग्रॅम, आयएसआय मार्क, उंदीरनाशक | १००० पॅकेट | ५१ | ५८ | ५७ | ६५ | ५५ | ५१००० |
| ८ | फिनाईल (डांबर) गोळया, जंतुनाशक, मुता—यासाठी | २००० किलो | १८० | १८० | १९८ | १६० | १७५ | ३२०००० |
| ९ | सफाया मोनोक्लोरोफिनोल पावडर,जंतुनाशक, दुर्गंधीनाशक | ५००० किलो | ५२ | ५५ | ५९ | ५९ | ५३ | २६०००० |
| १० | बायोकल्चर पावडर, डंपिंग ग्राउंडसाठी/कच—याचे विघटन करण्यासाठी (आवश्यक घटक — नॉन इडिबल पावडर, मिनरल पावडर, कल्चर ॲझोटो बॅक्टर—लिगनीग डिग्रेबल बॅक्टेरीया) | ७५०० किलो | १०२ | ८३ | १२० | १०७ | १०५ | ६२२५०० |
| ११ | ट्राय ॲक्ट, बायोकेमीकल जंतूनाशक पावडर, लिच कंट्रोल, तसेच सेप्टीक टॅक साठी | २५०० किलो | १२३ | १२५ | १३५ | १२१ | ११४ | २८५००० |
| १२ | मायक्रो फाईन पावडर, सुगंधित वातावरण निर्मिती करण्यासाठी | ५००० किलो | १३२ | १३० | १६० | ११५ | १३५ | ५७५००० |
| १३ | हायजीन, किटकनाशक/जंतूनाशक | २५०० लिटर | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| १५ | ग्रीन लार्वी, हर्बल, अळीनाशक | ५०० लिटर | १६९० | १७५५ | १८९५ | १९५० | १९०० | ८४५००० |
| १६ | प्रिमीफॉस मिथेले ५० % ईसी, अळीनाशक, डब्युएचओ प्रमाणीत, एन्विबिडीसी प्रोग्राम | २०० लिटर | २०८० | २०५० | २३०० | २०५० | १९२० | ३८४००० |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १७ | सॅफीनोथ्रिल, ५ % ईसी, डास नाशक डब्युएचओ प्रमाणीत, एन्विबिडीसी प्रोग्राम | २०० लिटर | १५३० | १५६० | १६४० | १५१० | १३५० | २७०००० |
| १८ | डॅपनिका ५०—५० अळीनाशक,डासनाशक | ५०० लिटर | ९५० | ९१० | ९९० | ७५० | ९६० | ३७५००० |
| १९ | सेप्टीक्लीन पावडर, शौचालयांचे सेप्टीक टॅक सफाईसाठी | १००० लिटर | ७०० | ६२५ | ५५३ | ६५० | ६०० | ५५३००० |
| २० | फ्रेश ऑल डिलक्स, ७५ ग्रॅम, कार्यालयांसाठी | १००० नग | ११० | १०५ | ७८ | १३० | १०० | ७८००० |
| २१ | पिप बेट, २% ग्रन्युअल्स, माशानाशक | ७५० किलो | ७९० | ८१५ | ८४० | ८४० | ८२० | ५९२५०० |
| २२ | वेस्ट ट्रिट पावडर, ( सिलीकेट पावडर, झेडबेस पावडर, एन्टीसेप्टीक पावडर, मिनरल पावडर (दुर्गंधीनाशक व रोगजंतूंचा अटकाव करण्यासाठी)) | ५००० किलो | ९२ | ७२ | १०८ | ८९ | ९२ | ३६०००० |
| **एकुण रक्कम रुपये** | | | | | | | | ८२,३५००० |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्यानुसार अ.क्र. ३,५,६,७, ९,१५,२१ या करीता मे. डॉल्फीन सेल्स, कल्याण यांनी सर्वात कमी दर सादर केले आहेत. अ.क्र. ४,१०व २२ या करीता मे. मित्र हर्बल प्रा.लि. कंपनी डोंबिवली यांनी सर्वात कमी दर सादर केले आहेत, अ.क्र. १९ व २० साठी न्युओ लॅब, सोलापुर तर अ.क्र. १,२,८,१२,१४,१८ या करीता मे. रविराज केमिकल्स, डोंबिवली व अ.क्र. ११,१६,१७ याकरीता मे. रॉयल इंटरप्राईझेस, मुंबई यांनी सर्वात कमी दर सादर केलेले आहेत. तर अक्र. १३ हायजीन, किटकनाशक/जंतुनाशक साठी कोणत्याही निविदाकाराने दर सादर कलेले नाहीत.

| अ. क्र. | किटकनाशक,जंतूनाशक,अळीनाशक, डासनाशक दुर्गंधीनाशक, शौचालये व डंपिंग ग्राउंडसाठी आवश्यक औषधांचे नांव | आवश्यक परिमाण | निविदाधारकाचे नाव व त्यांचे प्राप्त दर | | | | | वाटाघाटी अंती प्राप्त झालेले दर | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | मे. डॉल्फीन | मे. मित्र हर्बल | मे. नियो लॅब | मे. रविराज | मे. रॉयल | | |
| १ | ब्लीचींग पावडर ३३% क्लोरीन आय. एस.आय प्रमाणित | ७५०० किलो | | | | २७ | | २६.५० | १९८७५० |
| २ | काळे फिनाईल ग्रेड—१, शौचालयांसाठी (२५ लि. प्लास्टीक कॅनमध्ये) | ७००० लि. | | | | ६५ | | ४९ | ३४३००० |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | सफेद फिनाईल, शौचालयांसाठी (२५ लि. प्लास्टीक कॅनमध्ये) | ७००० लि. | ४९.५० | | | | | ४३ | ३०१००० |
| ४ | ओडोफ्रेश, हर्बल, दुर्गंधीनाशक फीशमार्केट, भाजीमार्केटसाठी | ५०० लि. | | १०६० | | | | १०४८ | ५२४००० |
| ५ | सॅनिटेक्स व्हाईट क्लिनर, सुगंधीत, शौचालयासाठी व कार्यालयांसाठी (२५ लि. प्लास्टीक कॅनमध्ये) | ५००० लि. | ५६ | | | | | ५४ | २७०००० |
| ६ | जर्मिटॉक्स प्लस पावडर, डिसन्फेक्टंट पावडर | ५००० कि. | ६२ | | | | | ५८ | २९०००० |
| ७ | पिपेक्स केक, १०० ग्रॅम, आयएसआय मार्क, उंदीरनाशक | १००० पॅकेट | ५१ | | | | | ५० | ५०००० |
| ८ | फिनाईल (डांबर) गोळया, जंतुनाशक, मुता—यासाठी | १००० किलो | | | | १६० | | ११५ | ११५००० |
| ९ | सफाया मोनोक्लोरोफिनोल पावडर,जंतुनाशक, दुर्गंधीनाशक | ५००० किलो | ५२ | | | | | ४८ | २४०००० |
| १० | बायोकल्चर पावडर, डंपिंग ग्राउंडसाठी/कच—याचे विघटन करण्यासाठी (आवश्यक घटक — नॉन इडिबल पावडर, मिनरल पावडर, कल्चर ॲझोटो बॅक्टर—लिगनीग डिग्रेबल बॅक्टेरीया) | ७५०० किलो | | ८३ | | | | ७९ | ५९२५०० |
| ११ | ट्राय ॲक्ट, बायोकेमीकल जंतूनाशक पावडर, लिच कंट्रोल, तसेच सेप्टीक टॅक साठी | २५०० किलो | | | | | ११४ | १०६.९० | २६७२५० |
| १२ | मायक्रो फाईन पावडर, सुगंधित वातावरण निर्मिती करण्यासाठी | ५००० किलो | | | | ११५ | | ११२ | ५६०००० |
| १३ | हायजीन, किटकनाशक/जंतूनाशक | २५०० लिटर | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरं क | निरंक | निरंक |
| १४ | क्लीनो व्हाईट, दुर्गंधीनाशक, डब्युएचओ, स्पेसिफीकेशन प्रमाणे | ३००० लिटर | | | | १३५ | | १०९ | ३२७००० |
| १५ | ग्रीन लार्वी, हर्बल, अळीनाशक | ५०० लिटर | १६९० | | | | | १५२५ | ७६२५०० |
| १६ | प्रिमीफॉस मिथेले ५० % ईसी, अळीनाशक, डब्युएचओ प्रमाणीत, एन्विबिडीसी प्रोग्राम | २०० लिटर | | | | | १९२० | १८६० | ३७२००० |
| १७ | सॅफीनोथ्रिल, ५ % ईसी, डास नाशक डब्युएचओ प्रमाणीत, एन्विबिडीसी प्रोग्राम | २०० लिटर | | | | | १३५० | १२६० | २५२००० |
| १८ | डॅपनिका ५०—५० अळीनाशक,डासनाशक | ५०० लिटर | | | | ७५० | | ७०० | ३५०००० |
| १९ | सेप्टीक्लीन पावडर, शौचालयांचे सेप्टीक टॅक सफाईसाठी | १००० लिटर | | | ५५३ | | | ५४० | ५४०००० |
| २० | फ्रेश ऑल डिलक्स, ७५ ग्रॅम, कार्यालयांसाठी | १००० नग | | | ७८ | | | ७७ | ७७००० |
| २१ | पिप बेट, २% ग्रन्युअल्स, माशानाशक | ७५० किलो | ७९० | | | | | ६५० | ४८७५०० |
| २२ | वेस्ट ट्रिट पावडर, ( सिलीकेट पावडर, झेडबेस पावडर, एन्टीसेप्टीक पावडर, मिनरल पावडर (दुर्गंधीनाशक व रोगजंतूंचा अटकाव करण्यासाठी)) | ५००० किलो | | ७२ | | | | ६९ | ३४५००० |

उक्त सादर केलेल्या दरांनुसार नमूद औषधे खरेदि करण्यास रु. ८२,३५०००/— (ब्याऐंशी लाख पस्तीस हजार मात्र.) खर्च येणार आसल्याने निविदाकारांकडुन न्युनतम दर सादर केलेल्या जंतुनाशक औषधे दरांबाबत जा. क्र.उमपा/उप—आ/आवि/१९६ दिनांक १९/०७/२०११ रोजी अन्वये निविदाकारांना वाटाघाटीसाठी पत्र देऊन त्यांच्याशी दिनांक २०/७/२०११ रोजी प्राप्त झालेले न्युनतम दरांनुसार वाटाघाटी करण्यात आल्या आहेत. व त्यानुसार संबंधीत न्युनतम दराच्या निविदाकारांनी लेखी पत्र दिलेली आहेत. आरोग्य विभागाने प्राप्त निविदा दराबाबत दिलेल्या अभिप्रायाशी इतर विभाग असहमत असल्यास त्यांचे देखील

स्वयंस्पष्ट अभिप्राय नमूद करणे आवश्यक आहे. वाटाघाटी अंती प्राप्त दरांचा तक्ता खालीप्रमाणे आहेत.

वरील जंतूनाशके/किटकनाशक/अळीनाशक/डासनाशक खरेदीकरीता होणा—या रू ७२६४५००/— ( बहात्तर लाख चौसष्ट हजार पाचशे मात्र ) खर्चास मा. स्थायी समितीची वित्तीय व प्रशासकीय मान्यता मिळणे, तसेच सदर न्युनतम दर सादर करणा—या निविदाकारांचे दर स्विकृत होऊन त्यांच्याशी संविदा करण्या करीता मा. स्थायी समितीच्या मान्यतेसाठी सदरचा प्रस्ताव सविनय सादर.

स्थायी समिती ठराव क्र. ६४ दिनांक:—८/८/२०११

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :—श्रीम. ज्योती माने

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर शहराच्या स्वच्छता व साफसफाईचे प्रयोजनार्थ जंतुनाशक/किटकनाशक औषधे पुरविणे कामी बाबनिहाय लघुत्तम दराचे निविदाकाराशी संविदेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—
अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. २३ वाचुन दाखवितात

———————————————————————————————————

**विषय क्र. २३** :— मे. संतोषी मजुर कामगार सहकारी संस्थेकडुन सहा महिन्यांसाठी १५ प्रशिक्षित ''फायरमन'' ठोक पगारावर तात्पुरत्या स्वरुपात पुरविणेकामी संविदेस मान्यता देणे.

———————————————————————————————————

महापालिका सचिव :—हा विषय केवळ स्थायी समितीच्या माहितीसाठी आहे.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—तर मग ठराव काय पारीत करत आहात?

सदस्य श्री. प्रशांत धांडे :—ठोक पगारावर सहा महिन्याकरीता प्रशिक्षीत १५ फायरमन कामावर घेतले आहेत. याची स्थायी समितीला माहिती दिली आहे.

सदस्य श्री.बी.बी. मोरे:—नाहीतर आम्ही सुध्दा जैन साहेबांसारखे हात झटकु की आम्हांला काही माहित नाही म्हणुन.

काही सदस्य :—पास—पास......

सभापती, श्री. लाल पंजाबी:—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑ **विषय क्र. २३** :— मे. संतोषी मजुर कामगार सहकारी संस्थेकडुन सहा महिन्यांसाठी १५ प्रशिक्षित ''फायरमन'' ठोक पगारावर तात्पुरत्या स्वरुपात पुरविणेकामी संविदेस मान्यता देणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिकेतील अग्निशमन विभागात एकुण ३ अग्निशमन वाहनांवर कार्य करण्यासाठी शासन निर्णय क्रमांक उमपा/२२९८/२०३०/प्रक्र२५९/९८/नवी—२३ दि. १३ जुन २००२ अन्वये एकुण २७ फायरमन पदांना मंजुरी देऊन तत्कालिन नगरपालिका आस्थापनेवरील ३३ + २७ असे एकुण ६० फायरमन संवर्गाची पदे मंजूर आहेत. त्यापैकी केवळ सध्या १९ फायरमनची पदे भरलेली आहेत. उर्वरीत ४१ पदे रीक्त असुन सदर मंजूर पदावर पात्र फायरमनची नेमणुक करणेची कार्यवाही सामान्य प्रशासन विभागामार्फत सुरु आहे.

महानगरपालिका अग्निशमन विभागाकरीता ६० फायरमन पदांपैकी १९ पदे नियमानुसार भरती केलेली आहे व ०४ प्रभारी फायरमन इतर विभागातील मजूर/सफाई कामगार या संवर्गातुन घेणेत आलेले आहे. त्यामुळे त्यांना नेहमी जादा तास काम करावे लागते. तसेच त्यांना साप्ताहीक सुटी देखील घेता येत नाही. शिवाय त्यांना अतिरीक्त कामाचा मोबदला देणेत येत नाही. त्यामुळे ते वारंवार अग्निशमन अधिका—यांस फायरमन भरती करण्याबाबची मागणी करीत असतात.

अग्निशमन विभागातील कर्मचा—यांना आगीसारख्या मानवनिर्मीत नैर्सगीक आपत्तींना सामोरे जावे लागते. तसेच अग्निशमन विभाग हा २४ तास कार्यरत व तत्पर असणे आवश्यक आहे.
सध्याचा कर्मचारी वर्ग हा अत्यंत अल्प असुन फायर कॉल/रेस्क्यु कॉल/स्पेशल कॉल या वर्दीवर मनुष्यबळ कमी असल्यामुळे काम करणे अत्यंत अडचणीचे होत आहे.

शासन निर्णय क्रमांक अशस/१४०७/३६०/प्रक्र/नवी—२० दिनांक ३१/०८/२००९ च्या महाराष्ट्र अग्नि सुरक्षा अभियान मधील परीशिष्ट क्र (भाग—२) अन्वये एक अग्निशमन वाहन २४ तास कार्यरत ठेवणेसाठी ३२ अधिकारी/कर्मचारी असणे आवश्यक आहे.

वरील बाबी लक्षात घेता तातडीची बाब म्हणुन खाजगी कंपनीकडुन (MINIMUM WAGES ACT) च्या दरानुसार राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, मुबई यांचे व्दारा प्रशिक्षण घतलेले प्रशिक्षीत एकुण १५ जवान घेतल्यास मासीक वेतन खर्च रक्कम रुपये ८,२९३ × १५ त्र १,२४,३९५ (एक लाख चोविस हजार तीनशे पंच्यान्नव) एवढा व सहा महिन्यांकरीता वेतन खर्च रक्कम रुपये ७,४६,३७०/—(सात लाख सेहचाळीस हजार तीनशे सत्तर) एवढा त्याचप्रमाणे वार्षीक वेतन खर्च रुपये १४,९२,७४० (चौदा लाख ब्यांन्नव हजार सातशे चाळीस) एवढा अपेक्षित आहे.

सदरचे कार्य हे अत्यावश्यक सेवेचे असल्याने कर्मचा—यांची निकड लक्षात घेता १५ कर्मचारी ठोक पगारावर सहा महिन्यांकरीता मे. संतोषी मजूर कामगार सहकारी संस्था मर्या., ता. कल्याण. जि. ठाणे. यांचेकडुन घेणेस प्रशासकीय मान्यता देणेत आलेली आहे. मा. स्थायी समिती सभेस माहितीस्तव सादर

**स्थायी समिती ठराव क्र.** ६५ **दिनांकः—८/८/२०११**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :—श्रीम. ज्योती माने

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार मे. संतोषी मजुर कामगार सहकारी संस्थेकडुन सहा महिन्यांसाठी १५ प्रशिक्षित ''फायरमन'' ठोक पगारावर तात्पुरत्या स्वरुपात पुरविणेकामी संविदेची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

महापालिका सचिव :— विषय क्र. २४ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. २४ :—१३ व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारसीनुसार उल्हासनगर महानगरपालिकेस प्राप्त अनुदानाचे विनियोग निश्चित करणे.**

---

श्री. प्रविणकुमार जैन, मुख्य लेखा अधिकारी:— १३ व्या वित्त आयोगाकडुन राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाकडुन सन २०१०—११ या आर्थिक वर्षापासुन पुढील पाच वर्षासाठी म्हणजे सन २०१४—१५ पर्यंत संपुर्ण महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थाना सर्व साधारण मुलभुत अनुदान म्हणुन रुपये २०७७.७१ कोटी व सर्वसाधारण कार्यात्मक अनुदान रुपये ११००.०० कोटी असे एकुण ३१७७.७१ कोटीच्या केंद्रीय अनुदानाची शिफारस केलेली आहे या शिफारसी नुसार प्राप्त होणारी रक्कम घनकचरा व्यवस्थापन, पाणी पुरवठा व स्वच्छता, सामाजिक पायाभुत सुविधांचा विकास, महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेच्या सुवर्ण जयंती निमित्त घ्यायचे उपक्रम इत्यादी कामावर खर्च करणे अनुज्ञेय आहे. आपली पाणी पुरवठा योजना १२७ कोटीची होती, त्याबाबत जी निविदा मागविण्यात आली ती १६० कोटीची होती आणि महापालिकेचा त्या मधील सहभाग ६३ कोटीचा होता. या सर्व योजनां वरील खर्च वित्त आयोगाकडुन प्राप्त होणाऱ्या या अनुदानातुन करण्याचे प्रस्तावित केले आहे.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:— हा निधी कोणत्या कामासाठी वापरायचा आहे?

श्री. शिर्के, कार्यकारी अभियंता, सा.बा.वि:— वित्त आयोगाकडुन येणारा निधी वेगवेगळया कामांसाठी वाटप केला आहे.

काही सदस्य :—पास—पास......

सभापती, श्री. लाल पंजाबी:—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. २४ :— १३ व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारसीनुसार उल्हासनगर महानगरपालिकेस प्राप्त अनुदानाचे विनियोग निश्चित करणे.**

**प्रस्तावना**

१३ व्या वित आयोगाने राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी सन २०१०—२०११ या आर्थिक वर्षापासून पुढील ५ वर्षासाठी म्हणजे सन २०१४—२०१५ पर्यंत संपूर्ण महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांना सर्वसाधारण मुलभूत अनुदान रुपये २०७७.७१ कोटी व सर्वसाधारण कार्यात्मक अनुदान रुपयै ११००.०० कोटी असे एकूण ३१७७.७१ कोटीच्या केंद्रीय अनुदानाची शिफारस केलेली आहे . त्यानुषंगाने १३ व्या केंद्रीय वित आयोगाच्या शिफारसीनुसार राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकरिता प्राप्त होणा—या केंद्रीय अनुदानाच्या वितरणाची व विनियोगाची कार्यपध्दती खालील प्रमाणे निश्चित केलेली आहे . केंद्र शासनाकडून १३ व्या वित आयोगाच्या शिफारसीप्रमाणे राज्यास नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी प्रतिवर्षी सर्वसाधारण मुलभूत व सर्वसाधारण कार्यात्मक अनुदान खालील प्रमाणे प्राप्त होणार आहे.

| अ.क्र. | निधी | २०१०—११ | २०११—१२ | २०१२—१३ | २०१३—१४ | २०१४—१५ | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सर्वसाधारण मुलभूत अनुदान | २९५.९० | ३४३.१० | ४०१.०३ | ४७५.१० | ५६२.५८ | २०७७.७१ |
| २ | सर्वसाधारण कार्यात्मक | ०.०० | ११७.३० | २७५.२० | ३२४.६० | ३८२.९० | ११००.०० |
| | एकूण | २९५.९० | ४६०.४० | ६७६.२३ | ७९९.७० | ९४५.४८ | ३१७७.७१ |

१३ व्या वित आयोगाने प्रत्येक राज्यास नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकरिता निधी वितरित करतांना ज्या निकषांचा आधार घेतला आहे त्याचा विचार करुन राज्य शासनाने खालील निकषांचा आधार घेवून राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना १३ व्या वित आयोगाचा निधी वितरण करण्याचा निर्णय घेतला आहे .

१)	निधी वितरित करतांना ५० टक्के निधी त्या  त्या महानगरपालिकांच्या २००१ च्या लोकसंख्येच्या प्रमाणात वाटप करण्यात येईल .

२)	१० निधी त्या महानगरपालिका क्षेत्रफळाच्या आधारे वाटप करण्यात येईल .

३)	प्राप्त निधीच्या २० टक्के निधी हा महानगरपालिकांना त्या शहराच्या सरासरी दरडोई उत्पन्नाची राज्यातील उच्चतम दरडोई उत्पन्नापासूनच्या तफावतीच्या आधारे वितरित करण्यात येईल .

४)	१५ टक्के निधी महसूली सुधार कार्यक्र राबविण्यासाठी ड वर्ग महानगरपालिकांना खालील प्रमाणे वितरित करण्यात येइल .

अ)	सन २०१०—२०११ पासून पुढील ५ वर्षात शासन ज्या ड वर्ग महानगरपालिका क्षेत्रात जकात कर ऐवजी स्थानिक संस्था कर लागू करेल त्या महानगरपालिकांना स्थानिक संस्था कर लागू झाल्याच्या पहिल्या वर्षी सदर १५ टक्के निधीमधून २/३ निधी त्या लगत पुर्वीच्या लगत पुर्वीच्या जकात वसुलीच्या प्रमाणात वितरित करण्यात येईल .

ब)	ज्या मनपा आपल्या क्षेत्रात भांडवली मुल्यावर आधारित मालमत्ता कर आकारणी सुरु करतील त्या ड वर्ग महानगरपालिकांमध्ये अशा आकारणीच्या पहिल्या वर्षी  सदर १५ टक्के निधीमधून १/३ निधी उत्तेजनार्थ वितरित करण्यात येईल . एखादया वर्षी राज्यातील कोणत्याही महानगरपालिकेने भांडवली मुल्यावर आधारित मालमत्ता कर प्रणाली लागु केली नाही तर सदर १/३ निधी हा ज्या ड वर्ग महानगरपालिकांमध्ये त्यावर्षी स्थानिक संस्था कर लागू करण्यात आला आहे अशा मनपांमध्ये वितरित करण्यात येईल .

५)	प्राप्त निधी पैकी ५ टक्के निधीचे वितरण  तथा अ, ब, व क वर्ग महानगरपालिकांना सुधार कार्यक्रम राबविण्यासाठी (२) आयुक्त तथा संचालक नगरपरिषदद प्रशासन संचालनालय यांना महानगरपालिकांमध्ये महत्वाचे सुधार कार्यक्रम राबविण्यासाठी (३) विशेष गर असणा—या महानगरपालिकांसाठी करण्यात येईल . वितरणाची पध्दती निधी वाटपाच्या वेळी शासन स्तरावरुन ठरवून देण्यात येईल . त्यानुसार अनुदानाचा हप्ता संबंधितानां वितरीत करण्यात येईल .

१३ व्या वित आयोगाच्या शिफारसीनुसार प्राप्त झालेली रक्कम पुढील प्रकल्पांसाठी खर्च करणे अनुज्ञेय राहील

<u>घनकचरा व्यवस्थापन</u> :

घनकचरा व्यवस्थापनातर्गंत कंत्राटदारांमार्फत किंवा सार्वजनिक खाजगी सहभागातर्गंत करण्यात येणारा खर्च

<u>पाणी पुरवठा व स्वच्छता</u> :

यामध्ये पाणी पुरवठा  व मलनि:सारण व्यवस्थेचे बळकटीकरण / विस्तारीकरण, शासनाने मंजुर केलेल्या पा.पु. व मलनि:सारण योजनांकरिता महानगरपालिकेने भरावयाची लोकवर्गणी , पाणी लेखा परिक्षण , उर्जा लेखा परिक्षण , शहर हागणदारी मुक्त , सांडपाण्याचा पुर्नवापर/पुर्नचक्रीकरण , पाणी पट्टी व वीज बील इत्यादी भरण्यासाठी

<u>सामाजिक पायाभूत सुविधांचा विकास</u> :

विकास आराखडयातील आरक्षणे विकसीत व भुसंपादन, रुग्णलय इमार बाधणे अंगणवाडी/बालवाडी बांधणे , नाटयगृह/प्रेक्षागृह बांधणे तसेच क्रिडांगणाचा विकास करणे ,स्मशानभुमीचा विकास, आधार केंद्र ,श्रम साफल्य योजनेतर्गंत सफाई कामगारांची सेवा निवासस्थाने बांधणे , अग्निशमन वाहने /उपकरणे व इतर यंत्रसामुग्री खरेदी करणे ,अग्निशमन कर्मचा—यांसाठी सेवा निवासस्थान बांधणे , मनपा प्रशासकीय इमारत बांधणे

<u>नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये राबवयाचे सुधारणा विषयक कार्यक्रम</u> :

केंद्र व राज्य शासनाच्या अभियांनातर्गंत विहित केलेल्या विविध सुधारण (त्मवितउे)(उदा. जीआयएस, ई—गव्हर्नर्स, व्दि नोंद लेखा पध्दती इ.) राबविण्याकरिता येणारा खर्च, शासनाच्या नागरी ई—गव्हर्नर्स प्रकल्पांतर्गत मनपा हिस्सा भरणे, संगणकीकरण खर्च, सर्व्हीस लेव्हल बेचमार्कींग प्रणाली कार्यान्वीत खर्च, उर्जा बचतीवरील उपाय योजना, पर्जन्यजल संचय राबविणे, नागरिकांनाप्रोत्साहन देणे .

<u>महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेच्या सुवर्ण जयंती निमीत्त घ्यावयाचे उपक्रम</u> :

सुवर्ण जयंती उदयान एक सार्वजनिक उदयान विकसीत करणे, सुवर्ण जयंती तलाव म्हणून एक सार्वजनिक तलावाचे सौदर्यीकरण, सुवर्ण जयंती पथ म्हणून शहरातील एक प्रमुख रस्ता एकात्मीक पध्दतीने विकसीत करणे, सुवर्ण जयंती सभागृह /प्रेक्षागृह म्हणून एक सभागृह बाधणे.

<u>इतर अनुज्ञेय कामे</u> :

केंद्र व राज्य योजनातर्गंत मंजूर पायाभूत सुविधा व आवास प्रकल्पांवरील लोकवर्गणी (मनपा हिस्सा) या वरील खर्च व असे प्रकल्प पुर्ण करण्याकामी आवश्यक ठरणारा अतिरिक्त खर्च.

उल्हासनगर शहर हे ब्रिटीशकालीन असून सदर शहराला पाणी पुरवठयाची नियोजित योजना नसल्याने संपूर्ण शहराला असमान व अनियमित पाणी पुरवठा होतो . उल्हासनगर महानगरपालिकेने उंच व सखल भागात समान तत्वावर पाण्याचे वितरण करणेसाठी १६० कोटी रुपयांची योजना हाती घेतली आहे . ही योजना केंद्र शासन पुरस्कृत जेएनएनयुआरएम योजनेतर्गत मंजूर करण्यात आलेली आहे सदर योजनेचे काम प्रगतीपथावर असून सदर योजनेत एकूण १२ उंच व बैठया टाक्या व ३०० किलोमीटर वितरण व्यवस्थेचा समावेश आहे. तथापि शहराची भौगोलिक परिस्थिती पहाता सदर योजनेच्या किंमतीत जवळपास ४० कोटी रुपयांची वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा परिस्थितीत सदर योजनेची किंमत २०० कोटी होणार असून त्यापैकी केंद्र व राज्य शासनाचा वाटा रुपये ६३ कोटी असून उर्वरित रक्कम म्हणजे १३७ कोटी उल्हासनगर महानगरपालिकेस स्वतःचा हिस्सा म्हणून गुंतवणूक करावयाची आहे . यापैकी एमएमआरडीए कडून ६३ कोटी रुपयांची कर्ज उभारणी केलेली असून उरलेली ७४ कोटी रुपयांची व्यवस्था करणे अनिवार्य आहे . जेणेकरुन प्रगतीपथावर असलेली योजना पुर्ण करणे सोयीचे होईल . त्याचप्रमाणे ई–गव्हनर्स ची ५.६२ कोटीची योजना मंजूर झाली असून सदर योजनेत महापालिकेस स्वतःचा वाटा म्हणून २.८१ कोटी रुपये गुंतवणूक करावयाची आहे.

पाणी पुरवठा योजना या पुढील ३० वर्षासाठी प्रस्तावीत असल्याने योजनेची देखभाल व दुरुस्ती, पाणी व उर्जा लेखा परिक्षण, वैयक्तिक नळ जोडण्या व पाणी बीले इत्यादी बाबींवर नियमित खर्च करणे भाग आहे जेणेकरुन योजना सुरळीत व सुस्थितीत राबविणे शक्य होईल .

तरी केंद्रीय वित आयोगाच्या शिफारसीनुसार राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकरिता प्राप्त अनुदानाचे वितरण , जेएनएनयुआरएम योजनेतर्गत घेण्यात आलेले प्रकल्प व इतर संदर्भीय बाबींवर खर्च करणेबाबत आदेशार्थ सादर.

स्थायी समिती ठराव क्र. ६६ दिनांकः–८/८/२०११

सुचकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :–श्री. जिवन इदनानी

ही स्थायी समिती उपरोक्त प्रस्तावनेत नमूद केल्याप्रमाणे केंद्रीय वित आयोगाच्या शिफारसीनुसार उल्हासनगर महानगरपालिकेस प्राप्त अनुदानाचा जेएनएनयुआरएम योजनेतर्गत हाती घेण्यात आलेली पाणी पुरवठा प्रकल्प, ई गव्हनर्स प्रकल्प, पाणी व उर्जा लेखा परिक्षण , वैयक्तिक नळ जोडण्या , पाणी बीले व पाणी पुरवठा योजना देखभाल व दुरुस्तीसाठी विनियोगास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

सायंकाळी ५.१० वाजंता सभेचे कामकाज संपल्याचे सभापती श्री. लाल पंजाबी यांनी जाहिर केले.

**(प्रकाश पं. कुकरेजा)**
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

.